# ज्ञान प्रबोधिनी

(न्यास नोंदणी क्र. एफ-२५४/पुणे)



## वार्षिक वृत्त

(राष्ट्रीय शके १९४५-४६)

दि.१ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४

दीपस्तंभ फौंडेशनतर्फे स्पर्धात्मक क्षमता संवर्धन केंद्राला मिळालेला पुरस्कार स्वीकारताना वाच. सविताताई कुलकर्णी



प्रज्ञा मानस संशोधिकेच्या प्रमुख वाच. अनघाताई लवळेकर यांना श्री. रवी पंडीत यांच्या हस्ते कार्यकर्ता गुणगौरव पुरस्कार



वेल्हे सहनिवासातल्या युवतींची मुंबई भेट





युवक विभाग – वीरव्रत संस्कार




अच्युत पालव यांनी साकारलेले सुलेखनातून अक्षरराम



स्पर्धात्मक क्षमता संवर्धन केंद्र अधिकारी भेट – गुजरात दौरा

# ज्ञान प्रबोधिनी

(न्यास नोंदणी क्र. एफ-२५४/पुणे)

# वार्षिक वृत्त

(सौर शके १९४५-४६)

दि.१ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४


| | | |
|---|---|---|
| **पत्ता** | **:** | **ज्ञान प्रबोधिनी भवन**<br>**५१०, सदाशिव पेठ,**<br>**पुणे ४११०३०** |
| **दूरभाष क्र.** | **:** | **(०२०) २४२०७०००** |
| **संकेत स्थळ** | **:** | www.jnanaprabodhini.org |
| **ई–मेल** | **:** | contact@jnanaprabodhini.org |

# ज्ञान प्रबोधिनी, पुणे
## सन्माननीय सदस्य, पदाधिकारी

### सन्माननीय सदस्य

| | |
|---|---|
| डॉ. रघुनाथ माशेलकर | माजी महासंचालक, CSIR नवी दिल्ली |
| श्री. आण्णा हजारे | सामाजिक कार्यकर्ते |
| श्रीमती अनु आगा | माजी खासदार, उद्योजिका, सामाजिक कार्यकर्त्या |
| डॉ. जयंत नारळीकर | माजी संचालक, आयुका, पुणे |
| जनरल मनोज नरवणे (निवृत्त) | माजी चीफ ऑफ आर्मी स्टाफ |

### पदाधिकारी

१. श्री. श. बा. तथा रवी पंडित (कार्याध्यक्ष)
२. वाच. गिरीश श्री. बापट (संचालक)
३. प्रा. महेंद्र के. सेठिया (कार्यवाह)
४. श्री. आशुतोष बारमुख (सहकार्यवाह)
५. श्री. मोहन चि. गुजराथी (निधिधारक)
६. श्री. सचिन गाडगीळ (संपदाधिकारी)

### कार्यकारी मंडळ

१. श्री. श. बा. तथा रवी पंडित (कार्याध्यक्ष)
२. वाच. गिरीश श्री. बापट (संचालक)
३. प्रा. महेंद्र के. सेठिया (कार्यवाह)
४. श्री. आशुतोष बारमुख (सहकार्यवाह)
५. श्री. मोहन चि. गुजराथी (निधिधारक)
६. श्री. सचिन गाडगीळ (संपदाधिकारी)
७. प्रा. वि. शं./सुभाष देशपांडे
८. प्रा. विश्वनाथ ध. गुर्जर
९. वाच. विवेक बा. कुलकर्णी
१०. वाच. सुधाताई कोठारी
११. श्री. महेश आठवले
१२. वाच. मनोज देवळेकर
१३. वाच. अनघा लवळेकर
१४. प्रा. सुवर्णा गोखले
१५. वाच. मिलिंद नाईक

### संचालक नियुक्त सदस्य

१६. प्रा. प्रशांत दिवेकर
१७. प्रा. संगीता कुलकर्णी
१८. श्रीम. शर्मिष्ठा चिपळूणकर
१९. श्रीम. विभावरी ताम्हनकर
२०. श्री. नचिकेत नित्सुरे

---

### संस्थात्मक सदस्य

१. ज्ञान प्रबोधिनी संशोधन संस्था
२. ज्ञान प्रबोधिनी शिवप्रदेश
३. ज्ञान प्रबोधिनी सोलापूर
४. ज्ञान प्रबोधिनी आयुर्विज्ञान संस्था
५. ग्राम प्रबोधिनी, साळुंब्रे

(या न्यासांचे वृत्तांत स्वतंत्रपणे प्रसिद्ध केले जातात. त्यातील काही सारांश या वृत्तात दिले आहेत.)

### संलग्न कंपन्या

१. ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ॲल्युम्नाय फौंडेशन (JPPAF)
२. ACIC Jnana Prabodhini Innovation Foundation
३. ज्ञान प्रबोधिनी फौंडेशन, अमेरिका (JPF, USA)

### केंद्रे

#### मुख्य केंद्रे

१. पुणे
२. निगडी
३. सोलापूर
४. हराळी (उस्मानाबाद)

#### उपकेंद्रे

१. पुणे केंद्र : शिवापूर, वेल्हे, शिरवळ (जिल्हा सातारा)
२. निगडी केंद्र : साळुंब्रे

#### विस्तार केंद्रे

१. अंबाजोगाई विस्तार केंद्र (जिल्हा बीड)
२. डोंबिवली विस्तार केंद्र

## ई-वृत्त पाहाण्यासाठी... विशेष रचना

(हव्या त्या वृत्तावर थेट जाण्यासाठी आधी खालील सूचना वाचा व त्यानुसार कृती करा.)

- (स्क्रोल केल्यानंतर) ‘हितगुज’चे पान येईल त्यानंतर ‘अंतरंग’चे पान दिसेल.
- अंतरंगात वृत्तातील सर्व विभागांची यादी पाहायला मिळेल. त्यापैकी ज्या विभागाविषयीचे वृत्त तुम्ही वाचू इच्छिता त्या विभागाच्या ‘शीर्षका’ला क्लिक केल्यावर तुम्ही थेट त्या विभागाच्या वृत्तावर जाऊन ते वृत्त वाचू शकाल.
- विभागाच्या वृत्ताच्या शेवटी पान क्रमांकावर क्लिक केल्यास परत तुम्ही अंतरंगावर येऊ शकाल व पुन्हा तुम्हाला हव्या त्या विभागाच्या शीर्षकावर क्लिक करता येईल.
- ज्या लेखांना क्यू आर कोड दिले आहेत तेथे क्यू आर कोडवर क्लिक केल्यावर थेट तो दुवा उघडेल व ते साहित्य ऐकता/वाचता/पाहाता येईल.

# हितगुज

ज्ञान प्रबोधिनीच्या सौर शके १९४५-४६ म्हणजेच सन २०२३-२४ च्या कामाचे वार्षिक वृत्त आपल्या हाती देताना आनंद होत आहे. प्रबोधिनीचे काम शिक्षण, संशोधन, ग्रामीण विकसन याबरोबरच उद्योजकता, राष्ट्रीय एकात्मता आणि स्त्री-शक्ती प्रबोधन या अंगांनी वाढत आहे. प्रत्येक क्षेत्रामध्ये इष्ट त्या दिशेने परिवर्तनाचे काही प्रयोग करून पाहावयाचे व त्यांच्या निष्कर्षांच्या आधारे सिद्धांत मांडावयाचे आणि सिद्धांतांच्या आधारे त्या कल्पनांचा विस्तार देशभर करावयाचा अशी प्रबोधिनीची कार्यपद्धती आहे. विस्तारातील सूत्र कायम राहावे, यासाठी जो दशवार्षिक भवितव्य लेख कार्यकर्त्यांनी तयार केला आहे, त्यातील हे दुसरे वर्ष होते. आपणच मांडलेल्या उद्दिष्टांना नेमके स्वरूप देणे, त्याची कालबद्धता ठरवणे, त्यासाठी लागणारे मनुष्यबळ व अर्थबळ उभे करण्यासाठी खटपट करणे आणि झालेल्या कामाची निष्पत्ती कशी मोजावयाची याचे निकष ठरवणे, अशी प्रक्रिया गेले वर्षभर सर्वच केंद्रांनी व त्यातील विभागांनी पार पाडली. प्रासंगिक यश अनेक विभागांनी मिळवले आणि सर्वांची मिळून वाटचाल एका वर्धिष्णू संघटनेकडे होत आहे, असे नम्रपणे नमूद करावेसे वाटते.

संपूर्ण देशाच्या पातळीवर सामाजिक, आर्थिक आणि राजकीय संदर्भात अनेक घडामोडी गेल्या वर्षभरात झाल्या. अनेक शासकीय, निम-शासकीय व खासगी संस्थांनी प्रबोधिनीच्या कामाची विशेष दाखल घेण्यास सुरुवात केली आहे, असे म्हणावेसे वाटते. अगदी मा. पंतप्रधानांच्या 'मन की बात' या कार्यक्रमाच्या शंभराव्या भागात प्रबोधिनीच्या 'पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मिती, सार्वजनिक उत्सवांमध्ये बर्चीनृत्यासारखा शिस्तबद्ध प्रकार रुजवण्याचा प्रयत्न आणि नवनिर्मितीच्या क्षेत्रातील अटल टिंकरिंग योजनेत विद्यार्थ्यांनी केलेले संशोधन' यांचा विशेष उल्लेख होता. नव्या शैक्षणिक धोरणामध्ये प्रबोधिनीच्या काही पैलूंचा समावेश कसा करता येईल, यादृष्टीने विविध समित्यांमध्ये प्रबोधिनीच्या प्रतिनिधींना पाचारण करण्यात आले. यातील चर्चांना आगामी वर्षांत अधिक नेमके स्वरूप येईल, असा विश्वास वाटतो.

पुण्यातील ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ही विशेष क्षमतावान विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणासाठी ओळखली जाते. दिल्लीच्या राज्य शासनाला येथील शिक्षण पद्धती महत्त्वाची वाटल्यामुळे तेथील काही शाळांमधील निवडक अध्यापकांची प्रबोधिनीस पुणे व निगडी येथे भेट झाली. विशेष क्षमतावान विद्यार्थी शोधण्याची शास्त्रीय पद्धत त्यांनी शिकून घेतली व आता काही दीर्घकालीन साहचर्य करण्याचा त्यांचा विचार चालू आहे. प्रबोधिनीच्या पाचही शाळांमध्ये जे विद्यार्थी प्रत्यक्ष प्रवेश घेऊ शकत नाहीत, अशा विविध ठिकाणी विखुरलेल्या विद्यार्थ्यांसाठी व त्यांच्या शिक्षकांसाठी प्रबोधिनीने अनेक नव्या रचना बसविल्या आहेत. अनेक जिल्हा-गावांमध्ये शिक्षक प्रशिक्षण वर्ग घेण्यात आले. तर विद्यार्थ्यांसाठी छात्र प्रबोधन मासिकाद्वारे 'ऐका-पाहा-वाचा-करा' असे उपक्रम मोठ्या प्रमाणावर घेण्यात आले. ग्रामीण भागामध्ये विकासमित्र, ग्रामीण प्रज्ञा विकास, आनंदी शिक्षण व अनुभवशाळा अशा विविध प्रकल्पांद्वारे विद्यार्थ्यांना बदलत्या काळाशी सुसंगत करणारे शिक्षण देण्याचा प्रयत्न गेल्या वर्षी वाढत्या प्रमाणात झाला. त्याचे सविस्तर वृत्त संबंधित विभागांनी आपल्यासाठी दिले आहे. Augmented Reality (AR) व Virtual Reality (VR) अशा आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांना विचारप्रवृत्त करणे, रूढ मार्कांच्या पलीकडे खरे शिक्षण मिळविण्याचा प्रयत्न करणे, यासाठी विविध स्पर्धा सुद्धा घेण्यात आल्या. पर्यावरणाशी जोडलेली 'निसर्गमित्र' ही स्पर्धा सुद्धा अनेक जिल्ह्यांमधील विद्यार्थ्यांनी स्वतः प्रयोग करत-करत अनुभवली. समाजाच्या सर्व सामाजिक-आर्थिक स्तरांतील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचे प्रबोधिनीचे धोरण मराठवाड्यातील बीड व धाराशिव जिल्ह्यात विशेषत्वाने राबविण्यात आले. डोंबारी, शिकलकरी, गोसावी तसेच लमाण तांड्यांवरील विद्यार्थ्यांचे शिक्षण त्यांना आवडेल अशा पद्धतीने चालू ठेवण्यासाठी नवनवीन प्रयोग करण्यात आले. भारताच्या अन्य प्रांतांमध्ये प्रबोधिनीची शिक्षण पद्धती पोहोचावी, त्यासाठी उत्तरेत अरुणाचल प्रदेश व जम्मू-काश्मिर तर दक्षिणेत तेलंगण आणि तामिळनाडू येथेही नियमित प्रयत्न करण्यात आले. प्रबोधिनीच्याच स्पर्धात्मक क्षमता संवर्धन केंद्रामध्ये शिकलेल्या ठिकठिकाणच्या शासकीय अधिकाऱ्यांचे या कामासाठी वेळोवेळी महत्त्वाचे सहकार्य लाभले.

शहरी व ग्रामीण भागात स्त्री-शक्ती प्रबोधनाचे जे उपक्रम चालू आहेत, त्यात विविध उपक्रमांची भर पडली. शालेय विद्यार्थ्यांसाठी 'विद्याव्रत' तर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी 'व्यसनांपासून संयम' असे उपक्रम मोठ्या प्रमाणावर घेण्यात आले. मुलींच्या सुरक्षिततेसाठी 'ओळख स्पर्शाची व उमलत्या वयाशी जुळवून घेताना' हे उपक्रम अनेक शाळा व महाविद्यालये यांच्यामध्ये घेतले गेले. त्यासाठी समाजातील काही जागरूक संस्थांनी मोलाचे साहाय्य देऊ केले. ग्रामीण स्त्रियांच्या प्रबोधनासाठी व आर्थिक स्वावलंबनासाठी पुणे जिल्ह्यातील वेल्हे व मावळ तालुक्यात, तसेच धाराशिव जिल्ह्यातील लोहारा तालुक्यात सातत्याने काम चालू आहे. त्यामध्ये स्थानिक

महिलांमधून गावपातळीवरील अनेक कार्यकर्त्या आत्मविश्वासाने पुढाकार घेत आहेत. हे विशेष नमूद करण्यासारखे वाटते. महिलांचा ज्यामध्ये अधिक वेळ जातो, त्या पाणी व इंधन या विषयांवर गत वर्षात भरीव काम झाले. पाणी साठवण्याच्या फेरोक्रीटच्या २८ टाक्या चार जिल्ह्यांमध्ये गावकऱ्यांच्या मदतीतून उभारण्यात आल्या आहेत. लाकूडफाटा गोळा करण्यात जाणारा वेळ व चुलीतील धुराचा त्रास वाचवण्यासाठी नेपियर गवतापासून इंधनाच्या कांड्या तयार करण्याचे यशस्वी प्रयोग गेल्या वर्षी झाले. महिलांच्या आरोग्याबाबत प्रबोधिनीच्या डॉक्टर माजी विद्यार्थिनींनी नियमितपणे ग्रामीण भागात जाऊन गत वर्षात चांगली कामगिरी केली.

प्रबोधिनीच्या निगडी केंद्रामध्ये जो जैव-तंत्रज्ञान विभाग चालतो, त्याला केंद्र शासनाने 'अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटर' अशी मान्यता दिली आहे. पुढच्या वर्षीपासून सुमारे पाच वर्षे नवनिर्मिती व उद्योजकता यांना मार्गदर्शन करण्याचे व सल्ला सेवा देण्याचे काम शासनाच्या व स्थानिक उद्योगांच्या आर्थिक साहाय्यातून सुरू होत आहे. प्रबोधिनीच्या शैक्षणिक कार्याला लाभलेला हा नवीन आयाम अनेक अर्थांनी प्रबोधिनीचे शिक्षण प्रत्यक्ष व्यवहारोपयोगी करण्यास हा प्रकल्प कारणीभूत ठरेल असे दिसते.

प्रबोधिनीने ज्या महत्त्वाच्या कार्यादिशा मांडलेल्या आहेत, त्यात राष्ट्रीय एकात्मता, स्त्री-शक्ती प्रबोधन, समूहगुणविकसन व नेतृत्वगुणविकसन या महत्त्वाच्या प्रक्रिया आहेत. यातील उपक्रमांचा विस्तार येत्या दशकात महाराष्ट्रातील सहा जिल्ह्यांमध्ये व देशातील सहा प्रातांमध्ये टप्प्याटप्प्याने व्हावा, असे नियोजन केले आहे. देशविदेशातील माजी विद्यार्थी, समाजातील हितचिंतक, औद्योगिक व व्यापारी जगतातील देणगीदार या सर्वांचेच या कार्यामध्ये योगदान लागणार आहे. आपण सर्वजण ते सातत्याने व मनःपूर्वक द्याल असा विश्वास वाटतो.

गतवर्षातला एक औपचारिक बदल म्हणजे प्रबोधिनीचे कार्यवाह म्हणून सुमारे २८ वर्षे काम करीत असणारे श्री. वि. शं. तथा सुभाष देशपांडे यांनी व सहकार्यवाह म्हणून काम करीत असणारे श्री. वि. ध. तथा विश्वनाथ गुर्जर यांनी आपला पदभार जानेवारी २०२४ मध्ये नव्या पिढीतील अनुक्रमे श्री. महेंद्र सेठिया व श्री. आशुतोष बारमुख यांच्याकडे सोपवला आहे. त्याचबरोबर ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. मोहनराव गुजराथी यांच्याकडे निधिधारक म्हणून तर श्री. सचिन गाडगीळ यांच्याकडे संपदाधिकारी म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. या नवीन पदाधिकाऱ्यांना आपणा सर्वांचे असेच सहकार्य लाभत राहो, ही विनंती. त्यांना सर्व प्रबोधिनी परिवारातर्फे हार्दिक शुभेच्छा!!

आपले स्नेहांकित,

श्री. वि. शं. तथा सुभाष देशपांडे
भूतपूर्व कार्यवाह (१९९६-२०२४)

वाच. गिरीश श्री. बापट
संचालक

अदम्य अपुल्या आकांक्षांचे गीत आजला गाऊ
जिथे जायचे ठरले तेथे, तेथे जाउच जाऊ,
आम्ही जाउच जाऊ ।। ध्रु. ।।

नवतेजाप्रत नवक्षितिजांच्या दौडत दौडत जाऊ
क्षणभर सांगुनी मनिचे हितगुज स्वप्ने नव रंगवू
नवीन कवने, नव्या कहाण्या नवस्फूर्तीने गाऊ ।। १ ।।

नसति भाषणे जीवनध्येये ही तर अमुची सारी
यत्न शिंपुनी फुलवू क्षेत्रे कर्तृत्वाची न्यारी
इतिहासाची दिशा पालटू महान मानव घडवू ।। २ ।।

कधी न रुसणे, कधी न रडणे, ना कधी थकणे, सदा पुढे चालणे
एकचि निश्चय झाला अमुचा राष्ट्र पुन्हा उभविणे
दुर्गमतेची तमा न आम्हा पाऊल पुढेच ठेवू ।। ३ ।।

निश्चय, निष्ठा, नीती यांचे कंकण बांधुन हाती
व्रतस्थ होउनि व्यापुनि टाकू विश्वाच्याही मिती
विश्वविजेते हिंदुराष्ट्र ते पुन्हा जगाला दावू ।। ४ ।।

शिक्षण संशोधन स्त्री शक्ती प्रबोधन नेतृत्व विकसन शिक्षण संशोधन सामाजिक उद्योजकता नेतृत्व विकसन राष्ट्रीय एकात्मता संघटन सामाजिक उद्योजकता आरोग्य राष्ट्रीय एकात्मता स्त्री शक्ती प्रबोधन सामाजिक आरोग्य प्रदेशविकसन आरोग्य संघटन शिक्षण संशोधन स्त्री शक्ती प्रबोधन नेतृत्व विकसन

# अंतरंग


- **मध्यवर्ती कार्यक्रम ........ ६**
- **विशेष अभिनंदन ........ ९**
- **ज्ञान प्रबोधिनी, पुणे केंद्र ........ १० ते ५५**

१. ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे ........ १०
२. शैक्षणिक उपक्रम संशोधिका ........ १३
३. शिक्षक प्रशिक्षण केंद्र ........ १६
४. शैक्षणिक साधन केंद्र ........ १८
५. छात्र प्रबोधन ........ २१
६. नेतृत्व संवर्धन केंद्र ........ २४
७. स्पर्धात्मक क्षमता संवर्धन केंद्र ........ २६
८. प्रज्ञा मानस संशोधिका ........ २९
९. संस्कृत संस्कृति संशोधिका ........ ३३
१०. सामाजिक शास्त्र अध्ययन केंद्र ........ ३५
११. नैसर्गिक संसाधने विभाग (शिवप्रदेशसह) ........ ३७
१२. कौशल्य प्रशिक्षण केंद्र, शिवापूर ........ ३९
१३. स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण) व राम-सीता पुराणिक तंत्र निकेतन, शिवापूर ........ ४१
१४. संवादिनी (मध्यवर्ती व संवादिनी विस्तार - शिरूर, खेड राजगुरूनगर, औंध, पौड, सोलापूर, भाईंदर) ........ ४४
१५. नागरी वस्ती अभ्यासगट ........ ४७
१६. जिजामाता दल ........ ४९
१७. युवक विभाग ........ ५०
१८. युवती विभाग ........ ५३
१९. उद्योजकता विकास केंद्र ........ ५५
**२०. अन्य राज्यांमधील विस्तार ........ ५६**

- **महाराष्ट्रातील अन्य मुख्य केंद्रे / उप केंद्रे / विस्तार केंद्रे / संलग्न न्यास ........ ५८ ते ८४**

२१. ज्ञान प्रबोधिनी, निगडी केंद्र ........ ५८
२२. ज्ञान प्रबोधिनी, सोलापूर केंद्र ........ ६३
२३. ज्ञान प्रबोधिनी, हराळी केंद्र ........ ६७
२४. ज्ञान प्रबोधिनी, साळुंब्रे उपकेंद्र ........ ७१
२५. अंबाजोगाई विस्तार केंद्र ........ ७३
२६. डोंबिवली विस्तार केंद्र ........ ७५
२७. ठाणे स्थायी संपर्क केंद्र ........ ७७
२८. चिपळूण स्थायी संपर्क केंद्र ........ ७८
२९. बदलापूर अस्थायी संपर्क केंद्र ........ ७९
३०. ज्ञान प्रबोधिनी आयुर्विज्ञान न्यास संचालित कमला मेहता नेत्र रुग्णालय, शिरवळ ........ ८०
३१. ज्ञान प्रबोधिनी फौंडेशन (JPF) ........ ८१
३२. ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ॲल्युमनाय फौंडेशन (JPPAF) ........ ८२
३३. एसीआयसी ज्ञान प्रबोधिनी इनोव्हेशन फौंडेशन ........ ८४

- **सन्माननीय देणगीदार ........ ८५**






# मध्यवर्ती कार्यक्रम

### ❖ ज्ञान प्रबोधिनी, पुणे वार्षिक सर्वसाधारण सभा ❖

दि. २७ जाने. २४ रोजी ज्ञान प्रबोधिनी, पुणे न्यासाची वार्षिक सर्वसाधारण सभा झाली. सभेच्या अध्यक्षस्थानी डॉ. रघुनाथजी माशेलकर होते. या वर्षीच्या सभेत कार्यकारी मंडळाच्या सदस्यांची निवड करण्यात आली. कार्यवाह म्हणून प्रा. महेन्द्र सेठिया तर सहकार्यवाह म्हणून श्री. आशुतोष बारमुख यांनी जबाबदारी स्वीकारली. तसेच पुढील तीन वर्षांसाठी श्री. मोहन गुजराथी यांची निधिधारक आणि श्री. सचिन गाडगीळ यांची संपदाधिकारी म्हणून निवड झाली. संरक्षण संशोधन व विकास संस्थेच्या (DRDO) उप-संचालिका व प्रबोधिनीच्या माजी विद्यार्थिनी सौ. विभावरीताई अभ्यंकर-ताम्हनकर यांची प्रबोधिनीच्या कार्यकारी मंडळावर नियुक्ती झाली. तसेच माजी लष्करप्रमुख मा. मनोज नरवणे यांनी प्रबोधिनीचे सन्मान्य सदस्यत्व स्वीकारले. डॉ. रघुनाथजी माशेलकर यांनी उपस्थितांशी संवाद साधताना प्रबोधिनीच्या कामाविषयी आनंद व्यक्त केला. देशाने गरूडझेप घेण्यासाठी अशा संस्था आवश्यक आहेत, असे त्यांनी सांगितले. संचालक वा. गिरीशराव बापट यांनी 'जगातील बदलांना सामोरे जाण्यासाठी आपली सामूहिक कामातली तत्परता यापुढे खूप वाढावी लागेल व दहा वर्षांचा भवितव्य लेख प्रत्यक्षात आणण्यासाठी वेगाने काम करणे, स्वतःला झपाट्याने बदलणे असे सर्व करावे लागेल,' असे समारोपात सांगितले.

### ❖ रूप पालटू व्याख्यानमाला ❖

ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक कै. आदरणीय आप्पांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने आठ वर्षांपूर्वी 'रूप पालटू' व्याख्यानमाला सुरू केली गेली. देशप्रश्नांवर जागरण व प्रबोधन व्हावे हा या व्याख्यानमालेचा उद्देश आहे. या व्याख्यानमालेच्या नवव्या पुष्पात ज्ञान प्रबोधिनी प्रशालेच्या १९८२च्या तुकडीचे डॉ. वामन पारखी हे मुख्य वक्ते होते. 'अमृतकाळातील भारत-अर्थव्यवस्थेची भरारी व देशांतर्गत आव्हाने' या विषयावर त्यांनी मांडणी केली. अर्थव्यवस्थेच्या इतिहासाचा मागोवा घेत पुढची वाटचाल कशी असेल, त्यात सर्वसामान्य नागरिकांची भूमिका काय असली पाहिजे याबद्दलचे विचार त्यांनी मांडले. प्रत्यक्ष २०० तसेच दूरस्थ ५०-६० जण व्याख्यानाला उपस्थित होते. मा. विवेकराव कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले तर मा. संचालकांनी कार्यक्रमाचा समारोप केला.

### ❖ ज्ञान प्रबोधिनी : एक परीसस्पर्श ❖

ज्ञान प्रबोधिनी प्रशालेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त प्रशालेच्या पहिल्या दहा वर्षांतील ५१ ज्येष्ठ विद्यार्थ्यांचे अनुभव ५१@५१ या लेखमालेअंतर्गत दूरस्थ स्वरूपात प्रकाशित केले होते. ही लेखमाला 'ज्ञान प्रबोधिनी : एक परीसस्पर्श' या नावाने पुस्तकरूपाने प्रकाशित

करण्यात आली. प्रबोध शाळेचे पहिल्या तुकडीचे विद्यार्थी श्री. अरुणजी कुदळे यांच्या हस्ते हा कार्यक्रम झाला. जुन्या आठवणींना उजाळा देत आणि अनेक दाखले देत त्यांनी त्यांचे मनोगत मांडले. या कार्यक्रमात प्रबोध शाळा आणि प्रशालेचे विद्यार्थी तसेच ज्यांच्या गोष्टी या पुस्तकात समाविष्ट आहेत असे सुमारे १२५ जण प्रत्यक्ष आणि काहीजण दूरस्थ पद्धतीने उपस्थित होते. मा. प्राचार्य मिलिंदराव नाईक यांनी प्रास्ताविक केले. मा. अजितराव कानिटकर यांनी कार्यक्रमाचा समारोप केला.

### ❖ मन की बात ❖

'मन की बात' या पंतप्रधानांच्या संवादात्मक कार्यक्रमाच्या शंभराव्या भागाच्या निमित्ताने आजपर्यंत या कार्यक्रमात ज्या-ज्या व्यक्तींचे, संस्थांचे उल्लेख मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहेत, अशा महाराष्ट्रातील तेरा संस्था/व्यक्तींना मुंबईत कार्यक्रमासाठी निमंत्रित करण्यात आले होते. प्रबोधिनीचे सोलापूरचे पर्यावरण पूरक गणपती तयार करण्याचे काम, गणेशोत्सवात बर्ची नृत्याची सुरुवात झाल्यामुळे वातावरणात झालेला बदल, अटल मधला एक संशोधन प्रकल्प या तीन उपक्रमांचा उल्लेख मा. पंतप्रधानांनी यापूर्वी कधी ना कधी 'मन की बात' मध्ये केला होता. त्यामुळे ज्ञान प्रबोधिनी संस्थेलाही मुंबईतील कार्यक्रमाचे निमंत्रण होते. प्रबोधिनीच्या वतीने मुंबईत झालेल्या कार्यक्रमात ज्ञान प्रबोधिनी निगडी केंद्रातून केंद्र प्रशासक श्री. शिवराज पिंपुडे व विद्यालयाचे पर्यवेक्षक श्री. सुधीर कुलकर्णी उपस्थित राहिले होते. राज्यपाल मा. रमेश बैस यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. त्याच दिवशी पुण्यातील अशा संस्थांचा सत्कार समारंभ आयोजित केलेला होता. त्या कार्यक्रमाला ज्ञान प्रबोधिनीचे प्रतिनिधी म्हणून युवक कार्यकर्ते स्वप्नीलदादा इंदापूरकर आणि युवती कार्यकर्त्या प्रज्ञाताई अक्कलकोटकर हे दोघे उपस्थित होते. पुण्याचे माजी महापौर श्री. मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते त्यांनी प्रबोधिनीतर्फे सत्कार स्वीकारला. दोन्ही कार्यक्रमांमध्ये अन्य संस्था संघटनांशी परिचयाची संधी यानिमित्ताने घेता आली.

### ❖ विशेष संस्कार उपक्रम ❖

१. **वीरव्रत :** पुणे केंद्र युवक विभागात वीरव्रताचा प्रयोग क्र. १ हा जानेवारी २०२३ पासून सुरू झाला होता. या प्रक्रियेत मार्गदर्शक गटातील सदस्यांनी सहभाग घेऊन एक-एक 'व्रतमित्र' निवडला होता. सहभागी व्रतार्थींनी आपापल्या व्रतमित्राशी बोलून स्वावलंबन, उद्यमशीलता, नेतृत्त्व, आत्मनिवेदन व लवचिकता, ध्येयप्रेरणा, व संघर्ष अशा सहा गुणांच्या अनुषंगाने स्वतःला घडवण्यासाठी आव्हाने घेऊन ती पूर्ण केली. या गटाची तयारी म्हणून काही विशेष सत्रे झाली. 'संघर्ष' या गुणावर मा. सुभाषराव देशपांडे व 'उद्यमशीलता' या गुणावर मा. संतोषराव गोंधळेकर यांनी अनुभवकथन केले. स्वतःचा व्यवसाय करणाऱ्या दादांनी स्वतः अनुभवलेले वीरव्रत उलगडून सांगितले. मा. संचालकांनी 'वीरव्रतींचा विकासमार्ग' या विषयावर व्रतार्थींना मार्गदर्शन केले. प्रक्रियेत सहभागी ३६ व्रतार्थी व १८ व्रतमित्रांनी दि. १३ ऑगस्ट २३ ला झालेल्या वीरव्रत ग्रहण समारंभात वीरव्रत घेतले.

२. **आचार्यव्रत प्रशिक्षण शिबिर :** ज्ञान प्रबोधिनी शैक्षणिक उपक्रम प्रकल्पांतर्गत अध्यापकांसाठी दि. २८ ते ३१ डिसें. या कालावधीत आचार्यव्रत प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरापूर्वी आचार्य व्रत घेणाऱ्या अध्यापकांना आचार्य व्रताची संकल्पना समजावून सांगून काही अभ्यासकार्य पण दिले होते. शिबिरामध्ये उपासना, चेतना व्यायाम, पारायण, अभिवाचन सत्र, स्वाध्याय गटकार्य, खेळ, भजनसंध्या, अनुभवकथन अशी सत्रे होती. हे शिबिर गाथा मंदिर, देहू येथे झाले. आचार्य हा ज्ञानाचे, कर्माचे आणि सेवेचे व्रत घेणारा आणि ते व्रत जोपासणारा असावा. साधुत्व, ज्ञानत्व आणि वात्सल्यत्व या तीन गोष्टी आचार्यांकडे असाव्यातच. आचार्यांकडे प्रथमोपचार, उपजीविका, निर्णय क्षमता, भावना, विचार, प्रेरणा, उपक्रम याबाबतीत स्वावलंबन असावे. त्यांनी कुटुंब, मित्रपरिवार, देश, मानवता आणि निसर्ग अशा आधुनिक पंचायतनाचा विचार केला पाहिजे. आचार्यांकडे दूर ग्रहण, दूर प्रक्षेपण आणि शक्ती प्रदानता या क्षमता असाव्यात. अशा महत्त्वाच्या विषयांवर ज्ञान प्रबोधिनीचे संचालक वाच. गिरीशराव बापट यांनी मार्गदर्शन केले.

### ❖ प्रतिज्ञाग्रहण ❖

ज्ञान प्रबोधिनीच्या पुणे, निगडी, हराळी केंद्रांवर मागील वर्षभरात प्रतिज्ञाग्रहणाचे कार्यक्रम झाले. विविध युवक-युवती तसेच प्रौढ महिला व पुरुष सदस्यांनी यामध्ये ज्ञान प्रबोधिनीची प्रथम, द्वितीय अथवा तृतीय प्रतिज्ञा घेतली. एकूण ४३ कार्यकर्त्यांनी देशसेवेची प्रथम प्रतिज्ञा घेतली. नऊ कार्यकर्त्यांनी ज्ञान प्रबोधिनीच्या माध्यमातून काम करण्याविषयीची द्वितीय प्रतिज्ञा घेतली. तर एकूण सात कार्यकर्त्यांनी पुढील काही वर्षांसाठी प्रबोधिनीने सुचवलेले प्राधान्याचे काम करण्याविषयीची तृतीय प्रतिज्ञा घेतली.

### ❖ अध्यापक प्रशिक्षण शिबिरे ❖

१. **पूर्व प्राथमिक-प्राथमिक शिक्षण :** या कार्यदिशेने काम करणाऱ्या प्रबोधिनीच्या सर्व केंद्रांतील सदस्यांसाठी तीन दिवसांचे प्रशिक्षण शिबिर झाले. एकूण ७५ शिक्षक याला उपस्थित होते. पंचकोशाधारित शिक्षण आणि त्यावरील उपक्रमांचे नियोजन कसे करावे यावर मार्गदर्शन व चर्चा सत्रे यात योजली होती. पाठ टाचणं मार्गदर्शन, आचार्यव्रत पालकांपर्यंत पोहोचवण्याच्या विविध पद्धती, आचार्यव्रत स्वीकारलेल्या सदस्यांचे अनुभवकथन, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे विषयही यात घेण्यात आले. सोलापूर, हराळी व निगडी केंद्रावर आजपर्यंत घेण्यात आलेल्या सर्व उपक्रमांचे पंचकोशनिहाय वर्गीकरण केले गेले. त्यातील एकूण २६ उपक्रम तीन केंद्रांवर वर्षभर

घेण्याचे ठरवले गेले.

२. **माध्यमिक शिक्षण :** प्रबोधिनीच्या प्रशालांमधील अध्यापकांची केंद्रशः प्रशिक्षण शिबिरे झाली. निगडी, सोलापूर, हराळी, साळुंब्रे येथे झालेल्या या शिबिरांमध्ये विविध विषयांवर प्रशिक्षण सत्रे झाली. उपचारात्मक अध्यापन पद्धती, विद्यार्थ्यांमधील भाषिक, लेखन व गणिती अक्षमता कशी ओळखावी, अध्यापकांचा विद्यार्थ्यांकडे पाहण्याचा दृष्टीकोन, अधिमित्र संकल्पना, भवितव्य लेखाचा आढावा, कार्यसंकल्प मांडणी, गृहभेटी, विद्यार्थी संवाद, वर्ग सभा, साप्ताहिक भेटी अशा विविध सत्रांचे आयोजन केंद्रांनी यामध्ये केले होते. तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व प्रबोधिनीतील शिक्षण, सर्वसाधारण प्रबोधिनीपण, विद्यारंभ ते विद्याव्रत, पालकांशी संवाद कसा करावा, सदस्यांच्या इंग्रजी भाषिक क्षमता वाढवण्यासाठी प्रशिक्षण अशी अनेक सत्रे नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला झाली.

## ❖ स्त्री-शक्ती प्रबोधन अभ्यासदौरा ❖

स्त्री-शक्ती प्रबोधन कार्यदिशेचा वर्धा अभ्यासदौरा दि. १५ ते १९ जाने. २४ या कालावधीत झाला. पुणे, डोंबिवली, बोरीवली, वेल्हे, हराळी, साळुंब्रे, सोलापूर या सात केंद्रांवरून एकूण ३९ सदस्या या अभ्यासदौऱ्यात सहभागी झाल्या होत्या. पू. विनोबाजींचे स्त्री-शक्ती जागरणाविषयी विचार समजून घेणे, गांधी विचार प्रत्यक्ष आपल्या जीवनात उतरवणाऱ्या विभूतींना प्रत्यक्ष भेटणे, ऐकणे आपल्या कामासाठी प्रेरणा घेणे हा या दौऱ्याचा मुख्य हेतू होता. त्यादृष्टीने नई तालीमचे व्यवस्थापक श्री. प्रभाकरजी पुसदकर, मगन संग्रहालयाच्या अध्यक्षा श्रीमती विभाजी गुप्ता, पवनार आश्रमात भूदान चळवळीनंतर रहायला आलेल्या ९३ वर्षांच्या आ. उषादीदी, आ. गौतमजी बजाज, गांधी विचाराने प्रेरित होऊन इंजिनिअर असूनही शेती करणारे श्री. मंदार देशपांडे, श्री. वसंतरावजी फुटाणे या सगळ्या दिग्गज व्यक्तींच्या भेटी झाल्या. याशिवाय सेवाग्राम फिरून पाहणे, मगन संग्रहालय पाहणे, गीताई मंदिरातील जोडीकार्य हे सर्व भारावून टाकणारे होते.

## ❖ राजभवनातील स्नेहमेळावा ❖

स्वातंत्र्य दिनाच्या संध्याकाळी पुणे येथील राजभवनात विविध क्षेत्रातील संस्थांच्या प्रतिनिधींचा स्नेह मेळावा आयोजित करण्यात आला होता. शैक्षणिक, सामाजिक संस्थांबरोबर पोलीस, लष्करी दलातील अधिकारीही उपस्थित होते. मा. राज्यपाल रमेशजी बैस यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. ज्ञान प्रबोधिनीचे प्रतिनिधी म्हणून निगडी केंद्राचे केंद्र प्रशासक श्री. शिवराज पिंपुडे यांना या मेळाव्याचे निमंत्रण होते. यानिमित्ताने अनेकांशी अनौपचारिक संवाद साधता आला.

## श्रद्धांजली

१. ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्रा. राम ताकवले यांचे १४ मे रोजी दुख:द निधन झाले. त्यांनी पुणे विद्यापीठ, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ यांची कुलगुरू पदे भूषवली. तसेच ते महाराष्ट्र ज्ञान मंडळाचे (MKCL) चे संस्थापक सदस्य होते. प्रा. ताकवले ज्ञान प्रबोधिनी संशोधन संस्थेच्या अध्यक्ष पदावर १९९९ ते २०१० अशी सुमारे दहा वर्षे कार्यरत होते. गाव पातळी ते राष्ट्रीय पातळीपर्यंत कसे संशोधन करता येईल, याचे मार्गदर्शन ते करत असत. प्रबोधिनीने अद्ययावत गोष्टी स्वीकारून जगाबरोबर राहायला हवे, पण त्याचबरोबर सर्व गोष्टीत समतोल ठेवावा असे त्यांचे सांगणे असायचे. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

२. ज्ञान प्रबोधिनीच्या संस्थापक सदस्यांपैकी एक वाच. सुरेशराव धायगुडे यांचे गत वर्षामध्ये दुःखद निधन झाले. संस्कृतमध्ये एम्.ए. व विद्यावाचस्पती आणि इंग्रजी विषयात विद्यावाचस्पती पदवी त्यांनी प्राप्त केली होती व ३३ वर्षे प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. प्रबोधिनीशी त्यांचा राष्ट्रजागृती मंडळापासून संबंध होता. त्यांच्या अनुभवाचा आणि मार्गदर्शनाचा लाभ अनेक वर्षे प्रबोधिनीला झाला आहे. त्यांच्या निधनामुळे प्रबोधिनीने एक हितचिंतक व मार्गदर्शक गमावला. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

३. ज्ञान प्रबोधिनीच्या कार्यकारी मंडळावरील ज्येष्ठ सदस्य, सामाजिक बांधिलकी जोपासणारे बांधकाम व्यावसायिक श्री. रामकुमार राठी यांचे दि. २३ नोव्हें. २३ रोजी दुःखद निधन झाले. सुमारे साठ वर्षांपूर्वी त्यांनी पुण्यामध्ये बांधकाम व्यवसायाची सुरुवात केली. ते सामाजिक कार्यातही अग्रेसर होते. ते प्रबोधिनीचे १९८१ सालापासून सदस्य मंडळाचे तर १९८४ सालापासून कार्यकारी मंडळाचे सदस्य होते. त्यांच्या अनुभवाचा आणि मार्गदर्शनाचा लाभ गेली अनेक वर्षे प्रबोधिनीला झाला आहे. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

४. लेखक श्री. दत्तात्रय टोळ यांचे दुःखद निधन झाले. छात्र प्रबोधनच्या संपादक मंडळात अनेक वर्षे ते सक्रीय सदस्य होते. तसेच काही काळ संत्रिकेसाठी पौरोहित्य करीत होते. नातू फौंडेशनच्या कार्यातही मुख्य विश्वस्त या नात्याने त्यांनी भरीव योगदान दिले. प्रबोधिनीसह अनेक संस्थांना त्यांनी अर्थसाहाय्य उपलब्ध करून दिले. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

५. डॉ. विनयबाला मेहता यांचे दुःखद निधन झाले. डॉ. मेहता यांनी प्रदीर्घकाळ अध्यापन, व्यवस्थापन, प्राचार्य पद अशा विविध जबाबदाऱ्या सांभाळून निवृत्ती घेतल्यानंतर सुमारे बारा वर्षे ज्ञान प्रबोधिनी प्रज्ञा मानस संशोधिकेमध्ये शालेय मानसशास्त्र पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाची घडी बसवण्यात मोलाचे योगदान केले. त्यांचा सातत्याने मानसज्ञांशी व विभागातील ज्येष्ठ सदस्यांशी संपर्क आणि संवाद होता. संशोधन संस्थेच्या कामाला देणगी देऊन बहुमोल मदतही केली होती. त्यांच्या स्मृतीस आदरांजली!

# विशेष अभिनंदन

१. 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' स्पर्धेमध्ये ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी या शाळेस महानगरपालिका गटात राज्यातील प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले.

२. 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' या योजनेअंतर्गत ज्ञान प्रबोधिनी हराळी विद्यालयास तालुका स्तरावर द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. त्यानिमित्त ज्ञानज्योती बहुउद्देशीय सामाजिक संस्थेमार्फत देखील विद्यालयाचा सत्कार झाला.

३. ज्ञान प्रबोधिनी स्पर्धा परीक्षा केंद्राला दीपस्तंभ फाऊंडेशन, जळगाव यांच्याकडून भारतीय प्रशासनामध्ये उत्कृष्ट कार्यक्षम अधिकाऱ्यांची साखळी निर्माण केल्याबद्दल स्वामी विवेकानंद पुरस्कार देण्यात आला. विभागप्रमुख वाच. सविता कुलकर्णी यांनी पुरस्कार स्वीकारला.

४. समतोल दिवाळी अंक २२ ला तीन पुरस्कार मिळाले. १. अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघातर्फे आयोजित दिवाळी अंक स्पर्धा – संकीर्ण विभागात प्रथम, २. रोटरी क्लब ऑफ पुणे लोकमान्य नगर आणि रोटरी क्लब ऑफ पुणे पर्वती यांच्या वतीने आयोजित दिवाळी अंक स्पर्धा, स्त्री–पुरुष आणि कुटुंब विषयक विभाग – द्वितीय, ३. मराठबोली दिवाळी अंक स्पर्धा – द्वितीय (विभागून).

५. फेब्रुवारी २४ मध्ये आळंदी येथे झालेल्या पू. स्वामीजी गोविंददेव गिरी महाराजांच्या गीताभक्ती अमृतमहोत्सवात आयोजित मातृशक्ती परिषदेत ज्ञान प्रबोधिनी सोलापूरच्या विश्वस्त वाच. स्वर्णलताताई भिशीकर यांचा सन्मान पू. स्वामीजींनी केला.

६. सोलापूर केंद्राच्या पौरोहित्य विभागप्रमुख वाच. अपर्णाताई कल्याणी यांना लायन्स क्लब ऑफ सोलापूर सेन्ट्रल व ह. दे. प्रशाला सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'प्राचार्य के.पी. मंगळवेढेकर लायन्स गुणवंत शिक्षक पुरस्कार' मिळाला. त्यांना स्व. श्री. विश्वनाथजी करवा स्मृतिपुरस्कार देखील मिळाला.

७. सोलापूर प्रबोधिनीतील प्राणायाम वर्गप्रमुख अंबिकाताई म्याकल व व्यसनमुक्ती उपक्रमप्रमुख डॉ. श्रुतीताई तारापुरे यांना ऑल इंडिया केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन यांच्या वतीने जगन्नाथ शिंदे व मनोरमा नाईक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

८. सोलापूर प्रबोधिनीतील मणिपूर सहनिवासप्रमुख श्री. अंनत अल्लिशे यांना उमरगा येथे लिंगायत समाज जिल्हा धाराशिव बसवरत्न बहुउद्देशीय संस्था यांच्यातर्फे बसवरत्न पुरस्कार देण्यात आला.

९. स्त्री–शक्ती प्रबोधन, ग्रामीण विभागाच्या भारतीताई खासबागे यांना रोटरी तर्फे नवदुर्गा पुरस्काराने गौरविण्यात आले.

१०. नैसर्गिक संसाधने विभागाचे वेल्हे तालुक्यातील खोपडेवाडी गावातील कार्यकर्ते श्री. सुनील जोरकर यांना यंदाचा फेरोसिमेंट सोसायटीचा उत्कृष्ट फेरोसिमेंट कारागीर हा पुरस्कार मिळाला.

११. मातृमंदिर विश्वस्त संस्थेतर्फे प्रज्ञा मानस संशोधिकेच्या विभागप्रमुख वाच. अनघाताई लवळेकर यांना कार्यकर्ता गुणगौरव पुरस्कार देण्यात आला.

१२. डोंबिवलीतील फ्रेंड्स वाचनालयातर्फे महिला दिनानिमित्त केंद्राच्या डोंबिवली पौरोहित्य गटातील पुरोहितांचा सन्मान करण्यात आला.

१३. राष्ट्रीय शैक्षणिक अनुसंधान आणि प्रशिक्षण परिषद यांच्या नावीन्यपूर्ण अध्यापन पद्धती आणि अध्ययन–अध्यापन साहित्य या कृती गटासाठी प्रा. प्रशांत दिवेकर यांची निवड करण्यात आली. हा गट नवीन शैक्षणिक धोरणातील राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यानुसार पाठ्यपुस्तके तयार करण्यासाठीची मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्याचे काम करेल.

१४. ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील अध्यापक हृषिकेशदादा कुलकर्णी व श्रेयसदादा फापाळे M.Ed. CET प्रवेश परीक्षेत महाराष्ट्रात अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांकांनी उत्तीर्ण झाले.

**ज्ञान प्रबोधिनी परिवारातील अनेक अधिकाऱ्यांना उत्कृष्ट सेवेसाठी पुरस्कार मिळाले. त्यातील राष्ट्रीय स्तरावरील काही पुरस्कार**

१. श्री. प्रवीण इंगवले (एस.पी, एन.आय.ए., मुंबई) : Union Home Minister Medal for Excellence in Investigation २०२३

२. शीतल तेली उगळे (IAS, महानगरपालिका आयुक्त, सोलापूर) : राष्ट्रीय पातळीवर सोलापूर शहराला 'इंडिया स्मार्ट सिटी' पुरस्कार

३. श्री. अनिरुद्ध जेवळीकर (उपसचिव, नगर विकास विभाग, महाराष्ट्र) : स्वच्छ भारत अभियानातील सर्वोत्कृष्ट राज्याचा पुरस्कार

४. श्री. अभिजित राऊत (IAS, नांदेड, महाराष्ट्र) : माझी वसुंधरा अभियान ३.० अंतर्गत पर्यावरणाचे संवर्धन, संरक्षण व जतन करण्यासाठी केलेल्या कामगिरीबद्दल उत्कृष्ट जिल्हाधिकारी म्हणून सन्मानित

५. श्री. गिरीश दापकेकर (साहा. आयुक्त, पाचगणी नगरपरिषद, सातारा) : माझी वसुंधरा अभियान ३.० अंतर्गत पाचगणी नगरपरिषदेला प्रथम पुरस्कार






# १. ज्ञान प्रबोधिनी प्रशाला

### ❖ विशेष उल्लेखनीय ❖

१. **मा. पंतप्रधानांकडून ज्ञान प्रबोधिनी प्रशालेच्या विद्यार्थ्यांचे कौतुक – एलिफायर प्रकल्प :** दि. २९ जुलै २३ रोजी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला तीन वर्षे पूर्ण झाली. यानिमित्ताने दिल्ली येथे प्रगती मैदानावर भरलेल्या 'अखिल भारतीय शिक्षा संगम' या संमेलनात भारतभरातील निवडक प्रकल्पांचे प्रदर्शन लावले होते. प्रशालेतल्या इ. १०वीच्या विद्यार्थ्यांनी बायोमिमिक्री या विषयांतर्गत केलेल्या 'एलिफायर' या प्रकल्पाची या प्रदर्शनात निवड झाली. हत्तीच्या सोंडेप्रमाणे हालचाल करून आग विझवणारे एलिफायर हे स्वयंचलित यंत्र बायोमिमिक्री शास्त्राचा वापर करून विद्यार्थ्यांनी तयार केले. याचा फायदा सर्व दिशांना अचूकपणे अग्निशमन करण्यासाठी होऊ शकतो. या यंत्राने आग लागलेल्या ठिकाणच्या तापमानाचा अंदाज घेऊन दुरूनच अग्निशमन करता येऊ शकेल. यामुळे अग्निशामक दलाच्या जवानांची होणारी हानी कमी होऊ शकेल. या प्रकल्पाच्या स्टॉलला मा. पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी यांनी भेट दिली.

२. **दिल्ली शिक्षण विभाग अभिषिक्त प्रकल्प :** दिल्ली सरकारतर्फे विशेष क्षमतावान विद्यार्थ्यांसाठी 'अभिषिक्त' या नावाने १५ केंद्रे सुरू करण्यात येणार असून, यात त्यांच्या क्षमता संवर्धनासाठी विशेष योजना असणार आहेत. प्रबोधिनी सुमारे ६० वर्षे या प्रकारचे काम करीत आहे. त्यामुळे ज्ञान प्रबोधिनीचे अनुभव, उपक्रम जाणून घेण्यासाठी, दिल्ली शिक्षण विभागाच्या माजी उपसंचालिका श्रीमती निरूपमा अभ्यंकर यांच्या पुढाकारातून दिल्ली शिक्षण विभागाचे उपसंचालक डॉ. सुधाकर गायकवाड आणि 'अभिषिक्त' प्रकल्पाच्या विशेष कार्यकारी अधिकारी उषाराणी यांच्या नेतृत्वाखाली दिल्ली सरकारच्या शिक्षण विभागातील निवडक ३० शिक्षक आणि काही पदाधिकारी यांनी दि. १९ ते २४ फेब्रु. २४ या काळात प्रशालेमध्ये प्रशिक्षण घेतले. या प्रशिक्षणाचा मुख्य हेतू विशेष क्षमतावान विद्यार्थ्यांची निवड प्रक्रिया कशी असते ते जाणून घेणे, त्यासाठीच्या अभ्यासक्रम-योजना, नावीन्यपूर्ण उपक्रम, प्रबोधिनीतील वेगळ्या शैक्षणिक उपक्रमांविषयी व विशेषतः बुद्धिवंतांच्या शिक्षणाचे तत्त्वज्ञान याविषयी माहिती करून घेणे असा होता. या कामाचा पुढचा टप्पा म्हणून दिल्ली येथे शिक्षक प्रशिक्षण झाले. त्याचे वृत्त 'अन्य राज्यांमधील विस्तार' या अंतर्गत आले आहे.

३. **प्रशालेस मान्यवरांच्या भेटी :**

१. श्री. यतीन्द्र शर्मा (संघ प्रचारक) – अखिल भारतीय सहसंगठन मंत्री, केंद्र लखनऊ
२. श्रीराम आरावकर (संघ प्रचारक) – अखिल भारतीय सहसंगठन मंत्री, विद्या भारती अखिल भारतीय शिक्षा संस्थान
३. श्री. साद पानसरे – हिंद एज्युकेशन अँड सोशल फाऊंडेशन लीड स्कूल, बावधन

४. डॉ. शांती अशोकन (संचालक), प्रा. कनकलक्ष्मी सुब्रमण्यम (प्राचार्य) – डी.ए.व्ही. पल्लीकरणाई
५. श्री. कौशिक नागसुब्रमण्यम (अध्यापक) – डी.ए.व्ही. ग्रुप ऑफ स्कूल्स, चेन्नई

### ❖ गणेशोत्सव ❖

गणेशोत्सवामधे दप्तराविना शाळेचे आयोजन करण्यात आले. या काळात विविध पाहुणे दैनंदिन पूजेमध्ये सहभागी झाले. त्यामध्ये राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेतील सौ. अनुराधा ओक (सचिव), सौ. शोभा खंदारे (सहसंचालक), सौ. नेहा बेलसरे (उपसंचालक), सौ. कमलादेवी आवटे (उपसंचालक) यांचा एकेक दिवस सहभाग होता. ॲड. राजेंद्र शाळीग्राम (शैक्षणिक संस्था कायदेशीर सल्लागार), ह. भ. प. चारुदत्तबुवा आफळे (राष्ट्रीय कीर्तनकार), सौ. संध्या गायकवाड (शिक्षणाधिकारी, प्राथमिक विभाग, जिल्हा परिषद, पुणे), प्रा. महेंद्रभाई आणि स्वप्नीलाताई सेठिया (ज्ञान प्रबोधिनी) यांनी देखील सहभाग घेतला.

शुभेच्छापत्र बनवणे, पत्रलेखन, मुखपृष्ठ बनवणे, प्रश्नमंजुषा, बातमीलेखन अशा विषयांवर वर्गशः स्पर्धा झाल्या. आर्थिक साक्षरता, प्रथमोपचार, पाककला, हस्तकला, बाजाराची ओळख, आरोग्य, अन्नप्रक्रिया उत्पादन, डिझाईन थिंकीग अँड इनोव्हेशन, पर्यटन क्षेत्राची ओळख अशा विषयांवर व्यावसायिक कार्यशाळा झाल्या. इ. ५वी ते ८वीच्या वर्गांसाठी अभिव्यक्ती सादरीकरण झाले. त्यामध्ये श्री. मिलिंद तुळाणकर यांचे जलतरंग वादन, प्रांजली बर्वे, दिग्विजय देशमुख, जयंत साने यांचे गायन, रमा कुकनुर आणि गटाचे नृत्यकथा सादरीकरण झाले. पालक अभिव्यक्ती गटाने गर्जा महाराष्ट्र हा कार्यक्रम व श्री. सारंग मांडके व श्री. सारंग भोईरकर यांनी ‘गोष्ट इथे संपत नाही’ हा कार्यक्रम सादर केला. चित्रकार श्री. चिंतामणी हसबनीस यांची मुलाखत देखील झाली. इ. ९वी व १०वीच्या वर्गांसाठी पुढील व्याख्याने झाली – अमृत काळातील भारत, चिरंतन विकासातील आव्हाने, विकसित व्यक्तिमत्त्व आणि समाज, समान नागरी कायदा, भारतीय ज्ञान परंपरा, शाश्वत विकासात वंचित घटकांची भागीदारी.

### ❖ विशेष व्याख्याने / कार्यक्रम ❖

१. सीबीएसईतर्फे मुख्याध्यापकांसाठी मुंबई येथे आयोजित केलेल्या २९व्या सीबीएसई सहोदय स्कूल कॉम्प्लेक्सेस २३–२४ परिषदेत Lead the Change या विषयावर प्राचार्य मिलिंदराव नाईक यांनी मांडणी केली.
२. इयत्तांनुसार व्याख्याने – आकाशकंदीलांची कार्यशाळा, प्लास्टिक जनजागृती, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राची माहिती, योगी अरविंद यांचे चरित्र, लेखक तुमच्या भेटीला, डीआरडीओ संस्थेबद्दल माहिती व संशोधक होण्यासाठी लागणारी विविध कौशल्ये, Synthetic biology ओळख, भूशास्त्र.

**प्रशालेय विद्यार्थ्यांचे २३–२४च्या शालान्त परीक्षेतील यश**

१. एकूण विद्यार्थी – ७९ / उत्तीर्ण विद्यार्थी – ७९ / शालेय सरासरी – ९३.९६ %
२. कु. रमा मंदार जोशी ही विद्यार्थिनी ९८.४ % गुण मिळवून प्रथम
३. सर्व ७९ विद्यार्थ्यांना ८०% पेक्षा अधिक गुण

३. स्वातंत्र्यदिनानिमित्त आसाम व मणिपूरमधील सद्यस्थिती – समज व गैरसमज यावर इ. ९वी–१०वीसाठी व्याख्यान झाले.
४. प्रजासत्ताक दिनानिमित्त इ. ५वी ते ७वीसाठी कथा रामसेतूची आणि ८वी ते १०वीसाठी G20 – भारतापुढील जागतिक नेतृत्वाची संधी अशी व्याख्याने झाली.
५. इ. ९वी–१०वीच्या पालकांसाठी श्री. विवेक वेलणकर यांनी करिअर मार्गदर्शन हे व्याख्यान दिले.
६. सर्व अध्यापक, कर्मचारी आणि पालकांसाठी बाल लैंगिक दुर्वर्तन (POCSO) याविषयी स्वतंत्रपणे व्याख्याने झाली.
७. या वर्षी प्रबोध उद्योग समूहाने दिलेल्या देणगीतून प्रशालेत १२ स्मार्टबोर्डस् बसवण्यात आले. याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीच्या समारंभाला मा. मोहनराव आणि मा. नलिनी गुजराथी, कार्यवाह मा. सुभाषराव देशपांडे उपस्थित होते.

### ❖ स्तर पद्धती ❖

इ.५वी ते ८वीच्या विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी व गणित या विषयांच्या क्षमताधारित शिक्षणाची योजना केलेली आहे. विद्यार्थी त्यांच्या क्षमतांप्रमाणे आठ स्तरांत विभागले जातात. याशिवाय ८वीतील विशेष मार्गदर्शनाची गरज असलेल्या विद्यार्थ्यांसाठी पुनर्भरण वर्ग होतात.

### ❖ विद्याव्रत संस्कार ❖

विविध विकसने समजावणाऱ्या व्याख्यानमालेचे व गटचर्चांचे इ. ८वीसाठी वर्षभर आयोजन केले होते. जानेवारी महिन्यात सज्जनगड येथे निवासी शिबिर झाले. दि. १० आणि ११ फेब्रु. २४ या दिवशी मुलांचा आणि मुलींचा विद्याव्रत संस्कार समारंभ झाला. मुलांच्या संस्कार समारंभासाठी मातृमंदिर विश्वस्त संस्थेचे मा. यशवंतराव लिमये तर मुलींच्या समारंभासाठी विद्याभारती संस्थेच्या अखिल भारतीय सचिव मा. वाच. मधुश्री सावजी या प्रमुख पाहुण्या होत्या.

### ❖ अभिव्यक्ती उपक्रम ❖

वर्षभर विद्यार्थी गायन, वादन, नृत्य, नाट्य, लेखन, शिल्पकला, चित्रकला, वक्तृत्व या माध्यमांचा अभ्यास करत होते. वर्षाच्या शेवटी इ. ७वी ते ९वीच्या वर्गांचे अभिव्यक्ती शिबिर झाले. सादरीकरणामध्ये विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर सर्व अभिव्यक्ती प्रकारांची विचारपूर्वक मांडणी व सादरीकरण केले.

**प्रशालेतील विद्यार्थ्यांचे विविध स्पर्धांमधील यश**

१. पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती (५वी) : सीबीएसई यादीत ८वा क्रमांक – ४
२. महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षा गुणवत्ता यादी : १
३. डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा सीबीएसई शाळांमधून (फेरी २) : पहिला क्रमांक – १, रजतपदके – ४
४. स्टुडन्ट सायन्स व्हिलेज कार्यशाळा, फरीदाबाद : ४ विद्यार्थ्यांची निवड
५. विद्यार्थी विज्ञान मंथन (जिल्हा स्तर) : १
६. भास्कराचार्य Mathematics Talent Search : ५
७. गणित प्रभुत्व परीक्षा : ८वी – १३, ५वी –१३
८. जी एम आर टी खोडद विज्ञान प्रदर्शन : २ प्रकल्प
९. आंतरराष्ट्रीय हिंदी ऑलिंपियाड : ३ सुवर्ण, २ रजत, ३ कांस्य
१०. आंतरशालेत वक्तृत्व स्पर्धा : ११
११. संगणक बुद्धिमत्ता स्पर्धा : १०
१२. लोकमान्य टिळक वक्तृत्व स्पर्धा : ६
१३. महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा – नाट्यवाचन स्पर्धा : २
१४. सुभाषिताभियानम् राज्य स्तर : १

## ❖ महाध्याय दिन ❖

१. ५वी : महात्मा फुले संग्रहालय, घोले रस्ता (संग्रहात्मक प्रकल्पासाठी मार्गदर्शनपर भेट), Wonderfold ओरिगामी प्रदर्शन (फोल्ड्समागील गणिताची ओळख)
२. ६वी : बालगंधर्व कलादालन – शिवाजी महाराजांच्या मराठा सरदारांच्या वंशजांनी जतन केलेली शस्त्रात्रे पाहणे, जागृती मुलींची अंधशाळा, आळंदी (शाळेची रचना समजावून घेणे, संवेदनशीलता वाढणे), बारा मावळातील भोर, कारी, आंबवडे व पिसावरे गावांना भेट (शिवरायांचा इतिहास प्रत्यक्ष जिथे घडला तिथे जाऊन तो समजून घेणे), Wonderfold व ओरिगामी प्रदर्शन (फोल्ड्समागील गणिताची ओळख)
३. ७वी : गुरुद्वारा भेट (शिखांचे प्रार्थना स्थळ पाहणे), आकाशदर्शन (ग्रह–तारे, तारकासमूह पाहणे)
४. ८वी : आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूट (सूक्ष्मजीवशास्त्र, अणुबलसूक्ष्मदर्शक (Atomic Force Microscope), वनस्पती जतन, वनस्पती ऊती संवर्धन (plant tissue culture) इ. विषयांशी संबंधित कामाच्या प्रयोगशाळा पाहणे)
५. ९वी : ताम्हिणी घाट (जैवविविधता पाहणे)
६. १०वी : डेक्कन कॉलेज (वस्तुसंग्रहालय पाहणे)
७. याशिवाय इ. ७वी ते १०वी मुले आणि इ. ८वी ते १०वी मुली यांनी विविध टप्प्यांमध्ये आषाढी वारीत सहभाग घेतला.

## ❖ अग्रणी योजना ❖

नोव्हेंबर अखेर इ. ९वीसाठी अग्रणी प्रशिक्षण शिबिर झाले. यात गटबांधणी, नियोजन कौशल्य, विवेकानंदांचे नेतृत्वगुण, गटकार्य, अग्रणी जबाबदाऱ्या या विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

१. **स्वामी विवेकानंद जयंती – युवा दिन कार्यक्रम :** दि. १२ जाने. २४ रोजी दोन व्याख्याने झाली व त्यानंतर इ. ५वी व ६वीच्या वर्गांनी सूर्यनमस्कार घातले व योगासने केली. इ. ८वी व ९वीच्या वर्गांसाठी स्वामी विवेकानंदांचे जीवन व क्रीडाक्षेत्र या दोन विषयांवर प्रश्नमंजुषा घेण्यात आली. अग्रणींनी या कार्यक्रमाचे आयोजन केले.
२. **गुरुपौर्णिमा कार्यक्रम व्याख्याने :** इ. ५वी ते १०वीच्या सर्व वर्गांसाठी गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने वर्गशः व्याख्याने झाली. गुरू–शिष्य नाते, Connectedness, Concern आणि Competence, गुरू–शिष्यांच्या गोष्टी, गुरुअष्टकातील गुरू–शिष्य, प्रबोधिनीचे तत्त्वसप्तक असे अनेक विषय प्रबोधिनीतील विविध ज्येष्ठ सदस्यांनी विद्यार्थ्यांसमोर मांडले.

## ❖ पालक संघ ❖

गट आता चांगला कार्यरत झाला असून, पालक अभिव्यक्ती गटातर्फे विविध कार्यक्रमांचे प्रबोधिनीत व बाहेरही सादरीकरण करण्यात आले. माता पालकांची ग्रामीण भागातील स्त्रियांसाठीचे कार्य समजून घेण्याच्या निमित्ताने मा. सुवर्णाताई गोखलेंशी गप्पा व वेल्हे केंद्रास भेट झाली.

**प्रतिसादासाठी जाहीर आवाहन**

१. प्रशालेस नव्या, मोठ्या जागेत स्थलांतर करायचे आहे. यासाठी नव्या वास्तूचे बांधकाम लवकरच सुरू करण्याचा मानस आहे. नव्या वास्तूच्या बांधकामासाठी आपण सढळ हाताने देणगी द्यावी असे आवाहन आहे.
२. प्रशालेतील प्रवेश हे निव्वळ बुद्धिमत्ता चाचणीच्या आधारे होतात. प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये ग्रामीण व निम्न मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे. या विद्यार्थ्यांचे प्रशालेतील शिक्षण अडू नये यासाठी प्रशाला अनेक प्रकारच्या शिष्यवृत्त्या देते. शिष्यवृत्त्या देण्यासाठी देणग्या देण्याचे आपणांस आवाहन आहे.
३. प्रशालेतील विद्यार्थी उत्तम प्रकल्प करीत असतात. या प्रकल्पांसाठी अनेक आधुनिक उपकरणे, प्रयोगसाहित्य–सामग्री लागते, प्रवास करावा लागतो. यासाठीही निधीची आवश्यकता लागते. अशा प्रकल्पांना पाठिंबा देण्यासाठी निधी द्यावा असे आवाहन आहे. याशिवाय प्रकल्पांना मार्गदर्शक म्हणूनही आपण प्रशालेस सहकार्य करू शकाल. (संपर्क क्र. : ०२०–२४२०७१२१/२२)





# २. शैक्षणिक उपक्रम संशोधिका

ज्ञान प्रबोधिनीच्या औपचारिक शैक्षणिक रचनांमधील प्रयोगांचा विस्तार करून देशभरातील शैक्षणिक रचनांमधील शिक्षणप्रक्रिया समृद्ध करण्यासाठी शैक्षणिक उपक्रम संशोधिका या विभागाचे काम चालते. शिक्षकांसाठी प्रशिक्षणे, विविध सामाजिक आणि आर्थिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम आणि पूरक शैक्षणिक साहित्य निर्मिती या माध्यमातून काम होते आहे.

▪ राज्ये – १० ▪ शाळा – १०६० ▪ विद्यार्थी – १,०३,९१७

### ❖ छोटे सायंटिस्टस् ❖

**महाराष्ट्रातील ११ जिल्हे, भारतातील ६ राज्ये व २ देश**

शालेय विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा, विज्ञानाची गोडी लागावी तसेच विज्ञान संकल्पना सोप्या कृतींच्या माध्यमातून मुलांपर्यंत पोहोचवण्याच्या हेतूने हा प्रकल्प गेल्या एक दशकापासून केपीआयटी कंपनीच्या संयुक्त विद्यमाने सुरू आहे. या शैक्षणिक वर्षात ८७१ शाळांमधील ९०,५१९ विद्यार्थ्यांपर्यंत ६८९ शिक्षक, १९ विज्ञान दूत, १,१२४ स्वयंसेवक यांच्या माध्यमातून पोहोचलो. महाराष्ट्रातील ११ जिल्ह्यांमध्ये सात ठिकाणी संस्था, पाच नगर/ महानगरपालिका, दोन विज्ञान अध्यापक मंडळ, तीन महाविद्यालये तर एक स्वयंसेवी संस्था यांच्या साहचर्यातून शिक्षक प्रशिक्षणे आणि स्वयंसेवकांच्या माध्यमातून इ. ५वी ते ९वीच्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचलो. याच बरोबर मेघालय, अरुणाचल प्रदेश, राजस्थान, तामिळनाडू, कर्नाटक आणि तेलंगणा या सहा राज्यांमध्ये पाच स्थानिक संस्थांच्या माध्यमातून प्रकल्पाचा भौगोलिक विस्तार झाला. याच बरोबर केपीआयटी कंपनीच्या दहा स्वयंसेवकांमार्फत थायलंड आणि अमेरिका येथील विद्यार्थ्यांसाठी प्रायोगिक तत्त्वावर तासिका घेण्यात आल्या.

इ. ८वी आणि ९वीसाठी वेगवेगळ्या प्रयोगांच्या माध्यमातून विज्ञान संकल्पना अधिकाधिक चांगल्या समजण्यासाठी कृती आणि संकल्पनांचे रोजच्या जीवनातील उपयोजन कळण्यासाठीची चर्चा असे वर्षभरातील सहा तासिकांचे स्वरूप होते. याचबरोबर पूर्व माध्यमिक गटाला (इ. ५वी ते ७वी) विज्ञान शिकण्यासाठी आवश्यक कौशल्य विकसन सूत्रांतर्गत निरीक्षण कौशल्य, प्रश्न कौशल्य, परिसर अभ्यास, मापन कौशल्य, वर्गीकरण कौशल्य आणि प्रयोग रचना अशा सहा विषयांसाठी द्वीस्तरीय रचना केली गेली.

दरवर्षी प्रमाणे वर्षभर झालेल्या तासिकांनंतर फेब्रुवारी महिन्यात माध्यमिक गटासाठी समस्या परिहार स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये दैनंदिन जीवनातील समस्या सोडविण्याचे आवाहन देऊन त्यांच्या कल्पनांना कृतीत मांडता यावे, असे नियोजन होते. एकूण सात केंद्रांतील ८० शाळांमधील निवडक ३२० विद्यार्थी यात सहभागी झाले होते. या वर्षी प्रथमच पूर्व माध्यमिक गटातील निवडक विद्यार्थ्यांसाठी समस्या परिहार स्पर्धेचे शिरोळ येथील अब्दुललाट केंद्रावर २० शाळांमधील ८० विद्यार्थ्यांसाठी

**गणित प्रभुत्त्व स्पर्धा**

पुणे जिल्हा गणित अध्यापक मंडळ आणि शैक्षणिक उपक्रम संशोधिका, ज्ञान प्रबोधिनी यांच्यातर्फे दि. १७ डिसें. २३ रोजी पहिल्या व २५ फेब्रुवारी २४ रोजी दुसऱ्या स्तरावरील गणित प्रभुत्त्व स्पर्धा घेण्यात आली. पहिल्या स्तरासाठी इ. ५वी मधील ८८५ व ८वी मधील ५०० विद्यार्थी उपस्थित होते. दि. १४ एप्रिल २४ रोजी ज्ञान प्रबोधिनी, पुणे येथे डॉ. विनय कुमार आचार्य यांच्या हस्ते पारितोषिक वितरण सोहळा झाला.

आयोजन करण्यात आले होते. यामध्ये वर्षभरात शिकलेले ज्ञान आणि कौशल्य वापरता येईल अशा समस्या दिल्या होत्या.

याशिवाय प्रकल्पातील मुलांसाठी सुट्टीतील शिबिर, अन्य विद्यार्थ्यांसाठी विज्ञान कार्यशाळा आणि अवकाश दर्शनाचा उपक्रम असे एप्रिल आणि मे महिन्यात योजले होते. रत्नागिरी DIET आणि जिल्हा शैक्षणिक प्रशिक्षण संस्था, गोवा यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक सहलीचे आयोजन दि. १० ते १७ जानेवारी २४ मध्ये करण्यात आले होते, यामध्ये एकूण १६०० विद्यार्थ्यांसाठी प्रदर्शनांचे आयोजन आपण केले होते.

छोटे सायंटिस्टस् प्रकल्प या वर्षी रोहा येथील ग्रामीण भागातील शाळांमध्ये सुरू करण्यात आला. चार विज्ञान संकल्पनांची (प्रकाश, दाब, ध्वनी, आम्ल-आम्लारी पदार्थ ओळख) एकूण सात सत्रे शाळांमध्ये घेण्यात आली. एकूण सरासरी ३६० ते ४०० विद्यार्थ्यांना याचा लाभ झाला. तसेच जानेवारी महिन्यात V-Solve स्पर्धेमध्ये १४ शाळांचा सहभाग होता.

## ❖ विकासमित्र ❖

### वेल्हे, पानशेत, रोहा, पडसरे

२०१९-२०२३ या कालावधीत पुणे जिल्ह्यातील वेल्हे तालुक्यात विकासमित्र प्रकल्प बजाज ऑटो लि. च्या आर्थिक सहयोगातून सुरू होता. गेल्या वर्षात म्हणजे २०२३-२४ साली हाच प्रकल्प विकासमित्र २.० म्हणून इंटॉक्स, ब्लूम कंबशन आणि वैयक्तिक देणगीदारांच्या सहयोगातून सुरू राहिला.

या प्रकल्पांतर्गत वेल्हे तालुक्यातील मावळ, वाजेघर, आंबवणे, पानशेत या चार विभागांतील विद्यार्थी व शिक्षणदूत यांच्यासाठी विविध कार्यक्रम योजले गेले. ४० शाळांमधील १७०० विद्यार्थ्यांपर्यंत या प्रकल्पाच्या माध्यमातून अभ्यास कौशल्ये, विज्ञान कौशल्ये, व्यक्तिमत्त्व विकसन कौशल्ये व राष्ट्रीय जाणीव असे विषय घेऊन काम केले. नियमित शालेय अभ्यासक्रमाच्या पलीकडे प्रबोधिनीच्या शैक्षणिक चिंतनातून तयार झालेल्या आशय आणि प्रक्रियेचा विशेष अनुभवसंच विद्यार्थ्यांना व शिक्षणदूतांना देण्यात आला.

या १७०० पैकी इ. ६वी व ९वी मधील निवडक १६० विद्यार्थ्यांसाठी 'प्रज्ञा विकास' कार्यक्रम देखील वर्षभरात दोन वेळा राबवला गेला. या निमित्ताने प्रबोधिनीतील अन्य विभागातील प्रशिक्षक प्रकल्पाशी जोडले गेले.

ही सर्व योजना राबवण्यासाठी दोन भागांमध्ये विद्यार्थ्यांचा विचार करण्यात आला. १. प्राथमिक गट व २. माध्यमिक गट. प्राथमिक गटाचे तास (विकासिका) घेण्यासाठी त्या-त्या गावांमधल्या २० युवती/महिला यांचा गट सलगपणे वर्षभर शिक्षणदूत म्हणून काम करत होता. या गटाची नोव्हेंबर महिन्यात अलिबाग-मुरूड अशी सहाध्याय सहल झाली. गटबांधणी, प्रवासाचा अनुभव आणि सांस्कृतिक ठिकाणांची ओळख अशी त्याची मुख्य उद्दिष्टे होती. माध्यमिक गटाच्या विकासिका घेण्यासाठी पुणे शहरातल्या, स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या १५ ते २० जणांनी काम केले. या व्यतिरिक्त सर्व विद्यार्थ्यांना छात्र प्रबोधनचे पाच सुबोध द्वैमासिक अंक वितरित करण्यात आले आणि त्यावर तासिका घेतल्या.

एक्सेल उद्योग समूह, रोहा आणि विवेकानंद ट्रेनिंग अँड रिसर्च इन्स्टिट्यूट, रोहा यांच्या संयुक्त विद्यमाने या वर्षी नव्याने सुरू केलेल्या 'विकासमित्र' प्रकल्पात रोहा तालुक्यातील ग्रामीण भागातील आठ शाळांमधील इ. ५वी ते ७वीचे ४०० विद्यार्थी सहभागी होते. या अंतर्गत साप्ताहिक तासिकांची योजना केली होती, ज्यामध्ये अभ्यास कौशल्ये, कृतियुक्त विज्ञान कौशल्ये यांचा समावेश होता.

अनुदानित आश्रमशाळा पडसरे येथील इ. ५वी ते ९वीच्या विद्यार्थी गटासाठी 'विकासमित्र' प्रकल्प या शैक्षणिक वर्षात सुरू झाला. दरमहा दोन दिवसीय एक शिबिर अशी एकूण आठ शिबिरे पडसरे येथे घेण्यात आली. वाचन कौशल्य, श्रुतलेखन, अभ्यास पायऱ्या, विज्ञान कौशल्ये- निरीक्षण, प्रश्न, मापन, परिसर अभ्यास, वर्गीकरण इ. कौशल्य, त्रिमितीय प्रतिकृती-रचना याचा उपयोग करून सूची, घन, असे घटते सुंदर अक्षर - अक्षर लेखन, स्व-जाणीव, व्यक्तिमत्त्व विकसन, राष्ट्रीय एकात्मता इ. घटकांवर आधारित सत्र घेण्यात आली. ध्वनी, ऊर्जा, रसायनशास्त्र-आम्ल-आम्लारी, प्रकाश, चुंबकत्व या विषयांवर इ. ८वी व ९वीच्या विद्यार्थ्यांचे विज्ञान संकल्पनांचे सत्र झाले. यामध्ये सुमारे ३०० विद्यार्थी सहभागी आहेत.

दि. १७ फेब्रुवारी रोजी पडसरे आश्रम शाळेत शापूरजी पालनजी व AFCON कंपनीचे अभियंते व अधिकारी यांनी विद्यार्थ्यांचे प्रयोग घेतले. दि. २८ फेब्रुवारी रोजी विज्ञान दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी विज्ञान प्रयोगांचे सादरीकरण केले.

## ❖ अनुभव शाळा व प्रज्ञा विकास ❖

### पुणे शहर

पुणे शहरातील नागरी वस्ती भागात राहणाऱ्या ६ ते ११ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी अनुभव शाळा तर १२ ते १५ वर्षे

वयोगटातील निवडक विद्यार्थ्यांसाठी प्रज्ञा विकास प्रकल्प गेल्या अनेक वर्षांपासून भारत फोर्ज यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू आहे.

अनुभव शाळेत, विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण व्हावी, शालेय अभ्यासात गती वाढावी, संस्कार आणि मूल्यांची जोपासना व्हावी, शाळेतील विविध स्पर्धांमधील सहभाग वाढावा आणि त्यांना विविध कलागुण दाखवण्याची संधी मिळावी या हेतूने अभ्यासक्रमाची रचना केली आहे. तसेच विद्यार्थ्यांना आरोग्यदायी पोषक घटक मिळावेत यासाठी सकस आहार नियमित दिला जातो. यामुळे शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांची मानसिकता आणि सातत्य टिकवून ठेवण्यासाठी मदत झाली.

प्रज्ञा विकास प्रकल्पात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अभ्यास कौशल्य, बुद्धिमत्तासंवर्धन, विज्ञान विकास, व्यक्तिमत्त्व विकसन, जीवन कौशल्य या उपविषयांवर आधारित अनुभव शिक्षण देण्याच्या हेतूने दर आठवड्याला दोन दिवस वर्ग घेतले जातात. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे इ. १०वी उत्तीर्ण झालेल्या एका विद्यार्थिनीला पुढील शिक्षणासाठी फिदा शिष्यवृत्ती मिळाली. मंथन शिष्यवृत्ती परीक्षा, गणित प्राविण्य परीक्षा इत्यादी परीक्षा देण्यात विद्यार्थ्यांचा सहभाग वाढला. प्रज्ञा विकास गटातील शिक्षकांनी सराव सत्र म्हणून पुण्यातील नंदादीप शाळा, पर्वती पायथा, व राम राजे शिक्षण संस्थेचे, बालमंदिर प्राथमिक शिशू शाळा येथे अभ्यास कौशल्याच्या एकूण २० तासिका घेतल्या.

### ❖ ज्ञानसेतू ❖

**जम्मू-काश्मीर, अरुणाचल प्रदेश, आसाम,**
**मेघालय, नागालँड, छत्तीसगड**

ज्ञानसेतू प्रकल्पाच्या माध्यमातून महाविद्यालयीन स्वयंसेवकांच्या द्वारे अन्य राज्यांतील दुर्गम भागातील माध्यमिक शाळांमध्ये विज्ञान कार्यशाळा घेतल्या जातात. विज्ञान हे साधन वापरून महाविद्यालयीन गटाला राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडावे, हा या प्रकल्पाचा मुख्य हेतू आहे.

ब्लूम कंबशन या कंपनीचे अर्थसाहाय्य या वर्षी लाभले. या वर्षीची भर म्हणजे "Know Our Country" या विषयावरचे भारताच्या विविधतेची ओळख खेळांच्या माध्यमातून करून देणारे प्रदर्शन, स्थानिक समाज दर्शन घडावे या हेतूने सर्वेक्षण, आणि त्या-त्या परिसरातील विशेष व्यक्तींची मुलाखत. याला जोडूनच सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन देखील स्थानिक ठिकाणी केले गेले, ज्यामध्ये संस्कृतीचे दर्शन हे नाच, गाणी, गोष्टी आणि खाण्याच्या पदार्थांमधून झाले. वर्षभरात एकूण १०९ महाविद्यालयीन स्वयंसेवकांसाठी प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्यापैकी ७९ कार्यकर्ते प्रत्यक्ष दौऱ्यासाठी जम्मू-काश्मीर, अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, नागालँड, छत्तीसगड या सहा राज्यांमध्ये जाऊन आले. एकूण १११ शाळांच्या माध्यमातून ८,३४८ विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचलो.

दि. १५ ऑगस्टच्या मेळाव्यात डॉ. वामन पारखी यांनी त्यांच्या भारतीय महसूल सेवा पदाधिकारी (IRS officer) म्हणून काम करत असतानाच्या अनुभवांतून उपस्थितांना मार्गदर्शन केले.

### ❖ प्रेरणासेतू ❖

**आसाम, अरुणाचल प्रदेश, मध्यप्रदेश,**
**महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक**

शैक्षणिक उपक्रम संशोधिका व ज्ञान प्रबोधिनी फौंडेशन, यूएसए यांच्या संयुक्त विद्यमाने 'प्रेरणासेतू' हा प्रकल्प राबविला जातो. यामध्ये विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ व्यक्ती विद्यार्थ्यांशी दूरस्थ माध्यमातून संवाद साधतात. त्यांचा त्यांच्या क्षेत्रातील प्रवास, आव्हाने आणि त्यावर मात करत मिळवलेले यश, आपले आदर्श आणि प्रेरणास्थाने अशा गोष्टी मुलांना सांगतात. २०२३-२४ वर्षात 'कॉर्पोरेट क्षेत्रातील नेतृत्व' या विषयावर विविध तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. यामध्ये आसाम, अरुणाचल प्रदेश, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, गोवा आणि कर्नाटक राज्यातील २१ शाळांमधून एकूण १०५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

### ❖ स्वयंअध्ययन कौशल्य प्रशिक्षण ❖

**पुणे, रोहा**

दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी स्वयंअध्ययन कौशल्य प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आल्या. यामध्ये रोहा येथील १४ शाळांतील सुमारे ४२५ विद्यार्थी, पुण्यातील महर्षी कर्वे शिक्षण संस्थेतील ११५ विद्यार्थिनी तसेच कास्प या संस्थेतील ५० विद्यार्थ्यांसाठी स्वयंअध्ययन तासिका घेण्यात आल्या.

**प्रतिसादासाठी जाहीर आवाहन**

शैक्षणिक उपक्रम संशोधिका विभागाच्या शैक्षणिक विस्ताराच्या कामामध्ये जास्तीत-जास्त शिक्षक, कार्यकर्ते आणि सुजाण नागरिक यांच्या प्रत्यक्ष योगदानाची गरज आहे. त्याच बरोबर अनेक कंपन्यांच्या आर्थिक सहयोगाची सुद्धा गरज येत्या वर्षांमध्ये भासणार आहे. सर्वांच्या सहकार्यामधूनच हे काम भारतभरातील अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणार आहे.

(संपर्क क्र. : ०२०-२४२०७१३८/२३१)

तपशिलातील वृत्त वाचण्यासाठी स्कॅन करा.




# ३. शिक्षक प्रशिक्षण केंद्र

### ❖ नवोदय विद्यालय ❖

वर्षारंभ दिवस : महाराष्ट्र, गुजरात आणि गोव्यामधील ७३ नवोदय विद्यालयातील ३३० अध्यापकांशी वर्षारंभ सत्रात 'Navodaya Vidyalaya : Schools with a Purpose' या विषयावर संवाद साधला. तसेच दि. ५ ऑगस्ट २३ रोजी नवोदय विद्यालय, सातारा येथे भेट व प्रशिक्षण योजण्यात आले. दि. ५ ऑक्टो. २३ रोजी प्रा. प्रशांत दिवेकर आणि शुभम गायकवाड यांनी जवाहर नवोदय विद्यालय, डूमरा, भूज, गुजराथ या शाळेला भेट देऊन विद्यार्थी आणि अध्यापकांशी संवाद साधला.

### ❖ आर्यभट्ट अनुसंधानात्मक विज्ञान प्रकल्प ❖

विवेकानंद केंद्र शिक्षा प्रसार विभाग, आसाम यांच्या २० शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी संशोधनात्मक प्रकल्प प्रक्रियेला सुरुवात झाली. शिक्षक व शिक्षक अधिमित्रांसाठी दूरस्थ प्रशिक्षण सत्रे घेण्यात आली. पहिल्या फेरीत आसाम, नागालँड मधील २१ शाळांमध्ये आर्यभट्ट अनुसंधानात्मक विज्ञान प्रकल्प स्पर्धेचे शाळास्तरावरील प्रकल्प सादरीकरण आयोजित करण्यात आले. यात १०१ प्रकल्प सादर करण्यात आले व त्यातून ८० प्रकल्प विभागस्तरासाठी निवडण्यात आले. दुसऱ्या फेरीत विभागस्तरावरील प्रकल्प परीक्षण आयोजित करण्यात आले. ८० प्रकल्प विभागस्तरासाठी निवडण्यात आले होते, त्यातून ३० प्रकल्पांची अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली. प्रकल्प अहवाल व सादरीकरणाच्या चित्रफितींच्या आधारे विद्यार्थ्यांचे परीक्षण करण्यात आले. आसाममधील परीक्षक व युवक विज्ञान दलाचे कार्यकर्ते यांनी दूरस्थ परीक्षण केले. श्री. नचिकेत नित्सुरे यांनी समन्वयन केले.

गुवाहाटी येथे दि. २३ व २४ डिसें. २३ रोजी राज्यस्तरीय अंतिम सादरीकरण आणि परीक्षण करण्यात आले. आसाममधील परीक्षक व युवक विज्ञान दलाचे कार्यकर्ते शुभम फौजदार आणि अनिकेत पाटील यांनी परीक्षण केले. प्रा. प्रशांत दिवेकर या सादरीकरणासाठी उपस्थित होते.

### ❖ परामिता स्कूल्स, करीमनगर ❖

परामिता स्कूल्स यांच्या शाळांमधील अध्यापकांसाठी संग्रहात्मक प्रकल्प, सामाजिक शास्त्र प्रकल्प आणि संशोधनात्मक प्रकल्प राबवण्यासाठी प्रस्ताव लेखन याबद्दल दूरस्थ संवाद सत्र योजण्यात आले.

दि. ८ व ९ नोव्हें. रोजी परामिता स्कूल्स, करीमनगर यांच्या चार शाळांमधील प्रकल्पांचे मध्यावधी परीक्षण करण्यात आले. विद्यार्थी सादरीकरण, प्रकल्प मार्गदर्शक संवाद व संयोजक गटाच्या नियोजन बैठकी करीमनगर येथे प्रा. प्रशांत दिवेकर आणि श्री. नचिकेत नित्सुरे यांनी योजल्या होत्या.

दि. ६ एप्रिल रोजी प्रकल्पांचे अंतिम परीक्षण करण्यात आले.

संग्रहात्मक प्रकल्प, सामाजिक शास्त्र प्रकल्प आणि संशोधनात्मक प्रकल्प या तीन प्रकारांत एकूण २६५ गटांतील ८३ गट अंतिम फेरीसाठी निवडले होते. विद्यार्थी सादरीकरण परीक्षण, प्रकल्प परीक्षक संवाद व व्यवस्थापक गटाशी संवाद यात करीमनगर येथे प्रा. श्रद्धा देशमुख, प्रा. प्रशांत दिवेकर आणि श्री. नचिकेत नित्सुरे उपस्थित होते.

### ❖ दयानंद अँग्लो वैदिक स्कूल, चेन्नई ❖

दि. २१ ते २४ सप्टें. २३ या कालावधीत दयानंद अँग्लो वैदिक स्कूल, चेन्नई यांच्या सात शाळांमधील इ. ९वीतील ५० विद्यार्थी आणि आठ अध्यापक यांच्यासाठी संशोधनात्मक प्रकल्पातून विज्ञान शिक्षण या विषयावर चार दिवसांचे प्रकल्प शिबिर घेण्यात आले. या शिबिरासाठी प्रा. प्रशांत दिवेकर आणि प्रणव पुजारी यांनी मार्गदर्शन केले. याच दरम्यान दयानंद अँग्लो वैदिक स्कूल यांच्या 'शिक्षणम्' या अध्यापक प्रशिक्षण वर्गातील छात्र अध्यापकांबरोबर 'अध्यापकाची प्रेरणा' या विषयावर प्रा. प्रशांत दिवेकर यांनी संवाद साधला. तसेच या सात शाळांमधील विज्ञान शिक्षकांसाठी 'विज्ञान अध्यापनातील ज्ञान प्रबोधिनीतील प्रयोग' या विषयावर परिचय सत्र झाले. श्री. प्रणव पुजारी यांनी दयानंद अँग्लो वैदिक स्कूल यांच्या अटल टिंकरिंग प्रयोगशाळेत काम करणाऱ्या अध्यापकांशी संवाद साधला.

दयानंद अँग्लो वैदिक स्कूल, चेन्नई यांच्या 'शिक्षणम्' या शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाच्या ४० विद्यार्थ्यांसाठी प्रकल्प पद्धतीचा परिचय करून देणारी तीन दिवसीय कार्यशाळा दि. १८ ते २० डिसें. २३ रोजी घेण्यात आली. डॉ सुरेंद्र ठाकूरदेसाई आणि प्रा. प्रशांत दिवेकर यांनी मार्गदर्शन केले. त्याचा पाठपुरावा म्हणून अभ्यास कार्याचा आढावा आणि प्रकल्प पद्धतीवर दूरस्थ चाचणी घेण्यात आली. या चाचणीतील घटकांचे विश्लेषण सत्र दूरस्थ घेण्यात आले. श्री. नचिकेत नित्सुरे यांनी विश्लेषण मांडले.

### ❖ अन्य प्रशिक्षणे ❖

१. दि. १२ व १३ ऑक्टो. रोजी संत मीरा इंग्लिश स्कूल, बेळगाव यांच्या तीन शाळांमधील चाळीस अध्यापकांसाठी अध्यापकाची परिणामकारकता, अनुभव शिक्षण आणि कौशल्य प्रशिक्षण या विषयावर दोन दिवसांचे प्रशिक्षण योजण्यात आले. प्रा. प्रशांत दिवेकर आणि प्रा. शिवराज पिंपुडे यांनी वर्गाला मार्गदर्शन केले.

२. दि. १० सप्टें. रोजी ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील अध्यापकांसाठी स्वामी दयानंद शिक्षण विचार या विषयावर सत्र योजण्यात आले.

३. राष्ट्रीय शैक्षणिक अनुसंधान आणि प्रशिक्षण परिषद यांच्या 'नावीन्यपूर्ण अध्यापन पद्धती आणि अध्ययन-अध्यापन साहित्य' या कृती गटासाठी प्रा. प्रशांत दिवेकर यांची निवड करण्यात आली. नवीन शैक्षणिक धोरणातील राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यानुसार पाठ्यपुस्तके तयार करण्यासाठीची मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्याचे काम हा कृतीगट करेल.

४. दि. ९ व १० नोव्हें. २३ रोजी दर्शन अ‍ॅकॅडमी यांच्या विविध राज्यातील आठ शाळांमधील चाळीस अध्यापकांसाठी परिसर अभ्यासासाठी प्रकल्प पद्धती या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

५. प्रज्ञानबोधिनीच्या १५ अध्यापकांच्या शालेय नेतृत्वासाठी नेता अध्यापक या विषयावर मुलाखती घेण्यात आल्या. वा. मिलिंद नाईक आणि प्रा. प्रशांत दिवेकर यांनी या मुलाखती घेतल्या.

६. दि. ९ डिसें. २३ रोजी रोटरी क्लब डेक्कन जिमखाना यांच्या बरोबर जुन्नर तालुक्यातील तीन शाळांमधील ३० अध्यापकांसाठी नावीन्यपूर्ण अध्यापन पद्धती या विषयावर एकदिवसीय प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला. प्रकाश रणनवरे, ओंकार बाणाईत व सौरभ दुर्गेकर यांनी मार्गदर्शक म्हणून काम केले.

**दयानंद अँग्लो वैदिक स्कुल – प्रबोधिनी संस्कार**

दि. २० मार्च रोजी चेन्नईच्या दयानंद अँग्लो वैदिक स्कूल, मोगप्पेरमध्ये प्रबोधिनीच्या पद्धतीने वर्षान्त समारंभ झाला. त्यामध्ये संपूर्ण उपासना आणि संकल्प आढावा कार्यक्रम झाला. त्याला एकूण अकरा शाळांचे मुख्याध्यापक आणि निवडक शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमानंतर प्रबोधिनीचे शैक्षणिक संस्कार कार्यक्रम या विषयावर सत्र झाले. सगळ्यांनी मिळून उपासनेच्या श्लोकांचा सरावही केला. यासाठी वाच. मधुराताई काशीकर अध्वर्यू म्हणून उपस्थित होत्या.

ജ്ഞജ്ഞ

पाखरे भरारली निळी नभे झळाळली,
पालवी नवी नवी तरूवरी थरारली
हासऱ्या सुरातूनी चालत्या पदातूनी,
झेप घेऊन उसळली ही चेतना ।।ध्रु.।।
हिचे आम्ही शुभांशु रे, सतेज रे, सुहास्य लास्य रे
युवमनी जी, संचारते, प्रकाशते, गती हिची, द्युती हिची, स्फूर्ती
क्षितिज बाहते धरेस क्षेम द्यावयास या ।।१।।



## ४. शैक्षणिक साधन केंद्र

तंत्रज्ञानामुळे दूरस्थ शिक्षणाची मोठी संधी सर्व स्तरातील आणि वयोगटातील, जगभरातील विद्यार्थ्यांसाठी निर्माण झाल्याने ती आवश्यकता पूर्ण करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरून ज्ञान प्रबोधिनीच्या त्रिवेणी शिक्षण पद्धतीला अनुसरून दर्जेदार शैक्षणिक ई-साहित्य निर्मिती करणे आणि दूरस्थ पद्धतीने प्रशिक्षण व मुक्त शिक्षण देणे हे काम शैक्षणिक साधन केंद्र करते. शालेय अभ्यासक्रमाशी निगडित नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार चित्रफिती, ई-खेळ, आभासी पद्धतीने अनुभव शिक्षण देणारी ॲपनिर्मिती आणि प्रशिक्षणे या वर्षी करण्यात आली.

| विषय | माध्यम | इयता | चित्रफितींची संख्या |
|---|---|---|---|
| इंग्रजी | इंग्रजी / मराठी | १ ते १०वी | ८० |
| गणित | मराठी | ५वी ते ८वी | ८१ |
| परिसर अभ्यास, विज्ञान | इंग्रजी, भारतीय सांकेतिक भाषा | ५वी, ६वी | ९४ |
| मूल्यशिक्षण | मराठी | १ली ते ५वी | २७ |
| | | **एकूण** | **२८२** |

### ❖ ई-साहित्य निर्मिती ❖

**दीक्षा प्रकल्प –** २८२ चित्रफिती/१७ राज्य / २ दशलक्ष views

केंद्र शासनाच्या दीक्षा प्रकल्पासाठी शालेय अभ्यासक्रमातील विविध विषयांच्या २५०० शैक्षणिक चित्रफिती आत्तापर्यंत तयार केल्या आहेत. हा प्रकल्प राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र यांच्या बरोबर जोडलेला आहे. या वर्षी २८२ चित्रफितींच्या निर्मितीचे काम केले. या चित्रफिती शिक्षण मंत्रालयाच्या पोर्टलवर आणि ERC JPP या YouTube चॅनेल वर प्रकाशित आहेत. विशेष विद्यार्थ्यांसाठी भारतीय सांकेतिक भाषेतील चित्रफिती निर्मिती करण्यासाठी SCERT सोबत तीन वर्षांचा करार करण्यात आला.

### ❖ आनंदी शिक्षण ❖

वंचित गटाला डिजिटल व शैक्षणिक साधनांच्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, स्वयंअध्ययनाची सवय लागावी, याकरिता शहरी, नागर वस्ती, ग्रामीण, तांडे व कर्णबधिर अशा इ. १ली ते ५वीच्या मुलांकरिता 'आनंदी शिक्षण' उपक्रम २०२२ पासून सुरू केला. या वर्षी यात कातकरी वाड्यांची भर पडली. सध्या ५१ केंद्रांमध्ये एक हजारांहून अधिक विद्यार्थी शिकत आहेत. २० विद्यार्थांमागे एक शिक्षक, १० केंद्रावर एक पर्यवेक्षक, आठवड्यातून किमान सहा तास भाषा, गणित, परिसर अभ्यास विषय चित्रफीत आणि शैक्षणिक साधनांच्या माध्यमातून शिकवणे अशी या प्रकल्पाची रचना आहे. शैक्षणिक क्षमतेनुसार

शिकण्यासाठीचा अभ्यासक्रम विकसित केला. प्रत्येक पाठावर आधारित चित्रफीत, हस्तपुस्तिका, गाणी, गोष्टी, या साधनांचा वापर केला गेला. सर्व केंद्रांवर पूर्वचाचणी, सराव पत्र, मासिक उडी पत्र, उत्तर चाचणी याआधारे मूल्यमापन करण्यात आले. याचबरोबर बाल जत्रेतून हसत-खेळत भाषा तसेच गणित शैक्षणिक मूल्यमापन घेण्यात आले. वेल्हा आणि पुणे येथे बालजत्रांचे आयोजन करण्यात आले. गंमतशीर शैक्षणिक चित्रफीत, हातांनी खेळता येतील व आपली बुद्धिमत्ता वापरून खेळ तयार करता येतील अशी शैक्षणिक साधने, अशा अनेक गोष्टी आनंदी शिक्षणात विद्यार्थ्यांना अनुभवायला मिळाल्या. शिकण्यातला आत्मविश्वास वाढल्यामुळे विद्यार्थी नियमित केंद्रात जाऊ लागले, अभ्यासाची रूची वाढली. पुणे व हराळी येथे ६० शिक्षकांची चार प्रशिक्षणे घेण्यात आली.

| विभाग | केंद्र | विद्यार्थी | प्रशिक्षक | पर्यवेक्षक | साहित्य |
|---|---|---|---|---|---|
| हराळी | ३० | ६५९ | ३० | ३ | टीव्ही, पेनड्राइव्ह, अभ्यासक्रम, मूल्यमापन ॲप, सरावपत्र, हस्तपुस्तिका, चित्रपुस्तिका, भाषा पुस्तिका, खेळ |
| रायगड | ७ | १७१ | ७ | १ | |
| नागरवस्ती | ४ | १०२ | ५ | १ | |
| कर्णबधिर शाळा | ६ | १२८ | ७ | १ | |
| वेल्हा | ४ | ७५ | ४ | ७ | |
| | ५१ | ११३३ | ५३ | १३ | |

## ❖ अन्य साहित्य निर्मिती ❖

१. **तंत्रशिक्षण अभ्यासक्रम –** STAR फोरमने तंत्रशिक्षणाच्या अभ्यासक्रमाचे https://www.theskillsguru.in/ हे पोर्टल विकसित केले. त्यातील 'पंप इन्स्टॉलेशन और रखरखाव' आणि कौशल्य विकसन याच्या दूरस्थ अभ्यासक्रमाच्या चित्रफिती तयार करायचे काम करून दिले.

२. **दिशादर्शन २.० –** ही करिअर मार्गदर्शन मालिका केली. यामध्ये २४ करिअर मार्गदर्शनाच्या चित्रफिती आहेत. याची विक्री प्रज्ञा मानस विभागातून सुरू आहे.

## ❖ दीक्षा ज्ञानवर्धन पेटी ❖

पुणे जिल्ह्यातील हवेली, शिरूर, आंबेगाव, जुन्नर, खेड येथील ५० शाळांना ज्ञानवर्धन पेटी देण्यात आली. या पेटीमध्ये इ. १ली ते १०वी मधील शालेय अभ्यासक्रमाशी संबंधित परिसर अभ्यास, विज्ञान, गणित, मराठी, इंग्रजी या विषयांच्या मराठी, हिंदी आणि इंग्रजी माध्यमांच्या चित्रफिती उपलब्ध आहेत. तसेच अरुणाचल प्रदेशमधील दिरांग आणि जंग शाळांत कियॉस्क (Knowledge Hub) वर परिणामकारक अध्ययनासाठी विविध विषयांवरच्या चित्रफिती उपलब्ध करून दिल्या. शिक्षकांसाठी दूरस्थ पद्धतीने मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात आले. दीक्षा ज्ञानवर्धन पेटी पोर्टलवर उपलब्ध करून देण्यासाठी इ. ५वी ते ८वी या वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी गणित या विषयावर आधारित विविध संकल्पना हसत-खेळत समजाव्यात या उद्देशाने ६७ ई-खेळ, ६७ कार्यपत्रके आणि चित्रफिती अशा विविध शैक्षणिक साधनांची निर्मिती करण्यात आली.

## ❖ प्रबोध आभासी प्रयोगशाळा ❖

**(Virtual Reality Lab)**

दुर्गम भागांतील शाळांमध्ये वैज्ञानिक प्रयोगशाळेच्या उपलब्धतेचे प्रमाण कमी आहे. तिथे आभासी प्रयोगशाळा उपयुक्त ठरतील. यातून विद्यार्थ्यांमध्ये स्वयंअध्ययन, वैज्ञानिक दृष्टिकोन, पर्यावरणाबद्दल जागरूकता इ. कौशल्यांचे विकसन होऊ शकेल. इ. ६वी ते १०वी या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शालेय अभ्यासक्रमाशी निगडित विज्ञान, सामाजिक शास्त्र या विषयांवर तंत्रज्ञानाच्या साहाय्याने ई-प्रात्यक्षिकांची निर्मिती करण्याचे काम सुरू आहे. त्यातील इ. ८वी ते १०वीचे ३५ विज्ञान प्रयोग VR मध्ये तयार करण्यात आले. ज्ञान प्रबोधिनी प्रशाला पुणे, निगडी, साळुंब्रे, सोलापूर, हराळी येथील विद्यार्थ्यांनी याचे टेस्टिंग करून प्रतिसाद घेण्यात आले. तसेच पुणे विद्यापीठातील विज्ञान प्रसार केंद्रात देखील याची प्रात्यक्षिके आयोजित केली होती. ३०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी याचा अनुभव घेतला. महाराष्ट्रात विज्ञान आणि पर्यावरण शिक्षण देणारी ही पहिली आभासी प्रयोगशाळा आहे. येत्या शैक्षणिक वर्षात अन्य शाळांतील विद्यार्थ्यांना पूर्व नोंदणी करून VR, AR बघण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच अन्य संस्था, शाळा, अनौपचारिक शिक्षण केंद्र, फिरत्या प्रयोगशाळा यांना आभासी प्रयोगशाळेचे सभासदत्व देण्यात येईल. त्यासाठी नोंदणी सुरू आहे.

## ❖ निसर्गमित्र ऑलिंपियाड ❖

शैक्षणिक साधन केंद्र, ग्रामविकसन-नैसर्गिक संसाधने आणि प्रशाला माजी विद्यार्थी संघ-पर्यावरण विशेष उद्दिष्ट गट यांच्या साहचर्याने 'निसर्गमित्र ऑलिंपियाड' या विशेष स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. प्रशालेमध्ये ज्याप्रकारे निरीक्षण कौशल्य आणि प्रकल्प घेतले जातात, तसे अन्य शालेय विद्यार्थी करतील आणि ही शिक्षण पद्धती दूरस्थ माध्यमातून पोहोचवली जाईल, असा हा प्रयोग होता. या स्पर्धेमुळे शहरी आणि ग्रामीण भागातील विद्यार्थांना तंत्रज्ञानाच्या साहाय्याने गुणवत्तापूर्ण शिक्षणाची उत्तम संधी मिळाली. पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण करण्याबरोबरच शैक्षणिक चित्रफिती, ई-खेळ, निरीक्षण कौशल्य आणि प्रकल्प

याची माहिती देणारे निसर्गमित्र पुस्तक उपलब्ध केले. एकूण १२ राज्यांतील १५० पेक्षा अधिक शाळा, संस्था, अनौपचारिक केंद्र यांनी सहभाग घेतला. ही स्पर्धा पाणी, माती, झाडे आणि प्राणी या चार प्रमुख विषयांशी निगडित असून इ. ५वी ते ९वी वयोगटामधील १,७६९ विद्यार्थ्यांनी पहिल्या फेरीसाठी नोंदणी केली. त्यामध्ये महाराष्ट्रातील पुणे, सिंधुदुर्ग, बीड, अहमदनगर, नांदेड, नाशिक, सांगली, मुंबई, संभाजीनगर, सातारा, सोलापूर, यवतमाळ कोल्हापूर, लातूर, धाराशिव, बुलढाणा, अमरावती, जळगाव, रत्नागिरी, धुळे, परभणी, चंद्रपूर या जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांबरोबरच मणीपूर, आसाम, बिहार, दिल्ली, गोवा, हिमाचल प्रदेश, जम्मू-काश्मीर, मध्यप्रदेश, पंजाब, तामिळनाडू, तेलंगणा या राज्यांतील विद्यार्थी देखील सहभागी झाले.

पहिल्या फेरीत नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांपैकी १,१२५ विद्यार्थ्यांनी पहिली फेरी दिली. त्यांपैकी ८६८ विद्यार्थी दुसऱ्या निरीक्षण कौशल्याच्या फेरीत गेले. तिसऱ्या फेरीत प्रकल्प करायचे होते त्यात ४५० विद्यार्थी गेले. इ. ५वी ते ७वी या गटासाठी संग्रह, प्रतिकृती, सर्वेक्षण आणि इ. ८वी ते ९वी या गटासाठी सर्वेक्षण, समस्या परिहार व नवनिर्मिती उत्पादन असे प्रकल्प प्रकार दिले होते. शेवटची फेरी जून महिन्यात घेण्यात येईल.

## ❖ प्रशिक्षण ❖

शासनासाठी आणि अन्य संस्था, शिक्षक यांच्यासाठी डिजिटल साधने वापर, निर्मिती आणि शैक्षणिक तंत्रज्ञान यांची प्रशिक्षणे घेतली. याचा मुख्य उद्देश साधनांचा प्रसार आणि संस्था, शाळा, शिक्षक जोडणे हा आहे. या वर्षी महाराष्ट्र व जम्मू, मणीपूर, अरुणाचल प्रदेशमध्ये प्रशिक्षणे घेतली. यात तंत्रज्ञानाचा वापर करून वर्गअध्यापन आणि Foundational Literacy and Numeracy हे विषय होते.

## ❖ दृक्-श्राव्य माध्यम केंद्र ❖

ज्ञान प्रबोधिनीच्या कामांचा प्रचार आणि प्रसार व्हावा, या उद्देशाने शैक्षणिक साधन केंद्राअंतर्गत दृक्-श्राव्य माध्यमांशी संबंधित कामांना सुरुवात झाली.

१. **मध्यवर्ती चित्रफिती :** प्रबोधिनीच्या कामांवर आधारित काही मध्यवर्ती विषय निवडून त्यावर माहितीपट तयार करण्याचे काम केले. ज्ञान प्रबोधिनी वार्षिक वृत्त (शके १९४४), भवितव्य लेख प्रक्रिया, मा. यशवंतराव लेले व मा. लताताई यांच्या मुलाखती, धडपड प्रयोगशाळा, अक्षर राम ग्रंथप्रदर्शन, चैतन्य भुवन (सोलापूर), अनुभव अभिरूची योजना (निगडी) हे माहितीपट प्रकाशित करण्यात आले. Jnana Prabodhini या यू-ट्यूब चॅनेलवर हे सर्व माहितीपट आणि २९ प्रबोधन गीतांच्या काव्य चित्रफिती प्रकाशित करण्यात आल्या.

२. **सेवा :** प्रबोधिनी अंतर्गत केंद्रांच्या आणि विभागांच्या कार्यक्रमांसाठी छायाचित्रे, छायाचित्रण, संकलन, थेट प्रक्षेपण, प्रसिद्धीपत्रके यांसाठी दृश्य रचना, समाजमाध्यमांसाठी Reels किंवा चित्रफिती तयार करण्यात आल्या. वर्षभरात मिळून ४९ कार्यक्रमांसाठी सेवा दिल्या. त्यापैकी २० कार्यक्रमांसाठी सशुल्क सेवा देण्यात आल्या. पुणे, निगडी, शिवापूर आणि डोंबिवली या चार केंद्रांत मिळून एकूण १६ विभागांतर्फे झालेल्या कार्यक्रमांचा यात समावेश होता. वनवासी कल्याण आश्रमाच्या बारीपाडा येथील प्रकल्पासाठी एका माहितीपटाची निर्मिती व्यावसायिक शुल्क आकारून करण्यात आली.

३. **समाजमाध्यमे :** फेसबुक, इन्स्टाग्राम, X (ट्विटर) व LinkedIn या समाजमाध्यमांवर प्रबोधिनीच्या खात्यांद्वारे विविध कार्यक्रमांची वृत्ते, निमंत्रणे, माहितीपत्रके नियमितपणे प्रकाशित करण्यात आली. फेसबुकद्वारे २३९, इन्स्टाग्रामद्वारे १४६, LinkedIn द्वारे ५१, तर X (ट्विटर) द्वारे २६ posts वर्षभरात करण्यात आल्या.

## ❖ केंद्र आणि विभाग साहचर्य ❖

नागरी वस्ती अभ्यासगट, हराळी केंद्र, नैसर्गिक संसाधने, प्रशाला माजी विद्यार्थी मंडळ (JPPAF) विशेष उद्दिष्ट गट - इकॉलॉजी, विशेष उद्दिष्ट कला गट, पुणे प्रशाला, छात्र प्रबोधन, युवक विभाग, युवती विभाग, प्रज्ञा मानस संशोधिका, संवादिनी, स्त्री-शक्ती (ग्रामीण), पालक महासंघ, नेतृत्व संवर्धन केंद्र, स्पर्धात्मक क्षमता संवर्धन केंद्र, संत्रिका, निगडी केंद्र, डोंबिवली विस्तार केंद्र, शिवापूर केंद्र, मध्यवर्ती कार्यालय, पुणे या विभाग व केंद्रांसोबत साहचर्याने काम केले.

> प्रबोधिनी, प्रबोधिनी, प्रबोधिनी, प्रबोधिनी
> एक ध्यास, एक आस आमुच्या मनोमनी ।।१।।
> प्रबोधिनी, प्रबोधिनी, प्रबोधिनी, प्रबोधिनी
> एक तंत्र, एक मंत्र आमुच्या तनूमनी ।।२।।
> प्रबोधिनी, प्रबोधिनी, प्रबोधिनी, प्रबोधिनी
> साध्य एक, मार्ग एक आमुची प्रबोधिनी ।।३।।




## ५. छात्र प्रबोधन

### ❖ कुमार साहित्य मेळावे व संमेलन ❖

१. **साहित्य मेळावे :** भाषेची गोडी, साहित्याची अभिरूची वाढावी म्हणून पुणे व परिसरात मिळून २९ साहित्य मेळावे झाले. त्यामध्ये सुमारे २००० विद्यार्थी सहभागी झाले होते. कुमार साहित्य संमेलनाच्या पूर्वतयारीचा भाग म्हणून लातूर व हराळी येथे छात्र प्रबोधनच्या अंकाभोवती दोन ते तीन तासांचे साहित्य मेळावे घेण्यात आले. लातूर परिसरात २१ ठिकाणी झालेल्या साहित्य मेळाव्यात एकूण १५०० विद्यार्थी, तर हराळी येथे झालेल्या पाच साहित्य मेळाव्यांत २०० विद्यार्थी सहभागी झाले होते. भाषिक खेळ, मौनवाचन, चर्चा, प्रकट वाचन, रसग्रहण, सादरीकरण इ. गोष्टी मेळाव्यांमध्ये घेण्यात आल्या. (एकूण ५५ मेळावे, ३,७०० विद्यार्थी)

२. **साहित्य संमेलन (हरंगुळ, लातूर) :** जनकल्याण निवासी विद्यालय हरंगुळ, लातूर यांच्यासोबत दि. ८ ऑक्टो. रोजी लातूर येथे २६ शाळांमधील ५३७ विद्यार्थी, ६० शिक्षक व १० साहित्यिकांच्या सक्रिय, उत्साहपूर्ण सहभागाने दिवसभराचे कुमार साहित्य संमेलन उत्साहात पार पडले उद्घाटनाला पद्मभूषण डॉ. अशोकराव कुकडे तर समारोपाला शिवशाहीर संतोष साळुंखे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. उद्घाटनाच्या कार्यक्रमात छात्र प्रबोधन प्रकाशित 'ध्यासपंथावरील दीपस्तंभ' या पुस्तकाचे डॉ. कुकडे यांच्या हस्ते प्रकाशन झाले.

३. **साहित्य संमेलन (हराळी) :** ज्ञान प्रबोधिनी, हराळी केंद्राच्यासह दि. २७ फेब्रु. २४ रोजी ज्ञान प्रबोधिनी विद्यालय, हराळी येथे संमेलन आयोजित करण्यात आले. संमेलनात ज्ञान प्रबोधिनी– हराळीचे विद्यार्थी आणि पंचक्रोशीतील पाच शाळांमधील मिळून एकूण २५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. संमेलनाचे उद्घाटन हराळी केंद्रप्रमुख मा. अभिजितदादा कापरे यांनी केले.

हरंगुळ व हराळी या दोन्ही संमेलनांत लेखन–अभिवाचन कार्यशाळा, लेखक गप्पा, कल्पक खेळ–स्पर्धा, साहित्य कट्टा, विद्यार्थ्यांचे सादरीकरण अशा सत्रांचा समावेश होता. दोन्ही संमेलनात मिळून आश्लेषा महाजन, रेणू पाचपोर, फारुक काझी, स्वाती ताडफळे, मृणालिनी कानिटकर, कैलास दौंड, बालाजी इंगळे, संगीता बर्वे, शंतनू पांडे, मुकुंदराज कुलकर्णी इ. मान्यवर साहित्यिक उपस्थित होते.

### ❖ कुमारांसाठीचे अन्य उपक्रम ❖

१. **वर्गोद्दिष्ट स्पर्धा :** छात्र प्रबोधनद्वारा प्रकाशित दिनदर्शिकेत ही स्पर्धा जाहीर करण्यात आली. वर्गाची एकी वाढणे, ठरवून एखादी गोष्ट वर्गाने पूर्ण करणे आणि आत्मविश्वास मिळवणे हा स्पर्धेमागील हेतू होता. स्पर्धेला प्रबोधन दूत शाळांमधील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. कृतज्ञता पत्रे, विज्ञान प्रयोग, सामूहिक अभ्यास, सार्वजनिक स्वच्छता, मुलाखत, बातम्यांचा कात्रण संग्रह, स्वकमाईतून देणगी इ. स्पर्धा वर्षभरात

दि. ८ ऑक्टो. २३, जनकल्याण निवासी विद्यालय, हरांगुळ, जि. लातूर येथील शाळेचे आवार विद्यार्थ्यांनी फुलून गेले होते. निमित्त होते कुमार साहित्य संमेलनाचे!

संमेलनासाठी दाखल झालेल्या सर्व शाळांची नोंदणी एव्हाना करून झाली होती. उद्घाटन सत्राला काही मिनिटांचा अवधी शिल्लक असताना १२ ते १५ विद्यार्थिनींचा एक गट 'आम्हाला कुमार साहित्य संमेलनात सहभागी होऊ द्या, आमची आयत्यावेळची नोंदणी करून घ्या!' अशी विनंती, नव्हे आग्रह 'जनकल्याण'च्या कार्यकर्त्यांकडे करत होता. त्यांच्याबरोबर कोणी शिक्षक दिसत नव्हते. त्यांच्यातली एक धिटुकली, गटाची 'पुढारी मुलगी' पुढे येऊन म्हणाली, ''खास 'आमच्यासाठी' हे संमेलन होणार आहे म्हटल्यावर, आम्ही इकडे 'यायचंच' असं ठरवलं; पण आमच्या शाळेतले शिक्षक आमची जबाबदारी घ्यायला उत्सुक नव्हते. त्यामुळे मुख्याध्यापकांनी आम्हाला संमेलनात सहभागी होण्यासाठीची परवानगी नाकारली. मग मी पुढाकार घेऊन संमेलनाला येऊ इच्छिणाऱ्या मुलींचा गट जमवला. मोठ्या चिकाटीने आम्ही आपापल्या घरून परवानगी मिळवली आणि आमच्या गावापासून ७-८ किमी. अंतरावर असलेल्या या शाळेत आमच्या जबाबदारीवर या कुमार साहित्य संमेलनासाठी हजर झालो आहोत.''

अत्यंत आत्मविश्वासपूर्वक तिनं सांगितलेली ही घटना ऐकून आम्ही थक्क झालो! काही कार्यकर्त्यांनी त्या विद्यार्थिनींसाठी उत्स्फूर्तपणे टाळ्या वाजवल्या. त्या सगळ्या मुलींच्या डोळ्यांत संमेलनाबद्दल कुतूहल होतं. प्रयत्नपूर्वक त्या मुली संमेलनात सहभागी झाल्या! दिवसभर अतिशय उत्साहपूर्ण, सक्रिय असा त्यांचा सहभाग होता. कुमार साहित्य संमेलन झाल्यानंतर घरी निघताना त्यांच्या सोबत होता देवी शारदेचा आशीर्वाद आणि कमावलेला आत्मविश्वास!

झाल्या. मार्च २३ ते मार्च २४ या कालावधीत १२ वर्गोद्दिष्ट स्पर्धांमधून ३० शाळांमधून ५५ वर्ग (सुमारे २५०० विद्यार्थी) सहभागी झाले होते. त्यापैकी २९ वर्गांना प्रत्येकी रु. १,००० चे बक्षीस पुस्तकरूपाने दिले. तसेच ज्या वर्गांनी वर्षभरात तीन बक्षिसे मिळवली, ते वर्ग महाबक्षिसासाठी पात्र झाले; अशा तीन शाळांमधील इ. ७वी, ८वीच्या वर्गांनी प्रत्येकी रु. २,००० ची रोख बक्षिसे मिळवली. या शिवाय राज्यस्तरीय हस्तलिखित व अभिवाचन स्पर्धा, कार्यशाळा, जिज्ञासा ग्रंथालय स्पर्धा, प्रगतीला बक्षिस स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले. या सर्वांत मिळून १,५०० विद्यार्थी सहभागी होते.

२. **ऑनलाइन उपक्रम – प्रबोधन ऐपावाक :** सलग चौथ्या वर्षी दि. १ ते ३१ मे २३ या कालावधीत 'प्रबोधन ऐपावाक' हा ऑनलाइन उपक्रम राबविला गेला. एकूण ४७३ विद्यार्थी यात सहभागी झाले. यामध्ये विद्यार्थ्यांना दि. १ ते २० मे दरम्यान 'ऐका-पाहा-वाचा' पैकी एक लिंक आणि 'करा'ची एक लिंक अशा रोज दोन लिंक्स् 'प्रबोधन ऐपावाक' ॲपद्वारे पाठवल्या गेल्या. या अंतर्गत प्रबोधिनीचे कार्यवाह मा. सुभाषराव देशपांडे व गिर्यारोहक मा. भूषण हर्षे यांच्या जडणघडणीच्या अंगाने मुलाखती झाल्या. 'ऐका-पाहा-वाचा-करा' वर आधारित स्पर्धा घेतली. ६० विद्यार्थ्यांनी त्याला प्रतिसाद दिला. विशेष कामगिरी केलेल्या चार विद्यार्थ्यांना पुस्तकरूपाने बक्षिसे दिली. दि. ११ जून २३ रोजी स्पर्धेतील विद्यार्थ्यांसाठी बक्षीस म्हणून तोरणा गडावर एक दिवसीय सहल नेण्यात आली. एकूण २६ विद्यार्थी सहलीमध्ये सहभागी झाले. गडांवर घडलेल्या ऐतिहासिक प्रसंगावर आधारित नाटुकल्यांचे सादरीकरण, दोन तासांची गडफेरी, नाश्ता, सहभोजन, खेळ, इ.चा आनंद विद्यार्थ्यांनी घेतला.

३. **प्रबोधन विकासिका :** जुलै २३ पासून इ. ५वी ते ११वीच्या विद्यार्थ्यांसाठी 'प्रबोधन विकासिका' हा ऑनलाइन/ऑफलाइन मासिक उपक्रम वर्षभर झाला. २९ विद्यार्थी यात सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांच्या विकसनासाठी दरमहा सुमारे अर्धा तास गटशः कृती व त्यानंतर सुमारे तासभर विविध क्षेत्रांतल्या कर्तृत्ववान व्यक्तींशी गप्पांचा कार्यक्रम असा एकूण दीड तासांचा कार्यक्रम होता. वर्षभरात एकदिवसीय स्वअध्ययन कौशल्य, संवाद कौशल्य विकसनाच्या दोन कार्यशाळा प्रत्यक्ष व तीन मान्यवरांशी गप्पांचे कार्यक्रम झाले. यामध्ये लेखक एकनाथ आव्हाड, लेफ्ट. कर्नल हृषिकेश बर्डे, आंतरराष्ट्रीय नेमबाज शाहू माने हे मान्यवर उपस्थित होते.

### ❖ प्रकाशने ❖

नियमित कामांमध्ये ११ नित्य अंक वर्षभरात प्रकाशित होऊन, १,३०० सभासदांपर्यंत पोहोचवले. 'विकासमित्र' प्रकल्पासाठी सुबोध द्वैमासिकाचे पाच अंक प्रकाशित झाले. त्याचे २००० सभासद आहेत. नित्य दिवाळी अंक, इंग्रजी दिवाळी अंक, सुबोध (ग्रामीण) दिवाळी अंक प्रकाशित झाले. एकूण २७००० अंकांची प्रकाशनपूर्व नोंदणी ७० केंद्रांद्वारे झाली. कुमारांसाठी दिनदर्शिका (वर्ष ८ वे) प्रकाशित करण्यात आली. त्याची नोंदणी ९,००० इतकी झाली. प्रायोगिक इंग्रजी ई-अंक दोन वेळा प्रकाशित झाला.

छात्र प्रबोधनच्या अंकातील साहित्यातून संपादन करून आत्तापर्यंत एकूण ८१ पुस्तके प्रकाशित झाली असून, त्यापैकी गेल्या वर्षात पाच नवीन पुस्तके, सहा पुस्तकांच्या पुढील आवृत्त्या प्रकाशित झाल्या.

१. **नवीन पुस्तके :** १) पंख फुलवू या प्रतिभेचे (हिंदी, गुजराती भाषेत) - ले. नलिनी गुजराथी २) रंगु अभंगाचे ठायी - अभंगपुस्तिका (व्यक्तिविकास), ३) ध्यासपंथावरील दीपस्तंभ (राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय १६ प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांचा

परिचय) – ले. शैलजा देशमुख, नीलिमा करमरकर ४) मैत्री आयुर्वेदाशी – ले. वैद्य प्रयाग सेठिया (माहितीपर)

२. **पूर्वप्रकाशित पुस्तकांच्या पुढील आवृत्त्या :** १) भावनांच्या प्रांगणात, २) कथा इस्रोची, ३) गीता गीताई, ४) चला प्रकल्प करूया, ५) व्यक्तिविकासासाठी विद्याव्रत भाग १ व २

३. **पुनर्मुद्रण :** १) कहाणी दोन भावांची, २) त्रिमितीची किमया, ३) वाचलेच पाहिजे भाग १ व २

४. **साहित्य निर्मिती व वितरण – सहा पानी ४० पुस्तकांचा संच :** सहा पानी एका संचात विविध लेखकांनी लिहिलेल्या कथा–कवितांची ४० पुस्तके आहेत. सहा पानीच्या दुसऱ्या संचात विविध क्षेत्रांत कर्तृत्व गाजवलेल्या ९२ व्यक्तींच्या प्रेरणादायी कहाण्यांची ४० पुस्तके आहेत.

५. **विक्री :** वर्षभरात विविध ठिकाणी लावलेल्या स्टॉल्सद्वारे प्रत्यक्ष व jpprakashane.org या संकेतस्थळाद्वारा ऑनलाइन विक्री झाली. एकूण १९.२२ लक्ष रुपयांची पुस्तक विक्री झाली.

### ❖ प्रौढांसाठीचे उपक्रम ❖

१. **शिक्षकांसाठी प्रबोधन दूत योजना :** शहरी/ग्रामीण भागातील ६वी ते ९वी इयत्तांना शिकवणाऱ्या शिक्षकांसाठी ही योजना राबवण्यात येते. शहरी, ग्रामीण व आदिवासी भागातील धडपडणाऱ्या २९ जिल्ह्यांतील, ७५ तालुक्यांमधील १७० शाळांमधील (उच्च प्राथमिक, माध्यमिक) प्रत्येकी एक शिक्षक या योजनेत कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी वाढावी, साहित्याची अभिरूची वाढावी, मुक्त अभिव्यक्तीच्या विविध संधी उपलब्ध व्हाव्यात, शिकण्याची हौस, स्वयंविकासाची प्रेरणा वाढीस लागावी हे या योजनेचे प्रमुख हेतू आहेत. 'झेप ३', 'झेप ४', 'भरारी' असे प्रबोधन दूतांचे तीन गट सक्रिय आहेत. तीन गटांमधील सहभागी शिक्षकांसाठी मार्गदर्शनपर दरमहा एक, अशा एकूण १५ दूरस्थ बैठकी झाल्या. प्रबोधन दूतांची दोन निवासी शिबिरे झाली. दि. २९ ते ३१ मे २३ मध्ये पुण्यात झालेल्या निवासी शिबिरात १४ जिल्ह्यांतून २८ जण सहभागी झाले. तर दि. १७ ते १९ नोव्हें. २३ मध्ये निगडी येथे झालेल्या निवासी शिबिरात १४ जिल्ह्यांतून २५ जण सहभागी झाले. वाचनाची गोडी व शिकण्याची हौस विद्यार्थ्यांमध्ये कशी वाढवावी, हा शिबिराचा हेतू होता. दि. १२ व १३ जाने. २०२४ रोजी दोन दिवसीय प्रबोधिनी परिचय सहल झाली. या सहलीत सहा जिल्ह्यांमधून २० शिक्षक व एक मुख्याध्यापक असे एकूण २१ जण सहभागी झाले होते. ज्ञान प्रबोधिनीचे पुणे, निगडी, साळुंब्रे येथे सुरू असणारे शैक्षणिक प्रकल्प पाहणे, येथील शिक्षक, मुख्याध्यापक, विद्यार्थी यांच्याशी संवाद साधणे तसेच अशा स्वरूपाच्या काही प्रयोगांची सुरुवात आपल्या ठिकाणी कशी करता येईल, याबाबतचा या शिक्षकांचा विचारविनिमय सुरू व्हावा हा या सहलीचा मुख्य उद्देश होता. प्रबोधनदूतांनी आपापल्या शाळांमधील विद्यार्थ्यांद्वारे पुढील उपक्रमांमध्ये उत्साहपूर्ण प्रतिसाद दिला. दिवाळी अंकांची व दिनदर्शिकेची विशेष सवलतीत नोंदणी झाली. (५६ शाळा, ४०२४ अंक), वर्गोद्दिष्ट स्पर्धा (४० शाळांचा सहभाग), जिज्ञासा ग्रंथालय (४३ शाळा), राज्यस्तरीय हस्तलिखित व अभिवाचन स्पर्धा (८ शाळा), प्रगतीला बक्षीस स्पर्धा (११ शाळांचा सहभाग, सहा शाळांनी स्पर्धा पूर्ण केली).

२. **पालकांसाठी प्रबोधन संवादक योजना :** ज्ञान प्रबोधिनीच्या शैक्षणिक प्रक्रियांचा लाभ अनेक मुलामुलींना घेता यावा व पुस्तकी शिक्षणापलीकडे त्यांच्या सर्वांगीण विकसनामध्ये डोळसपणे प्रभावी संवादकाची भूमिका पालकांना करता यावी, या उद्देशाने इ. ५वी ते ७वीच्या पालकांसाठी 'प्रबोधन संवादक' योजना एप्रिल २०२२ पासून सुरू आहे. त्यामध्ये या वर्षी १९ पालक सहभागी झाले होते. या सर्वांना १५ पुस्तकांचा संच व १२ अंक देण्यात आले. शिवाय छात्र प्रबोधन ई–मासिक दरमहा ई–मेल द्वारे पाठविले. दूरस्थ स्वरूपात तीन मासिक व्याख्याने व एक दिवसीय दोन प्रत्यक्ष कार्यशाळा झाल्या.

या उपक्रमांसाठी 'जल्लोष वाचनाचा' प्रकल्पांतर्गत 'इंडियन रूटस्' अमेरिका या संस्थेद्वारा भरीव अर्थसाहाय्य उपलब्ध झाले. तसेच सुमारे ४०० देणगीदार, जाहिरातदारांनी विशेष आर्थिक योगदान दिले, त्याबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत!

**विशेष आनंदवार्ता**

छात्र प्रबोधनतर्फे प्रकाशित, मा. नीलिमा करमरकर लिखित **'चलो मिरॅमॅक आणि इतर अद्‌भुत कथा'** या **कथासंग्रहाला** प्रतिष्ठेचा राजा मंगळवेढेकर **'राज्य पुरस्कार'** दि. २७ फेब्रु. २०२४ रोजी मराठी भाषा गौरव दिनाच्या दिवशी प्राप्त झाला.

**प्रतिसादासाठी जाहीर आवाहन**

१. नित्य व दिवाळी अंकांसाठी मराठी व इंग्रजी भाषेतील दर्जेदार लेखन आपण पाठवू शकाल. लेखक सुचवू शकाल.
२. विविध प्रकाशने अधिकाधिक जणांपर्यंत पोहोचवण्यासाठी आपण मदत करू शकाल. भेटवस्तू म्हणूनही आपल्या कार्यक्रमांमध्ये ही प्रकाशने देऊ शकाल.
३. आपल्या संपर्कातील विद्यार्थी व अध्यापकांना उपक्रमांमध्ये सहभागाचे आवाहन करू शकाल. तसेच हे उपक्रम अनेकांपर्यंत पोहोचावेत म्हणून अर्थसाहाय्य देऊ शकाल. (संपर्क क्र. : ०२०–२४२०७१७५/१८१)



# ६. नेतृत्व संवर्धन केंद्र

केंद्राच्या भवितव्य लेखात निवडलेल्या तीन क्षेत्रांमध्ये (प्रशासकीय, सामाजिक, संघटनात्मक) काम या वर्षी झाले. प्रशासकीय नेतृत्वगुण विकसन वर्गांमध्ये स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी १५ जिल्ह्यांमधील ५८ युवक, युवती सहभागी झाले. संघटनात्मक नेतृत्वगुण विकसनाचा वर्ग स्नेहदीप जनकल्याण फौंडेशन व 'स्व'-रूपवर्धिनी या दोन संघटनेतील प्रमुख कार्यकर्त्यांसाठी घेतला. सामाजिक नेतृत्व विकसनासाठी प्रशिक्षण वर्ग, शिबिरे व कार्यशाळा यांच्याद्वारे २१ महाविद्यालयात संपर्क होऊन विविध उपक्रमांच्या माध्यमातून ७०० हून अधिक प्रशिक्षणार्थीपर्यंत पोचता आले. याशिवाय १८ विद्यार्थ्यांसाठी दोन महिन्यांचा प्रायोगिक वर्ग घेतला.

### ❖ प्रशासकीय नेतृत्वगुण विकसन ❖

प्रशासकीय नेतृत्व व स्पर्धा परीक्षा अभ्यासाच्या तयारीसाठीचे दोन वर्ग जुलै २३ ते मार्च २४ दरम्यान झाले. या वर्गांमध्ये बेसिक व ॲडव्हान्स् (जिज्ञासा व आकांक्षा) अशा दोन भागांत केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेविषयी ३०० सत्रे, व्यक्तिमत्त्व व नेतृत्व पायाभरणीची ३४ सत्रे व ३० दिवस निवासी कार्यक्रम झाले. त्यामध्ये राजगड रात्र सहल, साहस शिबिर, नेतृत्व शिबिरे, अभ्यास शिबिर, ग्रामीण परिचय शिबिर, तालुका व जिल्हा अभ्यास सहल इ. उपक्रमांचा समावेश होता. याशिवाय विद्यार्थ्यांना आव्हानात्मक प्रसंगांना सामोरे जावे लागेल अशी व्यक्तिकार्ये, जोडीकार्ये, गटकार्ये दिली. ग्रामीण परिचय शिबिर पुणे जिल्ह्यातील वेल्हे तालुक्यातील सहा गावांमध्ये, तालुका अभ्यास सहल पनवेल, माणगाव (रायगड) आणि जावळी (सातारा) तालुक्यांमध्ये व जिल्हा अभ्यास सहल धाराशिव जिल्ह्यात झाली. धाराशिव जिल्ह्याचा तयार केलेला अहवाल वरील कोड स्कॅन करून पाहता येईल.

वर्गामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांच्या दोन बैठकी झाल्या. पालकांसाठी प्रबोधिनी परिचय सहल दि. १६ मार्च २४ या दिवशी झाली. महाराष्ट्राच्या विविध भागांतून २६ पालक यामध्ये सहभागी झाले. मा. मैत्रेय कुलकर्णी (IFS), मा. सविताताई कुलकर्णी (विभागप्रमुख, स्पर्धात्मक क्षमता संवर्धन केंद्र) तसेच मा. महेंद्रभाई सेठिया यांनी पालकांशी संवाद साधला. विभागाचा वर्षान्त समारंभ व स्नेहभोजनाने सहलीचा समारोप झाला. विद्यार्थ्यांच्या पुढाकाराने 'संकल्प व्याख्यानमाला' उपक्रम पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयामध्ये झाला. यामध्ये 'स्नेहवन' या संस्थेचे संचालक मा. अशोक देशमाने व्याख्याते म्हणून उपस्थित होते. जिज्ञासा व आकांक्षा वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पुढाकाराने समाजातील विविध क्षेत्रांत उत्तम कार्य व नेतृत्व करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांची मुलाखत घेण्याची 'ग्रेट भेट मुलाखत स्पर्धा' झाली. स्पर्धेत ३४ गटांनी सहभाग नोंदवला व प्रत्यक्ष ३१ गटांनी मुलाखती घेतल्या. स्पर्धकांसाठी मुलाखत कार्यशाळाही झाली. एकूण १०,००० रु. ची बक्षिसे बक्षीसपात्र सहभागींना देण्यात आली.

### ❖ संघटनात्मक नेतृत्वगुण विकसन ❖

१. **उत्कर्ष वर्ग :** पुण्यातील वस्ती भागात शिक्षण, आरोग्य विषय घेऊन काम करणाऱ्या 'स्नेहदीप जनकल्याण फौंडेशन'च्या कार्यकर्त्यांसाठी 'उत्कर्ष' वर्ग जुलै २३ ते फेब्रु. २४ या कालावधीत आयोजित केला. महिन्यातून एक पूर्ण दिवस सत्र, चर्चा, कृती असे वर्गाचे स्वरूप होते. वर्गाच्या उद्घाटन सत्राला स्नेहदीपचे मा. प्रकाश भंडारी उपस्थित होते. एकूण ३० कार्यकर्ते या वर्गात सहभागी झाले. नियोजन-कार्यवाही, गटबांधणी व सामाजिक जाणीव, प्रतिसादी वृत्ती इ. विषयांवरील सत्रे झाली. फेब्रुवारी महिन्यात प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र देऊन वर्गाचा समारोप झाला.

२. **उन्मेष २ वर्ग :** 'स्व'-रूपवर्धिनीच्या २५ युवकांसाठी जुलै २३ मध्ये हा वर्ग सुरू झाला. गटबांधणी कौशल्य व नेतृत्व विकसन इ. विषयांवरील सत्रे त्यात झाली. यामध्ये नेतृत्वाच्या शैली व नेतृत्व घडविण्याची पायाभरणी यावर सत्रांचे आयोजन करण्यात आले. या सत्रांना कृतींची जोड मिळावी, या हेतूने गटातील दोन जणांचा कार्यकर्ता सहवास मा. सुवर्णाताई गोखले व मा. अभिजितदादा कापरे यांच्यासोबत पूर्ण झाला. मा. गीतांजली देगावकर यांचे 'संघटनात्मक कामामध्ये अभ्यासाची गरज' यावरील अनुभवकथन झाले. दि. १७ ते २० ऑगस्ट या कालावधीत पुणे, अहमदनगर आणि बीड जिल्ह्यामध्ये अभ्यास सहल झाली. स्वयंसेवी संस्थांबरोबर संपर्क प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने 'ग्रामायण' संस्थेच्या पुण्यात आयोजित कार्यक्रमाला मदत करण्यासाठी एक सदस्य एक महिना गेला. 'नेतृत्व क्षमता' या विषयाची चाचणी परीक्षा व वैयक्तिक मुलाखतीद्वारे सहभागी विद्यार्थ्यांचे मूल्यांकन करण्यात आले. ऑगस्ट २३ मध्ये या वर्गाचा समारोप होऊन कु. किरण ननावरे याने प्रथम क्रमांक मिळवला.

### ❖ सामाजिक नेतृत्वगुण विकसन ❖

सामाजिक प्रश्नांवर काम करण्यासाठी सामाजिक नेतृत्व तयार व्हावे आणि असे नेतृत्व करण्याची क्षमता तयार व्हावी, म्हणून योग्य अनुभवांची व कौशल्य प्रशिक्षणाची योजना करण्याचा प्रयत्न या वर्गाद्वारे केला. सामाजिक नेतृत्वगुण विकसनाचा प्रायोगिक वर्ग दि. ५ ऑगस्ट ते १७ नोव्हें. २३ कालावधीत साप्ताहिक स्वरूपात घेतला. एकूण १८ विद्यार्थ्यांनी या वर्गाला प्रवेश घेतला. प्रेरणा, वृत्ती, कौशल्य आणि ज्ञान या मुद्द्यांवर आधारित सत्रे तसेच सामाजिक कार्यकर्त्यांची अनुभवकथने या वर्गात झाली. या वर्गानंतर वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिलांच्या पुनर्वसनासाठी काम करणाऱ्या रिलिफ फौंडेशन या संस्थेच्या कामात नऊ विद्यार्थी प्रत्यक्ष सहभागी झाले. सामाजिक काम व नेतृत्व करायची आवड असणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी संपर्क झाला व पुण्यातील महाविद्यालयात कार्यशाळाही आयोजित करण्यात आल्या.

### ❖ अन्य महत्त्वाचे ❖

१. **वेल्हे प्रशिक्षण केंद्र :** वेल्हे येथे कै. ले. कर्नल सुहास गोगटे नेतृत्व प्रशिक्षण केंद्राच्या सुमारे १०,००० चौ. फूट. क्षेत्रफळ असणाऱ्या चार मजली इमारतीचे बांधकाम पूर्ण होत आले आहे. लवकरच तेथे प्रशासकीय, सामाजिक, संघटनात्मक, शैक्षणिक नेतृत्वासंबंधी निवासी कार्यशाळा व शिबिरे आयोजित केली जातील.

२. **सदस्य प्रशिक्षण :** विभागातील सदस्यांसाठी प्रशिक्षण आयोजित केले होते. यामध्ये तीन टप्प्यांचा समावेश होता. टप्पा १ मध्ये विषय निश्चिती व तयारी, टप्पा २ मध्ये प्रत्यक्ष शिबिरात सत्र घेणे व टप्पा ३ मध्ये शिबिरातील सत्रावरती मा. शरदराव सुंकर (ज्येष्ठ व्यवस्थापन तज्ज्ञ, प्रशिक्षक, कार्यकर्ते, ज्ञान प्रबोधिनी) यांचा प्रत्येक सदस्याला वैयक्तिक प्रतिसाद अशा प्रकारचे नियोजन केले होते. मा. शरदरावांनी सदस्यांना 'प्रभावी सत्र अथवा कार्यशाळा कशा घ्याव्यात?' या संबंधी मार्गदर्शन केले.

३. **युवोन्मेष दिवाळी अंक :** 'सामाजिक नेतृत्व' हा या वर्षीच्या अंकाचा मुख्य विषय होता. विविध सामाजिक क्षेत्रांत काम करणाऱ्या व्यक्तींचे लेख या अंकात घेतले होते. अंकनिर्मिती, प्रचार-प्रसार, नोंदणी व वितरण हे सर्व नियोजन वर्गांमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी मिळून केले होते. एकूण ७०० अंकांची प्रकाशनपूर्व नोंदणी झाली.

४. **आंतरवासिता संधी :** पुण्यातील गरवारे व मॉडर्न महाविद्यालयात शिकणाऱ्या तपस्या दवे व इशांत देशमुख या केंद्राच्या दोन माजी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन वर्गाचा भाग असणारी दोन महिन्यांची आंतरवासिता (Internship) पूर्ण केली.

५. **आंतरविभागीय साहचर्य :** स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण) या विभागासह वेल्हे येथील केंद्राच्या कामात नियमित साहचर्य सुरू झाले. प्रज्ञा मानस संशोधिकेतील सदस्यांसह केलेले नेतृत्व विषयक संशोधन American Education Research Association (AERA) या संस्थेतर्फे घेण्यात येणाऱ्या परिषदेमध्ये मांडले गेले.

**प्रतिसादासाठी जाहीर आवाहन**

१. वंचित गटातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी आपण आर्थिक योगदान देऊ शकाल. (प्रति विद्यार्थी २५,०००/-)
२. वेल्हे येथील प्रशिक्षण केंद्राचा वापर विविध स्वयंसेवी संस्था, महाविद्यालये यांच्यासाठी व्हावा, यासाठी मदत करू शकाल.
३. विविध वर्गांमध्ये आपण संयोजक, मार्गदर्शक, संशोधक म्हणून सहभागी होऊ शकाल. (संपर्क क्र. : ०२०-२४२०७१७९)









# ७. स्पर्धात्मक क्षमता संवर्धन केंद्र

केंद्राचे काम हे Know Your self, Know yo ur System, Know your Society या सूत्राच्या आधारे चालते. या कामाला केंद्राचे माजी विद्यार्थी, अधिकारी आणि अनेक तज्ज्ञ व्यक्तींचे पाठबळ आणि कार्ययुक्त सहभाग असल्यामुळे, हे काम देशातच व जगभरात यशस्वीरित्या पोहोचू शकत आहे.

भवितव्य लेखात मांडलेल्या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी वर्षभरात विविध प्रकारचे काम झाले.

### ❖ प्रशासकीय अधिकाऱ्यांचे नेटवर्क ❖

**केंद्राच्या जगभरात कार्यरत असलेल्या प्रशासकीय अधिकाऱ्यांचे नेटवर्क सक्षम व अधिक कार्यरत करणे** या अंतर्गत, केंद्रात प्रशिक्षण घेतलेल्या अधिकाऱ्यांचे संपर्क दृढ राहून त्यांचे नेटवर्क तयार व्हावे, यासाठी काही मेळावे, दौरे आणि दूरस्थ पद्धतीने बैठकी व अनुभवांची देवाणघेवाण होते.

या वर्षी वाच. विवेक कुलकर्णी व वाच. सविता कुलकर्णी यांनी पुढील अधिकारी भेटी दौरे केले –

१. **सोलापूर :** दोन अधिकारी भेटी – सोलापुरातील महापालिका आयुक्त व पर्यटन उपसंचालक यांची भेट झाली. बदलत्या परिस्थितीतील आणि राजकीय पटलांवर होणाऱ्या बदलांमुळे निर्माण होणारी आव्हाने याबद्दल गप्पा झाल्या.

२. **सोलापूर–आंबेजोगाई :** १० अधिकारी भेटी – हराळी, आंबेजोगाई, लातूर, धाराशिव, सोलापूर या ठिकाणी विविध पदांवरील दहा अधिकाऱ्यांच्या भेटी व गप्पा झाल्या.

३. **संस्था भेट आणि अधिकारी भेटी :** आळंदीजवळ स्नेहवन संस्थेत केंद्राच्या सध्या न्यायाधीश असलेल्या श्री. समरेंद्र निंबाळकरांच्या 'अवघा रंग एक झाला' पुस्तकाचे प्रकाशन वाच. विवेक कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. वाच. सविता कुलकर्णी आणि सात अधिकारी उपस्थित होते.

४. **पुणे अधिकारी मेळावा २०२४ :** केंद्रीय लोकसेवा आयोग व महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगामधून सेवेमध्ये नुकतेच रुजू झालेले, सेवेत असलेले ज्येष्ठ व सेवानिवृत्त अशा सर्व स्तरांवरील ६४ अधिकाऱ्यांचा मेळावा ज्ञान प्रबोधिनीमध्ये झाला. वाच. विवेक कुलकर्णी यांनी प्रस्तावनेत 'प्रशासकीय अधिकाऱ्यांचे जाळे तयार करणे, ज्येष्ठ अधिकाऱ्यांच्या अनुभवातून शिकणे, मधल्या फळीतील अधिकाऱ्यांना कामाची प्रेरणा मिळणे', हे हेतू कार्यक्रमाने साध्य होतील, असे नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाच. सविता कुलकर्णी यांनी केले.

पुढील मान्यवरांनी मेळाव्यात त्यांचे अनुभव व विचार मांडले. श्री. अतुल कुलकर्णी (निवृत्त आय.पी.एस्., महाराष्ट्र), श्री. प्रमोद फाळणीकर (निवृत्त आय.पी.एस्., मध्यप्रदेश), श्री. राजीव रानडे (निवृत्त आय.आर.एस्.),

श्री. सुनील दाढे (निवृत्त आय.ए.ए.एस्.), श्री. श्रीकर परदेशी (आय.ए.एस्., महाराष्ट्र), श्री. श्रावण हर्डीकर (आय.ए.एस्., महाराष्ट्र). सर्व ज्येष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांच्या अनुभवातून तयार झालेले ज्ञान उपस्थितांसमोर मांडले.

प्रशासकीय यंत्रणेत स्वच्छ राहून नीतिमत्तापूर्ण आणि कार्यक्षमतेने काम करता येते, याचे हे सर्व आदर्श आहेत. अधिकाऱ्यांचे सविस्तर वृत्त वाचण्यासाठी वरील क्यूआर कोड स्कॅन करावा.

५. **अधिकाऱ्यांच्या झूम बैठकी :** केंद्र आणि राज्य सरकारमध्ये महत्त्वाच्या पदांवर असणाऱ्या अधिकाऱ्यांच्या दूरस्थ पद्धतीने सहा बैठकी झाल्या. विविध योजना, प्रशासनातले महत्त्वाचे विषय यावर चर्चा झाल्या. नियमित कामामध्ये या गटाच्या माध्यमातून एकमेकांना मदत होते. (सरासरी उपस्थिती ८०)

६. **प्रबोधिनी फेलो झूम बैठकी :** स्पर्धात्म क्षमता संवर्धन केंद्रातील जे विद्यार्थी केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध शिष्यवृत्तीमार्फत विविध क्षेत्रांत उत्तम कार्य करत आहेत, अशा विद्यार्थ्यांचा हा गट आहे. याच्या चार बैठकी झाल्या, त्यामध्ये सदस्यांनी कामाचे अनुभवकथन केले. (सरासरी उपस्थिती ३०)

७. **ग्लोबल थिंकर्स झूम बैठकी :** केंद्रातील जे विद्यार्थी प्रशासकीय यंत्रणेत नसून विविध क्षेत्रांत उत्तम योगदान देत आहेत, अशा माजी विद्यार्थ्यांचा ग्लोबल थिंकर्स नावाचा गट आहे. याच्या चार बैठकी झाल्या. सदस्यांनी त्यांचा आत्तापर्यंतचा शिक्षण प्रवास, विविध क्षेत्रांतील काम, तिथे आलेले अनुभव याची मांडणी केली. (सरासरी उपस्थिती २५)

८. **ज्ञान प्रबोधिनी प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या पत्नींचे मेळावे :** २०२२-२३ या वर्षी सुरू केलेल्या अधिकाऱ्यांच्या पत्नींच्या गटाच्या विविध विषयांवर दूरस्थ पद्धतीने १२ बैठकी झाल्या. २१ जणींनी अधिकारी पत्नी म्हणून आयुष्यात झालेल्या बदलांविषयी त्यांचे अनुभवकथन केले. एकमेकींना मानसिक आधार व मार्गदर्शन मिळण्यासाठी याचा उपयोग झाला.

### ❖ राष्ट्रीय एकात्मतेसाठी उपक्रम ❖

**राष्ट्रीय एकात्मतेसाठी युवा गटाला उपयुक्त अशा कार्यक्रमांचे सीमावर्ती व अवघड राज्यांमध्ये आयोजन करणे,** यामध्ये सीमावर्ती राज्यांमध्ये केंद्रीय लोकसेवा आयोग परीक्षा मार्गदर्शन वर्गाचे आयोजन करून हे प्रशिक्षण वर्ग दूरस्थ तसेच प्रत्यक्ष पद्धतीने घेण्याची रचना बसवली आहे.

इटानगर व नहरलगून (अरुणाचल प्रदेश) येथील केंद्रीय लोकसेवा आयोग पूर्वपरीक्षा मार्गदर्शन वर्ग आणि केंद्रातील सदस्यांचा अरुणाचल प्रदेश येथील दौरा याविषयी सविस्तर वृत्त 'अन्य राज्यांमधील विस्तार' या अंतर्गत वाचता येईल.

**केंद्रीय लोकसेवा आयोग २०२३ च्या परीक्षेत केंद्राचे १९ विद्यार्थी यशस्वी झाले व विविध पदांवर त्यांची नियुक्ती झाली.**

| | | |
|---|---|---|
| तेजस सारडा | अभिजित पाखरे | श्रुती कोकाटे |
| कुणाल अहिरराव | जान्हवी शेखर | हिमांशु टेंभेकर |
| आशिष पाटील | गौरी देवरे | श्रीकृष्ण सुशीर |
| सिद्धार्थ तागड | अभिषेक ताले | प्रांजली नवले |
| शुभम थिटे | प्रतिक बनसोडे | लोकेश पाटील |
| आदित्य बामणे | मानसी साकोरे | अपूर्व बालपांडे |
| अभिषेक ओझर्डे | | |

**केंद्रीय लोकसेवा आयोग २०२२ राखीव यादीत निवड झालेले यशवंत**

सुशांत कुलकर्णी  चेतक सावंत  सुरज खिलारे  तेजस सारडा

**केंद्रीय लोकसेवा आयोग (IFoS) २०२३ मधील यशवंत**

प्रांजल चोपडे  अनुष्का लोहिया  योगेश बोरकर

शशिकांत विभूते  चेतक सावंत

### ❖ नियमित उपक्रम ❖

१. **केंद्रीय लोकसेवा आयोग नियमित वर्ग २०२३-२४ (४८ विद्यार्थी) :** सर्व विषयांचे Orientation, सराव परीक्षा, वैयक्तिक समुपदेशन, अभ्यास कौशल्य प्रशिक्षण, Critical Thinking प्रशिक्षण, उपासना आणि चिंतन असे उपक्रम झाले. नियमित वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी वर्षारंभ उपासना अतिथी श्री. शैलेश बलकवडे (आयपीएस्, महाराष्ट्र) यांच्या उपस्थितीत झाली. वैयक्तिक समुपदेशनाच्या दोन फेऱ्या, पालक मेळावा (४५ पालक), सेमिनार -४६, विद्यार्थ्यांचे २४ विषयांवर सादरीकरण, सद्य घटना गटकार्ये, आठ आठवडे दोन समस्यांवर चर्चा करणे आणि विषयावर वादविवाद, UPSC 0th Attempt, मुख्य परीक्षा, लेखी परीक्षा असे उपक्रम देखील झाले.

२. **केंद्रीय लोकसेवा आयोग मिशन वर्ग (४१ विद्यार्थी) :** मुख्य परीक्षेच्या तयारीसाठी Daily Writing Praticeच्या ५३ चाचण्या आणि पूर्ण गुणांच्या तीन सराव परीक्षा झाल्या. या वर्गाला २०२२च्या यशवंत व तज्ज्ञ शिक्षकांनी मार्गदर्शन केले.

३. **केंद्रीय लोकसेवा आयोग मुलाखत प्रेरणा वर्ग (४० विद्यार्थी) :** मुलाखत पद्धत, गट मुलाखती, मुलाखत दिलेल्या विद्यार्थ्यांची अनुभवकथने, चित्रफितीवर चर्चा आणि सेमिनार अशी सत्रे यामध्ये झाली. विद्यार्थ्यांच्या जुन्नर तहसिल कार्यालय, पुणे ग्रामीण एस्.पी. कार्यालय, पुणे, म.न.पा., पुणे जिल्हाधिकारी कार्यालय येथे भेटी झाल्या. तज्ज्ञ वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर सराव मुलाखतीच्या तीन फेऱ्या झाल्या.

४. **नियमित साप्ताहिक उपासना :** सर्व विद्यार्थी व सदस्यांची नियमित साप्ताहिक उपासना झाली. वाच. सविता कुलकर्णी व वाच. विवेक कुलकर्णी यांचे उपासना चिंतन झाले.

५. **सेवा (SEVA - Self Enhancement through Volunteer**

**Activities) :** विद्यार्थ्यांनी विविध समाजगटातील शालेय विद्यार्थ्यांची 'सेवा' अंतर्गत नियोजनपूर्वक सत्रे घेतली.

विकासमित्र प्रकल्प : इ. ५वीच्या विद्यार्थ्यांसाठी स्कॉलरशिप परीक्षेची तयारी

प्रज्ञा विकास प्रकल्प : नंदादीप शाळेमध्ये इ. ५वीच्या शिष्यवृत्तीसाठी पाच आठवडे सत्रे

नागरी वस्ती : कौशल्य प्रशिक्षणांतर्गत इ. ८वीसाठी जोपासना सत्र, दांडेकर वस्ती - इ. २री ते ९वीच्या विद्यार्थ्यांसाठी विविध विषयांवर आठ सत्रे

६. **वेल्हे अभ्यास सहल :** वेल्हे येथे गेलेल्या सहलीत वेल्ह्यातील कातकरी वस्ती, कोंढवली वस्ती येथे वस्तीवरील लोकांचे राहणीमान, त्यांना भेडसावणारे प्रश्न, व्यवसाय व प्रबोधिनीशी त्यांचा आलेला संपर्क याविषयी गप्पा झाल्या. प्रकल्पातील कार्यकर्त्यांबरोबर देखील संवाद झाला.

ꕥꕥ

उमेदीत आरंभ हो जीवनाचा, कुलीनाघरी जन्म झाला ततः किम्?
मिळे गोमटे रूप, बुद्धी कुशाग्र, सुविख्यात शाळेत आला ततः किम्?
शिकूनि कला, शास्त्र, विद्या समग्र,परीक्षेत उच्चांक केला ततः किम्?
मिळे वैद्यकी, यांत्रिकीला प्रवेश, व्यवस्थापनी, शासनी वा ततः किम्?
क्षणाचीच आरास जाईल वाया जरी जीवनी राष्ट्रसेवा घडे ना ।। १ ।।

कबड्डीत,खोखोत निष्णात झाला, नि फुटबॉल, टेनीस जिंके ततः किम्?
सतारीत, गाण्यात, नाट्यात रंगे मिळाल्याच सर्वत्र टाळ्या ततः किम्?
पडू लागली छाप संभाषणी अन् सभा जिंकिल्या भाषणांनी ततः किम्?
कथा, लेख, काव्ये प्रसिद्धीस आली, बहू छापुनी ग्रंथ झाले ततः किम्?
क्षणाचीच आरास जाईल वाया जरी जीवनी राष्ट्रसेवा घडे ना ।। २ ।।

विदेशी प्रवासास जाणे घडे वा तिथे राहणे नित्य झाले ततः किम्?
सुखे देखिली, ऐकिली, चाखिली अन् किती हुंगिली, स्पर्शिली ती ततः किम्?
बडी नोकरी वा निजी कारखाना पगारात, सत्तेत वृद्धी ततः किम्?
पदे भूषवीली पुढारीपणाची मिळाली समाजी प्रतिष्ठा ततः किम्?
क्षणाचीच आरास जाईल वाया जरी जीवनी राष्ट्रसेवा घडे ना ।। ३ ।।

गुणी, गौर, सच्छील लक्ष्मीच जैसी अशी बायको लाभलेली ततः किम्?
गुणी, देखणा आणि कर्तृत्वशाली पती लाभला राजबिंडा ततः किम्?
फुलासारख्या हासऱ्या, गोजिऱ्या त्या मुलांनी घरा शोभविले ततः किम्?
घरी फ्रीज, टि.व्ही.नि सोयी सुखाच्या गडी, फोन, दारात गाडी ततः किम्?
क्षणाचीच आरास जाईल वाया जरी जीवनी राष्ट्रसेवा घडे ना ।। ४ ।।

अशा शर्यती चालल्या आंधळ्यांच्या तयामागुनी धावणे हे ततः किम्?
कुठे जात आम्ही? पुढे काय आहे?असा प्रश्न का हो पडे ना तुम्हाला?
जरी लोक येथील कोट्यानुकोटी कसे दैन्य देशात कोणी बघेना?
करू मातृभूमी जगी श्रेष्ठ ऐशी चला पौरुषाची प्रतिज्ञा करू या
असे दिव्य आव्हान हे विक्रमाचे जिणे राष्ट्रकार्यार्थ हो कांचनाचे ।। ५ ।।





## ८. प्रज्ञा मानस संशोधिका

विभाग विविध उपक्रमांद्वारा २०२३-२४ या वर्षात पन्नास हजारांहून अधिक लोकांपर्यंत पोहोचला. यात संशोधनातील प्रतिसादी व्यक्तीसोबतच थेट उपक्रमातील सहभागी तसेच विद्यावाचस्पती पदवी व अन्य अभ्यासक्रमाचे विद्यार्थी अशी व्याप्ती आहे.

### ❖ संशोधन उपविभाग ❖

१. **ओळख स्पर्शाची ३६०° :** 'चांगला आणि वाईट स्पर्श' याबाबत जाणीव-जागृती आणि प्रतिबंध याविषयी विद्यार्थ्यांना, पालकांना, शिक्षकांना आणि संस्थाचालकांना सविस्तर माहिती देणारा हा प्रकल्प पुणे आणि अहमदाबाद येथे राबवला गेला. यामध्ये पुण्यातील एकूण ९० पेक्षा अधिक शाळांमधील ४१,९०५ (इ. १ली ते ८वी) विद्यार्थ्यांपर्यंत, ६,१६५ पालकांपर्यंत आणि २३ संस्थांमधील १,०३६ शिक्षक व संस्था कर्मचाऱ्यांपर्यंत पोहोचता आले. विषयाची व्याप्ती, सखोलता सर्वदूर पोहोचावी याकरिता एप्रिल २३ मध्ये 'एक कान आस्थेचा' या विषयावर परिसंवाद झाला. डॉ. अनुराधा सहस्त्रबुद्धे (संचालक, ज्ञानदेवी संस्था), डॉ. मीनाक्षी नलबले (बाल शल्य-चिकित्सक) आणि डॉ. मुकुल जोशी (Responsible Netism चे प्रतिनिधी) या तीनही वक्त्यांनी आपले अनुभव आणि असे प्रकार घडू नये याकरिता काय करता येईल यावरील विचार व्यक्त केले. मुलांचे संवेदनशील भावविश्व सुरक्षित आणि स्वस्थ राहण्याकरिता, त्यांना पडलेले प्रश्न, अनेक समस्या त्यांना व पालकांना व्यक्त करता याव्यात याकरिता 'दूरध्वनी बाल-संवाद कट्टा' सुरू करण्यात आला. याअंतर्गत वेगवेगळ्या कारणांसाठी २३० जणांनी संपर्क केला. त्यातले २५ गंभीर (critical) होते. प्रकल्पाच्या 'खजिना गोष्टींचा' या पॉडकास्ट मालिकेद्वारा मुलांना आवडतील अशा एकूण दहा गोष्टींचे पॉडकास्ट प्रसारित करण्यात आले. या प्रशिक्षणामुळे मुलांच्या जाणीव-जागृतीमध्ये जो अनुकूल परिणाम होतो, त्या संदर्भातील संशोधन निबंध राष्ट्रीय परिषदेत सादर झाला. प्रकल्पासाठी बजाज फायनान्सने अर्थसाहाय्य केले आहे.

२. **संयम प्रकल्प :** ताराचंद रामनाथ सेवा ट्रस्ट बरोबर चालू असलेल्या या प्रकल्पाचा हेतू किशोरवयीन मुला-मुलींमध्ये जागरूकता निर्माण होऊन 'स्वजाणीव व स्वनियमनाच्या' द्वारे व्यसनाला प्रतिबंध व्हावा आणि व्यसने लागण्याआधी त्यांनी त्यापासून दूर राहावे यासाठी चळवळ उभी करावी, असा आहे. २०१९ पासून आत्तापर्यंत याचे दोन टप्पे पूर्ण होऊन तिसरा टप्पा सुरू आहे. या टप्पा तीन मध्ये पुण्यातील एकूण ११७ शाळांमध्ये सत्रे सुरू होती. त्यापैकी १०८ शाळांमध्ये सत्रे पूर्ण झाली. आत्तापर्यंत १५,५५८ विद्यार्थ्यांपर्यंत ३७८ प्रशिक्षकांद्वारे विषय पोहोचविण्यात यश आले. ६,६७९ पालकांपर्यंत हा विषय पोहोचला. या प्रकल्पातील निष्कर्षांवर आधारित तीन शोधनिबंधांना राष्ट्रीय नियतकालिकांमध्ये प्रसिद्धी मिळाली.

तसेच संशोधन वृत्तलेखनही पूर्ण करण्यात आले.

३. **निर्धार प्रकल्प :** कुमारवयीन गटातल्या (इ. ६वी ते ८वी) मुलांसाठी व्यसन परावृत्तीसाठी चालवला जाणारा हा दीर्घकालीन प्रकल्प एप्रिल २०२३ मध्ये सुरू झाला. यामध्ये दरवर्षी साधारणपणे २४ कृतीयुक्त सत्रे विद्यार्थ्यांबरोबर घेतली जातात. हा प्रकल्प मुक्तांगण इंग्लिश मिडियम स्कूल, सदाशिव पेठ, वनाज मित्रपरिवार शाळा, कोथरूड आणि श्री सरस्वती विद्यामंदिर, डहाणूकर कॉलनी या तीन शाळांमध्ये राबवला जात आहे. तिन्ही शाळांमधील मिळून एकूण ४९३ मुले सध्या उपक्रमात सहभागी आहेत. या वर्षी प्रत्येक वर्गाची २४ सत्रे पूर्ण झाली. ताराचंद रामनाथ सेवा ट्रस्ट यांनी या प्रकल्पासाठी अर्थसाहाय्य केले आहे. हा दीर्घकालीन प्रकल्प असून पहिल्या वर्षातील सत्र परिणामकारकतेचा अभ्यास करण्यासाठी पूर्वचाचण्या व अंतरिम चाचण्यांचा प्रदत्त संकलित करण्यात आला. गुणात्मक नोंदीही गोळा करण्यात आल्या.

४. **उद्योगिनी प्रकल्प :** ग्रामीण महिला उद्योजिकांच्या जीवन गुणवत्तेसंदर्भातील हा प्रकल्प आहे. यामध्ये आत्तापर्यंत १४६ महिला उद्योजिका, १३८ न-उद्योजिका आणि ७५ पुरुष उद्योजक असे एकूण ३५९ जणांचे प्रदत्त संकलन झाले आहे. त्यावर पुढे काम चालू आहे.

५. **प्रज्ञा प्रबोधन वर्ग समीक्षात्मक अभ्यास :** हा वर्ग इ. ५वी ते १०वीच्या उच्चक्षमता असलेल्या अन्य शाळांतील विद्यार्थ्यांसाठी चालवलेला दीर्घकालीन शालेय रचनेशिवायचा उपक्रम आहे. या उपक्रमाची पहिली सहा वर्षे पूर्ण झाल्यावर, त्याचा समीक्षात्मक अभ्यास योजला होता. योजना करण्यामागील हेतू म्हणजे वर्गाची उद्दिष्टे कितपत साध्य झाली व त्याची अन्य ठिकाणी राबविण्याची क्षमता कितपत आहे हे मांडणे, हा होता. या उपक्रमाच्या संदर्भातील कागदपत्रे व नोंदींची छाननी केल्यावर लक्षात आले की वर्गाची उद्दिष्टांची मांडणी थेट न मोजता येणारी होती. त्यामुळे उपक्रमाच्या एकूण प्रक्रियेवर केंद्रित अभ्यास केला गेला. उपक्रम मंजूर झाल्यापासून त्यातील नोंदींचा अभ्यास केला, विद्यार्थ्यांचे व पालकांचे अभिप्राय तपासले, प्रशिक्षकांनी लिहिलेले संशोधन निबंध वाचले. त्यावरून निघालेल्या निष्कर्षांच्या समर्थनार्थ वर्गाच्या सर्व प्रचोदक (facilitators) व काही विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. उपक्रमाचे संस्थापक-सदस्य, सध्याचे प्रमुख व समन्वयक यांच्या पण विस्तृत मुलाखती घेतल्या. अभ्यासाचे निष्कर्ष उपक्रमाच्या कार्यात्मक भागांप्रमाणे (functional areas) मांडले. तसेच उपक्रमाच्या उत्तमतेसाठी शिफारसी मांडताना Gifted Education क्षेत्रातील Best Practices चा आधार घेतला. हा उपक्रम अन्य ठिकाणी राबविण्याबाबत पण अभ्यासपूर्ण निष्कर्ष व सूचना अहवालात मांडल्या आहेत.

६. **विद्यावाचस्पती संशोधन केंद्र :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या विद्यावाचस्पती संशोधन केंद्रातील विद्यार्थिनी श्रीमती फातिमा गोम्स यांना फेब्रुवारी २२ मध्ये विद्यावाचस्पती पदवी मिळाली. केंद्रातील २२ विद्यार्थ्यांचा सहा महिन्यांच्या कामाचा आढावा एप्रिल व नोव्हेंबर २३ मध्ये घेण्यात आला. यासाठी सर्व मार्गदर्शक उपस्थित होते.

७. **परिसंवाद / परिषदा :** प्रज्ञा मानस संशोधिकेने आयोजित केलेले Qualitative Research in Social Sciences: Methods and Data Analysis workshop दि. १० ते १४ एप्रिल २४ दरम्यान झाले. एकूण २७ जणांची उपस्थिती होती. डॉ. मेधा देऊसकर, डॉ. भास्कर शेजवळ, डॉ. अनघा लवळेकर व डॉ. देवयानी तीर्थळी यांनी सत्रे घेतली.

Indian Institute of Education यांनी ऑक्टोबरमध्ये आयोजित केलेल्या 'Responsibilities of all the actors in the field of higher education in context with NEP-2020' या राष्ट्रीय परिषदेत तीन जणांनी शोध निबंध सादर केले.

विशाखापट्टणम येथे National Academy Of Psychology (NAOP) ने फेब्रुवारी मध्ये आयोजित केलेल्या परिषदेमध्ये चार जणांनी सादरीकरण केले.

पाँडिचेरी विद्यापीठाने फेब्रुवारी २४ मध्ये आयोजित केलेल्या Indian Academy of Applied Psychology (IAAP) च्या २८व्या आंतरराष्ट्रीय व ५९व्या राष्ट्रीय परिषदेमध्ये एकांनी निबंध सादरीकरण केले. या सादरीकरणाला सर्वोत्कृष्ट वैज्ञानिक पेपर सादरीकरण घोषित करण्यात आले.

## ❖ मनोमापन शास्त्र उपविभाग ❖

Design Thinking Aptitude मोजण्यासाठी 'रचना' अभिक्षमता मापन चाचणी निर्मितीचे काम शास्त्रशुद्ध पद्धतीने करण्यात आले. ही सेवा संगणकीय आणि पेपर पेन्सिल अशा दोन्ही माध्यमातून मराठी आणि इंग्रजी भाषेतून उपलब्ध आहे. रचना अभिक्षमता मापन चाचणीचे संगणकीकरण आणि प्रदत्त नोंदीसाठी नवीन प्रणाली तयार करण्याचे काम पूर्ण झाले. आत्तापर्यंत ९९ विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला. या चाचणी संदर्भात गुरुमंत्र संस्थेबरोबर करार करण्यात आला. त्यानुसार दोन्ही संस्थांनी एकत्रितरित्या डिझाईन क्षेत्राची ओळख व गरज तसेच या क्षेत्रात जाण्यासाठी त्या प्रकारच्या क्षमता विद्यार्थ्यांमध्ये आहेत का हे जाणून कसे घ्यायचे, याविषयी इ. १०वीतील विद्यार्थ्यांसाठी तीन चर्चासत्रे घेतली.

## ❖ मानव संसाधन विकास उपविभाग ❖

संपूर्ण वर्षभरात वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये चाचणीकाम आणि प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आले. या वर्षात विभागातर्फे एकूण ९४९ व्यक्तींचे मनोमापन आणि ४२१ व्यक्तींचे प्रशिक्षण झाले. या

वेळी बजाज ऑटो लि., महिंद्रा अँड महिंद्रा (चाकण, झहीराबाद, नाशिक), किर्लोस्कर ब्रदर्स, विवेकानंद रुग्णालय (लातूर), क्लासिक एन.एक्स., परिवार सुपर मार्केट, भाग्यलक्ष्मी बँक (नांदेड) इ. ठिकाणी काम झाले.

### ❖ क्षमता विकसन उपविभाग ❖

१. **शिबिरे व कार्यशाळा :** पुणे आणि नाशिक येथे झालेल्या प्रत्यक्ष व दूरस्थ अशा एकूण सहा बाल विकास शिबिरांत ४३३ मुले-मुली सहभागी होती व ५५ प्रचोदकांनी काम केले. या वर्षीचा सूत्र विषय 'शुभ गुण' (Positive Virtues) असा होता. सुजाण पालकत्व कार्यशाळेमध्ये एकूण ६८ पालकांनी सहभाग घेतला. प्रत्यक्ष व दूरस्थ पद्धतीने घेतलेल्या निरंतर बालविकास शिबिरामध्ये १४३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

२. **नवचेतना प्रकल्प :** इ. ५वी ते ८वीच्या मुलांच्या विचार कौशल्य, भावनिक कौशल्य व सामाजिक कौशल्य यांवर आधारित उपक्रम आहे. चाकण येथील नवोन्मेष विद्यालयात हा उपक्रम चालवला जातो. पाचवी ते आठवीचे मिळून २३७ विद्यार्थी सध्या उपक्रमात सहभागी आहेत. या प्रकल्पाला एडीएम फौंडेशनने अर्थसाहाय्य केले आहे.

३. **सक्षम प्रकल्प :** रोहन बिल्डर्सच्या अर्थसाहाय्यातून मुळशी तालुक्यातील कातकरी समाजातील चार वस्त्या आणि माले येथील मुलांचे वसतिगृह येथे बाल, कुमार आणि युवा वयोगटासाठी सातत्यपूर्ण रीतीने घेतला जाणारा प्रकल्प असून, त्याचा पहिला दोन वर्षांचा टप्पा यशस्वीरीत्या पूर्ण झाला. या वर्षी १०० बाल + कुमार आणि १० युवांना याचा लाभ झाला. दोन वर्षांनंतर केलेल्या गुणात्मक, संख्यात्मक माहिती विश्लेषणानुसार सर्वच वयोगटातील व्यक्तींमध्ये आत्मविश्वास, संवाद कौशल्य, सर्जन क्षमता आणि निर्णय क्षमता यामध्ये वाढ झालेली दिसली. त्याच प्रमाणे बालविकास गटासाठी आवर्जून घेतलेल्या लेखन, वाचन उपक्रमांचा मुलांना सकारात्मकरित्या उपयोग झालेला दिसला.

४. **प्रज्ञा मैत्र :** हा उच्च क्षमता असलेल्या मुलांच्या पालकांचा स्वमदत व पाठबळ गट आहे. उच्च क्षमतांची ओळख आणि जोपासना करण्यासाठी, अनुभवांची देवाण-घेवाण करण्यासाठी मासिक सत्रांचे आयोजन करण्यात येते. या वर्षी ५२ पालक कुटुंबे यामध्ये सहभागी होती.

५. **प्रज्ञा प्रबोधन वर्ग :** उच्च क्षमता असणाऱ्या इ. ५वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी हा प्रकल्प राबवला जातो. या वर्षी किशोर गटात (इ. ५वी, ६वी) ५३, तर कुमार गटात (इ. ७वी, ८वी, ९वी) २४ विद्यार्थ्यांचा सहभाग होता. याशिवाय, कल्याणी स्कूल मांजरी, हडपसर आणि श्री श्री रविशंकर स्कूल, भूगाव येथील इ. ५वी व ६वीच्या निवडक विद्यार्थ्यांसाठी (अनुक्रमे १२ आणि १३) या वर्षी हा प्रकल्प स्वतंत्रपणे राबवण्यात आला.

'मुलांचे भावविश्व समजून घेताना' हा राज्यस्तरीय परिसंवाद दि. १६ व १७ मार्च २४ रोजी आयोजित केला होता. 'मूल' केंद्रस्थानी ठेवून त्याचे भावविश्व घडवणाऱ्या आणि बिघडवणाऱ्या अनेक गोष्टींवर तज्ज्ञ व्यक्तींची व्याख्याने, मुलाखती व चर्चासत्रे झाली.

सुप्रसिद्ध संगीतकार डॉ. सलील कुलकर्णी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. डॉ. संदीप केळकर, मा. रेणुताई गावस्कर, डॉ. श्रीराम गीत, श्री. परेश मोकाशी हे दिग्गज पहिल्या दिवशी तर मा. माधुरीताई सहस्त्रबुद्धे, डॉ. उज्ज्वल नेने आणि प्रबोधिनीचे काही तज्ज्ञ अभ्यासक दुसऱ्या दिवशी होते. मुलांचे मानसिक स्वास्थ्य बिघडवणाऱ्या गोष्टी कोणत्या? यावर अनेक आयामांतून चर्चा झाली. तसेच हे स्वास्थ्य टिकवून ठेवण्यासाठी, आनंदी राहण्यासाठी नेमकं काय केलं पाहिजे याची सांगोपांग चर्चा झाली. सहभागींचे १३ गट करून प्रत्येक गटाला मुलांची सकारात्मक मानसिकता आणि ऊर्जा टिकून राहील असे विषय दिले गेले आणि त्यावर गटचर्चा झाली. या गटचर्चेचे शीर्षक 'आनंदक्षण वेचण्यासाठी' असे होते. या परिसंवादासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून २८७ जण आले होते. त्यामध्ये पालक, शिक्षक, समुपदेशक, अभ्यासक आणि डॉक्टर्सही होते. कार्यक्रमाचा समारोप मानसतज्ज्ञ डॉ. सुजला वाटवे यांनी केला.

### ❖ मार्गदर्शन समुपदेशन उपविभाग ❖

समुपदेशनासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समस्येची व्याप्ती पाहता 'उपचारात्मक अध्ययन' (Remidial Teaching) ही सेवा जास्त वेगाने वाढली. या वर्षभरात चाचणी + समुपदेशन आणि उपचारात्मक अध्ययन याचा लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांची आणि प्रौढ सदस्यांची संख्या खालीलप्रमाणे -

| | चाचणी | समुपदेशन | उपचारात्मक | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राथमिक | ५१ | २५ | ६७ | १४३ |
| माध्यमिक | ११३ | २०४ | १३४ | ४५१ |
| महाविद्यालयीन | ३ | ५९ | ८ | ७० |
| प्रौढ सदस्य | २४ | ९२ | - | ११६ |
| एकूण संख्या | १९१ | ३८० | २०९ | ७८० |

सोलापूर येथे तीन दिवसांचे शिक्षक प्रशिक्षण झाले. यामध्ये उपचारात्मक अध्ययन पद्धतीची ओळख करून दिली. या वेळी ३२ शिक्षक उपस्थित होते. पुण्यामध्ये उपचारात्मक अध्ययनाला नियमित येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी गंमत शाळा आयोजित केली होती, त्याचवेळी त्यांच्या पालकांसाठी दोन तासांची स्वतंत्र कार्यशाळा घेतली. त्याला २२ पालक उपस्थित होते. इ. ८वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी दोन पूर्ण दिवसांच्या 'स्वअभ्यास-कौशल्य' अशा दोन कार्यशाळा घेतल्या. दोन्ही मिळून ६२ विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला.

### ❖ अभिक्षमता मापन व शैक्षणिक मार्गदर्शन उपविभाग ❖

इ. ७वी ते १२वीच्या विद्यार्थ्यांसाठी विविध चाचण्यांद्वारे मनोमापन करून त्यावर मार्गदर्शन या उपविभागातर्फे केले जाते. या वर्षात आत्तापर्यंत एकूण ५,६४७ विद्यार्थ्यांसाठी चाचणीकाम आणि मार्गदर्शन (संगकणीय आणि पेपर पेन्सील) झाले. त्यापैकी iA चे ४,९५२, iTap चे ४१५ आणि Swayam चे २८० विद्यार्थी होते. अरुणाचल प्रदेश व छत्तीसगड येथे iA चे चाचणी काम झाले.

iA आणि iTap चाचणीसाठी असोसिएट लिंक्स एकूण १,६२६ (पुणे, नाशिक, सोलापूर, कोल्हापूर, बार्शी, संभाजीनगर, लातूर, मणिपूर) दिल्या गेल्या. करिअर ॲडवायझर ट्रेनिंग प्रोग्राम दूरस्थ पद्धतीने घेण्यात आला. २३ सदस्यांनी प्रशिक्षण घेतले.

### ❖ शैक्षणिक उपविभाग ❖

या वर्षी 'शालेय मानसशास्त्र पदव्युत्तर पदविका' (शा.मा.प.प.) या अभ्यासक्रमासाठी २६, 'प्रज्ञावन्ततेचे मानसशास्त्र व जोपासना' या पदव्युत्तर पदविकेसाठी १३, 'प्रज्ञावन्तता प्रशिक्षण कार्यक्रम' या अभ्यासक्रमासाठी सहा आणि 'बाल व किशोरांचे मानसशास्त्र-क्षमता संवर्धनसाठी' याला ३३ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. नियमित व्याख्यानांव्यतिरिक्त श्री. शरदराव सुंकर, डॉ. संज्योत देशपांडे आणि डॉ. प्रज्ञा कुलकर्णी या तज्ज्ञ व्यक्तींनी दोन्ही अभ्यासक्रमांसाठी व्याख्याने, चर्चासत्र स्वरूपात मार्गदर्शन केले. शालेय मानसशास्त्र माजी विद्यार्थी गटाची दोन case presentation sessions झाली आणि १४ मुलाखती (case studies) झाल्या.

**वर्षारंभ व कौतुक समारंभ :** दि. २ ऑक्टोबर २३ रोजी शा.मा.प.प व n-gift च्या सध्याच्या तुकड्यांचा वर्षारंभाचा व मागच्या तुकड्यांचा कौतुक समारंभ कार्यक्रम झाला. त्याला ३५ विद्यार्थी उपस्थित होते. प्रबोधिनी प्रशालेच्या माजी विद्यार्थिनी व सिटीप्राईड शाळांच्या संस्थापिका डॉ. अश्विनी जांभेकर कुलकर्णी या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात भविष्यात शिक्षणक्षेत्रात आपल्याला कोणकोणत्या आव्हानांना तोंड द्यावे लागणार आहे व यात आपल्या विद्यार्थ्यांची भूमिका काय असावी याचे सुंदर विवेचन केले.

### ❖ अन्य महत्त्वाचे ❖

१. प्रज्ञा मानस व सामाजिक शास्त्र अध्ययन केंद्र यांनी Learning to Performing हा नवीन अभ्यासक्रम बृहन् महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयामध्ये संयुक्तपणे राबवला.
२. राज्य सरकारने सर्व महाविद्यालये व शैक्षणिक संस्थांना राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रमाणन परिषदेकडून (NAAC) मूल्यांकन अनिवार्य केल्यामुळे, पुणे विद्यापीठानेही संलग्नता हवी असल्यास हे मूल्यांकन करून घ्यावेच लागेल असे सांगितले. त्यामुळे मूल्यांकनासाठी अर्ज दिला होता. या प्रक्रियेचे तीन टप्पे होते. पहिल्या टप्प्यात संस्थेची नोंदणी करून माहिती भरायची होती. दुसऱ्या टप्प्यात सात निकषांवर आधारित माहिती भरायची होती. त्या माहितीचे पुरावे जोडायचे होते. उ.दा. GPS positioning असलेली छायाचित्रे, उपस्थिती पत्रके, विविध प्रकल्पांचे अहवाल, इ. तिसरा टप्पा, दुसऱ्या टप्प्यावर किमान २५% गुण तुम्हाला मिळाले तर तुम्ही पुढे जाता. यामध्ये NAAC चा गट संस्थेला प्रत्यक्ष भेट देऊन माहितीची पडताळणी करतो व त्यानंतर grade मिळते. यासाठीचा पाठपुरावा सुरू आहे.
३. सदस्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी मासिक प्रशिक्षण सत्रे योजली जातात. या उपक्रमाची दोन वर्षे पूर्ण झाली असून तिसरे वर्ष सुरू आहे. यामध्ये ज्ञान प्रबोधिनीचे साहित्य परिचय, कौशल्यविकसन, दस्तऐवजीकरण, आहारातून ताणतणाव नियोजन अशा अनेक विषयांवरील सत्रे योजली गेली.
४. पाक्षिक पद्धतीने संशोधन निवेदन मालिका झाली. यामध्ये प्रबोधिनीतील विविध विभागांमधील अभ्यासक विषयांच्या मांडणीसाठी व श्रोते म्हणून सहभागी झाले. औपचारिक शिक्षण ते मानव संसाधन असा सुमारे ३० व्याख्यानांच्या विषयांचा व्यापक पट होता. सरासरी उपस्थिती २५ होती.

## प्रतिसादासाठी जाहीर आवाहन

- मुलांचे भावविश्व सुरक्षित रहावे म्हणून 'बालसंवाद कट्टा' या नव्या दूरभाष समुपदेशन सेवेची सुरुवात केली आहे. त्यासाठी अनेक शाळांमधून मुलांशी व त्यांच्या पालकांशी संपर्क साधत आहोत. या संवाद सेवेला अधिकाधिक मुलांनी व पालकांनी प्रतिसाद द्यावा असे आवाहन आहे. तज्ज्ञ समुपदेशक मुलांशी गप्पा मारण्यासाठी, त्यांच्या मनातील चिंता, काळजी, भीती इत्यादी भावनांना तोंड देण्यासाठी मुलांना मदत करतील. तसेच पालकांच्याही काही महत्त्वाच्या समस्यांना उत्तरे देण्यासाठी मार्गदर्शन करतील. यासाठी ९२२६०७४७६७ या क्रमांकावर सोमवार ते शनिवार स. ९ ते संध्या. ६ या वेळात संपर्क करू शकता.
- 'संयम' या उपक्रमाद्वारे समाजातील व्यसनाधीनता कमी व्हावी म्हणून शालेय मुलांशी शेकडो प्रशिक्षक संवाद साधत आहेत. तरीही व्यसनाचा वाढणारा विळखा आणि प्रशिक्षकांची उपलब्धी यांचे प्रमाण खूप व्यस्त आहे. जागरूक आणि संवेदनशील नागरिकांनी अधिकाधिक संख्येने संयम प्रकल्पात प्रशिक्षण घेऊन आपापल्या भागातील शालेय विद्यार्थ्यांशी संवाद साधला. स्वयंसेवी वृत्तीने काम केले तर या प्रश्नाची तीव्रता कमी व्हायला निश्चितच मदत होईल. (संपर्क क्र. : ०२०-२४२०७१४२)







# ९. संस्कृत संस्कृति संशोधिका

'संस्कृत-संस्कृति संशोधिका' (संत्रिका) विभाग गेली ४९ वर्षे संस्कृत भाषा आणि भारतीय संस्कृती या प्रमुख क्षेत्रांत संशोधन, ग्रंथप्रकाशन, प्रदर्शन तसेच व्याख्यानांचे आयोजन करीत आहे. ज्ञान प्रबोधिनी पद्धतीने सर्वांसाठी पौरोहित्य प्रशिक्षण व पुण्यात, महाराष्ट्रात, भारतभर व भारताबाहेरही महिला व पुरुष पुरोहितांमार्फत विविध संस्कारांचे पौरोहित्य विभागातर्फे केले जाते.

### ❖ विशेष महत्त्वाचे ❖

भारतभर २३-२४ हे वर्ष विशेष गाजले ते अयोध्येतील रामलल्लांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा या विषयाने! विभागानेही या संधीचा उपयोग करून घेतला. प्राणप्रतिष्ठापनेच्या पार्श्वभूमीवर संत्रिकेतील १९७७ रामायण ग्रंथांचा ठेवा रामभक्तांसाठी व अभ्यासकांसाठी प्रदर्शनाद्वारे ज्ञान प्रबोधिनीमध्ये दि. १९ ते २२ जाने. २४ या कालावधीमध्ये खुला करण्यात आला. संत्रिका सदस्य, युवक विभाग व अन्य विभागांच्या सहकार्याने 'अक्षरराम' प्रदर्शन यशस्वी झाले.

हिंदीचे प्राध्यापक आणि संशोधक कै. डॉ. गजानन नरसिंह साठे यांनी रामचरित्राशी संबंधित विविध ग्रंथांचा बृहत्संग्रह परिश्रमपूर्वक जमा केला. हा ग्रंथसंभार त्यांनी १९९७ मध्ये संत्रिकेच्या स्वाधीन केला. या संग्रहात २२ भारतीय आणि १२ विदेशी भाषांमधील, तसेच १८ वेगवेगळ्या लिप्यांमधील ग्रंथांचा समावेश आहे. जसे चिनी, जपानी, फ्रेंच, नेपाळी, फारसी, अरेबिक इ. आग्नेय आशियामधील कंबोडिया, थायलंड, इंडोनेशिया यांसारख्या 'बृहत् भारत' समजल्या जाणाऱ्या देशांतील रामायणे ही या संग्रहात आहेत. यापूर्वी १९९२ व २००१ मध्ये या ग्रंथांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते.

प्रदर्शनाचे उद्घाटन डॉ. अंबरीश खरे व कै. डॉ. ग. न. साठे यांचे पुत्र श्री. अनिल साठे यांच्या हस्ते झाले. संग्रहातील सिंधी, ऊर्दू, अरेबिक, फारसी, जपानी, रशियन आणि चिनी ग्रंथ पाहून अनेकांना आश्चर्य वाटले. काही विशेष ग्रंथांची टिपणे काढून वाचायला ठेवली होती. कंब रामायण गुजराथीमध्ये व मराठी गीत रामायण सिंधीमध्ये, हिंदीच्या अवधी, व्रज, हरयाणवी अशा बोलीभाषा, चित्ररूप रामायण हे देखील या संग्रहाचे आकर्षण आहे. औंधचे भवानराव महाराज तथा बाळासाहेब पंत यांनी चित्रबद्ध केलेली रामकथा, पुलक बिस्वास यांनी चित्रांकित केलेले इंग्रजीतील रामायण, 'मार्ग प्रकाशन' या संस्थेने रामायणावर आधारित पहाडी शैलीतील चित्रांचे संकलन, हे सगळ्यांना पाहायला मिळाले.

या कालावधीत प्रदर्शनस्थळी 'सुलेखनातून श्रीराम' (श्री. अच्युत पालव) हा कार्यक्रम झाला. फारसी भाषेचे अभ्यासक श्री. निखिल परांजपे यांनी फारसी रामायणावर आधारित उत्स्फूर्त मांडणी केली. प्रशालेच्या पालक अभिव्यक्ती गटातील सदस्यांनी गीतरामायण सादर केले. रामकथेचा विश्वसंचार (डॉ. अंबरिश खरे), रामकथेची अनंतरूपे (श्री. प्रणव गोखले), रामायण.. भूलोकीचे अमृत (डॉ. सौ. आरती दातार) अशी तीन व्याख्यानेही झाली. ही व्याख्याने

मोठ्या कालखंडानंतर विभागातील पाच सदस्यांचे प्रतिज्ञाग्रहण झाले. अरुणा जोशी, मीरा होळकर, चंदा पागे या पुरोहितांनी ज्ञान प्रबोधिनीची प्रथम प्रतिज्ञा घेतली. तर सुरेखा लिखिते आणि विद्याश्री पुरंदरे यांनी द्वितीय प्रतिज्ञा घेतली.

प्रदर्शन माहितीपट

रामकथेची अनंतरूपे

रामकथेचा विश्वसंचार

रामायण... भूलोकीचे अमृत

वरील क्यूआर कोड स्कॅन करून ऐकता येतील. प्रदर्शनाला दोन हजार पेक्षा जास्त जणांनी भेट दिली, यात काही शाळा व संस्थांमधले विद्यार्थी गटही होते. वृत्तपत्र व अन्य माध्यमांनीही प्रदर्शनाची दखल घेतली. रामचरित्राशी संबंधित अशा प्रकारचा आणि इतका प्रचंड ग्रंथसंग्रह बहुधा अन्यत्र सापडणार नाही, ही भावना अनेकांनी प्रदर्शन पाहताना व्यक्त केली.

### ❖ पौरोहित्य उपविभाग ❖

पुणे व डोंबिवली येथील प्रशिक्षित पुरोहितांच्या कामामध्ये उत्तरोत्तर वाढ होत असून मराठी, हिंदी व इंग्रजीत नामकरण ते अंत्येष्टी-श्राद्धविधी पर्यंतचे संस्कार भारतभर होत आहेत. धर्मनिर्णय मंडळ व ज्ञान प्रबोधिनीच्या विज्ञाननिष्ठ, परिवर्तनवादी विचारांचा प्रभाव सर्व स्तरातील विशेष करून तरुण पिढीवर होताना दिसत आहे. या वर्षी ७५०० हून अधिक संस्कार झाले. किमान चार हजारहून अधिक विविध भाषिक प्रांतिक सदस्यांपर्यंत प्रबोधिनीची संस्कार विषयक भूमिका पोहोचवता आली. यात सुमारे ३२ दूरस्थ संस्कारांचा समावेश आहे. हे संस्कार दुबई, अमेरिका, जर्मनी, कॅनडा अशा देशांमध्ये केले गेले. संस्काराच्या माध्यमातून मूल्य विचार पोहोचविणारे मातृभूमिपूजन, विहीर लोकार्पण यासारख्या विशेष संस्कारांचा यात नक्कीच उल्लेख करायला हवा.

जिवलग व्यक्तीच्या निधनानंतर लागणाऱ्या दाहकर्म संस्कारासाठी प्रबोधिनीतून पुरोहित मिळावेत, यासाठी स्वतंत्र दाहकर्म कार्यशाळा घेण्यात आली. यात युवक विभाग व अन्य इच्छुक गट असे ३१ सदस्य सहभागी झाले होते. वर्षभरात गणेश प्रतिष्ठापना, लक्ष्मीपूजन, या कार्यशाळा व सामूहिक महालय श्राद्धाचे कार्यक्रम ही झाले. त्याशिवाय प्रशिक्षक म्हणून काम करू शकतील, अशा पुरोहितांसाठी नियमित प्रशिक्षक प्रशिक्षण झाले.

### ❖ संशोधन उपविभाग ❖

वर्षभराच्या पूर्वतयारी नंतर ज्ञान प्रबोधिनी संशोधन संस्थेच्या सल्लागार समितीसमोर विभागातील 'ज्ञान प्रबोधिनी पद्धतीने होणारे विवाह संस्कार व पारंपरिक प्रचलित विवाह संस्कार आणि अन्य पर्यायी विवाह पद्धतींबाबत विवाहोत्सुक वधू वरांच्या अपेक्षा व धर्मशास्त्राचे अभ्यासक व पुरोहित सदस्यांचा या बद्दलचा प्रतिसाद - एक तुलनात्मक अभ्यास' या संशोधन प्रकल्पाचे मान्यतेसाठी सादरीकरण झाले.

### ❖ अन्य महत्त्वाचे ❖

१. कार्यालयीन व पुरोहित सदस्यांसाठी समूहगुणविकसनाच्या हेतूने सार्थ उपासना, राष्ट्रभक्तीपर गीतांचे गायन, ज्ञान प्रबोधिनीच्या प्रार्थनेचा अर्थ समजून घेणे, अशी सत्रे झाली. यातून पुरोहितांना एकत्र गटात काम करणे, प्रबोधिनीची कार्यपद्धती/विचार समजावून देणे हा हेतू होता, तो साध्य झाला. पुरोहित सदस्यांनी प्रबोधिनीचे काम समजून घेण्यासाठी स्वतःहून पुढाकार घेऊन प्रबोधिनीच्या हराळी व निगडी केंद्राला भेट दिली.

२. पत्रकार हिना कौसर खान यांची वाच. मनीषा शेटे यांनी 'मुस्लीम मनाची स्पंदने' या विषयावर मुलाखत घेतली. संत्रिका व मुस्लीम अभ्यास गटातर्फे या कार्यक्रमाचे प्रबोधिनी अंतर्गत गटासाठी आयोजन केले होते. हिना कौसर खान यांनी निर्भयता, प्रेम, विश्वास, समजूतदारपणा, सत्यावर आधारित विवेकी भूमिका यावर भर दिला. समाजमाध्यमातून प्रसृत होणाऱ्या माहितीवर अवलंबून राहू नये असेही त्यांनी नोंदविले. एकमेकांच्या कार्यक्रमात सहभागी होणे, भेटणे, संवाद यातून दोन समाजगटात सौहार्द निर्माण होऊ शकेल असे त्यांनी नोंदविले. मा. सुभाषराव देशपांडे यांनी या मुलाखतीचा अत्यंत नेमक्या शब्दात समारोप केला.

## प्रतिसादासाठी जाहीर आवाहन

१. येत्या काळात रामायण संग्रहावर आधारित अभ्यास/संशोधन सुरू करण्याचा विभागाचा मानस आहे. या प्रकारच्या अभ्यासात रस असलेल्या सदस्यांनी जरूर विभागात संपर्क करावा.

२. धार्मिक विधी भीतीपोटी न करता श्रद्धापूर्वक, सकारात्मक विचाराने होणे योग्य आहे, असा प्रबोधिनीचा विश्वास आहे. ही भूमिका अनेक लोकांपर्यंत पोहोचावी, यासाठी १८ वर्षांपुढील कोणाही इच्छुक स्त्री-पुरुषांसाठी संत्रिकेतर्फे पौरोहित्य वर्गाचे आयोजन केले जाते. या सर्वसमावेशक उपक्रमात सर्वांचे स्वागत आहे.

३. येत्या वर्षात विवाह विषयक संशोधन प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम सुरू होईल. संस्कृत विषयात पदवी, पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्यांचे या प्रकल्पात व पुढील काळात होणाऱ्या अशा अन्य प्रकल्पांत सहभागी होण्यासाठी स्वागत आहे. (संपर्क क्र. : ०२०-२४२०७१४६)

ജെജ



# १०. सामाजिक शास्त्रे अध्ययन केंद्र

ज्ञान प्रबोधिनीच्या सामाजिक शास्त्र अध्ययन केंद्राचे कार्यविधान 'व्यक्ती, समाज आणि सृष्टी यांच्या संतुलित विकासासाठी आवश्यक असलेला सर्वंकष दृष्टिकोन, कौशल्ये, वृत्ती नागरिकांमध्ये सामाजिक शास्त्रांच्या अध्ययनातून विकसित करणे व त्यासाठीच्या पूरक रचना बसवणे' असे आहे. गरिबी, विषमता आणि राष्ट्रीय एकात्मतेचा अभाव यांसारख्या समस्या समजून घेऊन, त्यांवर उत्तरे शोधण्यासाठी अर्थशास्त्र, तत्त्वज्ञान व तंत्रज्ञानाचा योग्य वापर यांसह विविध क्षेत्रांमध्ये सामाजिक शास्त्र अध्ययन केंद्र काम करते. चालू उपक्रमांमध्ये संशोधन प्रकल्प, अभ्यासगट, कार्यशाळा, अभ्यासक्रम आणि साहित्य निर्मिती यांचा समावेश होतो.

### ❖ अभ्यासक्रम ❖

१. **The Fundamentals of Critical Thinking :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासाठी 'एम.ए. पत्रकारिता आणि जनसंवाद' (MA Journalism and Mass Communication) च्या विद्यार्थ्यांसाठी हा दोन क्रेडिटचा अभ्यासक्रम (दीड तासांची २० सत्रे) प्रथम वर्षासाठी तयार केला व रानडे इन्स्टिट्यूटमध्ये राबवला. वेगवेगळी शैक्षणिक व सामाजिक पार्श्वभूमी असलेले एम.ए. पहिल्या वर्षाचे १५ विद्यार्थी यात सहभागी झाले होते. पुणे विद्यापीठामध्ये असा अभ्यासक्रम पहिल्यांदाच राबविला गेला. शहरी आणि ग्रामीण पार्श्वभूमी असलेले विद्यार्थी असल्याने इंग्रजी व मराठी दोन्ही भाषांचा वापर करण्यात आला. सत्रे संवादी पद्धतीने व वैविध्यपूर्ण उपक्रम करत घेण्यात आली. विद्यार्थ्यांच्या लेखी अभिप्रायातून अभ्यासक्रमाची उपयोगिता स्पष्ट झाली आहे. त्यांनी पुढील टप्प्याच्या अभ्यासक्रमाची अपेक्षा व्यक्त केली आहे.

२. **Learning To Performing :** प्रज्ञा मानस संशोधिका आणि सामाजिक शास्त्र अध्ययन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने बृहन् महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयामध्ये दुसऱ्या व तिसऱ्या वर्षाच्या (बी.कॉम.) विद्यार्थ्यांसाठी हा चार क्रेडिटचा अभ्यासक्रम (२ तासांची २४ सत्रे; १२ तासांचा गृहपाठ) राबवण्यात आला. स्व-उद्दिष्टे, स्व-ओळख, जगाची ओळख - परिणाम करणारे बाह्य घटक, आकलनामधील अडथळे, स्व-बदलासाठीच्या उपयोगी गोष्टी यांमध्ये सत्रांची विभागणी केली होती. श्री. अमोल फाळके यांनी एकूण सत्रांपैकी १२ सत्रे घेतली.

### ❖ आंतर्वासिता मार्गदर्शन ❖

१. मॉडर्न कॉलेजच्या मानसशास्त्राच्या चार विद्यार्थ्यांनी पंजाब मधल्या व्यसनाधीनतेच्या प्रश्नासंबंधी काही साहित्यशोधन केले. मृणाल देशपांडे (एम.ए. मानसशास्त्र) या विद्यार्थिनीने ते काम पुढे नेऊन त्याचा एक अहवाल तयार केला.

२. गार्गी तांबोळी (सिंबायोसिस महाविद्यालय, एम्.बी.ए.,

आय.आर.) या विद्यार्थिनीने The key aspects of India's international relations and foreign policy' या विषयावर अभ्यास करून अहवाल तयार केला.

### ❖ कार्यशाळा, व्याख्याने, सत्रे ❖

१. **राष्ट्रीय एकात्मता :** राष्ट्रीय एकात्मतेची भावना युवांच्या मनात रुजावी म्हणून प्रयत्न करू इच्छिणाऱ्यांसाठी ज्ञान प्रबोधिनी माजी विद्यार्थी मंडळाच्या राष्ट्रीय एकात्मता व सुरक्षा विशेष उद्दिष्ट गट आणि सामाजिक शास्त्र अध्ययन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सहा तासांची 'राष्ट्रीय एकात्मता मार्गदर्शक प्रशिक्षण कार्यशाळा' योजली होती. ३२ कार्यकर्ते सहभागी झाले होते. श्री. प्रशांत दिवेकर (प्रमुख मार्गदर्शक), निवृत्त एअर व्हाईस मार्शल श्री. किरण पळसुले, श्री. वामन पारखी यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

सुहासिनीताई देशपांडे अनुवादित 'आर्यांचे आक्रमण : अगा जे घडलेचि नाही' या पुस्तकावर त्यांनी स्वत: मांडणी केली. ३९ जण दूरस्थ पद्धतीने उपस्थित होते.

शालेय विद्यार्थ्यांसाठीच्या राष्ट्रीय एकात्मतेविषयीच्या लेखमालेसाठी श्री. शशिशेखर चौगुले यांनी आर्थिक उत्पादनाविषयी राज्याराज्यांमध्ये असलेले परस्परावलंबन अधोरेखित करणारा लेख लिहिला.

२. **Critical Thinking :** युवक विभाग आणि शालेय मानसशास्त्र पदव्युत्तर पदविका वर्ग या दोन्ही गटांसाठी १२-१२ तासांच्या दोन स्वतंत्र कार्यशाळा झाल्या. त्याची संरचना केली व प्रशिक्षण दिले. नेतृत्व संवर्धन केंद्राच्या दोन वर्गांसाठी पाच सत्रे झाली.

३. **व्यक्तिगत आर्थिक नियोजन :** या विषयावर श्री. अमोल सुगंधी यांचे सत्र आयोजित केले. ३२ जणांनी सहभाग घेतला.

### ❖ अन्य महत्त्वाचे ❖

१. **ग्रंथालय :** श्रीमती मेघनाताई ओगले यांच्याकडून त्यांचे वडील कै. श्री. दिगंबर रामकृष्ण आठवले यांच्या स्मरणार्थ अर्थशास्त्र विषयक पुस्तके खरेदी करण्यासाठी रु. ७५,०००/- देणगी मिळाली. त्या संदर्भातील उपयुक्त पुस्तकांची यादी करून पुस्तके विकत घेण्यास सुरुवात झाली आहे.

२. **श्री अरविंद तत्त्वज्ञान अभ्यासगट (पाक्षिक बैठक, नियमित १०-१२ सदस्य) :** मा. विश्वनाथ गुर्जर यांच्या मार्गदर्शनाखाली 'भारतीय संस्कृतीचा पाया' या पुस्तकाच्या अभ्यासाचे एक आवर्तन पूर्ण झाले. सध्या 'मानवी विकासचक्र' या पुस्तकाचा अभ्यास चालू आहे.

### प्रतिसादासाठी जाहीर आवाहन

येत्या वर्षात 'अर्थशास्त्र कट्टा' उपक्रम सुरू करत आहोत. नेहमीच्या शैक्षणिक पद्धतींपलीकडे जाऊन अर्थशास्त्र विषयाचा सखोल अभ्यास करणे, त्यातील बारकावे समजून घेणे, सदस्यांचे अर्थशास्त्रातील औत्सुक्य, गोडी वाढवणे, अर्थशास्त्राचा उपयोग/कार्यान्वयन, अन्य सामाजिक शास्त्रांशी असलेला संबंध समजून घेणे, असा या उपक्रमाचा उद्देश आहे. महाविद्यालयीन वयोगटापासून पुढे सर्व गटांसाठी हा कट्टा खुला असेल. अर्थशास्त्र कट्टा, आर्थिक विषमता - संशोधन प्रकल्प, Understanding complex problems using systems thinking या उपक्रमांमध्ये आपण सहभागी व्हावे. तसेच सामाजिक शास्त्र अध्ययन केंद्राच्या कार्यविधानाशी संबंधित विषयांमध्ये आपल्याला रस असलेल्यांनी जरूर संपर्क करा. आपल्याबरोबर अभ्यास तसेच काम करायला आम्हाला नक्की आवडेल. (संपर्क क्र. : ९८५०५७२५८०)

उरात अमुच्या अदम्य ईर्ष्या, चैतन्याला गगन थिटे
सामर्थ्याची ही ललकारी, लक्षमुखातुन आज उठे ।। ध्रु. ।।
ध्येयासाठी उसळत जाता, या देहाचे भान कुठे?
तरुणांच्या धमन्यांत आजला, समर्पणाची आस उठे ।। १ ।।
हनुमंताची अभेद्य काया, इंद्राचेही वज्र तुटे
खांद्यालागी भिडवा खांदा, संघटनेची साद उठे ।। २ ।।
रिपुरक्ताचा ठाव नेमका, श्रीरामाचा बाण सुटे
मनात घुमती वादळवारे, 'हरहर' गंभीर नाद उठे ।। ३ ।।
पिचून गेल्या अस्मानावर, तारुण्याचे तेज फुटे
'पराक्रमाचा विझतो वणवा', ही मातेची खंत मिटे ।। ४ ।।



# ११. नैसर्गिक संसाधने विभाग

### ❖ पाणी टंचाई निवारण कार्यक्रम ❖

दुर्गम गावांमधील पिण्याच्या पाणीटंचाई निवारणाच्या उपक्रमावर गेली काही वर्षे विभागातर्फे विशेष भर देण्यात येत आहे. पाणीटंचाई निवारणाच्या या उपक्रमात झरेविकास, नवीन विहीरखोदाई, जुन्या विहिरींचे खोलीकरण व रुंदीकरण, नवीन नळपाणी पुरवठा योजना, जुन्या नळपाणी योजनेची दुरुस्ती, पाणीसाठवण टाकीचे बांधकाम आदी विषय लोकांच्या सहभागातून हाताळण्यात येत आहेत. श्रमदान व लोकवर्गणी याआधारे प्रत्येक गावाचा सहभाग निश्चित करण्यात येत असतो. कामापोटी येणाऱ्या खर्चाच्या मोठ्या रकमेची तजवीज पुण्यातील विविध कंपन्यांच्या सीएसआर निधी व अन्य देणग्यांमधून करण्यात येते. गेल्या दोन वर्षांपासून पुणे जिल्ह्याबाहेरील कामास सुरुवात झाली आहे. विभागाचे काम सध्या पुणे जिल्ह्यातील भोर, वेल्हे व मुळशी तालुक्यांसह एकूण नऊ जिल्ह्यांतील २० निवडक तालुक्यांमध्ये विस्तारलेले आहे. नवीन तालुक्यांचा कामात समावेश करताना संबंधित तालुक्यातील शासनाच्या अधिकृत पाणीटंचाईग्रस्त गावांच्या यादीचा आधार घेण्यात येतो. टँकरने पाणीपुरवठा करण्यात येणाऱ्या गावांना यात प्राधान्य दिले जाते. अन्य जिल्ह्यांमध्ये पाण्याचा स्रोत उपलब्ध असणाऱ्या ठिकाणी पाणीसाठवण टाकी या उपक्रमाचा प्रामुख्याने विस्तार करण्यात येत आहे. टंचाईग्रस्त गावांमध्ये टँकरचे पाणी साठविण्यासाठीही या टाक्यांचा उपयोग होत आहे.

१. **विहीर खोदाई व बांधकाम उपक्रम :** गेल्या वर्षी बांधलेल्या माळेगाव (ता. मुळशी) येथील विहिरीचे लोकार्पण यंदा प्रबोधिनीच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या बागेश्रीताई पोंक्षे यांच्या हस्ते करण्यात आले. विहिरीसाठी अर्थसाहाय्य करणाऱ्या केपीआयटी टेक्नॉलॉजीचे वरिष्ठ व्यवस्थापक श्री. पुष्पहास जोशी हे यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. केपीआयटीचे सीएसआर अधिकारी श्री. तुषार जुवेकर, माळेगावच्या सरपंच श्रीमती नंदा चौधरी, उपसरपंच श्री. रवींद्र कडू, श्री. आण्णा मरगळे, श्री. नथू मरगळे हेही यावेळी उपस्थित होते.

पोमगाव (ता. मुळशी) येथे गेल्या वर्षी खोदलेल्या विहिरीचे बांधकाम पूर्ण झाले. या विहिरीच्या कामास पर्सिस्टंट फौंडेशनचे साहाय्य मिळाले. सातारा जिल्ह्यातील वाई तालुक्यातील मांढरदेव या ग्राम पंचायतीमधील गडगेवाडी या धनगरवस्तीत विहीरीसाठीचे खोदकाम पूर्ण झाले. विभागाने पुणे जिल्ह्याबाहेर बांधण्यास घेतलेली ही पहिलीच विहीर आहे. यासाठी पॉलिवन पॉलिमर्स इंडिया प्रा. लि. यांचे अर्थसाहाय्य मिळाले.

बांधकाम करण्यात आलेल्या सर्व विहिरींच्या जागांचे शासनाच्या नावे बक्षिसपत्र करण्यासाठी मोठ्या चिकाटीने पाठपुरावा करून ती मिळवण्यात आली. यंदाच्या विहिरींची कामे धरून विभागातर्फे आत्तापर्यंत ३७ विहिरींचे खोदकाम व बांधकाम यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आले आहे.

२. **फेरोसिमेंट टाकी बांधकाम :** या वर्षी पिण्याच्या पाण्याच्या साठवणुकीसाठी एकूण २८ गावे/वस्त्यांमध्ये फेरोसिमेंट टाक्यांचे बांधकाम करण्यात आले. यांपैकी पुणे, सातारा, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यात प्रत्येकी चार टाक्या आणि नाशिक जिल्ह्यात बारा टाक्या बांधण्यात आल्या. या वर्षी बांधलेल्या टाक्या धरून विभागातर्फे आत्तापर्यंत एकूण ८५ टाक्या बांधल्या आहेत. या सर्व लोकसहभागातून बांधलेल्या आहेत हे विशेष! या सर्व ठिकाणी ग्रामस्थांनी चौथरे बांधून देण्यास मदत केली. अनेक गावात साठवणटाकीचा सळईचा सांगाडा बांधण्यात व सांगाड्यावर सिमेंटचा माल लिंपण्यात स्थानिक ग्रामस्थांनी चांगल्याप्रकारे श्रमकार्य केले.

यंदा बांधलेल्या दोन टाक्यांची क्षमता २० हजार लि. आहे, तर उर्वरित सर्व २६ टाक्यांची क्षमता १५ हजार लि. इतकी आहे. यंदाच्या वर्षी या उपक्रमात सांगली जिल्ह्यातील जत तालुक्याची व नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर आणि पेठ या दोन आदिवासी तालुक्यांची नव्याने भर पडली. हळ्ळी व उटगी (ता. जत), गुंजेगाव (ता. मंगळवेढा) येथील माध्यमिक शाळांसाठी देखील टाक्या बांधण्यात आल्या.

यंदाच्या टाक्यांसाठी पॉलिवन पॉलिमर्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, फ्रेम्स प्रोसेस अँड एनर्जी सिस्टिम, केपीआयटी टेक्नॉलॉजीज्, एम्.एस्.एस्. इंडिया प्रा. लिमिटेड, ज्ञान प्रबोधिनी फौंडेशन, अमेरिका अशा अनेकांचे अर्थसाहाय्य लाभले. मुंबईतील जलवर्धिनी संस्थेचे उल्हास परांजपे यांचे या फेरोसिमेंट टाकी बांधकामासाठी वेळोवेळी तांत्रिक मार्गदर्शन लाभले.

३. **नळपाणी योजना :** यंदाच्या वर्षी भोर तालुक्यातील प-हर ग्रामपंचायतीतील कचरेवस्ती येथे नीरा-देवधर धरणामधून वस्तीवरील विहिरीपर्यंतच्या दीड किमी. लांबीच्या पाईपलाईन अंथरण्याचे काम पूर्ण करण्यात आले. पाईपलाईन खोदकाम व पाईप अंथरण्याचे काम ग्रामस्थांनी श्रमदान व लोकवर्गणीतून केले. यामुळे उन्हाळ्यात वस्तीपर्यंत पाणी पोहोचले. यामुळे गावाचे शासकीय टँकरवरील अवलंबित्व कमी होण्यास मदत झाली.

तोंडवळ ग्रामपंचायतीमधील पोंड्यांचा माळ (ता. पेठ, जि. नाशिक) या आदिवासी पाड्यावर दमणगंगा नदीशेजारील कुपनलिकेवरून पाड्यावर बांधलेल्या टाकीपर्यंत ३०० मीटर अंतराची पाईपलाईन टाकण्यात आली. यासाठीचे खोदकाम व पाईपलाईन बुजविणे यासाठीचे श्रमदान ग्रामस्थांनी उत्साहाने केले. पाईपलाईनचा खर्च केपीआयटी टेक्नॉलॉजीज्च्या अर्थसाहाय्यातून करण्यात आला.

४. **श्रमकार्य उपक्रम :** केपीआयटी कंपनीच्या अभियंत्यांनी वेल्हे तालुक्यातील नाळवट या गावातील तामजाईच्या ओढ्यावर श्रमदानाने एक वनराई बंधारा बांधला. या श्रमदानामध्ये २० पुरुष व चार महिला सहभागी झाल्या. याच गावात अजून एका बंधाऱ्याचे काम केपीआयटीच्या अभियंत्यांनी पूर्ण केले. या श्रमदानामध्ये १६ मुले आणि चार मुली सहभागी झाल्या.

### ❖ सौर ऊर्जा ❖

१. **सौर पॅनेल व दिवे जुळणी प्रशिक्षण :** नागरी वस्ती अभ्यास गटातील मुलींनी यंदा ७०० सौर पॅनल तयार केले. यापैकी ५०० पॅनलची विक्री शारदाश्रम फाउंडेशन, पुणे यांना करण्यात आली. शिवापूर येथील तेजोमय उपक्रमाला दिवाळी सौर पणती विक्रीसाठी १२० पॅनल देण्यात आले.

साळुंब्रे केंद्रातील व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात एक सौर पॅनल जुळणी प्रशिक्षण घेण्यात आले. यात मावळ तालुक्यातील कातकरी वस्तीवरील १५ विद्यार्थी सहभागी झाले होते.

तळेगावमधील 'वर्क फॉर इक्वालिटी' या संस्थेच्या माध्यमातून मुले सौर प्रशिक्षणासाठी आली होती. या मुलांची शाळा सुटलेली आहे. या प्रशिक्षणासाठी इनरव्हील क्लब ऑफ निगडी प्राईड यांचे अर्थसाहाय्य मिळाले. इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा डॉ. रंजना कदम, सचिव सोनाली जयंत, माजी अध्यक्षा शकुंतला बन्सल यांनी या प्रशिक्षणाला भेट दिली. आठवडाभरातील या प्रशिक्षणात सौर दिवे जुळणीचेही प्रशिक्षण मुलांना देण्यात आले.

२. **सौर दिवे वाटप :** नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर तालुक्यातील, कोकणा आदिवासी समाज असलेल्या हिरडी गावातील भवानीवाडी येथे २५ सौर दिव्यांचे वाटप करण्यात आले आहे. सातत्याने व अनियमित भारनियमनाला सामोरे जाणाऱ्या ग्रामस्थांना यामुळे दिलासा मिळणार आहे.

### ❖ अन्य महत्त्वाचे ❖

१. पर्जन्य जलसंकलनाबाबत मुंबईतील जलवर्धनी संस्थेसोबत एका चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. त्याला पुण्यात पाणी विषयात अनेक वर्षे काम करणाऱ्या विविध संस्थांचे एकूण २५ प्रतिनिधी उपस्थित होते.
२. वातुंडे (ता. मुळशी) येथील धनगरवस्ती वरील श्री. कृष्णा कोकरे यांनी केपीआयटी टेक्नॉलॉजीज्च्या वार्षिक कार्यक्रमात गावातील कामाविषयीचे अनुभवकथन केले.
३. इनरव्हील क्लब ऑफ पुणे आयोजित प्रदर्शनात सौर दिवे व बांबूच्या वस्तू यांचे प्रदर्शन मांडून विभागातर्फे सहभाग घेण्यात आला. क्लबचे पुणे जिल्हा व परिसरातील सदस्य यावेळी आवर्जून उपस्थित होते. विभागातील श्री. प्रदीप जाधव यांनी उपस्थितांना माहिती सांगितली. सौर उपक्रमाचा प्रसार, प्रचार आणि निधी संकलन या उद्देशाने हा सहभाग घेण्यात आला.




# १२. कौशल्य प्रशिक्षण केंद्र, शिवापूर

### ❖ वर्गांचे तपशील ❖

ज्ञान प्रबोधिनी कौशल्य प्रशिक्षण केंद्र, शिवापूर येथे लेथ मशीन ऑपरेटर, सी.एन.सी मशीन ऑपरेटर, वेल्डर आणि इलेक्ट्रिशियन हे वर्ग नियमित चालू आहेत. एकूण विद्यार्थी संख्या ५० आहे. त्यातील सी.एन.सी १५ व १६ आणि लेथ मशीन २८ या तुकडीतील एकूण २९ विद्यार्थ्यांपैकी १७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. नवीन तुकडीत सध्या २१ विद्यार्थी शिकत आहेत. येथील विभागामध्ये एकूण ११ सदस्य नियमित कार्यरत आहेत.

### ❖ विशेष कार्यक्रम व उपक्रम ❖

१. **आषाढी एकादशी व खांडेनवमी :** दि. २९ जून २३ रोजी आषाढी एकादशीनिमित्त शिवापूर केंद्रामध्ये भजन व उपासनेचा कार्यक्रम झाला. कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित राहून छान प्रतिसाद दिला. तसेच खांडेनवमीनिमित्त यंत्रपूजनाचा कार्यक्रम सिनेमरो निर्माण कंपनीचे श्री. पराग मेंगाळे सर (व्यवस्थापकीय संचालक) यांच्या हस्ते पार पडला. पराग सरांनी विद्यार्थ्यांना त्यांचे अनुभव सांगताना आयुष्यात यश मिळवायचे असेल तर कष्टाशिवाय पर्याय नाही असे आवर्जून सांगितले.

२. **दि. १५ ऑगस्ट ध्वजारोहण कार्यक्रम :** स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने ध्वजारोहणाच्या कार्यक्रमाला केंद्रामध्ये गावातील ज्येष्ठ नागरिक तसेच सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य, सर्व विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. 'लोकमान्य टिळकांचा परिचय' या विषयावर व्याख्यान झाले.

३. **दि. २६ जानेवारी ध्वजवंदन :** दरवर्षी प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी एखादा गड निवडून ध्वजारोहण करायचे, असा संकल्प केला आहे. या वर्षी ध्वजारोहण करण्यासाठी शिवापूर केंद्रातून सर्व विद्यार्थी आणि शिक्षक किल्ले केंजळगड व रायरेश्वर येथे गेले होते.

४. **संवाद वर्ग :** प्रत्येक शुक्रवारी विद्यार्थ्यांसाठी नवीन उपक्रम म्हणून संवाद वर्ग घेतला जातो. संवादक म्हणून वेगवेगळ्या कंपनीचे मॅनेजर तसेच स्वतःचा व्यवसाय सुरू करणारे माजी विद्यार्थी त्यांचे अनुभव व कंपनीमध्ये चालणारे काम या बद्दल संवाद साधतात. आत्तापर्यंत १५ संवाद वर्ग घेतले.

५. **छोटे इंजिनिअर्स उपक्रम :** या उपक्रमामध्ये आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांना इंजिनिअरिंग कौशल्ये शिकवली जातात. आता दोन शाळांमध्ये हा उपक्रम चालू आहे. विद्यार्थी व शिक्षकांचा खूप छान प्रतिसाद आहे. पुढील वर्षात हा उपक्रम अजून सहा शाळांमध्ये चालू करणार आहोत.

६. **सोलर उपक्रम :** दिवाळीनिमित्त सौर कक्षात एकूण १४० पणतीमाळ आणि ९० कंदील दिवे विद्यार्थ्यांनी बनवून विक्रीसाठी पाठवले. कमवा व शिका योजनेतून पाच विद्यार्थी काम करत होते.

छोटे इंजिनिअर्स प्रकल्पाच्या अंतर्गत दि. ७ फेब्रुवारी २४ रोजी पहिल्यांदाच 'छोटे इंजिनिअर्स प्रकल्प स्पर्धा' आयोजित करण्यात आली. विद्यार्थ्यांनी वर्षभरात जी कौशल्ये शिकली होती, त्याचे प्रदर्शन करण्यासाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. दोन्ही शाळांमधील एकूण १८ गटांपैकी ८ गट निवडले होते. एकूण ४० विद्यार्थी स्पर्धेसाठी हजर होते. विद्यार्थ्यांनी तीन तासांमध्ये प्रकल्पामध्ये ठरवलेली वस्तू बनवली. गटातील सगळ्याच विद्यार्थ्यांनी उत्तम मॉडेल तयार केले. स्पर्धेसोबतच बक्षीस वितरणाचा कार्यक्रम पार पडला.

### ❖ महत्त्वाच्या भेटी ❖

१. दि. १९ ऑक्टो. २३ रोजी ज्ञान प्रबोधिनीचे संचालक वा. गिरीशराव बापट यांनी केंद्राला भेट दिली. केंद्रातील सर्व विभागांची पाहणी करून आ. संचालकांनी विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना मार्गदर्शन केले. विद्यार्थी आणि शिक्षकांमध्ये संवाद कसा असावा?, विद्यार्थ्यांचा कौशल्याकडे कल वाढविण्यासाठी त्यांच्यापुढे वेगवेगळ्या प्रकारची आव्हानात्मक कामे देण्याचा प्रयत्न करणे, जेणेकरून विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य शिक्षणाची जिज्ञासा निर्माण होईल, याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.
२. दि. २४ डिसें. २३ रोजी मणिपूर मधील डॉक्टर नंदी वेदमणी मॅडम व खणकर मॅडम यांनी केंद्रास भेट दिली.
३. बॉस्टन सायंटिफिक आणि केपीआयटी कंपनीच्या काही लोकांनी येऊन केंद्राला भेट दिली.
४. विज्ञान आश्रम पाबळ येथील प्रदर्शनास सदस्यांनी भेट दिली.

### ❖ अन्य महत्त्वाचे ❖

१. केंद्रात सिडबी आयोजित मिटकॉन कंपनीकडून P.V व Thermal Solar हा ३० दिवसांचा कोर्स घेण्यात आला. यासाठी २५ विद्यार्थी उपस्थित होते. तसेच कोर्स पूर्ण झाल्यानंतर उद्योग आधार आणि मिटकॉन कंपनीकडून सर्टिफिकेट देण्यात आले व इंडस्ट्री व्हिजिट करण्यात आली.
२. दि. २४ फेब्रु. २४ रोजी श्री. मोहन सर आणि मितेशदादा आचवल यांनी स्टड क्राफ्ट, आर्वी येथे त्यांच्या प्रकल्पाला भेट देऊन विद्यार्थ्यांच्या नोकरीसाठी व त्यांच्या विद्यार्थ्यांच्या बद्दल काय अपेक्षा आहेत, याबद्दल माहिती घेतली.

### ❖ नवीन उपक्रम ❖

१. **नवीन संकेतस्थळ :** तंत्रशिक्षण अभ्यासक्रमांची व केंद्रांची माहिती व्हावी, यासाठी एक नवीन संकेतस्थळ बनवले आहे. कोणकोणते अभ्यासक्रम आपण राबवणार आहोत त्याचे तपशील त्यावर कळतील. तसेच त्यावर केंद्रावरील महत्त्वाच्या घडामोडीही पाठवल्या जातील. प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्याला त्याद्वारे आपली माहितीही पाठवता येईल. माहिती मिळताच केंद्राकडून त्या विद्यार्थ्याला संपर्क केला जाईल. संकेतस्थळ पाहण्यासाठी सोबत दिलेला क्यूआर कोड स्कॅन करावा.
२. **कौशल्य शिक्षणाचे महत्त्व कार्यशाळा :** या वर्षीपासून जवळच्या गावांमधील शाळांमध्ये इ. १०वी आणि १२वीच्या विद्यार्थ्यांसाठी Career Guidance Programme चे आयोजन करण्यात येत आहे. या अंतर्गत विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षण आणि कौशल्य याचे महत्त्व सांगितले जाते आणि पुढील शिक्षण करत असतानाच आपल्या इथे तंत्रशिक्षणाचे वर्ग करणे त्यांच्यासाठी फायद्याचे असेल हे पटवून दिले जाते. सोबतच विद्यार्थ्यांना काही Technical activities करण्याची संधी दिली जाते. उदा. वेल्डिंग करणे, ड्रिल मशीन वापरणे, मेटल कटिंग करणे, सोल्डरिंग करणे इ.
३. **वेल्डिंग वर्कशॉप :** केंद्रात वेल्डर कोर्स अनेक वर्षांपासून सुरू आहे. याद्वारे विद्यार्थ्यांना वेल्डिंग आणि फॅब्रिकेशन क्षेत्राबाबत अभ्यास शिकवला जातो. या वर्गाच्या प्रात्यक्षिकासाठी स्वतंत्र जागा असावी यासाठी fabrication workshop बांधण्यात आले आहे. त्याठिकाणी विद्यार्थी सगळ्या प्रकारच्या वेल्डिंगचे practical आणि अभ्यास करू शकणार आहेत.
४. **व्यवस्थापकीय :** नवीन ERP System चालू केल्याने विद्यार्थ्यांची प्रवेशाची माहिती, हजेरी भरणे, पावत्या पाठविणे, शुल्काचे तपशील ठेवणे ही कामे सोपी झाली आहेत.

या वास्तूच्या कणाकणाशी जडले माझे नाते
काशी माझी हीच आणखी रामेश्वरही येथे ।। ध्रु. ।।
श्रांत जिवाला, भ्रांत मनाला, करुणाघन बुद्धाचे मंदिर
शरद्रात्रिचे शांत शिवालय आश्वासन हे देते ।। १ ।।
पोलादाच्या नसानसांतुन, थिजला लाव्हा, भिजले वादळ
कोसळत्या बिजलीचे बनले मूर्त शिल्प लखलखते ।। २ ।।
विक्रम-वैभव-वैराग्याच्या, दिग्विजयी दूतांच्या नयनी
आजच जेथे दिव्य उद्याचे दर्शन मजला होते ।। ३ ।।



## १३. स्त्री-शक्ती प्रबोधन, ग्रामीण

या वर्षी वेगवेगळ्या ४२ बैठकांमधून १६० महिला कार्यकर्त्यांनी साधारण ४००० महिलांसाठी काम केले. शिवगंगा-गुंजवणी खोऱ्यातील ७० गावांत हे काम पसरले आहे. आर्थिक स्वयंपूर्णता, व्यक्ती-विकास, आरोग्य, शिक्षण अशा विषयांत काम झाले.

### ❖ सहनिवास ❖

जास्वंद गिरीकन्या मुलींचा सहनिवास, वेल्हे येथे यंदा आठ नवीन व आधीच्या २० मुली मिळून २८ मुली होत्या. ज्या मुलींना शिक्षणासाठी किमान १२ कि.मी. चालावे लागते, अशा दुर्गम २० गावांतून, नाममात्र शुल्क देऊन, मुली निवासात राहतात व शाळा-महाविद्यालयात जातात. मुलींना अभ्यासात मार्गदर्शन मिळत असल्यामुळे सर्व मुली समाधानकारक गुण मिळवून पुढील इयत्तेत गेल्या. मुलींचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी 'शनिवार शाळा' हा साप्ताहिक उपक्रम झाला. या वर्षी संवादिनी (हार्मोनियम) शिकून १२ जणी गांधर्व महाविद्यालयाची पहिली परीक्षा उत्तीर्ण झाल्या. यंदा निवासाच्या पाच देणगीदारांना त्यांच्या घरी भेटून दिवाळीनिमित्त निवासातील मुलींनी केलेल्या क्विलिंगच्या पणत्या व बेसनाचे लाडू अशी भेट दिली. रथसप्तमीनिमित्त निवासातील प्रत्येक मुलीने ५० सूर्यनमस्कार घातले. प्रबोधिनीत अनुभव सहली, क्षेत्र भेटी यांना महत्त्व आहे. असे शिक्षण निवासात राहणाऱ्या ग्रामीण मुलींचे सुद्धा आवर्जून केले जाते. या वर्षी पुढील सहली झाल्या.

१. **पुणे सहल :** इ. ५वी ते ९वीच्या १३ मुलींची प्रभाताई इनामदार यांनी पुणे दर्शन सहल काढली. त्यांनी पुण्यातील सदर्न कमांड म्युझियम पाहून सात युद्धांची माहिती घेतली. त्यानंतर रुबी हॉल ते छत्रपती संभाजी उद्यान पर्यंत मेट्रो प्रवास केला. झपूर्झा म्युझियम मधले कला दालनही पाहिले.

२. **मुंबई सहल :** युवतींची सहल मुंबईला झाली. ११ युवती, तीन ताई असा १४ जणींचा गट यात सहभागी झाला. सहलीत विधानभवनाला भेट दिली. विधानभवनाचे सर्व कामकाज कसे चालते, अधिवेशन काळात विधानभवनातील सभागृहात मंत्री, सदस्य, पत्रकार, विद्यार्थी कुठे बसतात, रेकॉर्डिंग रूम, त्याचे टीव्ही वरील live कसे दाखवले जाते, अध्यक्ष कुठे बसतात अशी सर्व माहिती घेतली. प्रबोधिनीच्या स्पर्धात्मक क्षमता संवर्धन केंद्राच्या माजी विद्यार्थिनी धनश्रीताईंनी संपूर्ण मंत्रालय दाखवले. त्यानंतर मुंबईची वैशिष्ट्ये असणारे नेहरू तारांगण, सायन्स सेंटर, गेट वे ऑफ इंडिया पाहून गट वेल्ह्याला परतला.

यंदाचे वर्ष निवासाचे दशकपूर्तीचे वर्ष असल्याने काही वेगळे कार्यक्रम घेतले. ज्यामध्ये -

१. **माजी विद्यार्थिनींचा मेळावा** : निवास सुरू केल्यापासून आजपर्यंत ४१ गावांतून ९३ मुली शिकून गेल्या आहेत. त्यांना मेळाव्याला बोलावले होते. त्यापैकी २२ युवती आल्या. सगळ्यांनी निवासाबद्दल मनोगत व्यक्त केले. इथे राहिल्याने पुढे काय

संधी मिळाल्या ते त्यांनी मोकळेपणाने मांडले. बोलणे ऐकताना निवासामुळे त्यांची आयुष्यं किती बदलली हे लक्षात येत होते.

२. **पालकांची प्रबोधिनी परिचय सहल :** पालकांसाठी पुण्यात ज्ञान प्रबोधिनी परिचय सहल झाली. १८ पालक यासाठी आले होते. स्त्री-शक्ती प्रबोधन ग्रामीण, छात्र प्रबोधन, नैसर्गिक संसाधने विभाग, प्रज्ञा मानस संशोधिका हे विभाग त्यांनी पाहिले आणि प्रबोधिनीची माहिती समजून घेतली. आपली मुलगी कुठल्या संस्थेमध्ये शिकते, याची पालकांना सहलीत ओळख झाली.

३. **नियमित दल :** स्वाधार प्रकल्पाच्या अंतर्गत ७ ते १४ या वयोगटातील मुलांच्या क्षमतांचा विकास करण्यासाठी खेळगट उपक्रम दहा गावांतील १८० मुलांसाठी झाला. गणेशोत्सवात लेझीम सादरीकरण, दहीहंडी, आषाढी एकादशी भजन, शिवजयंती, प्रजासत्ताक दिनानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम असे सण मुलांनी साजरे केले. त्यातून पुढाकार घेऊन नवीन गोष्टी शिकण्याची संधी मुलांनी पहिल्यांदा घेतली.

## ❖ किशोर व किशोरी विकास ❖

कल्याण, कुसगाव, वरवे, कुरूंगवडी या गावातील शाळांत इ. ८वीच्या वर्गावर जुलै २३ ते फेब्रु. २४ या कालावधीत विद्याव्रताच्या १८ तासिका घेतल्या. तासिकांमध्ये श्रिया संस्थेमधून योगशिक्षक व प्रबोधिनीच्या माजी विद्यार्थिनींचा सहभाग होता.

१. **विद्याव्रत संस्कार :** दि. ३ फेब्रु. २४ या दिवशी चार शाळांतील ११० विद्यार्थी-विद्यार्थिनी व सहनिवासातील सहा मुली अशा ११६ जणांचा विद्याव्रत संस्कार वरवे येथे झाला. कार्यक्रमास तीन शाळांतील शिक्षक व पुण्यातून नियमित विद्याव्रताची सत्रे घ्यायला येणाऱ्या गटातून सहा जण उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी अनंत दासजी (इस्कॉन मंदिर) उपस्थित होते. पूर्वतयारीचे निवासी शिबिर सज्जनगडावर झाले. या शिबिराला पूर्वी विद्याव्रत घेतलेले कल्याण गावातले ताई-दादा आले होते.

२. **विद्याव्रत जोपासना :** विद्याव्रत घेतलेल्या मुलांना सेवा अनुभव म्हणून गावातील शेतकऱ्यांच्या भाजीची पुण्यात विक्री करण्याचा अनुभव देणे, असा प्रयोग केला. कुरुंगवडी, वरवे, कुसगाव या तीन शाळांतील दहा मुलांनी कोथरूड, पौड इथल्या तीन ठिकाणी विक्रीचा अनुभव घेतला. एकूण रु. १०,८००/- रुपयांची भाजी विक्री तीन स्टॉलवर मिळून मुलांनी केली.

## ❖ आर्थिक स्वयंपूर्णता ❖

५६ गावांमधील प्रबोधिनीच्या १६२ बचत गटांच्याद्वारे २६८७ महिला आर्थिक प्रवाहात जोडल्या गेल्या आहेत. मागील वर्षात या गटांद्वारे सुमारे ४ कोटींचे कर्जवाटप झाले. तसेच १.५ कोटींची परतफेड व सुमारे ५ लाख इतके व्याज जमा झाले. बचत गटाचे काम करताना आर्थिक स्वयंपूर्णतेच्या कामाची गरज नेहमीच जाणवत असते. त्यासाठी ग्रामीण महिलांना स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण दिले जाते. यंदाही विविध प्रकल्पातून स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण दिले गेले.

१. **राम-सीता पुराणिक तंत्र निकेतन :** शिवापूर येथे महिलांसाठी शिवणकाम, खाद्यपदार्थ, कलेच्या गोष्टी अशा आठ प्रकारची ३३ प्रशिक्षणे घेण्यात आली. त्यात ८५ महिला सहभागी झाल्या. त्यांनी केलेल्या उत्पादनांची रु.१,२९,६८९/- रकमेची विक्री करण्यात आली.

२. **धनश्री प्रकल्प :** ज्ञान प्रबोधिनी फौंडेशनच्या आर्थिक मदतीने कौशल्य विकसनासाठी हा प्रकल्प घेण्यात आला. त्यात पार्लर, शिवण, संगणक अशा काही महिने चालणाऱ्या सात वर्गांची योजना नसरापूर, हातवे, कासुर्डी, वेल्हे, आंबवणे या पाच केंद्रांवर केली होती. यामध्ये ९६ जणी सहभागी झाल्या.

३. **संपदा प्रकल्प :** वेल्हे तालुक्यातील नऊ गावांत सायबेज कंपनीच्या आर्थिक मदतीने संपदा प्रकल्प एप्रिल २३ ते मार्च २४ या कालावधीमध्ये झाला. यात गाववार ६० कौशल्य प्रशिक्षणे झाली. त्यात ४५९ महिला सहभागी झाल्या होत्या. ज्यांनी आधी प्रशिक्षणे घेतली होती, अशा २३४ महिलांच्या पुढील शिक्षणासाठी २० विशेष प्रशिक्षणे घेतली. प्रकल्पात केलेल्या उत्पादनांची वर्षभरात ३९ स्टॉलद्वारे रु.४,४२,२९४/- इतकी विक्री झाली. त्याशिवाय डायट किट उत्पादन रु.४,२७,२५०/- इतके झाले. उत्पादनांची गावातल्या गावात पाहुणे येतील तेव्हा विक्री होईल, असे पाहिले. त्यात रु.५,२१,३५७/- विक्री झाली. सगळी मिळून एकूण विक्री रु.१३,९०,९०१/- झाली. या शिवाय नऊ गावांत बचत गट चालवले गेले. त्यात बचत गटातून उत्पादक काम करण्यासाठी ६४ महिलांना मिळून रु.२१,७९,५००/- भांडावलासाठी कर्ज वाटप केले.

४. **हरित ऊर्जा प्रकल्प :** या प्रकल्पाचे हे दुसरे वर्ष आहे. आडवली, असकवडी, मार्गासनी या वेल्ह्यातील गावांमध्ये ३३ शेतकऱ्यांनी प्रकल्पासाठी ४४ एकर शेतावर नेपियर गवत लावले. या निमित्ताने १३ एकर पडीक जमीन वापरली गेली. लागवड केलेल्या शेतकऱ्यांच्या वर्षभरात ३२ बैठकी गावात घेऊन संबंधित सर्व निर्णय घेण्यात आले. हरित ऊर्जा महिला बचत गट या उपक्रमाचे सगळे काम बघतो. प्रकल्पाचा भाग म्हणून ५० कुटुंबांना आधुनिक चुली वाटप केले. या प्रकल्पात १०५ जणांना कुठल्या तरी प्रकारचा लाभ मिळाला. कापणी केलेल्या गवतापासून इंधन कांडी बनवायला गटातील महिला शिकल्या. त्यांनी मार्च महिन्यापर्यंत तीन टन इंधनकांडीचे उत्पादन केले.

५. **स्वाधार प्रकल्प :** पासली खोऱ्यातील (ता. वेल्हे) अर्थ-व्यवस्थेला चालना मिळावी म्हणून कोलंबी, जाधववाडी, केळद या तीन ग्रुप ग्रामपंचायतींमधील ११ गावांमध्ये शिक्षण, उपजीविका, पर्यावरण यावर काम करण्यासाठी कोफोर्ज कंपनीच्या अर्थसाहाय्याने स्वाधार हा प्रकल्प केला.

६. **उपजीविका :** स्वतःचे आर्थिक उत्पन्न वाढवावे याकरिता बचत गटामध्ये सहभागी असलेल्या महिला सभासदांना १४ वेगवेगळ्या प्रकारची उद्योग प्रशिक्षणे देण्यात आली. दिवाळी व गौरी गणपतीनिमित्त करंजी, बेसन लाडू, चकली असा फराळ बनवून त्याची गावा-गावात भोंगा गाडी फिरवून रु.१४,५३०/-ची विक्री महिलांनी केली. युवा गटाने उद्योजक बनावे याकरिता शिवमुद्रा फौंडेशनच्या मदतीने उद्योजकता विकास प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला. यामध्ये उद्योग सुरू करण्यासाठी आवश्यक असणारी कौशल्ये व मार्गदर्शन सत्रे घेण्यात आली. वर्गामध्ये १४ जण सहभागी होते.

७. **पर्यावरण :** पासली खोऱ्यातील जैवविविधतेची नोंद करावी म्हणून स्थानिक लोकांच्या मदतीने तज्ज्ञ डॉ. मेधावी राजवाडे आणि डॉ. अमृता जोगळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली माहिती संकलन केले. त्याचे एक पुस्तकही प्रकाशित केले. त्यात भागातील देवराई, प्राणी, पक्षी यांच्या माहितीचे संकलन आहे. प्रकल्पाचा भाग म्हणून शहरातील लोकांना ग्रामीण जीवन जवळून अनुभवता यावे यासाठी इको मेला आयोजित केला होता. यावेळी रानभाज्यांचे प्रदर्शन व केळद देवराई येथे भेट झाली. यामध्ये ३२ ठिकाणांहून १८२ लोक सहभागी झाले होते. यावेळी २६ महिलांनी जेवण व नाश्ता बनवण्याची संधी घेतली. यानिमित्ताने महिलांनी १,००,०००/- रुपयांची उलाढाल केली. चुलीचे प्रात्यक्षिक देऊन १०४ कुटुंबांना सुधारित चुलींचे वाटप केले. ज्या कुटुंबांना चुलीचे वाटप केले आहे, ती कुटुंबे स्वयंपाक बनवणे, पाणी तापवणे यासाठी चुलीचा नियमित वापर करत आहेत त्यामुळे इंधनासाठी वापरल्या जाणाऱ्या झाडांच्या काही टन (किमान १०० टन) लाकडांची बचत झाली आहे. कुसारपेठ येथे २० सौरदिव्यांचे वाटप केले. हे दिवे शिवापूर येथे उत्पादित केलेले होते. एम्प्लॉयी एंगेजमेंट अंतर्गत कोफोर्ज कंपनीच्या ६० सदस्यांनी वृक्षारोपणाचा कार्यक्रम केला.

## ❖ हिरकणी विस्तार प्रकल्प ❖

०-६ वयोगटात ज्यांची मुले आहेत अशा माता पालिकांचे प्रशिक्षण म्हणजे हिरकणी प्रकल्प! यंदा प्रकल्पाचे ११वे वर्ष होते. यंदा भोर तालुक्यातील १६ गावांत हिरकणी सत्रे झाली. त्याशिवाय हिरकणी उपक्रमाचा विस्तार या अंतर्गत विविध केंद्रांवर हिरकणी सत्रांची सुरुवात झाली. चार महिने चालणाऱ्या या उपक्रमात पालिकांसाठी सहा प्रशिक्षण सत्रांचे नियोजन केलेले असते. याचा अनुभवातून सिद्ध झालेला अभ्यासक्रम आणि सगळीकडे सारखे प्रशिक्षण दिले जावे, म्हणून पुस्तिका तयार केली. महत्त्वाचे म्हणजे स्थानिक भाषेत प्रशिक्षणे देऊ शकणारा १८ प्रशिक्षिकांचा गट या वर्षी वेल्हे भागात तयार झाला. त्या शिवाय प्रत्येक केंद्रांवर जाऊन प्रशिक्षण घेतल्याने तेथेही असा पहिल्या टप्प्याचा गट तयार झाला. ३३ जणींनी मिळून भोर, सोलापूर, हराळी, चिपळूण, साळुंब्रे, मुळशी येथील कातकरी वस्ती आणि शिक्रापूर इथल्या ३५ ठिकाणी ४६३ माता पालिकांसाठी हिरकणी सत्र घेतली. यासाठी सात जणींनी त्या-त्या ठिकाणी प्रमुख म्हणून काम पाहिले.

अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्ताने महिला व बालविकास विभागाकडून ग्राम पंचायतीतून 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार' देण्यात आला. गावासाठी धडपडणाऱ्या गावातील कार्यकर्तींचा गावातच सत्काराचा कार्यक्रम करायचा असे याचे स्वरूप होते. स्त्री-शक्ती प्रबोधन विभागाच्या गावातच राहून काम करणाऱ्या आशा शिंदे, कुंदा खंडाळकर, उज्ज्वला डांगे, सुमन जानकर, मनीषा शिळीमकर, सुमनताई शिंदे, हर्षदा झांजे, मनीषा करंजकर, रुपाली जाधव, राणी सुतार, सुनीता महाडिक, जयश्री शिळीमकर यांना या वर्षी हा पुरस्कार देण्यात आला. शाल, नारळ, मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री, महिला बालकल्याण मंत्री यांच्या सहीचे प्रमाणपत्र आणि स्मृती चिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप! गावात काम करणाऱ्या या कार्यकर्त्यांची नावे गावाने ठरवली. याचा अर्थ तिचे नेतृत्व गावाने स्वीकारले आहे अशी पावती मिळाली!

## ❖ आरोग्य सखी ❖

ज्ञान प्रबोधिनी फौंडेशनच्या अर्थसाहाय्याने या वर्षी झालेल्या या प्रकल्पात ५५ तपासणी शिबिरे झाली. त्याचा १३१५ लोकांनी लाभ घेऊन सहभाग घेतला. ५१ जणांना पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले. सर्व तपासणी शिबिरात १२ डॉक्टर नियमित येत होते. त्यासोबत २७ कार्यकर्त्यांनी काम केले. काही वेळा शासकीय ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्र येथील डॉक्टरांची मदत झाली. सर्व डॉक्टर स्वेच्छेने काम करतात. कॅन्सर पूर्व, बालआरोग्य, गरोदर माता, डोळे, दात, नवजात शिशु यासंबंधी ही तपासणी शिबिरे झाली.

## ❖ नवदिशा नेतृत्व प्रकल्प ❖

वेल्हे तालुक्यातील दुर्गम गावातील महिला प्रतिनिधींसाठी नवदिशा नेतृत्व प्रकल्प २०२१ पासून सुरू आहे. महिन्यातून एकदा या प्रकल्पाची बैठक वेल्हे कार्यालयात होते. त्यात २५ गावांचा समावेश आहे. प्रकल्पातील गावात बचत गटाचे काम चालू आहे व प्रत्येक गावातील कार्यकर्ती या बैठकीला येते. बैठकीला येणाऱ्या महिला गावाचे नेतृत्व करतात म्हणून नवदिशा नेतृत्व प्रकल्पाची सुरुवात झाली. या वर्षी बहुतेक महिलांनी गावपातळीवर मेळावे घेतले. स्वयंरोजगार कौशल्य प्रशिक्षण वर्ग घेतले, सगळ्या जणींनी एकत्र जाऊन केरळ फाईल्स सिनेमा पाहिला.










## १४. संवादिनी (स्त्री-शक्ती प्रबोधन, शहरी)

स्त्री-शक्ती प्रबोधन या कार्यदिशेच्या अंतर्गत संवादिनी गट काम करतो. 'स्वयंविकासातून समाजपरिवर्तन' हे ध्येय समोर ठेवून गेली २५ वर्षे संघटितपणे काम सुरू आहे. पुणे (मध्यवर्ती संवादिनी), पुणे (औंध व पौड रस्ता), शिरूर, खेड- राजगुरुनगर, भाईंदर अशा ठिकाणी संवादिनी गटांचे काम सुरू आहे.

### ❖ पुणे (मध्यवर्ती संवादिनी) ❖

२०२४-२५ हे रौप्य महोत्सवी वर्ष आहे. या वर्षभरात होणाऱ्या विविध उपक्रमांची सुरुवात दि. ३ जाने. २४ला मातृभूमिपूजनाने झाली. संवादिनीच्या उद्दिष्टांपैकी, कुटुंब जीवनाच्या गुणवत्तेचा अभ्यास करून ती वाढविणे, विविध वयोगटातील महिलांचे मानसिक आरोग्य जोपासण्यासाठी प्रयत्न करणे, या अनुषंगाने 'स्त्री-पुरुष संपूरकता' आणि 'मानसिक आरोग्य' असे दोन अभ्यास गट सुरू झाले आहेत. तसेच कार्यकर्ताघडण ते नेतृत्वघडण ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी समूहगुण प्रशिक्षणे सुरू आहेत. मध्यमवयातही स्वतःच्या क्षमतांचा प्रयत्नपूर्वक विकास करू पाहणाऱ्या, स्वेच्छेने आणि स्वयंप्रेरणेने समाजविकासातही सातत्याने योगदान देणाऱ्या संवादिनी सदस्या आठ गटांद्वारे विविध उपक्रमांमध्ये सहभागी असतात.

**विशेष नोंदी**

१. सदस्यांचे विविध विषयांचे वाचन व अभ्यास व्हावा, या उद्देशाने आठ गटांनी विविध विषयांवर वाचन केले.

२. महिला दिन आणि संवादिनी रौप्य महोत्सवी वर्ष या निमित्ताने दि. ८ मार्च रोजी कुमुदिनी ट्रस्ट आणि जनकल्याण रक्तपेढीच्या मदतीने रक्तदान शिबिर घेतले. एकूण ११७ जणांचा सहभाग होता. त्यापैकी ८४ महिला होत्या.

३. संवादिनी वर्धापन दिनानिमित्त झालेल्या स्नेहमेळाव्यात रोहिणीताई आठवले, अर्चनाताई जयवंत आणि नीलिमाताई रानडे यांना २०२४चा 'कृतिशील संवादिनी' पुरस्कार दिला.

**गटशः तपशील**

१. **विद्याव्रत गट :** मे २३ मध्ये झालेल्या विद्याव्रत शिबिरातील व्रतार्थींसाठी जून २३ ते फेब्रुवारी २४ अशी जोपासना सत्रे झाली. त्यामध्ये 'एकमेकां साहाय्य करू' कृति खेळ, प्रतिज्ञा अर्थ, वेल्हे येथे भातलावणी, ज्ञान प्रबोधिनी गणेश विसर्जन मिरवणूक पाहणे, त्रिशुंड गणपती मंदिर, नागेश्वर मंदिर व काळाराम मंदिर येथे वारसास्थळ दर्शन, वसुबारस गोपूजन व शेत फेरफटका, धडपड प्रयोगशाळा, 'अक्षरराम' प्रदर्शनात सहभाग, सिंहगड गिर्यारोहण या उपक्रमांचा समावेश होता. दि. १२ जुलै २३ ते ३१ जाने. २४ दरम्यान मध्यवर्ती संवादिनी, डोंबिवली, ठाणे, बदलापूर येथील सदस्यांचे दूरस्थ पद्धतीने पाक्षिक विद्याव्रत प्रशिक्षण झाले. सरासरी २५-३० सदस्यांनी सहभाग घेतला.

२. **कौशल्य गट :** या वर्षी गटाने 'गटकार्य-सहकार्य' या विषयाचा नव्याने अभ्यास करून हा विषय विद्यार्थ्यांसमोर मांडला.

कौशल्य गटातर्फे एकूण १० विषय घेतले जातात. गरजेप्रमाणे त्यात नव्याने भर घालण्यासाठी अभ्यास करून, सरहद्द पब्लिक स्कूल मध्ये ४० विद्यार्थ्यांसाठी सत्र घेतले. जुलै २३ ते एप्रिल २४ दरम्यान पुण्यातील सहा व ग्रामीण भागात एका शाळेत मिळून एकूण १०६५ विद्यार्थ्यांपर्यंत विषय पोहोचवले.

३. **उमलत्या वयाशी जुळवून घेताना :** नशा मुक्ती जनजागृती अभियानाच्या अंतर्गत अलंकार पोलिस चौकी, पुणे यांच्या हद्दीतील शाळांमध्ये 'व्यसने' या विषयावर चर्चा सत्र झाले. ओकरिज हायस्कूल, कोंढवा येथे घेतलेली कार्यशाळा सर्वार्थाने वैशिष्ट्यपूर्ण होती. हिंदी भाषेत पहिल्यांदाच कार्यशाळा घेतली. कोल्हापूर येथील 'युवा साथी' प्रशिक्षक व इथले नवे प्रशिक्षक यांनी एकत्र काम केले. एच.आय.व्ही. बाधित वधू-वर व त्यांच्या पालकांसाठी मानव्य संस्थेसोबत कार्यशाळा घेण्यात आली.

४. **विकासिका :** संवादिनी सदस्यांनी लिहिलेल्या 'मनाचे श्लोक समूह चिंतन' या पुस्तकातील 'श्लोकांच्या अर्थाचे वाचन' या उपक्रमाची सांगता सज्जनगडाला भेट देऊन झाली. देवीच्या नवरात्रात स्वत:ला समजलेला पाच प्रबोधिनीच्या पद्यांचा अर्थ सदस्यांनी लिहिला. वर्षभरात ९५९२ विद्यार्थ्यापर्यंत 'शालेय प्रतिज्ञेचा अर्थ व इतिहास' पोहोचवला.

५. **ओळख स्पर्शाची :** २००३ विद्यार्थ्यांसाठी सात शाळांतून कार्यशाळा घेतल्या. तीन ठिकाणी मिळून २७३ पालकांसाठी कार्यशाळा घेतल्या. राजगुरूनगर, वेल्हा, वाजेघर या तीन ठिकाणी प्रशिक्षक प्रशिक्षणे घेतली. यातून १०४ प्रशिक्षक तयार झाले. विशेष म्हणजे देवगडला पालक, संस्था सदस्य व विद्यार्थ्यांसाठी प्रथमच प्रशिक्षण झाले. त्याला खूपच उत्साहपूर्ण प्रतिसाद मिळाले.

६. **मासिक बैठक :** गेली २४ वर्षं हा उपक्रम चालू आहे. उद्दिष्टांवर आधारित व्याख्याने, चर्चा, कार्यशाळा इत्यादीचे आयोजन यामध्ये केले जाते. वर्षभरात मासिक बैठकीच्या उद्दिष्टांना धरून नऊ बैठकी झाल्या. त्यापैकी सहा प्रत्यक्ष (सरासरी उपस्थिती ५०) आणि तीन दूरस्थ (सरासरी उपस्थिती १००) झाल्या. विविध सामाजिक, पर्यावरणीय, सांस्कृतिक विषय बैठकींमध्ये हाताळले गेले.

७. **समतोल गट :** दि. १ एप्रिल २३ ते मार्च २४ पर्यंत प्रकाशित झालेल्या सहा अंकांचे सूत्रविषय पुढीलप्रमाणे होते - १. प्रेरणा, २. महिलाविषयक कायदे - एक अभ्यास, ३. रंग मनाचे, ४. दिवाळी अंक- उंच तिचा झोका, ५. संकीर्ण, ६. परिपक्व ज्येष्ठत्व. यापैकी 'प्रेरणा' हा अंक औंध आणि पौड रस्ता संवादिनी सदस्यांनी काढला. दिवाळी अंकाचे प्रकाशन सुप्रसिद्ध लेखिका, कवयित्री डॉ. अरूणा ढेरे यांच्या हस्ते झाले. दि. २ डिसेंबर २३ ते मार्च २४ चे अंक गटाच्या सहभागाने 'जोडीकार्य' करून जबाबदारीने पूर्ण केले.

आकाशवाणीच्या पुणे केंद्रावर 'संवादिनीची वाटचाल' याबद्दल दि. ६ मार्च रोजी वनिता मंडळ कार्यक्रमात संवादिनी समन्वयक वाच. वीणा लिमये व साधना सेठिया यांची गौरी लागू यांनी घेतलेली मुलाखत प्रसारित करण्यात आली. अतिशय नेटक्या, मुद्देसूद आणि प्रभावीपणे आवाहन करणाऱ्या या संवादातून आकाशवाणीच्या माध्यमातून हजारो लोकांपर्यंत संवादिनी पोहोचवली.

## ❖ पुणे (औंध संवादिनी) ❖

फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात मुरकुटे शाळेमध्ये इ. ५वीच्या वर्गासाठी संवाद कौशल्य याविषयी दोन मेळावे घेतले. यामध्ये पद्ये शिकवणे, संवादाचे प्रकार, त्याचे कौशल्य कसे मिळवायचे?, संवादाचे विषय देऊन सादरीकरण करायला सांगणे, मुलाखतीचे तंत्र, मौन संवाद म्हणजे काय असे सांगून, मौन संवाद लिहायला सांगणे इ. सत्रे झाली. मूक संवादात शारीरिक हालचाल आणि चेहऱ्यावरचे भाव कसे व्यक्त होतात याविषयीही माहिती दिली. फ्रेम गेम आणि संवादाशिवाय नाटिकांचे मूक सादरीकरण करायला सांगितले.

## ❖ पुणे (पौड रस्ता संवादिनी) ❖

१. **मासिक बैठक :** या वर्षीच्या मासिक बैठकीत विविध सामाजिक विषय हाताळले गेले. उदा. सावरकर विचार, प्रबोधिनीचे विविध क्षेत्रातील कार्य, समर्थ रामदास; गुरू म्हणून केलेले कार्य व प्रबोधन, कृष्ण शिष्टाई, राष्ट्र सेवा समितीच्या मावशी केळकरांचे कार्य, महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर मला भावलेले स्त्री व्यक्तिमत्त्व असे विषय झाले. (उपस्थिती २२ ते २५)

२. **गप्पाकट्टा :** सदस्यांना मनातल्या भावना आणि विचार व्यक्त करायला असलेले हे व्यासपीठ आहे. यात नाही कशी म्हणू, द केरला स्टोरी, कौतुक हवे हवेसे, माझी सर्वात पहिली मैत्रीण मला आठवते का?, देवीच्या विविध रूपांपैकी एका रूपावर बोलणे, मला सगळ्यांना सांगाविशी वाटते अशी दिवाळीतली गोष्ट, मी माझ्या रागावर नियंत्रण कसे मिळवते, माझ्या मनातील राम, चला माहेरी जाऊया असे विषय होते.

३. **मेळावे :** नवरात्रामध्ये भोंडला आणि जानेवारीत संक्रांत मेळावा झाला.

४. **कौशल्य प्रशिक्षण तासिका :** वर्षभरात महेश विद्यालयातील इ. ६वीच्या मुले-मुली मिळून एकूण ५३ विद्यार्थ्यांसाठी कौशल्य आधारित २८ तासिका झाल्या. यामध्ये निरीक्षण, आकलन, स्मरण, संवाद, वाचन, लेखन हे विषय घेतले. सर्व तासिकांमध्ये मुलांच्या नोंदी केल्या. विशेष म्हणजे प्रत्येक तासिकेला वर्गशिक्षिका व भाषेच्या शिक्षिका उपस्थित होत्या. या तासिका आठ कार्यकर्त्यांनी घेतल्या. ग. रा. पालकर शाळेत इ. ६वीच्या सेमी इंग्रजी वर्गातील १५ मुली आणि

२४ मुले अशा ३९ विद्यार्थ्यांसाठी कौशल्यांच्या तासिका व गप्पा गोष्टी फुलोरा, निरीक्षण स्मरण खेळ, अशा एकूण २७ तासिका नऊ कार्यकर्त्यांनी घेतल्या.

**पौडरस्ता संवादिनी आणि औंध संवादिनीचे सामायिक उपक्रम**

१. **निवासी अभ्यास शिबिर :** नोव्हेंबर महिन्यात दहा कार्यकर्त्यांचे वाई येथे दोन दिवसीय निवासी अभ्यास शिबिर झाले. यात सर्वसाधारण प्रबोधिनीपण आणि कार्यकर्ते बनूया पुस्तिकांचे गटश: वाचन करून मांडणी झाली.

२. **प्रशिक्षण वर्ग :** शाळांमध्ये तास घेण्यासाठी पूरक म्हणून लेखन आणि वाचन कौशल्य प्रशिक्षणे घेतली. वाच. भाग्यश्रीताई हर्षे यांनी ही प्रशिक्षणे घेतली. वंदनाताई कामठे आणि कल्पेशदादा कोठाळे यांनी समूहगुण प्रशिक्षणाची दोन सत्रे घेतली.

३. **संस्था भेटी :** या वर्षी ज्ञान प्रबोधिनी, निगडी येथे दोन्ही गटांच्या मिळून सतरा कार्यकर्त्या गेल्या होत्या. आणि झपूर्झा या संग्रहालयाला अठरा सदस्यांनी भेट देऊन कला आणि संस्कृती याबद्दल माहिती करून घेतली.

४. **एकादशी भजन आणि आषाढी वारी :** दरवर्षी प्रमाणे आषाढी एकादशीला निरूपणासह भजन झाले. तर वारीचा आनंद घेण्यासाठी युवती विभाग आणि दोन संवादिनी गट अशा ३५ जणी हडपसर ते दिवेघाट वारी बरोबर चालत गेल्या होत्या.

५. **वाचन गट :** साप्ताहिक दूरस्थ वाचन गटात या वर्षी आ. गिरीशराव बापट यांनी लिहिलेल्या अभंग निरूपणाचे वाचन आणि त्या अनुषंगाने आलेले अनुभव व न समजलेल्या गोष्टींवर चर्चा झाली.

## ❖ शिरूर संवादिनी ❖

१. दि. १९ जुलै २३ रोजी शिरूर येथे संचालक वाच. गिरीशराव बापट यांची केंद्र भेट झाली. संवादिनी शिरूर, मध्यवर्ती संवादिनीचे संपर्क केंद्र म्हणून कामात सहभागी असेल, असे यावेळी संचालकांनी सांगितले.

२. 'अधिक महिना-अधिक वाचन' या उपक्रमात प्रबोधिनी प्रकाशित २७ पुस्तकांचे वाचन केले. मासिक बैठकीमध्ये शिरूर संवादिनीच्या सदस्यांनी स्वतः रचलेली भारूडे सादर केली. स्त्री-शक्ती प्रबोधनच्या पुणे येथील मेळाव्यामध्ये 'मी सरपंच झाले' याचे सादरीकरण अलकाताई रुपनर यांनी केले.

३. दि. ७ ते १४ ऑगस्ट या सप्ताहात 'भारत माझा देश आहे' या प्रतिज्ञेचा अर्थ ६७०० मुलांपर्यंत पोहोचवला.

४. पाच शाळांमध्ये उमलत्या वयाशी जुळवून घेताना याची सत्रे झाली. आठ शाळांमध्ये 'ओळख स्पर्शाची' हा उपक्रम २४७१ विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवला.

५. तरुणाईची आव्हाने, सुजाण पालकत्व, किशोरवयीन मुलींसाठी मासिक पाळी मार्गदर्शन हे विषय कार्यशाळांमधून पोहोचवले.

## ❖ खेड राजगुरूनगर चैतन्य संवादिनी ❖

डॉ. माणिकताई बिचकर यांच्या पुढाकाराने मासिक बैठक स्वरूपात दि. १६ जून २२ पासून 'चैतन्य संवादिनी'ची सुरुवात झाली. शिक्षित आणि अल्प शिक्षित असा मिश्र गट इथे चांगला बांधला गेला आहे. या वर्षी काही उपक्रम सुरू झाले.

१. चैतन्य संस्थेच्या कार्याबद्दल जास्तीची माहिती व त्यातून प्रेरणा मिळावी, म्हणून सुधाताई कोठारी यांची मुलाखत झाली.

२. मातृभूमिपूजन ठिकठिकाणी पोहोचावे असा गटाचा मानस होता म्हणून प्रशिक्षण घेतल्यानंतर ६९७ विद्यार्थ्यांबरोबर आणि तीन संस्था/ठिकाणी १०५ लोकांबरोबर मातृभूमिपूजन केले.

३. 'ओळख स्पर्शाची' हा विषय अधिक जणांपर्यंत पोहोचावा या उद्देशाने या कार्यशाळेचे प्रशिक्षण घेतले.

४. संवादिनीमध्ये महिला येत्या राहाव्यात, या हेतूने दि. ३१ ऑगस्ट २३ रोजी बचत गट सुरू केला.

५. इतर काही महिलांबरोबर गटकार्य करता येईल का? आणि त्यांच्या काही नवीन कल्पनांची देवाण-घेवाण या उद्देशाने चैतन्य संवादिनी आणि इतर महिला मंडळे अशी चर्चा घेतली.

## ❖ भाईंदर संवादिनी ❖

१. मासिक बैठकीत कविता वाचन, नवरात्रात भोंडला, दि. ८ मार्चच्या निमित्ताने मला भावलेली व्यक्तिरेखा याचे वेशभूषेसह सादरीकरण व गटचर्चा झाल्या.

२. आधुनिक नवरात्रासाठी केलेल्या अभ्यासात आरक्षणामुळे मिळालेल्या संधीचा उपयोग यावर तीन सदस्यांनी एक आमदार, दोन नगरसेविका आणि एका पंचायत सदस्याची मुलाखत घेतली आणि मांडणी केली.

३. 'व्यक्तीविकासासाठी विद्याव्रत' या पुस्तकाचा अभ्यास गट करत होता. प्रत्यक्ष कामाचा अनुभव यावा, या विचारातून मेळावे घ्यायचे ठरवले. आंबेडकर नगर मधील 'उत्कर्ष क्लासेस' या उर्मिला चौधरी यांच्या शिकवणी वर्गात वस्ती विभागातून येणाऱ्या इ. ५वी ते ७वीच्या पंधरा विद्यार्थ्यांसाठी डिसें. २३ ते मार्च २४ या कालावधीत असे चार मेळावे घेतले. प्रत्येक मेळाव्याला साधारण पंधरा मुले आणि चार ते सहा ताया उपस्थित होत्या. या मेळाव्यांत बुद्धीला चालना देणारे आणि शारीरिक क्षमता वाढवणारे खेळ आणि गटचर्चा यात मुलांचा उत्साहाचा सहभाग होता. मेळाव्यांचा या वर्षीचा शेवट म्हणून मुलांची सहल जंजिरा किल्ला, नरहरी चिमाजी अप्पा उद्यान उत्तन पाली येथे नेली. मुलांना विविध किल्ल्यांची माहिती सांगितली.



# १५. नागरी वस्ती अभ्यासगट

पुण्यातील विविध वस्त्यांबरोबर, सामाजिक, आर्थिक, दृष्टीने मागासलेल्या परिसरातील विविध वयोगटातील स्त्री-पुरुषांबरोबर विभाग काम करतो. या वर्षी १७ ठिकाणी वस्तीभेटी केल्या गेल्या व निवडक ५८९ कुटुंबाचे सर्वेक्षण करण्यात आले. वस्त्यांजवळील तीन शाळा व वस्त्यांमध्ये केलेल्या कामाचे वृत्त पुढे दिले आहे.

### ❖ महिला व युवती उपक्रम ❖

**एकूण २९० सक्रीय सहभागी**

नागरी वस्ती अभ्यासगट विभागातील युवतींच्या महिला पालकांच्या पुढाकाराने सात वर्षांपूर्वी 'सावित्री दल' या नावाने महिलांच्या कामाची सुरुवात झाली. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विविध उपक्रम घेण्यात आले.

१. **सांस्कृतिक :** दि. १८ जून २३ ला १७ महिलांची वर्षारंभ उपासना झाली. सावित्री दल व ज्ञानगंगा भजनी मंडळ, खेड शिवापूर या गटांच्या रामनवमी भजनोपासना कार्यक्रमात ६० महिला व युवती उपस्थित होत्या. आषाढी एकादशी भजनोपासनेच्या कार्यक्रमात ५० महिला सहभागी झाल्या होत्या. अधिक श्रावण मासानिमित्त घेतलेल्या कार्यक्रमात कल्याणीताई देवचके यांनी अधिकमासाची माहिती सांगून प्रार्थना, पद्य, अथर्वशीर्ष, मंगळागौरीचे खेळ घेतले व खाऊ वाटप झाला. दि. २७ ऑगस्ट २३ला एकादशीनिमित्त मातृभूमिपूजन, अभंग व गायन उपक्रमात १८ महिला उपस्थित होत्या. हरितालिका व गणेश प्रतिष्ठापना प्रशिक्षणात कल्याणीताई देवचके आणि प्रमिलाताई बनसोडे या दोघीजणी सहभागी झाल्या होत्या.

दि. २२ ऑक्टो. २३ला सावित्री दलातर्फे नवरात्रोत्सवात २९ ठिकाणांहून आलेल्या दहा वर्षांपुढील एकूण ११८ मुली व महिलांची स्त्री-शक्ती प्रबोधन, ग्रामीणच्या तृप्तीताई कुलकर्णी व चार सहकारी यांनी 'हिमोग्लोबिनची' तपासणी केली. सर्वांचे हिमोग्लोबिन पुरेसे चांगले आले. उपस्थितांना आरोग्याबाबत मार्गदर्शन करताना सांगितले की, आपल्या आहारात पालेभाज्या, फळे, पोषक आहार, योग्य व पुरेसा व्यायाम तसेच आरामाची आवश्यकता आहे. हिमोग्लोबिन कमी असलेल्यांना औषधे व सकस आहार दिला. तपासणी चालू असताना किशोरी व महिलांचे विविध खेळ, 'श्री शारदेची उपासना', 'श्रीसूक्त पठण' देखील झाले. सावित्री दलाच्या महिलांनी देवीची गाणी तर युवतींनी नृत्ये सादर केली. सर्वांनी भोंडला, फुगड्या, गरबा असे खेळ खेळून नंतर खिरापतीचा आस्वाद घेतला आणि प्रार्थनेने सांगता झाली.

२. **आधुनिक नवरात्र :** दि. ३ जानेवारीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले तर दि. १२ जानेवारीला राजमाता जिजाबाई यांची जयंती असते. याचे औचित्य साधून २०१९ पासून विभागात आधुनिक नवरात्र साजरे केले जाऊ लागले. या

वर्षी दि. ७ जानेवारी २४ला 'माझी गोष्ट काल-आज-उद्या' या संकल्पनेवर आधारित कार्यक्रम झाला. विभागप्रमुख मा. हर्षाताई किर्वे यांनी प्रास्ताविक केले. ज्ञान प्रबोधिनीत यायच्या आधी आणि आल्यानंतर माझ्यामध्ये झालेले बदल, तसेच भविष्यातील स्वप्ने, याबद्दल आपल्या मैत्रिणींनी मनमोकळेपणाने बोलावे, अशी अपेक्षा व्यक्त केली गेली. स्त्री-शक्ती प्रबोधन कार्यदिशेच्या सहसचिव सौ. वंदना कामठे यांनी त्यांची गोष्ट सांगताना सांगितले की, ''संयम ठेवा आणि मिळालेली योग्य सुवर्णसंधी सोडू नका. प्रबोधिनीतून मिळालेले संस्कार पुढच्या पिढीला देऊन त्यांच्यात बदल घडविणे हेही आपले यशच आहे''. त्यानंतर १८ महिलांनी स्वतःची गोष्ट मोकळेपणाने सांगितली. ॲड. प्रार्थनाताई सदावर्ते यांनी समारोपात मानसिक स्वास्थ्य संवर्धनाबाबत मार्गदर्शन केले. प्रत्येकीची गोष्ट समाधानाची कशी होईल, यासाठी एकत्र प्रयत्न करायचे ठरले. या कार्यक्रमामध्ये निवडक ३३ महिला उपस्थित होत्या.

३. **स्वयंरोजगार :** दि. १८ फेब्रुवारी २४ रोजी प्रबोधिनी प्रशालेची प्रवेश परीक्षा असल्याने पाच महिलांनी सकाळी ८ ते ६ या वेळेत स. प. महाविद्यालयात पदार्थांचे स्टॉल लावले होते.

### ❖ बालगट, किशोरगट, कुमारगट ❖
### एकूण ८६१ मुले

काही वस्त्या व प्रबोधिनीमध्ये 'सर्वांगीण विकास सर्वांसाठी' या संकल्पनेवर आधारित सर्व वयोगटातील मुला-मुलींसाठी वर्षभर साप्ताहिक दले, शैक्षणिक प्रकल्प, व्यक्तिमत्त्व विकास तासिका इ. कामे झाली.

१. **साप्ताहिक दल :** वडारवाडी, जोशीवाडा, सातचाळ या ठिकाणी सहभागी झालेल्या ७० मुला-मुलींसाठी विविध खेळ, गप्पा-गोष्टी, गाणी, सहल व अभ्यासपूरक सत्रे घेतली.

२. **शैक्षणिक प्रकल्प :** 'आनंदी शिक्षण' हा नागर वस्ती अभ्यासगट व शैक्षणिक साधन केंद्र यांचा संयुक्त प्रकल्प साई सर्व्हिसच्या अर्थसाहाय्याने कोरोना काळात सुरू झाला. मार्च २४ मध्ये प्रकल्पाला दोन वर्षे पूर्ण झाली. वस्त्यांमध्ये दर शनिवारी-रविवारी दोन तास १०० मुलांसाठी आनंदी शिक्षण प्रकल्प झाला. वस्तीतील इ. ३री ते ४थी मधील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साधन केंद्राने अभ्यासक्रम बनवून स्थानिक ताईबरोबर खेळ, गप्पा, गोष्टी, गाणी अभ्यासाच्या चित्रफिती दाखवून मुलांकडून प्रश्नपत्रिका सोडवून घेतल्या.

इनटॉक्स कंपनीच्या अर्थसाहाय्यातून 'बालविकास प्रकल्पा'च्या अंतर्गत काही वस्त्यांमध्ये बालविकास केंद्रे सुरू झाली. केंद्रामध्ये इ. १ली ते इ. ९वीच्या ३५० मुलांची नोंदणी झाली. केंद्रातील ताईंसाठी डिसेंबर महिन्यात पाच दिवस दोन तास प्रशिक्षण झाले. 'व्यक्तिमत्त्व विकास सत्रे' या नावाने सुधाताई रहाणे व प्रा. हर्षाताई यांनी काही कृतिसत्रे, पद्य, प्रार्थना, गाणी शिकवली. मुख्यतः लहान मुलांशी संवाद साधत त्यांच्या विकासाला मदत कशी करायची, याबाबत मार्गदर्शन केले. वस्त्यांमधील स्थानिक ताईंना प्रशिक्षण देऊन प्रकल्पाच्या विशिष्ट कृतींसाठी २१९ मुलांची निवड केली. १) तळजाई पायथा, २) मुकुंदनगर, ३) लक्ष्मीनगर-आंबेडकर वसाहत ४) जनता वसाहत, ५) धायरी, ६) माळवाडी, ७) कर्वेनगर, ८) ठाकरे वसाहत, ९) दत्तवाडी, १०) ओटा वसाहत, ११) मातंग वस्ती, १२) वडारवाडी, १३) विश्रांतवाडी, १४) वडगाव शेरी, १५) कलवड, १६) फुरसुंगी या १६ ठिकाणी केंद्रे झाली. या प्रकल्पात समन्वयक म्हणून सारिकाताई शिवलेकर यांनी काम पाहिले.

**प्रशिक्षणे :** प्रज्ञा मानस संशोधिकेतर्फे क्षमता विकसन सत्रात सुजाताताई होनप आणि प्रसन्नाताई अलोने यांनी एकूण १२ कृतींचे प्रशिक्षण घेतले. त्यामधून मुलांचे भावविश्व समजून घेऊन ते कसे फुलवायचे, क्षमतामापन, चेकलिस्ट भरणे याविषयी त्यांनी सांगितले. प्रशिक्षण कालावधीमध्ये १८ प्रशिक्षार्थी सहभागी होत्या.

दि. २० जाने. व १० मार्च रोजी अस्मिताताई अत्रे, नीलिमाताई भिडे आणि अश्विनीताई लेले यांनी चित्रकला प्रशिक्षणात निसर्गचित्र कसे काढावे, जलरंग कसे भरावेत हे शिकवले. सहा केंद्रातील निवडक ६२ मुले- मुली व १५ ताई या सत्रात सहभागी झाल्या होत्या.

दि. २८ जाने. २४ रोजी रांगोळी प्रशिक्षण सत्रात बालविकास केंद्रामधील इ. ४थी ते ७वी च्या २२ मुले व आठ ताईंना सुधाताईंनी बिंदू, उभ्या-आडव्या रेघा, विविध सांस्कृतिक चिन्हे वापरून रांगोळीची प्रात्यक्षिके दाखविली.

दि. ११ फेब्रुवारी व २५ फेब्रुवारी या दोन दिवशी अभ्यास कौशल्य सत्रात ४१ मुले आणि सात ताई उपस्थित होत्या. शैक्षणिक उपक्रम संशोधिकेतून अंजलीताई आणि शुभंकरदादा हे प्रशिक्षक आले होते. त्यांनी वाचन, लेखन, श्रवण यासंबंधित अभ्यास कौशल्ये घेतली. मुलांनी हसत खेळत अभ्यास केला.

**सहली :** दि. १७ ते ३१ मार्च दरम्यान बालविकास केंद्रांच्या ताईंनी मुलांच्या सहली काढल्या. बागेमध्ये खेळ, विविध गुणदर्शन, संग्रहालय पाहाणे इ. कार्यक्रम या सहलींमध्ये योजले होते.

३. **व्यक्तिमत्त्व विकास – वस्त्यांजवळील शाळांमधील उपक्रम :** मुलांसाठी 'चांगल्या सवयी, चांगला माणूस' ही विद्याव्रतावर आधारित संकल्पना वापरून विश्वकर्मा विद्यालय, बिबवेवाडी व सुंदराबाई राठी विद्यालय, मित्रमंडळ चौक या दोन शाळांमध्ये मुलांसाठी कार्यक्रम घेतले गेले. या दोन्ही शाळांमध्ये

आसपासच्या वस्तीभागातील अनेक मुले-मुली शिकत आहेत. विश्वकर्मा विद्यालयात इ. ७वीच्या १२३ मुलामुलींसाठी तीन मेळावे व पाच दिवसांचे शिबिर झाले. युक्ताहार विहार, इंद्रिय संयमन, दैनंदिन उपासना, स्वाध्याय प्रवचन, सद्‌गुरू सेवा, राष्ट्रअर्चना असे विषय यात घेण्यात आले. व्याख्यान, गटचर्चा, नाटुकली, पोस्टर बनविणे इ. माध्यमे वापरली गेली. बर्ची नृत्य शिकविले. शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक, सेवक तसेच प्रबोधिनीतील दादा व विभागातील ताई मिळून २० जणांनी हे गटकार्य करण्याचा अनुभव घेतला.

४. **बालजत्रा :** दि. २३ फेब्रुवारी २४ या दिवशी नागरी वस्ती अभ्यासगट आणि शैक्षणिक साधन केंद्र यांनी संयुक्तपणे कर्मवीर भाऊराव हिरे हायस्कूल, लक्ष्मीनगर येथे बालजत्रा घेतली. शाळेतील इ. ५वी ते इ. ८वी तील १०८ मुलांसाठी भाषा व गणित या विषयांचे मूल्यमापन केले. यासाठी शाळेतीलच इ. ९वी ची ४० मुले-मुली व प्रबोधिनीतील १० ताईंना प्रशिक्षण दिले. जत्रेतील स्टॉलवरील खाऊ व खेळणी हे मुलांचे मुख्य आकर्षण होते. त्यामुळे प्रश्नांची उत्तरे देताना मुलांना उत्साह, आनंद वाटत होता. शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, सेवक यांच्या सहभागाने बालजत्रा यशस्वी झाली.

**प्रतिसादासाठी जाहीर आवाहन**

सर्व देणगीदार, स्वयंसेवक, जेष्ठ मार्गदर्शक यांच्या सहकार्याने वरील सर्व उपक्रम उत्तमप्रकारे करता आले. त्याबद्दल सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद. हे काम अधिक चांगल्या प्रकारे पुढेही चालू राहण्यासाठी आपण प्रत्यक्ष सहभागी होऊ शकता. तसेच आर्थिक मदतही करू शकता. (संपर्क क्र. : ०२०२४२०७२२१, ९४०३८५२७७४)

## १६. जिजामाता दल

वय वर्षे ६० पेक्षा अधिक असलेल्या महिला या दलाच्या अंतर्गत एकत्र जमतात. यामध्ये गटाने विविध विषयांचा अभ्यास व चर्चा करणे, प्रबोधिनीमधील तसेच अन्यही महत्त्वाच्या विषयांबाबत व्याख्यांनाची योजना असे कार्यक्रम होतात. दलाची वर्षारंभ, वर्षान्त उपासना व वार्षिक संचालक भेट देखील नियमितपणे होते.

१. ज्ञान प्रबोधिनीचे पथदर्शी यांवर व्याख्याने योजली होती. योगी अरविंद यांचे व्याख्यान गेल्या वर्षी झाले. समर्थ रामदास, महर्षी दयानंद आणि स्वामी विवेकानंद यांवर या वर्षी व्याख्याने झाली.
२. मनाचे श्लोक सर्वच वयातील लोकांच्या मनाला उभारी आणि आधार देणारे आहेत. वयाच्या साठीनंतर त्यातील कुठले जास्त उपयोगी आहेत, असे शोधण्यासाठी मा. उषाताई खिरे यांनी सांगितले होते. त्याप्रमाणे सदस्यांनी २५ श्लोक शोधले. यावर बोलायला वाच. मनीषाताई शेटे आल्या होत्या. मा. अदिती देवधर या प्लास्टिकचा आपल्या जीवनातील वापर कसा कमी करता येईल आणि पर्यावरण यावर माहिती देण्यास आल्या होत्या. डॉ. सीमा दाबक यांनी महाभारतातील स्त्रिया यावर सलग चार व्याख्याने दिली. सौ. सुवर्णाताई गोखले यांच्या अर्थसखी पुस्तकावर गटात चर्चा झाली. त्यावर बोलायला ताई स्वतःही आल्या होत्या. वाच. अनघाताई लवळेकर यांनी दलावर त्यांचा आत्तापर्यंतचा प्रवास आणि अनुभव सांगितले.
३. गोकुळाष्टमी, नवरात्र हे सण साजरे करण्यात आले. नवरात्रीला एक-एक विषय देऊन सदस्यांना उत्स्फूर्तपणे विचार मांडण्यास सांगितले. सर्व देवींची स्तोत्रे म्हटली. संक्रांतीचे गुप्तदान गोळा केले आणि ते नागरी वस्ती अभ्यासगटाला देण्यात आले.
४. प्रकल्पाचा विषय एकादशी असा होता. प्रत्येकीला एक महिना देऊन त्यातील दोन एकादशींवर माहिती लिहिण्यास सांगितली. विरक्ती आणि वैराग्य यातील फरक जाणून त्यावर लेखन केले.
५. दलाची वार्षिक संचालक भेट झाली. आ. संचालकांनी प्रबोधिनीत सध्या काय चालू आहे असे सांगितले. मुलांसाठी जे उपक्रम शाळेमध्ये केले जातात ते दिल्लीतील शाळांतसुद्धा करावेत असा दिल्ली सरकारचा मानस आहे, हे ऐकून खूप छान वाटले.








# १७. युवक विभाग

मागील वर्षी पुण्यातील विविध भागांत शालेय मुलांसाठी १३ आणि महाविद्यालयीन युवकांसाठी आठ दले चालत होती. क्रीडा आणि विज्ञान ही माध्यमे वापरून ५००+ युवक वर्षभर जमत होते. सहभागी युवकांचे व्यक्तिमत्त्व विकसन, समूहगुणविकसन, कृतिशील देशभक्ती शिकणे यासाठी या दलांवर एकूण १२०+ युवकांनी प्रतोद, मार्गदर्शक, दल-प्रतिनिधी अशा जबाबदाऱ्या घेऊन काम केले. महत्त्वाचे म्हणजे गुढीपाडवा व दसऱ्याच्या दिवशी प्रतिज्ञाग्रहणाचा कार्यक्रम झाला.

### ❖ महाविद्यालयीन दले ❖

१. **तपशील :** पाच क्रीडा दले आणि तीन विज्ञान दले अशी एकूण आठ महाविद्यालयीन दले वर्षभर साप्ताहिक वारंवारितेने भरत होती. दलांवर नियमित खेळ/ विज्ञान अभ्यास /चर्चा, प्रासंगिके, वैचारिके, पद्य झाली. दलांनी गिर्यारोहण सहली, श्रमदान, विषय परिचय शिबिरे इ. प्रासंगिक उपक्रम सुद्धा आयोजित केले. सर्व दलांवर मिळून १५०-१६५ युवकांची सरासरी उपस्थिती दर सप्ताहात होती. क्रीडा दलांवर फुटबॉल, कबड्डी, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल हे नियमित खेळ तसेच दुर्गभ्रमण, बरची-वाद्य प्रशिक्षण, मिरवणुका, आकाश कंदील विक्री असे प्रासंगिक उपक्रम झाले.

२. **विज्ञान दल :** जुलै महिन्यात सहकारनगर मधील युवक विज्ञान दलाच्या पुढाकाराने लेडी रमाबाई सभागृह, स. प. महाविद्यालय इथे 'विज्ञान चित्रपट महोत्सव' भरवण्यात आला. या महोत्सवाला २५० प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. १५ युवक महोत्सवाच्या आयोजनात सहभागी होते. Sci-Fi चित्रपट, माहितीपट, शास्त्रज्ञांची व्याख्याने, विज्ञानकथा अभिवाचन अशी सत्रे प्रेक्षकांना अनुभवता आली. महोत्सवाचे उद्घाटन अभिनेते, दिग्दर्शक श्री. गिरीश कुलकर्णी यांच्या हस्ते झाले, तर समारोपाला शास्त्रज्ञ वाच. मिलिंद वाटवे उपस्थित होते. गणेशोत्सवाच्या दरम्यान सहा दिवस तीन महाविद्यालयीन विज्ञान दलांनी मिळून सिव्हिल कोर्ट मेट्रो स्थानक, गणेश मंडळे व गृहरचना संस्था अशा नऊ ठिकाणी प्रदर्शने भरवली. या आयोजनात ४१ युवक सहभागी होते. मेट्रो स्थानकात प्रदर्शन भरवण्यात पुणे मेट्रो महामंडळाचे मोलाचे सहकार्य मिळाले.

३. **प्रशिक्षणे :** Rational Emotive Behavioural Therapy (REBT) व Critical Thinking या दोन महत्त्वाच्या विषयांवर मार्च २४ मध्ये कार्यशाळा झाल्या. REBT कार्यशाळेला ५८ व Critical Thinking कार्यशाळेला ६१ युवक उपस्थित होते.

### ❖ शालेय दले ❖

१. **तपशील :** दहा क्रीडा दले आणि तीन विज्ञान दले अशी एकूण तेरा शालेय दले वर्षभर दैनंदिन किंवा साप्ताहिक वारंवारितेने

| क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| १. | भाग | सदाशिव पेठ, शुक्रवार पेठ, बिबवेवाडी, सहकारनगर, कर्वेनगर, कोथरुड, सिंहगड रस्ता, गोखलेनगर |
| २. | उपस्थिती | किशोर : २००+, कुमार : १५०+, युवक : १५०+ |
| ३. | मार्गदर्शक संख्या | ८५ शालेय मार्गदर्शक + ४५ महाविद्यालयीन मार्गदर्शक |
| ४. | दुर्गभ्रमण | विसापूर, केंजळगड-रायरेश्वर, लोहगड, सिंहगड, तिकोना, विसापूर, हरिश्चंद्रगड, जीवधन, पांडवगड, राजगड, कात्रज ते सिंहगड, चंदन-वंदन, भोरगिरी ते भीमाशंकर |
| ५. | श्रमदान | मालेगाव - धनगर वस्ती, मुळशी व खोपडेवाडी, वेल्हे इथे २८ युवकांनी दुष्काळ निवारणासाठी श्रमदान केले. |
| ६. | खेळ | डॉजबॉल, फुटबॉल, व्हॉलीबॉल, बेसबॉल, स्टंपबॉल, चौरसधावा, दशहस्तांतरण, कबड्डी, नौकायुद्ध, लंगडी, मल्लखांब, खो-खो |
| ७. | विशेष उपक्रम | विज्ञान चित्रपट महोत्सव, मातृभूमीपूजन, रक्तदान शिबिर, गुरुद्वारा भेट, एकत्र सिनेमा पाहणे, सामुहिक व्यायाम, अभ्यास शिबिर |
| ८. | प्रासंगिक विषय | भारत-पाक युद्धे, भोपाळ दुर्घटना, स्वीकारशील स्वदेशी |
| ९. | चरीत्र कथन | धर्मवीर संभाजी महाराज, महर्षी दयानंद, गुरु गोविंदसिंह, समर्थ रामदास, स्वामी विवेकानंद, छत्रपती शिवाजी महाराज, योगी अरविंद |
| १०. | मदतकार्य | मणिपूर मधल्या नागरिकांसाठी हिवाळी कपडे गोळा करण्याच्या कामात सहभाग |

भरत होती. दलांवर नियमित खेळ/ विज्ञान अभ्यास प्रयोग, प्रासंगिके, वैचारिके, पद्य झाली. मातृभूमिपूजन, मेळावे, गिर्यारोहण सहली, विषय परिचय शिबिरे इ. प्रासंगिक उपक्रम सुद्धा दलांनी आयोजित केले. सर्व दलांवर मिळून ३५०-३७० मुलांची अधिक ३०-३५ मार्गदर्शकांची सरासरी उपस्थिती दर सप्ताहात होती.

२. **सहकारनगर भाग :** सॅम माणेकशॉ दलाने या वर्षी विश्वकर्मा विद्यालयात नागरी वस्ती अभ्यासगटाच्या साहाय्याने १०० मुलांचे विद्याव्रत शिबिर घेतले. त्यातल्याच ५० मुलांनी नियमित बर्ची सराव करून गणेशोत्सवात विविध प्रात्यक्षिके , मिरवणुकांमध्ये सहभाग घेतला. अनेक वर्षांनी दलाच्याच भागात स्टॉलवर कंदिलविक्री तसेच घरपोच पणतीविक्री झाली. सहा मार्गदर्शक व १५ मुले या विक्री उपक्रमात सहभागी होते. छत्रपती संभाजी दलाने न्यू इंग्लिश शाळेत बर्चीचा गट बसवला. संभाजी दलाचे आजी-माजी युवक मार्गदर्शक असा ७०-८० जणांचा मेळावा झाला. छत्रपती शिवाजी महाराज दलावर इ. १०वीच्या मुलांसाठी वर्षभर अभ्यासिका झाली. वर्षभर सातत्याने इतिहास विषयक प्रासंगिके दलावर झाली. या वर्षी पहिल्यांदाच झेंडूची फुले विक्री हा उपक्रम घेतला. आंतरदलीय सामन्यात गोल खो-खोच्या सामन्यांमध्ये दलाने अंतिम फेरीत धडक मारली.

३. **प्रशालेय दले :** स्वातंत्र्यवीर सावरकर दलावर पथक रचनेत एकूण पाच साहस सहली झाल्या. वर्षाच्या सुरुवातीला वारी मध्ये सहभाग झाला. नेतृत्वगुण व समूहगुण विकसनासाठी सलग दोन महिने पथक रचनेत दल झाले. गणेशोत्सवात इ. ५वीच्या मुलांनी २५०० पेक्षा जास्त घरांमध्ये जाऊन सार्थ अथर्वशीर्ष पठण केले. इ. ६वी आणि ७वीच्या मुलांनी लेझीम व संचलनाचा गट बसवला होता. लेझीमची तीन प्रात्यक्षिके व एक महाप्रात्यक्षिक झाले. दलाचे तीन दिवसांचे हिवाळी क्रीडा शिबिर झाले. शिबिरामध्ये इतरवेळी खेळले जात नाहीत असे खेळ समाविष्ट होते. उदा. विटी दांडू, भोवरा, रस्सी खेच, इ. इ. ७वीसाठी दोन दिवसांचे शहर परिचय शिबिर झाले. खेळशः रचनेत जलतरण, खो-खो, मल्लखांब, दशहस्तांतरण, दंडू गोळा असे खेळ शिकले. वर्ष संपताना मुलांनी आंतरदलीय सामन्यात भाग घेतला. एका खेळात विजेतेपद तसेच एका खेळात उपविजेतेपद मिळवले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलावर रु. ९.५ लक्षांचा विक्री उपक्रम झाला. एकूण १००० हून जास्ती कंदील विकले गेले. गणेशोत्सवात या गटाने ९ मिरवणुका व १२ प्रात्यक्षिके केली. इ. ८वी, ९वीच्या मुलांचे चार दिवसांचे क्रीडा शिबिर हराळी इथे झाले. कबड्डी, व्हॉलीबॉल, हँडबॉल या खेळांचे सराव व प्रशिक्षण सलग अडीच महिने या शिबिरापासून दलावर झाले. वस्ती भागातल्या मुलांच्या घरी  मातृभूमिपूजनाचे कार्यक्रम इ. ९वीच्या मुलांनी केले. इ. १०वी साठी तीन दिवसांचे अभ्यास शिबिर व नियमित अभ्यासिका झाल्या. इ. ९वीच्या गटाची जीवधन इथे तर इ. १०वीच्या गटाची हरिश्चंद्रगड इथे सहल झाली.

४. **कोथरूड भाग :** क्रांतिवीर चाफेकर दलातील मुलांनी रक्षाबंधनाच्या निमित्ताने अलंकार पोलीस चौकीतील पोलीस बांधवांना राख्या बांधल्या आणि त्यांच्याशी संवाद साधला. दलावरील इ. १०वीच्या कुमारांची तीन महिने अभ्यासिका घेतली. दलावरील

कुमारांनी मिळून एकत्र 'वीर सावरकर' हा चित्रपट बघितला. दलावरील अभिनव शाळेमध्ये शिकणाऱ्या कुमारांनी शाळेतील विद्यार्थ्यांचा बर्ची गट बसवला. त्याचे सादरीकरण त्यांच्या शाळेच्या क्रीडा दिनाच्या निमित्ताने झाले. गणेशोत्सवामध्ये मुलांनी घरोघरी जाऊन ५० घरांमध्ये मातृभूमिपूजन केले, ज्यामध्ये साधारण ५०० जणांनी सहभाग घेतला. गुरुगोविंदसिंह दलाने दोन महिन्यांत दर रविवारी सायकलवर पुण्यातील ऐतिहासिक स्थळांना भेटी दिल्या आणि पुण्याचा इतिहास समजून घेतला. या वर्षी दलावर एकूण सत्तरहून अधिक नवीन मुले आली. शिवनगरी येथे चालणाऱ्या सेनापती बापट दलाने सलग दोन महिने अभ्यासिका घेतली. भागातल्या तिन्ही दलांनी मिळून ३ लक्ष रुपयांची कंदीलविक्री केली. आंतरदलीय सामन्यांसाठी तिन्ही दलांचा एकत्र सराव झाला. नांदेड सिटी येथील शाळेत ७० जणांचे विस्तार शिबिर झाले. चाफेकर दलावर विविध विषयांवर वर्षभर प्रासंगिके झाली. मैदानपूजन कार्यक्रम मनमोहन सोसायटी मैदानावर घेण्यात आला.

५. **गोखलेनगर भाग :** रणजितसिंह दलाच्या २७ मुलांची साहस सहल किल्ले तोरणा इथे झाली. आंतरदलीय सामन्यांमध्ये दोन्ही खेळात दलाचे संघ उत्तम खेळून उपांत्य फेरीत पोहोचले. चाणक्य दलाच्या मुलांची अभ्यासिका झाली. चाणक्य दलाच्या १८ मुलांनी गणेशोत्सवात तीन प्रात्यक्षिके व तीन मिरवणुका केल्या. प्रफुल्लचंद्र राय दलाने दोन ठिकाणी 'प्रकाश' या विषयावर विज्ञान प्रदर्शन सादर केले. गुरुनानक जयंतीला इ. १०वीच्या चार मुलांसोबत गुरुद्वारा भेट दिली गेली.

६. **विज्ञान दले :** कुमारांसाठी मे २३ मध्ये दोन व डिसेंबर २३ मध्ये एक अशी एकूण तीन संशोधनात्मक प्रकल्प शिबिरे आयोजित करण्यात आली. यांत मिळून १५०+ विद्यार्थी सहभागी झाले. तिन्ही शिबिरे शालेय व महाविद्यालयीन विज्ञान दलांच्या मार्गदर्शकांनी व युवकांनी घडवून आणली. गणेशोत्सवाच्या काळात पाच दिवस 'कलाविष्कारांमागील विज्ञान' आणि 'क्रीडाप्रकारांमधील विज्ञान' या विषयांवर प्रबोधिनीत प्रदर्शन भरवण्यात आले. दिवाळीमध्ये पणत्या रंगवणे व विक्रीमध्ये विज्ञान दले सहभागी झाली होती. डिसेंबरमध्ये चार विद्यार्थी व तीन मार्गदर्शक गुजरातमध्ये आयोजित भारतीय विज्ञान संमेलनात विज्ञान दलातर्फे निमंत्रित सदस्य म्हणून गेले होते व तेथील प्रदर्शनात 'भारतीय वाद्यांमागील विज्ञान' विषय घेऊन सहभागी झाले. प्रदर्शनात इस्रोचे अध्यक्ष श्री. एस्. सोमनाथ यांची भेट घडली. वर्षभरात विविध निमित्तांनी विज्ञान दलाच्या मार्गदर्शकांनी व काही विद्यार्थ्यांनी वेल्हे, नाशिक, पुण्यातील वस्ती भाग या ठिकाणच्या विद्यार्थ्यांसाठी पुण्यात विज्ञान सत्रे घेतली.

७. **धमाल शिबिरे :** पुण्यातील ३०० मुलांसाठी प्रबोधिनीमध्ये तीन दिवसांचे धमाल शिबिर घेण्यात आले. विविध गटकार्ये, खेळ, विज्ञान प्रयोग, ओरिगामि, स्थळभेटी, अशी सत्रे घेण्यात आली. शिबिरानंतर दोन दुर्गभ्रमण सहली नेण्यात आल्या. इ. १०वी उत्तीर्ण झालेल्या गटाने शिबिराचे पूर्ण नियोजन केले.

## ❖ भौगोलिक विस्तार ❖

एकूण २० कार्यकर्त्यांचे १४ निवासी, १२ अनिवासी असे दौरे वाईला झाले. इ. ८वी व ९वीच्या मुला-मुलींसाठी स्वयंअध्ययन, व्यक्तिमत्त्वविकसन अशा विविध विषयांवर दोन शाळांमध्ये पाक्षिक सत्रे झाली. पागा तालमीमध्ये युवकांचे पाक्षिक क्रीडा दल झाले. दादांनी जवळजवळ सर्वच मुलांच्या गृहभेटी केल्या. किसनवीर महाविद्यालयामध्ये युवकांसाठी प्रारंभिक सत्रे झाली. इ. १०वी झालेल्या नऊ युवकांची राजगडावर निवासी सहल झाली.

प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने वाईमध्ये जाहीर पद्धतीने घेतलेला पहिलाच कार्यक्रम मातृभूमिपूजनाचा झाला. ४० जण (२० कुमार व २० नागरिक) यामध्ये सहभागी झाले.

## ❖ मार्गदर्शक दले ❖

मार्गदर्शक म्हणून जबाबदारी घेतलेल्या सदस्यांचे प्रशिक्षण आणि गटबांधणी यासाठी शालेय आणि महाविद्यालयीन मार्गदर्शकांची साप्ताहिक मार्गदर्शक दले वर्षभर चालू होती. महाविद्यालयीन मार्गदर्शक दल सरासरी २०च्या उपस्थितीने वर्षभर भरत होते. दलातील युवकांशी होणारा संवाद, अष्टावधानीपणा हे प्रशिक्षणाचे मुख्य मुद्दे होते. दि. १९, २०, व २१ जानेवारी २०२४ या दिवसांमध्ये महाविद्यालयीन दलांवरील मार्गदर्शकांसाठी निवासी 'गीतारहस्य अभ्यास शिबिर' निगडी इथे घेण्यात आले. आठ महाविद्यालयीन दलांनी गीतारहस्यातील प्रत्येकी एकेका प्रकरणावर अभ्यास करून मांडणी केली. महाविद्यालयीन दलांवरील ३३ मार्गदर्शकांनी शिबिरात सहभाग घेतला.

शालेय मार्गदर्शक दल १५-२०च्या उपस्थितीने वर्षभर भरत होते. कौशल्य विकसन, क्रीडा हे मुख्य उद्देश होते. दलाचे दोन दिवसांचे विवेकानंद अभ्यास शिबिर झाले.

**अन्य विभाग साहचर्य :** बिबवेवाडी भागतल्या मार्गदर्शकांनी नागरी वस्ती अभ्यास गटासोबत विश्वकर्मा शाळेत विद्याव्रताची सत्रे घेतली. १०० जणांचा विद्याव्रत कार्यक्रम या शाळेत झाला. शैक्षणिक उपक्रम संशोधिकेच्या रोहा व पडसरे येथील शिबिरांमध्ये इ. १०वीच्या विद्यार्थ्यांनी सत्रे घेतली. संत्रिकेच्या अक्षरराम प्रदर्शनात १० पेक्षा अधिक युवकांनी काम केले. दोन जणांनी जबाबदार सदस्य म्हणून काम केले. चार युवकांनी चार वेगवेगळ्या विभागात नियमित कामाची जबाबदारी घेतली.





# १८. युवती विभाग

**❖ शालेय दले ❖**

१. **प्रशालेय दले (ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील इ. ५वी ते ७वीच्या मुलींचे कमलाबाई सोहोनी दल आणि इ. ८वी ते १०वीच्या मुलींचे कल्पना चावला दल) :** सोमवार ते गुरुवार खेळशः आणि शुक्रवारी पथकशः दलाचे नियोजन होते. वर्षभरात आषाढी वारी, गणेशोत्सव, क्रीडा शिबिर, अभ्यास शिबिर, सहली, विक्री उपक्रम अशा अन्यही उपक्रमांमध्ये सर्व प्रशालेय गटाचा विविध प्रकारे सहभाग होता.

'गणेशोत्सवा'त इ. ५वी-६वी मुली अथर्वशीर्ष पठणासाठी जवळपासची घरे व पथकशः चार मंडळांमध्ये गेल्या. इ. ७वीच्या गटाने लेझिम नृत्य, तर इ. ९वी व १०वीच्या गटाने बर्चीनृत्य सादरीकरणात सहभाग घेतला. याशिवाय नवीन गोष्ट म्हणजे इ. ८वी मुलींना कलरीपयट्टू हा प्रकार शिकवण्यात आला. हा प्रकार सामूहिक नृत्याच्या स्वरूपात बसवून त्याचे प्रात्यक्षिक आणि मिरवणुकीत सादरीकरण झाले. सर्व गटांनी मिळून एकूण १८ सामूहिक नृत्याची प्रात्यक्षिके आणि पाच मिरवणुका केल्या.

दि. ३ ते ९ नोव्हें. या कालावधीत दिवाळीच्या निमित्ताने 'विक्रीसप्ताह' झाला. यात संपूर्ण दिवस नियोजन व प्रत्यक्ष विक्रीचा अनुभव मुलींनी घेतला. पुण्यातील विविध भागात घरोघरी जाऊन, स्टॉल्स् लावून, तसेच दूरस्थ माध्यमातून विक्री झाली. प्रत्येक पथकाने आपापले विक्री साहित्य ठरवायचे होते. यामध्ये पूजा साहित्य, आकाशकंदील, पणत्या, भेटवस्तू, इ.चा समावेश होता. एवढेच नव्हे तर घरोघरी संपर्क करून मागील वर्षीच्या पणत्या पुन्हा रंगवून देणे, असेही मुलींनी केले. पथकात काम कसे करायचे, विक्री कशी करायची, ग्राहकाशी कसे बोलायचे, हिशोब कसे लिहायचे याबद्दल आवश्यक मदत इ. १०वी मुलींनी केली. रोजचे हिशोब पूर्ण करणे, नोंदी ठेवणे, साहित्य आणणे, मुलींमध्ये वाटणे यात इ. ८वी ते १०वीच्या मुली सहभागी होत्या. या उपक्रमातून सर्व पथकांनी मिळून सुमारे अडीच लक्ष रुपयांची उलाढाल केली.

दि. २४ ते २९ डिसें. या कालावधीत इ. ५वी ते ९वीसाठी 'क्रीडाशिबिर' झाले. दिवसाच्या नियोजनात चार तास खेळासाठी राखीव होते. याशिवाय संचलन, पद्यगायन, व्यायाम आणि योगासने, कलरीपयट्टू प्रशिक्षणाची सत्रे झाली. पाचव्या दिवशी पथकशः क्रीडा स्पर्धा झाल्या. शिबिराच्या शेवटच्या दिवशी घनगड, लोहगड, रोहिडा, कुर्डूगड या गडांवर पथकशः चार सहली एकाच दिवशी झाल्या.

इ. १०वीमधील मुलींसाठी 'अभ्यासशिबिरा'ची योजना केली होती. दिवसभरात मौनाभ्यास, प्रश्नपत्रिका सोडवणे, गटचर्चा या माध्यमातून सात तास अभ्यास होत होता.

यासोबत रोज संध्याकाळी प्रश्नपत्रिका लेखन, वेळेचे नियोजन व ताणाचे नियोजन अशी सत्रे झाली. जे शिक्षण आपण घेत आहोत ते सर्व कशासाठी या संदर्भाने बागेश्रीताई पोंक्षे यांचे अनुभव कथन झाले.

कमलाबाई सोहोनी दलाच्या वर्गशः निवासी सहली झाल्या. इ. १०वी मधल्या ३८ मुलींची वर्षासहल अंधारबन येथे, इ. ९वीच्या २९ मुलींसाठी कात्रज ते सिंहगड रात्रसहल आणि इ. ८वीच्या ४० मुलींची राजगड येथे निवासी सहल झाली. यामध्ये वेगवेगळ्या गोष्टी मुलींनी अनुभवल्या. इ. ९वीच्या गटाने चांदण्याच्या प्रकाशात, एकमेकींना मदत करत १४ किमी. अंतर आणि १५ टेकड्या सर केल्या. इ. ८वीच्या सहलीत प्रबोधिनीच्या वेल्हे केंद्राची ओळखही मुलींना झाली. गडावर पोहोचल्यानंतर गटकार्यही झाले. त्याशिवाय कल्पना चावला दलातील इ. ५वीच्या ३८ मुलींची सहल शिवनेरी गडावर झाली.

२. **प्रबोध शालेय दल (प्रबोधिनीमध्ये औपचारिक शिक्षण सुरू नसलेल्या इ. ५वी ते १०वीच्या मुलींचे दल) :** साप्ताहिक पद्धतीने वर्षभर हे दल नियमित सुरू होते. खेळ, गटकार्य, कलासत्रे, गटचर्चा अशा विविध माध्यमांचा वापर करून दलाचे नियोजन केले गेले.

गणेशोत्सवात नियमित दलावरील मुलींचा ज्ञान प्रबोधिनीच्या गणेश विसर्जन मिरवणुकीत सहभाग होता. डी.इ.एस्. इंग्लिश मिडियम स्कूल (टिळक रस्ता) व अप्पर इंदिरानगर येथील विश्वकर्मा शाळेतील मुलींचा देखील यात सहभाग होता.

डिसेंबर २३ मध्ये दलाची संख्या व संपर्क वाढवण्याच्या दृष्टीने तीन दिवसांचे शिबिर आयोजित केले होते. एकूण शिबिरात आठ मार्गदर्शिका आणि ५१ मुली सहभागी झाल्या.

३. **विज्ञान दल :** विज्ञान दलाची सुरुवात म्हणून गणेशोत्सवाच्या काळात विज्ञान प्रदर्शनात काही प्रयोगांचे सादरीकरण केले. रसायन शास्त्रातील चार व भौतिक शास्त्रातील तीन प्रयोग दाखवून त्याचे स्पष्टीकरण मुलींनी दिले. जानेवारी २४ पासून नियमित पाक्षिक विज्ञान दलाची सुरुवात झाली. तीन मार्गदर्शिका व १५ मुलींचा यात सध्या सहभाग आहे. मोजमापनाच्या पद्धती, व्हर्नीअर कॅलीपरचा वापर, जीवशास्त्र प्रयोगशाळेतील साधनांची ओळख, विविध गोष्टींच्या पारदर्शिका बनवून सूक्ष्मदर्शकातून निरीक्षण करणे इ. सर्वांनी मिळून केले. रसायन शास्त्र प्रयोगशाळेत काम करण्याची संधीही मुलींना देता आली. या दलाच्या माध्यमातून प्रत्यक्ष प्रयोगशाळेत काम करण्याचे अनुभव मुलींना घेता आले.

### ❖ महाविद्यालयीन दल ❖

वर्षभर साप्ताहिक पद्धतीने नियमित महाविद्यालयीन दल झाले. गटचर्चा, कला, क्रीडा, मार्गदर्शनपर व्याख्याने, विविध विषयांच्या कार्यशाळा अशा माध्यमांचा वापर केला गेला. वारी, गणेशोत्सव, दीपोत्सव अशा निमित्ताने उपक्रम राबविण्यात आले. आषाढी वारी, गणेशोत्सव यामध्ये हा गट सहभागी झाला होता.

गणेशोत्सवाच्या निमित्ताने या गटाचे साधारण दीड महिना नियमित दैनंदिन दल झाले. पूर्णतः नव्याने येत असलेल्या युवतींच्या प्रबोधिनी परिचयासाठीही यावेळी योजना केल्या.

यावर्षी अजून एक आव्हान पेलण्याचा प्रयत्न केला. अनंत चतुर्दशीच्या दिवशी रात्री ८ ते १२ या कालावधीत एका मिरवणुकीत युवतींचा गट सहभागी झाला. या मिरवणुकीत नियंत्रणासाठी अनेक महाविद्यालयीन व प्रौढ युवती यांसोबत युवक विभागातील सदस्य व शौर्य पथकातील सदस्यांचीही मदत मिळाली. या निमित्ताने दोन पथकांमधील साहचर्याचा अनुभवही घेता आला.

पाच माजी कार्यकर्त्यांच्या पुढाकारातून वय वर्षे ३५ पेक्षा अधिक असणाऱ्या पालक गटातील प्रौढ युवतींचा बर्चीनृत्यात सहभाग होता. घर आणि स्वतःची नोकरी/ व्यवसाय सांभाळून सराव करून या गटाने नव्याने यावर्षी सहभाग घेतला आणि एक प्रात्यक्षिक सादर केले.

दीपावली आणि राम मंदिरातील मूर्तीची प्राणप्रतिष्ठा या दोन निमित्तांसाठी दीपोत्सव साजरा केला गेला. दोन्ही कार्यक्रमात मिळून सुमारे १२० पेक्षा अधिक युवती, काही पालक व प्रबोधिनीतील अन्य सदस्य उपस्थित होते.

### ❖ युवती संघटन बैठक ❖

वर्षभर मध्यवर्ती युवती समिती आणि विस्तारित युवती समितीच्या द्वैमासिक पद्धतीने सहा बैठकी झाल्या. पुणे, निगडी, वेल्हे आणि हराळी केंद्रातील प्रमुख युवती सरासरी १५ उपस्थितीने या बैठकीसाठी जमत होत्या. सर्व ठिकाणी युवती संघटनाचे काम वाढण्याच्या दृष्टीने आवश्यक चर्चा, प्रशिक्षण, युवतींनी विविध विषयांवर अभ्यासपूर्वक मांडणी करणे, संचालक वाच. गिरीशराव बापट यांचे मार्गदर्शन अशी सत्रे झाली. स्त्री–शक्ती प्रबोधन कार्यदिशेच्या प्रतिनिधी देखील यात प्रासंगिक सहभागी झाल्या.

## प्रतिसादासाठी जाहीर आवाहन

इ. ५वी पासून पुढील वयोगटातील युवतींसाठी युवती विभागाच्या दलांतर्फे विविध नियमित व प्रासंगिक उपक्रमांची योजना केली जाते. आपल्या संपर्कातील युवतींना आपण या मध्ये सहभाग घेण्याविषयी सुचवू शकाल. (संपर्क क्र. : ८९८३४०१५०७)

# ११. उद्योजकता विकास केंद्र

या केंद्राचे काम आता प्रबोधिनीच्या विविध भौगोलिक केंद्र-उपकेंद्रांद्वारे चालते. वृत्तांत वर्षामध्ये पुणे, निगडी, शिवापूर, आंबवणे, सोलापूर व हराळी येथे उद्योजकतेचे विविध उपक्रम झाले. त्यांची व्यवस्थापकीय रचना त्या-त्या ठिकाणच्या केंद्रांनी सांभाळली.

पुणे केंद्रात युवक विभागाने गणेशोत्सवात गणेश मूर्तींची तर दिवाळीमध्ये आकाशकंदील आणि पणत्यांची विक्री केली. त्यासाठी युवक प्रबोधन उद्योग हा भागीदारी व्यवसाय युवकांनी स्वतःच्या जोखमीवर चालविला आहे.

निगडीला विविध विक्री उपक्रमांबरोबरच जैवतंत्रज्ञानावर आधारित नवनिर्मिती व उद्योग यांना चालना दिली जाते. केंद्रशासनाचा जो अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटर (ACIC) असा प्रकल्प प्रबोधिनीस मंजूर झाला आहे, त्यासाठी वेगळी Section 8 कंपनी स्थापन केली आहे. बांबू व नेपियर गवत यांच्या ऊती संवर्धनावर काम चालू आहे. निगडी केंद्रामधील सुमारे ४ हजार चौ. फूट जागा या उपक्रमासाठी उपलब्ध करण्यात आली असून केंद्रशासनाचे अनुदान अपेक्षित आहे. दिवाळीमध्ये महिलांच्या एका गटाने बांबूचे नक्षीदार ५०० आकाशकंदील तयार करून प्रबोध समूहाला दिले.

शिवापूर येथील कौशल्य प्रशिक्षण वर्गामध्ये सी.एन्.सी. यंत्रांवर टर्निंगचे काम शिकविले जाते. या विद्यार्थ्यांनी परिसरातील उद्योगांमधून दोन व्यावसायिक कामे मिळविली व ती आपल्या प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केली.

वेल्हे तालुक्यात आंबवणे व नसरापूर येथे महिलांचे जास्वंद वर्ग चालतात. हस्तकौशल्यावर आधारित अनेक उत्पादने करून महिलांनी पुण्याच्या बाजारात विकली. तसेच शहरातील पाहुण्यांना ग्रामीण जीवनाचा परिचय करून देणारा ॲग्रो टुरीझम हा व्यवसायही अनेकजणी आपापल्या गावात यशस्वीपणे करीत आहेत. परिसरातील कातकरी बांधवांना उत्पन्नाचे काही साधन मिळवून देण्यासाठी प्रयत्न झाले. आडवली येथील हरित ऊर्जा बचत गटाने नेपियर गवताची लागवड करून त्यापासून इंधन कांड्या बनविण्याचा व्यवसाय सुरू केला आहे. त्याचे सविस्तर वृत्त स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण) विभागाच्या वृत्तात आलेच आहे.

सोलापूर येथे कागदी पिशव्या बनविणाऱ्या उद्योगाने रु. ८८ लक्षची उलाढाल केली. पिशव्यांवरील छपाईसाठी एक ऑफसेट छपाई यंत्र खरेदी करण्यात आले. बिडी कामगार महिलांच्या पर्यायी रोजगाराचा यात समावेश असल्याने ती एक 'सामाजिक उद्योजकता' म्हणता येईल.

हराळी येथे शेती पूरक व्यवसायाची यंदा भर पडली. रोटरी क्लबच्या मदतीने शेती पूरक अवजारे खरेदी करण्यात आली. ही अवजारे युवकांना उपलब्ध केली असून त्यांनी सुरुवातीला ती शेतकऱ्यांना भाड्याने देण्यास सुरुवात केली आहे. पुढे या अवजारांच्या साहाय्याने शेती चालक व्यवसाय करण्याचा युवकांचा मानस आहे.

प्रबोधिनीच्या विविध केंद्रांवरील युवकांना माजी विद्यार्थ्यांचे औद्योगिक मार्गदर्शन मिळू लागले आहे. या सर्व प्रयत्नांमधून प्रबोधिनीच्या कार्यपद्धतीमध्ये उद्योजकता रुजावी असा प्रयत्न वृत्तांत वर्षात वाढत गेला आहे, असे दिसते.

आम्ही उसळत्या लाटा चैतन्य सागरीच्या ।। ध्रु. ।।
आम्ही सोत्कंठ भूमिच्या अंकुरल्या आकांक्षा
आम्ही पोलादी पंखांनी झेपावतो दशदिशा
आम्ही अमृतकलश अर्पितो पदी आईच्या ।। १ ।।
आहे ज्वालांशी फुलांशी प्रखर कोमल नाते
आहे तेजस्वी संयत अमुच्या खड्गाचे पाते
दिसो दुरित कोठेही कोसळू मस्तकी त्याच्या ।। २ ।।
आम्ही प्रसन्न पुष्पाच्या उमलत्या पाकळ्या
आम्ही आदित्य तेजाच्या धाकुल्या किरणकळ्या
देवभूमिच्या पूजेत उजळू ज्योती प्राणांच्या ।। ३ ।।




# २०. अन्य राज्यांमधील विस्तार

### ❖ गुजरात ❖

१. अहमदाबाद येथे इ. १ली ते ८वीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रज्ञा मानस संशोधिकेचा ओळख स्पर्शाची ३६०° हा उपक्रम राबवला. याद्वारे ११ शाळांमधील ४७००+ विद्यार्थी, १७९ पालक आणि ९१ शिक्षकांपर्यंत हा विषय पोहोचवला.

२. गुजरात परिसरातील केंद्र शासनाच्या विविध पदांवरील स्पर्धात्मक क्षमता संवर्धन केंद्राच्या २२ अधिकाऱ्यांच्या वाच. विवेक कुलकर्णी व वाच. सविता कुलकर्णी यांनी भेटी घेतल्या. विविध विषयांवर यावेळी चर्चा झाली.

### ❖ तेलंगणा ❖

१. महिंद्रा अँड महिंद्रा झहीराबाद, तेलंगणा येथे १८ लोकांचे चाचणीकाम प्रज्ञा मानस संशोधिकेतर्फे झाले. त्यावेळी एका तेलगु भाषिक मुलीला आधी दूरस्थ प्रशिक्षण दिले होते. तिने दुभाषाचे काम केले. तसेच तिथे हिंदी, इंग्रजी, तेलगु, तमिळ आणि मराठी इतक्या भाषेतील साहित्य नेले होते आणि या सर्वाचा चांगला उपयोग झाला.

२. शेजारील राज्यांमध्ये प्रबोधिनीचे कोणते उपक्रम सुरू करता येतील व त्यासाठी काय पूर्वतयारी लागेल, याचा अंदाज घेण्यासाठी सोलापूर केंद्रातर्फे तेलंगणा मधील संगारेड्डी येथे विविध उपक्रम योजले गेले. मे मध्यापर्यंत संगारेड्डी मध्ये पाच प्राणायाम वर्गांमध्ये मिळून ३५ महिला प्राणायाम करायला लागल्या. प्रज्ञा विकास मध्ये ६० विद्यार्थी येऊन गेले, तर दहा महाविद्यालयीन युवकांचा संपर्क झाला व ते प्रज्ञा विकास मध्ये सहभागी झाले. महिला रोजगार निर्मिती प्रकल्पांतर्गत दोन महिलांचे शिलाई प्रशिक्षण व चार महिलांचे कागद पिशवी निर्मिती प्रशिक्षण झाले.

### ❖ कर्नाटक ❖

१. सोलापूर केंद्रातर्फे गेली पाच वर्षे कलबुर्गी येथे किशोरी प्रज्ञा विकास उपक्रम होत आहे. किशोरांसाठी विकासिकेच्या या वर्षी दहा कार्यशाळा झाल्या.

### ❖ दिल्ली ❖

१. दिल्ली सरकारतर्फे विशेष क्षमतावान विद्यार्थ्यांसाठी 'अभिषिक्त' प्रकल्प नियोजित असून, त्यासाठी शिक्षकांचा एक गट ज्ञान प्रबोधिनी प्रशालेत भेटीसाठी येऊन गेला. त्यापुढचा भाग म्हणून दि. ११ ते १३ मार्च २४ रोजी अभिषिक्त प्रकल्पामध्ये विद्यार्थ्यांचे नामांकन कसे करायचे?, याविषयी सुमारे अडीच हजार शिक्षकांचे प्रशिक्षण दिल्ली येथे प्रशाला व प्रज्ञा मानस संशोधिकेच्या सदस्यांनी घेतले. तत्पूर्वी सर्व शिक्षकांना प्रशालेचे प्राचार्य वाच. मिलिंद नाईक आणि प्रज्ञा मानस संशोधिकेच्या प्रमुख वाच. अनघाताई लवळेकर यांनी मार्गदर्शन केले.

### ❖ अरूणाल प्रदेश ❖

१. राज्य समन्वयक मृण्मयी वैशंपायन नोव्हें. २३ मध्ये १८ दिवस राज्याचा दौरा करून आल्या. या दौऱ्यात सुमारे ६० सदस्यांशी आणि पुण्यात निवास करणाऱ्या अरूणाचल मधील परिचितांच्या कुटुंबांशी संवाद, भेटी, गृहभेटी केल्या. इटानगर, सेप्पा, झिरो, नामसाई, तेजू, रोइंग या भागातील विविध संस्था, विद्यापीठे आणि तेथील कार्यकर्ते, सदस्य अशाही भेटी झाल्या. नामसाई येथील अरुणाचल युनिव्हर्सिटी, तेजूतील डेनिंग युनिव्हर्सिटी आणि झिरो येथील सेंट क्लेरेट महाविद्यालय येथील सदस्यांच्या भेटी झाल्या. तेजू येथील करुणा ट्रस्ट कार्यालया बरोबर बाम्बुसा लायब्ररी आणि मिशमी स्टुडंट्स् युनियनच्या कार्यकर्त्यांच्या एकत्र सत्रातून स्थानिक पातळीवरच्या गरजा आणि त्यांना प्रतिसाद म्हणून कोणते कार्यक्रम एकत्र करता येतील, अशी चर्चा या दौऱ्यात झाली.

२. स्पर्धात्मक क्षमता संवर्धन केंद्र आणि सेवाभरती, अरुणाचल प्रदेश यांच्या संयुक्त विद्यमाने सहा आठवड्यांचा केंद्रीय लोकसेवा आयोग प्रशिक्षण वर्ग इटानगर व नहरलगून या दोन ठिकाणी झाला. आठवड्याला दोन शिक्षकांनी अरुणाचलमध्ये जाऊन रोज चार तास प्रत्येक केंद्रावर पूर्वपरीक्षेचे विषय मार्गदर्शन केले. जाणाऱ्या गटासाठी 'अरुणाचल प्रदेश परिचय व आव्हाने' या विषयावर व्याख्यान झाले. इटानगर आणि नहरलगून मिळून ४० आणि झूमच्या माध्यमातून सात विद्यार्थी वर्गाला उपस्थित होते. वर्गादरम्यान नियमित परीक्षा, चर्चासत्र आणि नंतर दहा पूर्वपरीक्षा सराव परीक्षा झाल्या. पुण्याहून वाच. सविता कुलकर्णी यांनी दोन सत्रे घेतली. श्री. प्रवीण इंगवले (एसपी, एनआयए, मुंबई) यांनी झूमच्या माध्यमातून पोलीस सेवेविषयीचे अनुभवकथन केले. या वर्गांच्या समारोपाच्या निमित्ताने वाच. सविता कुलकर्णी व श्री. उमेश रामटेके यांचा अरुणाचल दौरा झाला. वर्गाचे विद्यार्थी, सेवाभारतीचे उपाध्यक्ष, सचिव तसेच राज्य समन्वयक कार्यक्रमाला उपस्थित होते. श्री. विजय स्वामी (कार्यकारी संचालक, RIWATCH, अरुणाचल प्रदेश) प्रमुख पाहुणे होते. स्पर्धात्मक क्षमता संवर्धन केंद्रात तयार केलेली स्पर्धात्मक अभिवृत्ती चाचणी रोइंग, तेजू आणि इटानगर या तीन ठिकाणी दीडशे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना दिली. या चाचणीचे अहवाल तयार झाल्यानंतर वैयक्तिक समुपदेशनाची दूरस्थ सत्रे प्रत्येक विद्यार्थ्यासोबत झाली. वाच. सविता कुलकर्णी यांचे नहरलगूनच्या महिला महाविद्यालयांमध्ये करिअर गायडन्स या विषयावर व्याख्यान झाले. डॉ. अभिजीत गुरव (आय.पी.एस्., एस्.पी., तीनसुकिया आसाम), श्री. शरद दराडे (सचिव, राज्यपाल, अरुणाचल प्रदेश), श्री. खोपे थलाई (आर.टी.आय. आयुक्त, इटानगर), कोविड काळात प्रबोधिनीमध्ये वास्तव्यास राहिलेले विद्यार्थी, तसेच इतर विद्यार्थी आणि अधिकारी अशा एकूण २० जणांच्या दौऱ्यादरम्यान भेटी झाल्या.

३. दिरांग आणि चांग येथे दि. २७ जाने. ते ३ फेब्रु. मध्ये प्रज्ञा मानस संशोधिकेतर्फे १११ विद्यार्थ्यांचे अभिक्षमता मापन चाचणी काम झाले.

४. अरुणाचल प्रदेश येथील RIWATCH संस्थेसाठी तीन माहितीपटांची निर्मिती शैक्षणिक साधन केंद्राद्वारे व्यावसायिक शुल्क आकारून करण्यात आली.

> मेघालय, अरुणाचल प्रदेश, राजस्थान, तामिळनाडू, कर्नाटक आणि तेलंगणा या सहा राज्यांमध्ये पाच स्थानिक संस्थांच्या माध्यमातून छोटे सायंटिस्ट प्रकल्पाचा भौगोलिक विस्तार झाला. तसेच जम्मू-काश्मीर, अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, नागालँड, छत्तीसगड या राज्यांमध्ये ज्ञानसेतू प्रकल्पाच्या माध्यमातून महाविद्यालयीन गटातील कार्यकर्ते जाऊन आले.

### ❖ छत्तीसगड ❖

१. रायपूर, बिलासपूर आणि कोंडागाव या ठिकाणी दि. २७ ते ३० जाने. २४ मध्ये १३४ विद्यार्थ्यांचे प्रज्ञा मानस संशोधिकेतर्फे अभिक्षमता मापन चाचणी काम झाले. श्री. आल्हाद कुलकर्णी यांनी तेथील ४० सदस्यांचे करीयर मार्गदर्शन यावर दोन दिवसाचे प्रशिक्षण घेतेले.

### ❖ मणिपूर ❖

१. सोलापूर सहनिवास प्रमुख श्री. अनंत अल्लीशे यांना मणिपूर भेटीच्या दरम्यान तेथील स्थलांतरितांच्या छावण्यांमधील व एकूणच आजूबाजूची भीषण स्थिती लक्षात आली. त्यामुळे ऑगस्टमध्ये प्रबोधिनीतर्फे इम्फाळ व चुराचांदपूर जवळील काही छावण्यांमध्ये तात्काळ गरजेच्या असलेल्या रोजच्या वापरातल्या साहित्याची मदत दिली गेली.

२. प्रबोधिनीच्या कार्यकत्यांचा AMAND (Association of Manipuri Diaspora) या संस्थेबरोबर सातत्याने संवाद चालू आहे. याच संपर्कातून छावण्यांमध्ये राहणाऱ्या मणिपुरी बांधवांसाठी कडाक्याच्या थंडीपासून बचाव होईल, असे गरम कपडे व चादरी यासाठी मदतीचे आवाहन केले गेले. पुण्यात ठिकठिकाणी राहणाऱ्या प्रबोधिनीच्या हितचिंतकांनी मणिपूरमध्ये राहणाऱ्या बांधवांसाठी मदत केली. जवळपास तब्बल ७०० किलो सामान पाठवले गेले.

३. मणिपूर मध्ये भाऊबीजेचा दिवस मोठ्या उत्साहाने साजरा होतो. दिवाळीच्या काळात अशाच सामूहिक प्रयत्नांतून अंदाजे १०० किलो फराळ विमानाने मणिपूरला पाठवला गेला.



# २१. ज्ञान प्रबोधिनी, निगडी केंद्र

### ❖ अधिमित्र योजना ❖

निगडी केंद्रात २३-२४ हे शैक्षणिक वर्ष 'अधिमित्र वर्ष' म्हणून जाहीर केले होते. यासाठी पूर्व प्राथमिक विभागापासून सर्व वयोगटाच्या विद्यार्थ्यांसाठी, पालक व अध्यापकांसाठीही 'अधिमित्र' विषयावर वैयक्तिक संवाद, पालक संवाद, गृहभेटी, वर्गमित्र संवाद, अधिमित्र विशेष तासिका अशा स्वरूपाच्या उपक्रमांचे नियोजन केले होते. अध्यापकांसाठी दिवाळीत कुटुंब मेळावा आयोजित केला होता, तर अधिमित्र तासिकांचे नियोजन करताना वर्गमित्र तासिका, हसत-खेळत बुद्धिविकास, सामाजिक जाणीव संवर्धन आणि छात्र प्रबोधन प्रकाशित अन्यही साहित्याचा वापर केला गेला.

### ❖ पंचकोश शिक्षण चिंतन परिषद ❖

कै. वा. ना. अभ्यंकर तथा भाऊंच्या तृतीय पुण्यतिथी निमित्त ज्ञान प्रबोधिनी निगडी, गुरुकुल आयोजित राज्यस्तरीय परिषद दि. १५ व १६ फेब्रुवारीला झाली. कै. भाऊंनी सुरू केलेल्या गुरुकुल प्रयोगाचे सार्वत्रिकरण करणे, नवीन शैक्षणिक धोरणात मांडलेले पंचकोश शिक्षण प्रणालीचे तत्त्वज्ञान समजून घेणे, प्रबोधिनीचा महाराष्ट्रभरातील संपर्क दृढ करणे, अशा उद्दिष्टांसाठी ही परिषद आयोजित करण्यात आली होती. कै. भाऊंनी लिहिलेल्या 'पंचकोश विकसनातून शिक्षण' या पाचव्या आवृत्तीचे प्रकाशन यावेळी करण्यात आले. दोन दिवसांच्या परिषदेमध्ये सहभागी सदस्यांसाठी पुढील सत्रांचे आयोजन केले होते. १. बीजभाषण : शिक्षणातील भारतीय तत्त्वविचार - वाच. गिरीशराव बापट, २. व्यक्तिमत्त्व विकसनाची आजची गरज - प्रा. रेणू दांडेकर, प्रा. महेंद्र सेठिया, ३. ज्ञान प्रबोधनीतील शैक्षणिक संस्कार : शिक्षण संकल्प ते आचार्यव्रत - प्रा. शिवराज पिंपुडे, श्री. श्रीराम इनामदार, सौ. श्रुती फाटक, वाच. अनघा लवळेकर, ४. नवीन शैक्षणिक धोरणातील भारतीयत्व - वाच. मनोज देवळेकर, वाच. प्राची साठे, प्रा. गजानन लोंढे, ५. चिंतनिका : हनुमंताचे पंचकोशात्मक चरित्र - ह.भ.प. चारुदत्तबुवा आफळे, ६. गुरुकुल कार्यप्रात्यक्षिके व पंचकोशांचे क्रियान्वयन, ७. ज्ञान प्रबोधिनीची पंचकोशात्मक शिक्षणप्रणाली - प्रा. प्रशांत दिवेकर, प्रा. आदित्य शिंदे, वाच. सविता कुलकर्णी.

'पंचकोश विकसनातून शिक्षण' या पाचव्या आवृत्तीचे प्रकाशन वाच. इरेशजी स्वामी (उपाध्यक्ष, ज्ञान प्रबोधिनी सोलापूर) व प्रा. सुभाषराव देशपांडे (भूतपूर्व कार्यवाह, ज्ञान प्रबोधिनी) यांच्या हस्ते झाले. नवीन आवृत्तीमध्ये आधीच्या लेखांची पुनर्मांडणी करण्यात आली. तसेच गुरुकुलात सध्या चालू असणाऱ्या उपक्रमांचा, प्रक्रियांचा यामध्ये समावेश करण्यात आला. प्रबोधिनीच्या कार्यकर्त्यांनी पुस्तकात कालसुसंगत नवीन लेखांची भर घातली.

पंचकोशांचे तत्त्वज्ञान, गुरुकुलात त्यानुसार होणारे उपक्रम यांचे

परिषदेचे वृत्त

परिषदेतील व्याख्याने

प्रदर्शन यावेळी मांडण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांचे प्रकल्प, मौनाभ्यास, मौनसंवाद, स्वरचित कविता, कथा यांची मांडणी करण्यात आली होती. या प्रदर्शनासोबत महाराष्ट्रात सध्या चालू असलेल्या १० पंचकोशाधारित गुरुकुलांपैकी पाच गुरुकुलांच्या कार्यपरिचयाचे तक्ते यावेळी मांडले होते. परिषदेसाठी महाराष्ट्रातील १९ जिल्ह्यांतील ७० विविध शाळांचे प्रतिनिधी म्हणून संस्थाचालक, मुख्याध्यापक, अध्यापक, पालक असे २२० सदस्य पूर्णवेळ उपस्थित होते.

### ❖ दिल्ली प्रशिक्षण योजना ❖

Directorate of Education, GNCTD DIET/SCERT यांच्या माध्यमातून दिल्ली पब्लिक स्कूलच्या शालेय क्रीडा शिक्षकांसाठी क्रीडाकुल विभागातर्फे प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्याची संधी या वर्षात मिळाली; ती दिल्ली शिक्षण विभागातील निवृत्त उपसंचालिका मा. निरूपमाताई अभ्यंकर यांच्यामुळे!!

खेळातील प्रशिक्षणासाठी शास्त्रशुद्ध योजनेचा अवलंब क्रीडाकुल विभागात गेली २५ वर्षे करण्यात येत आहे. या संकल्पनेचा प्रचार व प्रसार होण्याच्या दृष्टीने अधिकाऱ्यांसमोर क्रीडाकुल संकल्पनेची मांडणी करण्यात आली. पारंपरिक शास्त्र आणि आधुनिक शास्त्र याचा मेळ खेळात करून, त्या माध्यमातून खेळाडूंचा सर्वांगीण विकास घडविण्याचा हेतू डोळ्यासमोर ठेवून, या प्रशिक्षण वर्गांची रचना एकून तीन टप्प्यात करण्यात आली होती.

दि. १९ ते २३ जून, दि. २ ते ६ ऑगस्ट आणि दि. २ ते ७ नोव्हें. या कालावधीत झालेल्या सत्रांत ३८ क्रीडा शिक्षक आणि साधारण चार समन्वयक यांचा सहभाग होता. १. सुयोग्य जीवनशैलीसाठी योगशास्त्राचा आधार, २. खेळाडूच्या सर्वांगीण विकासासाठी आयुर्वेदाचा अवलंब, ३. Body Posture, ४. खेळाडूचा आहार, ५. Recovery, ६. व्यक्तिमत्त्व विकसनासाठी क्रीडा माध्यम, ७. Lead up games ही संकल्पना, ८. Mother game – खेळाडू विकसनाचे साधन, ९. Fitness Assesment, १०. पंचकोश माध्यमातून व्यक्तिमत्त्व विकसन अशा संवादमालेचे आयोजन यात करण्यात आले. पारंपरिक क्रीडा प्रकार, रायफल शूटिंग, धनुर्विद्या, मॅट कबड्डी, योगासने, कुडो, लाठी-काठी, बरची या विषयांचे प्रत्यक्ष प्रशिक्षण व त्याचे सहभागी सदस्यांकडून सादरीकरण अशा कृतिसत्रांचा देखील समावेश करण्यात आला. निगडी केंद्रातील गुरुकुल, मुक्तीसोपान, या विभागांच्या भेटींचे नियोजनही करण्यात आले होते. याद्वारे निगडी केंद्रातील सर्वांगीण विकासाचे प्रारूप सर्व सहभागी सदस्यांपर्यंत पोहोचविता आले.

राज्यात २३-२४ या शैक्षणिक वर्षात 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' हे अभियान राबवले होते. यात १,०३,३१२ शाळांनी सहभाग नोंदवला होता. यात ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडीचा महानगरपालिका गटात राज्यात प्रथम क्रमांक आला. याचा पारितोषिक वितरण समारंभ दि. ५ मार्च २०२४ रोजी मा. मुख्यमंत्री आणि शिक्षणमंत्री यांच्या उपस्थितीत मुंबई येथे झाला. या सोहळ्यासाठी विद्यालयातर्फे पालक, अध्यापक, माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि प्राचार्य सहभागी झाले होते. या अभियानाच्या माध्यमातून शाळांमध्ये शैक्षणिक गुणवत्तावाढ, शालेय व्यवस्थापन, सामाजिक बांधिलकी अशा विविध विषयांवर घेतलेल्या उपक्रमांची दखल घेतली गेली.

### ❖ काश्मीर दौरा ❖

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने केंद्रात झालेल्या 'अभ्यासपर्व' उपक्रमात कलम ३७० या विषयावर अध्यापक, पालक आणि विद्यार्थी गटाने अभ्यास केला होता. अभ्यासाचा पुढील टप्पा म्हणजे या गटाचा काश्मीर दौरा! दि. २ ते १० जून २३ दरम्यान हा दौरा झाला. पुस्तकी अभ्यासानंतर प्रत्यक्ष अनुभवातून काश्मीरचा अभ्यास करणे हा यातला मुख्य उद्देश होता. दौऱ्यासाठी तीन विद्यार्थी, चार विद्यार्थिनी, एक युवक, एक युवती, दोन मार्गदर्शक असा ११ जणांचा गट निश्चित करण्यात आला. पूर्वतयारी म्हणून विद्यार्थ्यांनी काश्मीरमध्ये कार्यरत असणाऱ्या काही निवडक व्यक्तिंबरोबर संवाद साधला. त्यातून तेथील सामान्य नागरिकांशी, स्थानिक मुलांशी कशाप्रकारे संवाद साधावा, अशी माहिती घेतली. कलम ३७० रद्द झाल्यानंतर भारतीय सैन्याची भूमिका, नवी आव्हाने, महिलांचा सैन्यातील सहभाग, सैन्यातील प्रशिक्षण यंत्रणा, प्रबोधिनीतून मिळालेली शिकवण अशा विषयांवर स्थानिकांशी चांगली चर्चा झाली. याशिवाय कामाबाबत सैन्य अधिकाऱ्यांच्या भूमिका, तळमळ अनुभवता आली.

### ❖ निगडी केंद्र गणेशोत्सव ❖

सार्वजनिक गणेशोत्सव हा संघटनेचा उत्तम नमुना म्हणून ओळखला जातो. निगडी केंद्रात या वर्षी गणेशोत्सव तीन आयामांना धरून साजरा करण्यात आला. पर्यावरण, संस्कृती संवर्धन आणि राष्ट्रीय एकात्मता या सर्व अंगांनी विचार करून विविध उपक्रमांची रचना केली होती. 'पर्यावरण' यात निर्माल्याचे संकलन करून त्यापासून धूप, उदबत्ती, खत निर्मिती करता येईल, अशी रचना केली, त्याला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. 'संस्कृती संवर्धन' अंतर्गत संपूर्ण निगडी केंद्रात स्पष्टोच्चारासह अथर्वशीर्ष पठण व्हावे, या हेतूने सर्व पालक, अध्यापक व विद्यार्थी गटांना अथर्वशीर्षाचे प्रशिक्षण दिले. 'राष्ट्रीय एकात्मता' या विषयाला अनुसरून संपूर्ण गणेशोत्सवाची सजावट व प्रदर्शनाचे आयोजन केले

दि. २८ मार्च २४ रोजी अर्थतज्ज्ञ पद्मविभूषण श्री. विजयराव केळकर व सौ. लताताई केळकर यांनी पूर्व प्राथमिक विभागाला भेट दिली. सोबत वाच. उमाताई बापटही उपस्थित होत्या. विभागातील कृतियुक्त शिक्षणपद्धती त्यांनी समजून घेतली. विभागप्रमुख वैशालीताई तळेगावकर यांनी विभागाची माहिती दिली. प्रत्यक्ष कृतिशिक्षणाचा अनुभव हा पाच क्षेत्रांमध्ये (जीवन व्यवहार, शारीरिक व कारक कौशल्य, वाचन गणन लेखन, कलानुभव, परिसर व विज्ञान) अभ्यासक्रमाची रचना करून केलेला होता आणि बालवर्गाची मुले स्वतः अनुभव घेत होती. जीवन व्यवहारातील सोलणे, कुटणे, निवडणे असे उपक्रम पाहून त्यांना कौतुक वाटले. केंद्रीय सदस्यांशी गप्पा मारत त्यांनी नव्या योजनेची चर्चा केली.

होते. यात ईशान्य भारताची माहिती मिळवून राज्यांचे तक्ते, ईशान्य भारतातील समाजजीवन व निसर्ग यांची ओळख करून देणारी सजावट याचा समावेश होता. 'समावेशकता' या आयामाला धरून विविध राज्ये, धर्म, पंथ, भाषा असणाऱ्या परिसरातील नागरिक व पालकांना आरतीसाठी निमंत्रित करून त्यांच्या हस्ते मातृभूमिपूजन देखील केले.

### ❖ पूर्व प्राथमिक विभाग ❖

शिशु वर्ग व बालवर्गाच्याद्वारे मराठी व इंग्रजी माध्यमातून लहान मुलांच्या क्षमता वर्धनासाठी इथे काम केले जाते. दि. १७ ते २३ जून २३ या कालावधीत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांत जी-२० प्रदर्शनाचे आयोजन केले होते. यात भारतातील बऱ्याच राज्यांनी भाग घेतला होता. सर्व राज्यांनी आपापल्या राज्यात चाललेले शैक्षणिक प्रयोग, याद्वारे शिक्षण क्षेत्रातील बदल व नव्याने येऊ घातलेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला अनुसरून विविध माहितीची मांडणी केली होती. NCERT च्या सहकार्यामुळे आपल्या शाळेस तिथे मांडणी करायची संधी मिळाली. पूर्व प्राथमिक विभागाने बालवाटिकेचा संच उभा केला होता. बालवाटिकेत कृतियुक्त शिक्षणावर भर देत शैक्षणिक साहित्याचे नियोजन व वापर, तसेच नव्या धोरणानुसार आवश्यक गोष्टींचा समावेश उपक्रमांमध्ये कसा केला जातो ? याबद्दलची माहिती सर्वांना दिली. शैक्षणिक साहित्याचा योग्य वापर वयोगटानुसार करता येतो, हे प्रभावीपणे मांडण्यासाठी विभागातील काही चिमुकल्या विद्यार्थ्यांनीही प्रदर्शनात सहभाग घेतला. ही चिमुकली न घाबरता छान उत्तरे देत होती. शाळेत केलेले प्रयोग विद्यार्थ्यांपर्यंत किती चांगल्या प्रकारे पोहोचतात, याचा अनुभव प्रदर्शनासाठी आलेल्या अध्यापकांनी, पाहुण्यांनी, विदेशातून आलेले मंत्री इ. सर्वांनीच घेतला. या प्रदर्शनामुळे विभागातील अनेक प्रयोगांचे सिंहावलोकन करता आले आणि त्याची योग्य मांडणी करण्यासाठी आवश्यक गोष्टींचे प्रशिक्षण नकळत झाले.

### ❖ प्राथमिक गट क्र. १ ❖

स्नेहसंमेलन म्हणजे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनातील एक आनंदाचा क्षण असतो. या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील नेतृत्वगुणाला व कलागुणांना वाव मिळतो. मुले शाळेच्या वातावरणात अधिक मोकळी होतात. सांस्कृतिक खात्यांतर्गत अनेक उद्दिष्टे समोर ठेवून 'एक वर्ग एक सण' हा उपक्रम घेण्यात आला. वर्षभर आषाढी एकादशी, नागपंचमी, राखीपौर्णिमा, दहीहंडी, गणेशोत्सव, नवरात्र, दिवाळी आणि संक्रान्त असे आठ सण आठ वर्गांनी साजरे केले. प्रत्येक पारंपरिक सणाला आधुनिकतेची जोड देऊन सणाचे वेगळेपण जपण्यात आले. प्रत्येक सणाला संबंधित मुलांसोबत त्या वर्गाच्या पालक-शिक्षकांचेही सादरीकरण झाले. यामुळे त्यांच्यातील नातेसंबंध दृढ झाले. वर्गातील १००% मुलांचा यात सहभाग होता.

### ❖ प्राथमिक गट क्र. २ ❖

शिक्षक-विद्यार्थी-पालक आंतरक्रिया दृढ करणे, विविध कलागुणांना वाव देणे आणि मुख्य म्हणजे छ. शिवाजी महाराजांची सविस्तर माहिती मिळवणे, या उद्देशाने वार्षिक स्नेहसंमेलन दि. ३१ जाने. २४ रोजी झाले. यात मुलांचा सहभाग आणि त्याचबरोबर इच्छुक पालकांचा मदत, सादरीकरण सहभाग अपेक्षित होता. त्याप्रमाणे सुमारे ३९७ विद्यार्थी, १३ शिक्षक आणि ५० ते ६० पालकांचा गट सहभागी झाला. मुलांच्या सादरीकरणापूर्वी गोष्टीरूपात शिवाजी महाराजांचे चरित्र विद्यार्थ्यांना सांगितले आणि दोन आठवडे सर्व सादरीकरणाचा सराव घेतला. पोतराज नृत्य, पोवाडा आणि शिवराज्याभिषेक यांसारखे कार्यक्रम हे या संमेलनाचे वैशिष्ट्य ठरले. कार्यक्रमाला इतिहास अभ्यासक, कवी, गझलकार, श्री. संतोष घुले उपस्थित होते.

### ❖ पूर्व माध्यमिक विभाग ❖

विकासाच्या प्रक्रियेत निसर्गाचा विचार व्हावा, आजूबाजूच्या परिसराची, उपलब्ध संसाधनांची व ती बेसुमार वापरल्याने होणाऱ्या दुष्परिणामांची ओळख व्हावी, अर्थात् मुलांमध्ये कृतिशील संवेदना निर्माण व्हावी, या उद्देशाने 'निसर्गशाळा' हा उपक्रम पूर्व माध्यमिक विभागात इ. ७वीच्या चारही तुकड्यांसाठी (१५८ विद्यार्थी) दर शनिवारी झाला. आयकॉन संस्थेच्या श्रीमती केतकी घाटे यांचे तीन दिवसीय प्रशिक्षक प्रशिक्षण वर्ग झाले. यातून नियोजन करून अभ्यासक्रम ठरवला. नियोजित अभ्यासक्रम झाडे, नकाशा, पाणी, प्रदूषण, ऊर्जा-कर्ब उत्सर्जन, शेती या विषयांमध्ये विभागण्यात आला होता. वर्षभरात एकूण ३० तासिका, दोन क्षेत्र भेटी, चार तज्ज्ञ व्यक्तींची व्याख्याने विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आली होती.

### ❖ माध्यमिक विभाग ❖

अभ्यासातील बुद्धिमत्तेसोबतच विद्यार्थ्यांचा कल बघून त्यांना

रुची असणाऱ्या विषयांचे अभिरूची उपक्रमाच्या निमित्ताने शिक्षण हे माध्यमिक विभागाचे वैशिष्ट्य आहे. वर्षभर अन्यही विविध उपक्रमांची शालेय अभ्यासाला इथे जोड दिलेली आहे. इ. १०वीचे (इंग्रजी मा.) ४८ विद्यार्थी कोकणातील चिपळूण व पावस येथे शिबिरासाठी दि. ९ ते १२ ऑक्टो. २३ या कालावधीत गेले होते. प्रबोधिनीचे तिथले काम समजून घेणे, लोकजीवन, निसर्ग, सांस्कृतिक वारसा जाणून घेता यावा, या दृष्टीने शिबिरातील सत्रांचे नियोजन करण्यात आले. मा. शीतलताई सामंत यांचा व्यक्ती परिचय, स्वामी स्वरूपानंद मठ, पावसमध्ये उपासना, स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी बांधलेले पतित पावन मंदिर व मंदिर परिसरातील संग्रहालय येथे भेट असे शिबिराचे मुख्य कार्यक्रम होते.

माध्यमिक मराठी विभागातील इ. ९वीच्या ४२ मुलींचे मातृभूमी परिचय शिबिर दि. १८ ते २३ डिसें. २३ या कालावधीत मेळघाट येथे झाले. विद्यार्थिनींनी धारणी या गावातील सरपंचांची मुलाखत घेऊन त्या गावाविषयी माहिती घेतली. गावाचा भौगोलिक परिसर, नद्या, जंगल, आरोग्य, शाळा, गावातील सण, सोयीसुविधा याविषयी माहिती घेतली. संपूर्ण बांबू प्रकल्प केंद्र चालविणाऱ्या श्रीमती निरूपमा देशपांडे यांची मुलाखत घेतली.

इ. ९वीच्या ३५ मुलांचे मातृभूमी परिचय शिबिर दि. १७ ते २२ डिसें. २३ या कालावधीत वर्धा आणि नागझिरा अभयारण्य येथे झाले. सेवाग्राम आणि पूज्य विनोबा भावेंचे काम समजून घेण्यासाठी त्यांनी पवनार आश्रमाला भेट दिली. तसेच गीताई मंदिराला आणि कुमारअप्पापुरम् येथील विज्ञान केंद्रालाही भेट दिली. नागझिरा व्याघ्र प्रकल्पाजवळील पिटेझरीया गावात शहरी सोयीसुविधा कायमच्या सोडून निसर्गाचा अभ्यास करण्यासाठी गेलेल्या निसर्गप्रेमी आणि पक्षीतज्ज्ञ श्री. किरण पुरंदरे यांचा व्यक्ती परिचय करून घेतला.

## ❖ गुरुकुल विभाग ❖

उपनिषदांमध्ये नमूद केलेल्या पंचकोश या व्यक्ती विकासाच्या तत्त्वज्ञानावर आधारित असलेली १२ तासांची शाळा असे विभागाचे संक्षिप्त स्वरूपात वर्णन करता येईल. विभागाच्या अनेक उपक्रमांमधील एक म्हणजे दरवर्षी सर्व विद्यार्थी व अध्यापकांच्या सहभागातून साजरे होणारे स्नेहसंमेलन. 'एका जनार्दनी' अर्थात संत एकनाथांचे जीवनचरित्र या विषयावर या वर्षीचे स्नेहसंमेलन झाले. केवळ १५ दिवसांमध्ये दर्जेदार अभिनयासहित ही सुंदर कलाकृती सादर करण्यात आली. मुक्तीसोपान संगीत विभागातील अध्यापकांचे सहकार्य यात मिळाले. रंगभूषा, वेशभूषा ही जबाबदारी गुरुकुलातील पालकांनी सांभाळली. अभंग, गवळण, भारूड, या माध्यमातून संत एकनाथांनी केलेले समाज प्रबोधन नृत्यनाटिकेद्वारे सादर केले. कार्यक्रमाला साजेशी रांगोळी, व्यासपीठ, सजावट, नेपथ्य या सर्वांनी कार्यक्रमाची शोभा वाढली. एकूण २०० विद्यार्थी आणि १५ अध्यापकांनी या सादरीकरणात सहभाग नोंदवला. राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त आदर्श शिक्षक ह.भ.प. श्री किसन महाराज चौधरी यावेळी पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक तर केलेच आणि 'हेच संमेलन तिकीट ठेवून मोठ्या नाट्यमंदिरात सादर करूया' या शब्दात शाबासकी दिली. एका पालकांनी नाव न सांगण्याच्या अटीवर विभागाला बक्षीसही दिले.

**नवनगर विद्यालयातील विद्यार्थ्यांचे २३-२४च्या शालान्त परीक्षेतील यश**

१. उत्तीर्ण विद्यार्थी : १००%
२. विशेष प्रावीण्य : १८३ विद्यार्थी, प्रथम श्रेणी : ३८ विद्यार्थी, द्वितीय श्रेणी : १४ विद्यार्थी, पास श्रेणी : १ विद्यार्थी
३. कु. श्रेया भाटे (माध्यमिक इंग्रजी) ही विद्यार्थिनी ९९.६०% गुण मिळवून प्रथम

## ❖ क्रीडाकुल विभाग ❖

ज्ञान प्रबोधिनी निगडी, क्रीडाकुल व टाटा ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'ग्रामीण खेळाडू विकसन प्रकल्प कार्यशाळा' अंतर्गत दि. ३० व ३१ मार्च २४ रोजी Radical Transformational Leadership प्रशिक्षण घेण्यात आले. सदर प्रशिक्षणात बारामती, मावळ, चिपळूण व सोलापूर केंद्रातील प्रशिक्षक, वैद्य, मानसतज्ज्ञ व समन्वयक असे एकूण ४० सदस्य उपस्थित होते. कार्यशाळेमध्ये सदस्यांना RTL प्रशिक्षणातून संघ बांधणी, ध्येय निश्चित करणे, तसेच खेळाडू जडण-घडणी मध्ये क्रीडा-आरोग्य व मानस विभागाचे महत्त्व व जबाबदारी काय असते हे सांगण्यात आले. तसेच खो-खो, कबड्डी, व ॲथलेटिक्स या खेळांचा सराव घेण्यात आला. यामध्ये प्रशिक्षकांना सदर खेळातील मूलभूत कौशल्ये व पूरक खेळ शिकवण्यात आले. या कार्यशाळेमध्ये प्रमुख अभ्यागत म्हणून श्री. सुदर्शन रॉडड्रीक्स (CEO-RTL), श्री. यशवंत लिमये व श्री. नीलम बाबरदेसाई (HoD TATA Trust-Sports) होते.

## ❖ संगणक विभाग ❖

संगणकातील आधुनिक कौशल्ये आत्मसात करण्याबरोबरच स्वत:च्या कौशल्यवाढीसाठी व विविध विषयांचे आकलन व्हावे यासाठी, संगणकाचा साधन म्हणून योग्य उपयोग कसा करावा, हे विभागाच्या विविध उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवले जाते. दि. १९ फेब्रु. ते २१ मार्च २४ या कालावधीत विभागात कौशल्य सादरीकरण सप्ताह साजरा झाला. विभागाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त सादरीकरणाचा वेगळा प्रयत्न करण्यात आला. विद्यार्थ्यांनी या वर्षी प्रकल्पाबरोबर वर्षभरात आत्मसात केलेली कौशल्ये पालकांसमोर सादर केली. यात विद्यार्थ्यांचे गट करून इयत्तेनुसार कौशल्य सादरीकारणाचे विषय ठरवले होते. तसेच प्रश्नमंजुषा, पाठ्यपुस्तकातील घटकांवर आधारित प्रकल्प, अशा

**विशेष यश**

१. इ. ५वी शिष्यवृत्ती प्राप्त : इंग्रजी माध्यम ३ विद्यार्थी, मराठी माध्यम १२ विद्यार्थी
२. इ. ८वी शिष्यवृत्ती प्राप्त : इंग्रजी माध्यम ८ विद्यार्थी, मराठी माध्यम ९ विद्यार्थी
३. राष्ट्रीय पातळीचे यश : नॅशनल ज्युनियर ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप उंचउडी १ सुवर्ण, मल्लखांब २ कांस्य पदके, ॲथलेटिक्स (डेरवण) १ कांस्य, जिमनॅस्टिक्स (डेरवण, बालेवाडी) १ सांघिक रौप्य, जिमनॅस्टिक्स (बालेवाडी) ५ सांघिक रौप्य, शालेय कुडो (पुणे) १ रौप्य
४. संघटना ॲथलेटिक्स सब ज्युनियर स्पर्धा (सांगली) १ रौप्य (उंच उडी), संघटना ज्युनियर कबड्डी (ठाणे) - १ सुवर्ण

उपक्रमांचा समावेश होता. या सादरीकरणाला निगडी केंद्रातील अनेक सदस्यांनी भेट दिली. या वर्षी अध्यापकांनी स्वतः हाताने तयार केलेले विविध फलक व त्यावरील संगणक विभागाच्या २५ वर्षांच्या प्रवासाच्या रेखाटलेल्या कालरेषा, हस्तकौशल्याने केलेली वातावरण निर्मिती हे महत्त्वाचे आकर्षण होते. पालकांनी सकारात्मक प्रतिसाद देत विभागाचे कौतुक केले. विद्यार्थी छोट्या वयात संगणक किती कौशल्याने हाताळत आहेत, हे पाहून पालक आनंदित झाले होते.

### ❖ मुक्तिसोपान संगीत विभाग ❖

शालेय वयातच विद्यार्थ्यांमध्ये संगीताची गोडी निर्माण करणे, या उद्देशाने काम करत असलेल्या या विभागातर्फे 'देवगाणी' ही खुली सांगीतिक स्पर्धा दि. २७ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आली होती. १४ दिग्गज परीक्षक, १० वादक यांच्या उपस्थितीत ही स्पर्धा विद्यालयाच्या प्रांगणात झाली. वय वर्षे ५ ते ७५ अशा तब्बल ७५० स्पर्धकांनी या नृत्य-गायन स्पर्धेत सहभाग नोंदवला. स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ गणेशोत्सवात दि. २६ सप्टें. रोजी झाला.

### ❖ संवेद विभाग ❖

विद्यार्थ्यांच्या विकासात अध्यापक व पालकांचे साहाय्य करणे व विशेष गरजा असणारे व विशेष क्षमता असणारे विद्यार्थी शोधणे, त्यांना मार्गदर्शन करणे असे काम विभागातर्फे केले जाते. कोरोना संचारबंदीच्या काळापासून विद्यार्थ्यांमधील अस्थिरता वाढते आहे आणि अभ्यासातील बैठक कमी होते आहे, असे दिसून येत होते. विद्यार्थ्यांच्या वाढत्या समस्या जाणून घेऊन, अशा विद्यार्थ्यांच्या पालकांशी वैयक्तिक संवाद साधून, त्यांची ऑक्टोबर महिन्यात मॉरिस फौंडेशनतर्फे पालक सभा घेण्यात आली. या बैठकीत इ. १ली ते इ. ७वी पर्यंतच्या समस्याप्रधान विद्यार्थ्यांचा व पालकांचा सहभाग होता. एकूण ४४ विद्यार्थ्यांसोबत वर्षभर काम झाले.

### ❖ युवक विभाग ❖

विभागाच्या गणेशोत्सव प्रात्यक्षिकांमुळे केंद्राच्या वाढत्या संपर्काच्या परिघात गणेश मंडळांची सकारात्मक भर गेल्या काही काळात पडली. याचे पुढचे पाऊल म्हणजे गणेशोत्सवातील मंडळांव्यतिरिक्त अन्य काही ठिकाणी सामूहिक नृत्याची प्रात्यक्षिके सादर करणे! त्यानुसार बालकल्याण अनाथाश्रम, औंध येथे मा. नितीनभाई कारिया यांच्या संपर्कातून केवळ महाविद्यालयीन युवकांचे बर्ची प्रात्यक्षिक झाले. विशेष मुलांसोबत ४० युवक पूर्ण तीन तास त्या वातावरणात रमून गेले होते. आश्रमातील सर्वांनी नृत्यात सहभाग नोंदवला. शिवराज्याभिषेकाचे ३५०वे वर्ष म्हणून समाजातील विविध संस्था, पिंपरी-चिंचवड मधील ५० पथके यांनी आयोजित केलेल्या एकत्रित वादनात युवक विभागाच्या १०० युवकांचा गट बर्ची नृत्य करण्यासाठी सहभागी झाला. याशिवाय नियमित शालेय, महाविद्यालयीन आणि मार्गदर्शक दलाद्वारे विभागाचे नित्याचे काम वर्षभर सुरू राहिले.

### ❖ युवती विभाग ❖

शालेय आणि महविद्यालयीन युवतींसाठी वर्षभरात विविध उपक्रम राबवले गेले. महाविद्यालयीन दलाच्या अंतर्गत या वर्षात १२ महिन्यांत १२ किल्ल्यांवर जाण्याचा संकल्प होता. येणाऱ्या या उपक्रमाचा संघटन हा मुख्य हेतू होता व जास्तीत जास्त युवतींना युवती विभागाच्या संपर्कात आणायचे, असे ठरवले होते. एप्रिल २३ महिन्यापासून कोथळीगड, तुंग, तिकोना, पेब, रतनगड, प्रबळ गड, कलावंतीण, कळसूबाई, राजगड व राजमाची हे दहा किल्ले मार्च २४ पर्यंत पूर्ण झाले. या उपक्रमाद्वारे एकूण २३३ युवतींपर्यंत पोहोचू शकलो.

### ❖ पालक महासंघ ❖

आजी व माजी पालकांचा मोठा गट आता बांधला गेला आहे. सामाजिक, कला, क्रीडा, संस्कृती, पर्यावरण, विज्ञान, मानस अशा विषयांवर आधारित उपक्रमांचे आयोजन पालक संघाद्वारे केले जाते. विद्यार्थ्यांना खऱ्या अर्थी स्वावलंबी बनवायचे असल्यास दैनंदिन जीवनातील अनेक कौशल्यांचे प्रशिक्षण द्यावे लागते. 'निर्मिती कौशल्य' या उपक्रमातून यासाठी पालक संघाने प्रयत्न केला. इ. ८वीच्या चारही वर्गांवर पालक महासंघातील सदस्यांनी याचे तास घेतले. कौशल्य विकसनाला उद्योजकतेची जोड देऊन सुमारे १४ वस्तूंच्या निर्मितीचे प्रशिक्षण यामध्ये दिले गेले. बांबूच्या वस्तू, तिळगुळाच्या वड्या, आकाशकंदील, बर्ची रंगविणे, मण्यांच्या राख्या, कुठलेही केमिकल्स न वापरता नैसर्गिक रंग, घरातल्या जुन्या कपड्यांपासून पायपुसणी तयार करणे, अशा अनेक वस्तूंचा यात समावेश होता. यातून मुलांनी नवनिर्मितीचा चांगला अनुभव घेतला.




# २२. ज्ञान प्रबोधिनी, सोलापूर केंद्र

### ❖ कलशारोपण समारंभ ❖

पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाची वास्तू ७५ वर्षे जुनी झाल्याने त्या जागी आधुनिक सुविधा असलेली नूतन वास्तू बांधण्यात आली. या वास्तूचा कलशारोपण समारंभ दि. ६ जाने. २४ रोजी परमपूज्य स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. संचालक वाच. गिरीशराव बापट व स्वामीजींच्या हस्ते वास्तोष्पती व कलशाचे पूजन झाल्यानंतर 'राष्ट्राय स्वाहा' असे म्हणत अग्निसाक्षीने नूतन वास्तू राष्ट्राला अर्पण करण्यात आली. उपस्थितांना प्रबोधिनीतल्या उपक्रमांची माहिती व्हावी, या दृष्टीने ११ विभागांतील प्रकल्पांचे सादरीकरण योजले होते. सर्व शैक्षणिक विभाग, पूरक शिक्षणातील प्रज्ञा विकास, किशोरी विकास, अंकुर प्रकल्प, मणिपुरी विद्यार्थ्यांचा सहनिवास, विडी कामगार महिलांसाठीचा आरोग्य सखी मंच व पिशवी निर्मिती प्रकल्पाचा यात समावेश होता.

**ज्ञान प्रबोधिनीच्या नूतन अध्यक्षांची निवड :** मा. श्री. सुधाकरपंत परिचारक हे ज्ञान प्रबोधिनी, सोलापूर संस्थेचे पूर्वीचे अध्यक्ष होते. त्यांच्या देहांतानंतर हे अध्यक्षपद रिक्त होते. दि. ६ जाने. २४ रोजी प.पू. स्वामी गोविंददेव गिरी महाराजांनी संस्थेचे अध्यक्षपद स्वीकारले. पूर्वी आचार्य किशोरजी व्यास या नावाने ख्यात असणारे प.पू. स्वामी गोविंद देव गिरी महाराज हे सध्या अयोध्येच्या श्रीराम मंदिराचे कोषाध्यक्ष, मथुरेच्या श्रीकृष्ण मंदिराचे उपाध्यक्ष, गीता परिवार व वेदव्यास प्रतिष्ठानचे संस्थापक सदस्य म्हणून कार्यरत आहेत.

### ❖ पूर्व प्राथमिक विभाग ❖

१. **स्नेहसंमेलन :** प्रभू श्रीरामाचे चरित्र विद्यार्थ्यांना माहीत व्हावे, त्यांच्या ठायी असणारे सद्गुण समजावे, या उद्देशाने या वर्षी १६० विद्यार्थ्यांनी दहा नृत्ये व तीन नाटुकल्या सादर केल्या. प्रार्थना सत्रात रोज एक याप्रमाणे श्रीरामांविषयीची गाणी, नाटुकली व प्रसंग दाखवण्यात आले. यातून विद्यार्थ्यांना श्रीरामांची माहिती मिळाली. विविध नवीन शब्दांची मुलांना ओळख झाली. एक महिना सर्व शिशुशाळा राममय झाली होती. रामायणातील प्रसंग मुले घरी जाऊन पालकांना सांगत होती, असा अभिप्राय पालकांनी मनोगतातून दिला.

२. **राखीपौर्णिमा :** मोठ्या गटातील विद्यार्थ्यांनी शहरातील नऊ शाळांमधील १५४५ विद्यार्थ्यांना राखी बांधली. मुलांबरोबरच मुली, शिक्षिका, मावशी यांनाही राखी बांधून संपूरकतेचा संदेश पोहोचविण्यात आला. यात पालकांनीही सहभाग घेतला.

३. **देण्याचा संस्कार :** दिवाळीनिमित्त १६० विद्यार्थ्यांनी धान्य, सुगंधी तेल, साबण इ. वस्तू यमगरवाडी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना भेट दिल्या. आपल्या आनंदात वंचितांना सहभागी करून घेता आले, याचा आनंद झाला.

४. **खेळ जत्रा :** मनोरंजनाबरोबरच बौद्धिक व कौशल्याधारित १२० खेळांची मांडणी करण्यात आली. विविध प्रकारच्या उड्या, चाली, आकलन, निरीक्षण, कारक, दोन्ही हातांचा

**बालविकास मंदिर प्रशालेतील विद्यार्थ्यांचे २३-२४च्या शालान्त परीक्षेतील यश**

१. उत्तीर्ण विद्यार्थी : १००%
२. ४९ विद्यार्थ्यांना ८०% पेक्षा अधिक गुण
३. चि. कबीर भाकरे हा विद्यार्थी ९७% गुण मिळवून प्रथम

वापर करून घेणे, पंचेंद्रियांवर आधरित खेळ इ. विषयांवर खेळांची रचना करण्यात आली. विद्यार्थी प्रत्येक दालनात खेळ खेळून पुढच्या दालनात उत्साहाने खेळण्यासाठी जात होते. २५० पालकही खेळात सहभागी झाले होते.

५. **आजी-आजोबा कार्यशाळा :** मुलांच्या जडण-घडणीत आजी-आजोबांचा सहभाग महत्त्वाचा असतो त्यामुळे त्यांच्यासाठी कार्यशाळा योजण्यात आली. मानसतज्ज्ञ व समुपदेशक मा. अलकाताई काकडे यांचे या कार्यशाळेस मार्गदर्शन लाभले. १२० आजी-आजोबा सहभागी झाले होते.

६. **कृतिसंशोधन :** या वर्षी वर्गश: चार कृतिसंशोधनाची टिपणे तयार झाली. कारकविकास, निरीक्षण क्षमता, शब्दसंग्रह वाढ व सुदृढ बालकांसाठी निरीक्षण सूची या विषयावर नोंदी व टिपण तयार झाले.

### ❖ प्राथमिक विभाग ❖

१. **राखीपौर्णिमा :** इ.२री तील विद्यार्थ्यांनी म.न.पा. शाळा क्र. ९ मधील विद्यार्थ्यांना राखी बांधून शालेय साहित्य भेट दिले. एकत्र कुटुंब पद्धती जाणून घेण्यासाठी इ. ३रीतील ८० विद्यार्थी वर्गातील एकत्र कुटुंब असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या घरी गेले होते. तेथे त्यांनी घरातील सर्व सदस्यांशी संवाद साधून त्यांना राखी बांधली. इ. ४थीतील विद्यार्थ्यांनी केगाव येतील पोलीस प्रशिक्षण केंद्रातील १०० पोलीस प्रशिक्षणार्थीना व अधिकाऱ्यांना राखी बांधून कृतज्ञता व्यक्त केली. त्यावेळी पोलिसांचे व्यायाम प्रकार, शिस्त, शस्त्रे यांची माहिती विद्यार्थ्यांना मिळाली. डीसीपी वैशाली कडुकर यांनी विद्यार्थ्यांच्या पर्यावरणपूरक राख्यांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी सोप्या भाषेत उत्तरे दिली.

२. **गोकुळाष्टमी :** विद्यार्थ्यांना गोपाळ काल्याची गोष्ट सांगितली. यावेळी विविध कृष्णगीतांनी व धुनींनी उत्साहपूर्ण वातावरणात योगपुष्प व इतर प्रात्यक्षिके सादर केली. यावेळी मुलांच्या व मुलींच्या गटांनी मनोरा रचत दहीहंडी फोडली.

३. **अन्य :** तृणधान्य वर्षानिमित्त तृणधान्यांचे महत्त्व सांगून तृणधान्यांपासून तयार होणाऱ्या, लहान मुलांना आवडतील अशा पदार्थांची माहितीही दिली. दीपावलीनिमित्त विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक आकाशकंदील बनवले तसेच पणत्यांचे रंगकाम केले. श्रीराम सेवेअंतर्गत इ. १ली ते ४थीच्या विद्यार्थ्यांनी एक धागा प्रभू रामचंद्रांसाठी म्हणून हातमागावर वस्त्र विणले.

४. **वारसास्थळांना भेटी :** स्थानिक ऐतिहासिक स्थळांना भेट या उपक्रमांतर्गत सोलापूरातील बलिदान चौक स्मारक, मंगळवार पेठ पोलीस चौकी, हुतात्मा चौक, सोलापूर महानगरपालिका व द्वारकानाथ कोटणीस स्मारक इ. ठिकाणी भेट देऊन त्या ठिकाणांचे महत्त्व सांगण्यात आले.

### ❖ माध्यमिक विभाग ❖

१. **मातृभूमी परिचय सहल :** दि. २७ जुलै ते ६ ऑगस्ट २३ या कालावधीत इ. १०वीतील ७४ विद्यार्थ्यांनी चार गटात महाराष्ट्रातील चार जिल्ह्यांस भेट देऊन १४ लोककला व कलाकारांचा परिचय करून घेतला. पुणे जिल्ह्यातील जेजुरी येथील खंडोबाचा गोंधळ-जागरण, पोवाडा कीर्तन इ. लोककला, तर अंबाजोगाई येथील देवीचा गोंधळ-जागरण, पोवाडा, लळीत इ., कोल्हापूर पन्हाळा येथील वालुग, कैपटनृत्य, हेडाम, बतावणी, धनगरी ओव्या इ. कला, तर सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दशावतार, कठपुतली, लाकडी बाहुल्या तयार करणे इ. कला पाहिल्या. कलांची माहिती, इतिहास जाणून घेताना सध्याच्या काळातील कलाकारांपुढील आव्हानेही जाणून घेतली. आ. संचालकांच्या उपस्थितीत सहलीत घेतलेले अनुभव व निरीक्षणे मांडली.

२. **समाजदर्शन :** सामाजिक जाणीव संवर्धनासाठी दरवर्षी हा उपक्रम योजला जातो. 'सोलापूर परिसरातील लोककला व कलावंताचा परिचय करून घेणे.' असा या वर्षीचा विषय होता. उपक्रमाची पूर्वतयारी म्हणून श्री. वामनराव बावळे (लोककला अभ्यासक) यांचे लोककला संकल्पना व स्वरूप समजावून देणारे मार्गदर्शक व्याख्यान झाले. इ. ५वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांचा समावेश असणाऱ्या ३६ गटांनी दि. १८ ते २२ डिसेंबर २३ दरम्यान लोककला प्रत्यक्ष जाणून घेण्यासाठी सोलापूर परिसरातील लोककलाकारांच्या भेटी घेतल्या. वारकरी कीर्तन, नारदीय कीर्तन, गौळण, भारूड, बोलक्या बाहुल्या, डोंबारी असे कलाप्रकार प्रत्यक्ष पाहिले व कलाकारांना प्रश्न विचारून कलांबद्दल जाणून घेतले. या उपक्रमांतर्गत इ. ५वी ते ९वीच्या विद्यार्थ्यांना डोंबाऱ्याचे साहसी खेळ दाखवण्यात आले.

३. **विद्याव्रत :** विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडवणारा विद्याव्रत उपक्रम प्रशालेत झाला. शारीरिक, मानसिक, बौद्धिक विकसनांतर्गत विविध पैलूंवरील पाच व्याख्याने झाली. आदर्श दिनक्रमाचा अनुभव देणारे तीन दिवसीय निवासी शिबिर हराळी येथे पार पडले. यात विद्यार्थ्यांनी आंनदशाळा प्रकल्पभेट, गटकार्य, श्रमकार्य, नाट्यीकरण, भित्तिपत्रकनिर्मितीचा अनुभव घेतला.

४. **बुद्धिमत्ता संवर्धन कार्यशाळा :** दि. २६ जाने. ते २० मार्च २४ या कालावधीत दूरस्थ माध्यमातून अध्यापकांसाठी या कार्यशाळेचे आयोजन केले. एकूण आठ कार्यशाळांमध्ये

ज्ञान प्रबोधिनीच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या वाच. सुजलताई वाटवे यांनी मार्गदर्शन केले. परिसरातील प्रशालांमधील एकूण १४ अध्यापकांचा यात सहभाग होता.

५. **छोटे सायंटिस्ट :** दि. ९ फेब्रु. २४ रोजी या उपक्रमांतर्गत आंतरशालेय समस्या परिहार स्पर्धा पार पडली. यात सोलापूरातील एकूण १३ शाळांमधील ५२ विद्यार्थी व १० अध्यापकांचा सहभाग होता. यात ज्ञान प्रबोधिनी प्रशालेस प्रथम क्रमांक प्राप्त झाला.

६. **इलेक्ट्रॉनिक्स कार्यशाळा :** तंत्रशिक्षणाची सुरुवात व तंत्रज्ञानाची ओळख होण्यासाठी इ. ८वी व ९वीच्या विद्यार्थ्यांकरिता वर्षभरात सहा इलेक्ट्रॉनिक्स कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये Electronic eye, Dual Lead flasher indicator, Burgiar Alarm इ. विषय हाताळले गेले.

७. **प्रेरणासेतू मार्गदर्शन :** दि. २ सप्टें. २३ ते २ मार्च २४ या कालावधीत झालेल्या एकूण १३ मार्गदर्शन व्याख्यानांतून निनाद कानेटकर, अपूर्वा बर्वे, प्रणव कुलकर्णी, श्रीराम गाडगीळ, कस्तुरी गवळी, शाल्मली पेंडसे, निरंजन रास्ते, अव्दैत देशपांडे, विशाखा पंडीत, जयंत कुलकर्णी यांनी विविध प्रकारच्या क्षेत्रातील करिअरच्या संधींबाबत मार्गदर्शन केले.

## ❖ पूरक शिक्षण कार्यदिशा ❖

१. **प्रज्ञा विकास व किशोरी विकास उपक्रम :** सोलापुरातील विडी कामगार कुटुंबातील मुलामुलींसाठी गेली तीन वर्षे प्रज्ञा विकास व किशोरी विकास वर्ग चालविला जातो. पाच ठिकाणी चाललेल्या या उपक्रमामध्ये इ. ७वी ते १०वीतील १०० मुले व ५० मुली सहभागी होत्या. कृती सत्रांमधून प्रतिभा, कल्पकता, सर्जनशीलतेला चालना देणे, छोट्या खेळांमधून भाषिक प्रज्ञा फुलवणे, प्रयोगातून वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करणे, कोड्यांतून व सरावातून गणिती बुद्धिमत्ता खुलवणे इ. प्रयत्न विकासिकेमध्ये केले जातात. मातीपासून गणेश मूर्ती बनविणे, पर्यावरणपूरक राख्या व आकाशकंदील निर्मिती या कार्यशाळांद्वारे विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलतेला वाव मिळावा, अशी योजना केली होती. नोव्हें. २३ ते फेब्रु. २४ या कालावधीत या गटातील विद्यार्थ्यांसाठी विद्याव्रताच्या पाच कार्यशाळा झाल्या. त्यानंतर दि. २५ फेब्रु. रोजी ९० विद्यार्थी व ४५ विद्यार्थिनींनी विद्याव्रताची दीक्षा घेतली.

२. **अंकुर प्रकल्प :** भटक्या विमुक्तांमधील भिक्षा मागणे व तत्सम कामे करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा प्रकल्प चालविला जातो. यात इ. १ली ते ४थीतील २५ विद्यार्थी येतात. स्वस्तिक नगर, सोरेगाव येथे एका पत्र्याच्या खोलीत ही शाळा चालते. या वर्षी गोपाळकाल्याच्या दिवशी या मुलांनी अक्षरहंडी तयार करून अक्षरओळख पक्की करण्याचा प्रयत्न केला. पोलिस बांधवांना राखी बांधली, दीपोत्सवानिमित्त रंगीत पणत्या व आकाश दिवे तयार केले. शांतीपाठ, कार्यानुभव, लहान विज्ञान प्रयोग, खेळ यातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केला.

ज्ञान प्रबोधिनी सोलापूरचे सहकार्यवाह श्री. अमोल गांगजी यांना जुलै २०२३ मध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाकडून शिक्षणशास्त्र शाखेतून विद्यावाचस्पती पदवी मिळाली. त्यांच्या प्रबंधाचा विषय 'A Study of Educational Culture in the Upanishads and its relevance to present secondary education' (उपनिषदांमधील शैक्षणिक संस्कृतीचा अभ्यास आणि त्याची सध्याच्या माध्यमिक शिक्षणाशी असलेली प्रासंगिकता) हा होता.

## ❖ राष्ट्रीय एकात्मता कार्यदिशा ❖

सातरस्ता परिसरात ज्ञान प्रबोधिनीच्या चैतन्यभुवन वास्तूमध्ये मणिपूरच्या वनवासी भागातील विद्यार्थ्यांसाठी सहनिवास चालविला जातो. या सहनिवासात इ. ५वी ते १०वीचे १४ विद्यार्थी राहतात. हे विद्यार्थी सोलापुरातील गांधी नाथा रंगजी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकत असून, शाळेमध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या गुणांनी चांगली छाप पाडली. विद्यार्थ्यांसाठी संगणक, बुद्धिबळ, संगीत, चित्रकला, फुटबॉल या तासिकाही योजल्या जातात. या विद्यार्थ्यांनी उत्तम क्रीडा यश मिळवले. शालेय बॅडमिंटन स्पर्धेमध्ये या संघाचा जिल्हास्तरीय प्रथम क्रमांक आला, तर सेंट जोसेफ प्रशालेच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवानिमित्त योजलेल्या फुटबॉल स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. सोलापूर फुटबॉल क्लबतर्फे झालेल्या फुटबॉल स्पर्धेत ग्रॅम्मिलीन या विद्यार्थ्यास उत्कृष्ट खेळाडू म्हणून पारितोषिक मिळाले.

पेटी, तबला, व्हायोलीन, बासरी, सतार इ. वाद्यांसह गायनाचे प्रशिक्षण या विद्यार्थ्यांना आठवड्यातून तीन तास दिले जाते. आषाढी एकादशीला भजन उपासनेचा त्यांनी अनुभव घेतला. तसेच उज्जैन पिठाचे जगद्गुरू सिद्धलिंगराज शिवाचार्यजी यांच्यासमोर लिंगाष्टकम् सवाद्य सादर केले.

मुलांची सोलापूर मधल्या कुटुंबांशी नाळ जुळावी, यासाठी राखीपौर्णिमा, दिवाळी व मकर संक्रांत हे तीन सण विशेषत्वाने साजरे केले. प्रशालेतील सात विद्यार्थिनींच्या घरी या विद्यार्थ्यांनी रक्षाबंधनाचा सण साजरा केला. दिवाळीमध्ये ही मुले विविध कुटुंबात राहतील अशी योजना केली होती. अभ्यंगस्नान, लक्ष्मीपूजन, फराळाचा आस्वाद, फटाके फोडणे, आकाशकंदील लावणे, किल्ला बनविणे, पतंग उडवणे इ. अनुभवांसह तेथील मुलांशी त्यांची मैत्री झाली. मकरसंक्रांतीला विद्यार्थ्यांनी चैतन्यभुवन शेजारील अपार्टमेंटमध्ये घरोघर जाऊन तिळगुळ दिला व आपले स्नेहबंध दृढ केले.

## ❖ स्त्री-शक्ती प्रबोधन कार्यदिशा ❖

१. **विडी कामगार महिलांसाठी प्राणायाम वर्ग :** विडी कामगार महिलांचे आरोग्य सुधारावे, त्यांचे संघटन व्हावे यासाठी प्राणायाम वर्ग चालविले जातात. सोलापुरातील सहा ठिकाणी चालणाऱ्या वर्गांत ३००हून अधिक विडी कामगार महिला सहभागी आहेत. या वर्षी आषाढी एकादशी भजन उपासनेत ३० महिलांनी सोलापुरातील विविध ठिकाणच्या भजन उपासनेमध्ये सहभागी होऊन भक्तिरस अनुभवला. निरक्षर महिलांनी स्वतः मागणी करून प्रौढ साक्षरता वर्गात सहभाग नोंदवला. त्यातील पाच जणी वाचायला शिकल्या. दि. ४ व ५ सप्टें. रोजी या वर्गातील महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली. चार प्रभागांमध्ये रक्तदान शिबिराचे देखील आयोजन करण्यात आले. यात एकूण ३३ सदस्यांनी रक्तदान केले. रक्तदानाबद्दल मनात असलेली भीती दूर करून सामाजिक जाणीव संवर्धनाच्या हेतूने हा उपक्रम घेण्यात आला. विडी घरकुल भागात शासकीय योजनांची माहिती देणारी दोन तासांची कार्यशाळा झाली. विविध क्षेत्रांतील उद्योगांच्या संधी यानिमित्ताने महिलांना नव्याने कळल्या. सोलापूर प्रबोधिनीतील माजी विद्यार्थ्यांचा समावेश असणाऱ्या डॉक्टर गटाकडून वर्गातील महिलांसाठी आरोग्य शिबिर झाले. दि. १६ मार्च रोजी ३४२ महिलांचा एकत्रित मेळावा झाला. सोलापूर जिल्हा योग संजीवनीची २२ महिलांनी प्रथम परीक्षा व १३ महिलांनी द्वितीय परीक्षा दिली. वरील सर्व उपक्रमांसह गणेशोत्सव, विजयादशमी, श्रीराम प्रेरणासोहळा, तंबू शिबिर, नवीन गटांमध्ये प्रशिक्षक म्हणून जाणे, या उपक्रमांमध्ये वर्गातील महिला सहभागी होत आहेत.

२. **संवादिनी :** या गटात एकूण २० महिला सदस्य असून मासिक बैठक, गप्पा कट्टा, दासबोध अभ्यास, सामाजिक कार्यांना भेटी, कर्तृत्ववान व्यक्तींच्या भेटी, गटचर्चा, मेळावा, अभ्यास सहली, प्रबोधिनीच्या केंद्रीय योजनांमध्ये जबाबदारी इ. मध्ये गटातील महिला सहभागी होतात. सावरकर विचार आजही मार्गदर्शक आणि अनुकरणीय, समर्थ रामदास यांनी गुरू म्हणून केलेले कार्य, महिला आरक्षण विधेयक, प्रबोधिनीच्या कर्नाटकातील विस्तार कार्याविषयी माहिती असे विषय बैठकीत झाले. शाळेतील पालिकांसाठी मेळावा आयोजित केला होता. त्यात सुमारे ३५ जणी सहभागी झाल्या. नवरात्रात भोंडला आणि संक्रांतीला तिळगुळ समारंभ साजरा केला. जानेवारी महिन्यात हराळी केंद्राला ११ सदस्यांनी भेट दिली. आधुनिक नवरात्रात महिला आरक्षण विधेयकाचा अभ्यास सर्वांनी केला. दर बुधवारी नियमित दासबोध वाचन झाले. गटातील चार जणींनी दासबोध अभ्यास करून परीक्षा दिल्या आणि त्यात यश मिळवले. ज्योतीताई कुलकर्णी यांनी मनोबोध विशारद हा अभ्यासक्रम पूर्ण केला. श्रीसमर्थ सेवा मंडळ संचलित श्रीसमर्थ शिष्य योगीराज कल्याणस्वामी पारितोषिक त्यांना मिळाले.

३. **हिरकणी प्रकल्प :** बालकांचा ० ते ६ हा वयोगट त्यांच्या शारीरिक विकासाबरोबरच मूलभूत कौशल्य, बौद्धिक व मानसिक विकासासाठी संवेदनशील असतो. बालकांच्या विकासात मातांचा सहभाग कसा असावा, याचे मार्गदर्शन या प्रकल्पातून केले जाते. सोलापुरात सध्या प्रकल्पाचे तीन गट कार्यरत असून सहा मार्गदर्शिका आहेत. घरातील उपलब्ध साधनांचा मुलांच्या विकासासाठी वापर करण्याचे तंत्र शिकवणारा हा प्रकल्प महत्त्वाचा व अनोखा आहे. या वर्षी एप्रिल व सप्टेंबर महिन्यामध्ये प्रत्येकी दोन दिवसांची दोन प्रशिक्षण शिबिरे झाली. यात एकूण ९०हून अधिक महिला सहभागी झाल्या होत्या. बालकांचा बौद्धिक विकास, शारीरिक विकास, सौंदर्यदृष्टी आणि कारक कौशल्यांच्या विकासासाठीची सत्रे योजली होती. सहभागी मातांना प्रेरणा देऊन प्रमाणपत्रे दिली.

४. **कापडी पिशवी निर्मिती प्रकल्प :** गेली तीन वर्षे सोलापुरात विडी कामगार महिलांना पिशवी निर्मितीचे प्रशिक्षण दिले जात आहे. या प्रकल्पाने विडी कामगार महिलांना आरोग्यदायी व सन्मानजनक पर्यायी रोजगार उपलब्ध करून दिला आहे. गेल्या वर्षभरात १२ महिलांनी चिकाटीने शिलाईचे प्रशिक्षण घेतले. या सर्व महिलांना शिलाई मशीन भेट म्हणून देण्यात आली. आत्तापर्यंत या प्रकल्पातून नऊ लाख कापडी पिशव्यांची निर्मिती झाली असून, अडीच लाख कागदी पिशवी निर्मिती झालेली आहे. वर्षभरात सुमारे ८८ लक्ष रुपयांची उलाढाल झाली.

## ❖ सत्संगसुधा व पौरोहित्य ❖

दर रविवारी सायंकाळी तासभर आध्यात्मिक विषयांवर प्रवचन, शिवाय वर्षभर प्रबोधनपर विविध कार्यक्रम असणारा सत्संग गट गेली ३३ वर्षे साधकांना मार्गदर्शक ठरत आहे. गुरुपौर्णिमेनिमित्त दि. २२ जुलै २३ रोजी स्वामी माधवानंद यांचे उत्तराधिकारी श्री. गजानन नाटेकर यांचे 'वंदन भक्ती' या विषयावर निरूपण झाले. वाच. अमोल गांगजी यांनी सत्संगात दृक्श्राव्य पद्धतींचा वापर करत ईशावास्य उपनिषदाचा अभ्यास मांडला. दि. ११ फेब्रुवारी रोजी ब्रह्मवादिनी सौ. जयश्रीताई सांगवीकर यांच्या उपस्थितीत ईशावास्य उपनिषद रसग्रहण कार्यक्रम झाला. संस्थेचे उपाध्यक्ष व शरण साहित्याचे अभ्यासक वाच. इरेशजी स्वामी यांनी बसवेश्वर व इतर संतांच्या साहित्यातील समाजामध्ये सद्गुण रुजवणारी वचने या विषयावर दोन सत्रांमधून बोधप्रद प्रवचने केली.

केंद्रात गेल्या २७ वर्षांपासून पौरोहित्य विभाग देखील कार्यरत आहे. अर्थवाही व कालानुरूप संस्कार विधी या विभागाद्वारे केले जातात. या वर्षभरात देखील विभागाने अनेक संस्कार पार पाडले.




# २३. ज्ञान प्रबोधिनी, हराळी केंद्र

हराळी केंद्रावर निवासी माध्यमिक विद्यालय आणि कृषी पदविका विद्यालय असे दोन विभाग अनेक वर्षं कार्यरत आहेत. केंद्रावरील शेतीतही नवनवे प्रयोग सुरू असतात. गेल्या दोन वर्षांत विद्यालयात पूर्व प्राथमिक आणि प्राथमिक वर्गांची भर पडली आहे. पूरक शिक्षण, प्रदेश विकसन, स्त्री-शक्ती प्रबोधन, युवशक्ती प्रबोधन या कार्यदिशांनी परिसरातील सुमारे ३० गावांत आणि २० तांड्यांवर कामे चालू आहेत. गेले वर्ष दुष्काळी स्थितीचे होते. जवळजवळ सरासरी पेक्षा निम्मा पाऊस कमी झाला. तरीही सर्व विभागांचे उपक्रम सुरू राहिले. दर वर्षीप्रमाणे आषाढी एकादशी, गणेशोत्सव असे सणही एकत्र साजरे झाले. प्रत्येक विभागात भवितव्य लेखाला समोर ठेवून काम पुढच्या टप्प्याला नेण्याचा प्रयत्न सर्व कार्यकर्त्यांनी केला.

## ❖ ग्रामगीता अभ्यास शिबिर ❖

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या काळात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी लिहिलेल्या ग्रामगीता या ग्रंथात महात्मा गांधींचे सर्वोदयाचे तत्त्वज्ञान, संत गाडगे महाराजांचे रोकडे अध्यात्म आणि तुकडोजी महाराजांची कलात्मक दृष्टी यांचा संगम दिसून येतो. त्यात वर्णन केलेली ग्रामीण भागाच्या दयनीय अवस्थेची कारणे आणि त्यावर सुचवलेला सर्वांगीण ग्रामविकासाचा उपाय आजही तंतोतंत लागू पडताना दिसतो. गावाचा विकास म्हणजे फक्त भौतिक सुविधांचा विकास नाही, हे लक्षात घेऊन हराळीतील कार्यकर्त्यांनी सर्वांगीण ग्रामविकास या संकल्पनेचा अभ्यास करण्याचे ठरवले. त्याची सुरुवात म्हणून या वर्षी केंद्राच्या २५ कार्यकर्त्यांचे ग्रामगीता अभ्यास शिबिर दि. १८ ते २० नोव्हेंबर २३ या काळात तुकडोजी महाराजांच्या कर्मभूमीत अमरावती जिल्ह्यात आयोजित करण्यात आले होते. गटचर्चा, स्वयंअध्ययन, सादरीकरण, परिसंवाद अशा माध्यमांतून अभ्यास करण्यात आला. संचालक वाच. गिरीशराव बापट या शिबिरासाठी पूर्ण वेळ उपस्थित होते.

## ❖ प्रबोधन औजारे बँक ❖

केंद्राच्या नियमित उपक्रमांच्या शिवाय या वर्षी नव्याने सुरू झालेला वेगळा उपक्रम म्हणजे प्रबोधन औजारे बँक! गेली तीन दशके दक्षिण मराठवाड्याच्या ग्रामीण भागात काम करत असताना या भागातील शेती, फायदेशीर आणि शाश्वत कशी करता येईल याबाबत केंद्रात सतत विचार चालू असतो. शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढवणे, त्याच्या योग्य वापराच्या व्यवस्था बसवणे, याच्या जोडीने शेतीतील आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराबाबतची उदासीनता आणि कुशल मनुष्यबळाची कमतरता या प्रश्नांवरही काम करणे गरजेचे आहे, असे लक्षात आले. जर ग्रामीण युवकांनी यंत्रांच्या साहाय्याने किफायतशीर दरात शेतीची कामे करून दिली तर शेतकऱ्याचा उत्पादनखर्च कमी होतो व स्थानिक युवकांना चांगला रोजगारही मिळू शकतो. या पार्श्वभूमीवर 'प्रबोधन औजार

**विद्यालयातील विद्यार्थ्यांचे २३-२४च्या शालान्त परीक्षेतील यश**

१. उत्तीर्ण विद्यार्थी : १००%

२. २९ विद्यार्थ्यांना ८०% पेक्षा अधिक गुण

३. चि. वेदांत देशपांडे हा विद्यार्थी ९६% गुण मिळवून प्रथम

बँकेची' संकल्पना प्रत्यक्षात आली. रोटरी क्लब (डिस्ट्रिक्ट ३१३२) व रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन यांनी मिळून रोटरी इंटरनॅशनलच्या ग्लोबल ग्रँट या योजनेअंतर्गत या प्रकल्पास अर्थसाहाय्य दिले. हराळीच्या परिसरातील सर्वसामान्य शेतकऱ्यांना आधुनिक औजारे सुलभपणे आणि योग्य दराने मिळावीत ही भूमिका यामागे आहे. यामध्ये ३३ वेगवेगळ्या प्रकारची एकूण ५९ औजारे आणि शेतीसाठी लागणारी साधने उपलब्ध करून दिली आहेत.

### ❖ प्राथमिक व माध्यमिक विद्यालय ❖

ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षणाची दयनीय अवस्था बघता २०-२१ पासून केंद्रात पूर्व-प्राथमिक आणि प्राथमिक शाळेचे वर्ग नव्याने सुरू केले. सीएस्आर मधून मिळालेल्या अर्थसाहाय्यातून या वर्षी 'हसरे पक्षी' बालवाडीसाठी टुमदार कौलारू वास्तू उभी राहिली. या भागातील मुलांच्या विशेष गरजा लक्षात घेऊन, मूलभूत साक्षरतेच्या शिक्षणपद्धतीत काही बदल केले. बालवाडीत शब्दाचा पहिला आवाज व शेवटचा आवाज ओळखण्याच्या खेळामुळे श्रवण अचूक व्हायला मदत झाली. अक्षरओळख आणि अंकज्ञान अचूक व्हावे, यासाठी परिसरातील वस्तूंचा वापर करून समज पक्की करून घेण्यात आली. इ. १ली व २रीत सर्व मुलांना वाचता यावे, यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. मराठीच्या जोडीने फोनिक्स तंत्राच्या मदतीने मुले इंग्रजीही शिकू लागली. वर्गमांडणीच्या उपक्रमातून मुले शिकलेल्या गोष्टींची उजळणी आणि सराव स्वतःहून करायला शिकली. नियमित अभ्यासक्रमाच्या जोडीने वर्षभरात आषाढीची दिंडी, रक्षाबंधन, दहीहंडी, गणेशोत्सव, दसऱ्याचे पाटीपूजन, दिवाळी मेळावा असे पारंपरिक व राष्ट्रीय सण मोठ्या उत्साहाने साजरे झाले. त्यातून मुलांना भारतीय संस्कृतीचा परिचय झाला आणि सणांमागचा विचार त्यांच्यापर्यंत पोहोचला.

माध्यमिक विद्यालयातही या वर्षी क्रमिक शिक्षणाच्या जोडीने इतर अनेक उपक्रम झाले. ग्रामीण विद्यार्थ्यांना विज्ञान तंत्रज्ञानाकडे पाहण्याची वेगळी दृष्टी मिळावी यासाठी इ. ८वी आणि ९वीच्या विद्यार्थ्यांसाठी 'विज्ञान पत्रकारिता उपक्रम' घेण्यात आला. सध्या अमेरिकेत उच्चशिक्षण घेत असलेला आपला कार्यकर्ता अक्षय केदारी याने त्याच्या विद्यापीठाच्या मदतीने हा उपक्रम घेतला. त्यामध्ये विद्यार्थ्यांना त्यांच्या आजूबाजूला दिसणाऱ्या तंत्रज्ञानाशी संबंधित समस्यांचा अभ्यास करायला आणि त्याची लेख स्वरूपात मांडणी करायला शिकवण्यात आले. त्यासाठी गटात काम आणि विचार करायलाही शिकवण्यात आले. गटाने मिळून विषय व त्याचे विविध पैलू ठरवणे, त्याबाबतची माहिती मिळवणे, माहितीची छाननी करणे, मुलाखती / सर्वेक्षणासारखी तंत्रे वापरून प्रत्यक्ष लोकांकडून माहिती गोळा करणे व तिचे विश्लेषण करून निष्कर्ष काढणे आणि त्याच्या आधारे लेख तयार करून तो ब्लॉग स्वरूपात प्रकाशित करणे, ही कामे मुलांनी केली. प्रत्येकी सात-आठ लेखांचे दोन अंक यातून तयार झाले.

इ. ७वी ते ९वीतील विद्यार्थ्यांसाठी शेती विषयाच्या नियमित तासिका योजण्यात आल्या. त्यामुळे मुले सेंद्रिय शेतीतील अनेक तंत्रे शिकली. अटल लॅब मध्ये मुलांनी अनेक प्रकल्प केले. 'छोटे सायंटिस्ट' उपक्रमांतर्गत आयोजित 'वी सॉल्व' या अभिनव समस्या परिहार स्पर्धेत विद्यालयाच्या संघांनी उत्तम प्रदर्शन केले. छात्र प्रबोधन आयोजित अभिवाचन स्पर्धेत भाग घेऊन विद्यालयातील मुलांनी बक्षीस मिळवले. तसेच छात्र प्रबोधनने घेतलेल्या कुमार साहित्य संमेलनातही मुले उत्साहाने सहभागी झाली.

ज्ञान प्रबोधिनीच्या शिक्षण पद्धतीचा गाभा असलेला विद्याव्रत संस्कार व त्यासाठीची पूर्वतयारी करून घेण्यात आली. गेल्या दोन वर्षांपासून इ. ५वीसाठी विद्यारंभ संस्कारही योजला जातो. या वेळी विद्यारंभ कार्यक्रम ऑगस्ट महिन्यात घेण्यात आला आणि त्यानंतर वर्षभर मुलांसाठी नियमित तासिका / सत्रे / उपक्रम घेण्यात आले.

### ❖ कृषी विद्यालय ❖

अनुभव शिक्षण हा कृषी शिक्षणाचा पाया असून त्यात गेली अनेक वर्षं विविध प्रयोग करून पाहिले जात आहेत. या वर्षी मुलांनी रेशीम उद्योग, गांडूळ खतनिर्मिती आणि नाचणीचे पदार्थ बनवून विक्री करणे या कृषी उद्योगांचा अनुभव घेतला. दोन महिन्यांच्या कालावधीत मुलांना उद्योगाचे नियोजन, भांडवल उभारणे, वस्तू निर्मिती, मालाची किंमत ठरवणे आणि विक्री अशा पूर्ण उद्योगचक्राचा अनुभव मिळाला.

शेती क्षेत्रातील घडामोडींचा आवाका यावा, यासाठी या वर्षी लातूर येथील गळीत धान्य संशोधन केंद्र व आधुनिक रोपवाटिका, कावळेवाडी येथील यशस्वी शेळीपालन उद्योग, धाराशिव येथील कृषी महोत्सव, लाकडी तेल घाणा, कुक्कुटपालन, मुरूम येथील कृषी उत्पन्न बाजार समिती इ. ठिकाणी विद्यार्थ्यांच्या भेटी आयोजित करण्यात आल्या होत्या. मुलांनी कृषी उद्योगांमधील अनेक यशस्वी उद्योजकांच्या मुलाखती घेतल्या. या वर्षी पहिल्यांदाच कृषी विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी तंबू शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. नळदुर्ग जवळील रामतीर्थ या निसर्गरम्य ठिकाणी झालेल्या या शिबिरातून मुलांना खूप काही शिकायला मिळाले.

### ❖ शेती आणि शेती विस्तार उपक्रम ❖

हे वर्ष दुष्काळाच्या सावटाखाली गेले. पाऊस उशिरा झाल्याने पेरण्याही उशीरा झाल्या. दरवर्षीच्या तुलनेत ५०% पेक्षा कमी

पाऊस झाल्याने खरीप हंगामाच्या पीक उत्पादनात घट झाली आणि रबी हंगामात पेरण्याही कमी झाल्या.

१. शेती क्षेत्रावर यंदा आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्षाच्या निमित्ताने केंद्रावरच्या प्रयोग क्षेत्रावर राजगिरा, नाचणी, बाजरी, राळा, सावा, वरई, भगर, कोदो, इ. पिकांची लागवड करून चांगले उत्पादनही घेतले.
२. शेती निविष्ठा विक्रेत्यांसाठी DAESI अभ्यासक्रमाची दुसरी तुकडी दि. २९ मार्च २३ रोजी सुरू झाली. वर्षभर नियमित साप्ताहिक तासिका आणि अभ्यास सहली पार पडल्या.
३. मे २३ मध्ये धाराशिव जिल्हा सेंद्रिय शेती समिती आणि हराळी केंद्र यांचा एकत्र सेंद्रिय शेती मेळावा झाला. सेंद्रिय शेतीचे महत्त्व, जमिनीचे - शेतकऱ्यांचे आरोग्य, बांधावरील वृक्ष लागवड, निविष्ठा तयार करणे याबाबत मार्गदर्शन झाले.
४. सोयाबीनच्या बाजारात उपलब्ध बियाणाची गुणवत्ता तपासण्यासाठी एक प्रयोग म्हणून ६१ बियाणे नमुन्यांची उगवण क्षमता शास्त्रीय पद्धतीने काढण्यात आली आणि ती माहिती सर्वांसाठी उपलब्ध करून देण्यात आली.
५. बायर व सॅलिक्रॉप या कंपन्यांनी विकसित केलेल्या टोमॅटोच्या सुधारित वाणाची क्षेत्रचाचणी (Field Trial) लातूर जिल्ह्यात घेण्यात आली. ज्ञान प्रबोधिनी परिवारातील डॉ. ऋचा गोडबोले यांच्या माध्यमातून या चाचणीच्या नोंदी घेण्याचे काम कृषी विद्यालयाला मिळाले. ऑक्टो. २३ ते मार्च २४ या काळात शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या एका गटाने ३० हून अधिक क्षेत्रभेटी केल्या आणि सविस्तर नोंदी घेतल्या. शेती संशोधनातील क्षेत्रचाचणीचा चांगला अनुभव सहभागी शिक्षक आणि विद्यार्थ्यांना मिळाला.
६. हराळी पंचक्रोशीतील शेतकऱ्यांना सूक्ष्म जिवाणू / बुरशीजन्य खते, औषधे सहज उपलब्ध व्हावीत, या उद्देशाने कृषी विद्यालयात या वर्षी 'बांधावरची प्रयोगशाळा' हा प्रकल्प नव्याने सुरू करण्यात आला. दि. २९ ऑगस्ट २३ रोजी ज्ञान प्रबोधिनी कृषी विद्यालय हराळी आणि एसीआयसी ज्ञान प्रबोधिनी इनोव्हेशन फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमाची सुरुवात झाली. सध्या ट्रायकोडर्मा आणि मायकोरायझा या दोन उपयुक्त बुरशीची वाढ करून त्याचे पिकावरील परिणाम बघण्यासाठी प्रयोग सुरू आहेत.

### ❖ प्रदेश विकसन ❖

१. सुपतगाव आणि सालेगाव येथे लोकसहभागातून चार इनलेट-आऊटलेट शेततळी तयार करण्यात आली. त्यासाठी रमा-पुरुषोत्तम फौंडेशनची मदत मिळाली.
२. रोटरी क्लब ग्लोबल ग्रांट प्रकल्पाच्या अंतर्गत तोरंबा, उदतपूर, सय्यद हिप्परगा आणि सालेगाव या गावांमध्ये ३५ विहिरींचे खोलीकरण करण्यात आले. तसेच जनावरांसाठी पाणी पिण्याचे २५ हौद देण्यात आले आणि दोन गावांमध्ये फेरोसिमेंट टाक्या श्रमदानातून बांधण्यात आल्या. या प्रकल्पाच्या लोकार्पणाचा कार्यक्रम दि. १७ जून २३ रोजी करण्यात आला.
३. तज्ज्ञ भूजल अभ्यासकांच्या मार्गदर्शनाखाली या वर्षी तीन गावांचे भूजल आराखडे बनवण्याचे काम चालू आहे. या निमित्ताने या गावांमधील जलदूतांसोबत वर्षभर काम झाले.
४. तसेच ACWADAM संस्थेबरोबर धाराशिव जिल्ह्यातील चार गावांमध्ये पिण्याच्या पाण्याच्या गुणवत्तेसंदर्भात एक नवीन प्रकल्प सुरू झाला.

### ❖ पूरक शिक्षण ❖

पूरक शिक्षण विभागात विकासिका व आनंदशाळा या दोन प्रकल्पांचं काम वय वर्षे ६ ते १२ या वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी चालते. ज्ञान प्रबोधिनीचे वैशिष्ट्यपूर्ण शैक्षणिक प्रयोग त्यामुळे समाजातील एकूण १२०० विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचले. विकासिका प्रकल्प परिसरातील आठ गावांत तर आनंदशाळा प्रकल्प २० तांडे व एक वस्ती अशा २१ ठिकाणी सुरू आहे. त्यात एकूण ४५ स्थानिक ताई-दादा आणि सात समन्वयक नियमितपणे काम करत आहेत.

**१. विकासिका :** या प्रकल्पात मूलभूत साक्षरता हे उद्दिष्ट ठेवून इ. १ली ते ४थी साठी भाषा व गणित विषयांच्या उपयोजनात्मक अभ्यासक्रमाची रचना बसवली आहे. तीन प्रतिसादी गावांत इ. ५/६वीचे वर्ग सुरू झाले आणि तिथे प्रकल्पाधारित शिक्षण देण्याचा प्रयत्न झाला. मुलांचे भावविश्व अभ्यासक्रमाशी कसे जोडून घेता येईल असा विचार करून सत्रांची रचना केल्यामुळे मुलांचा उत्साह टिकून राहायला मदत झाली. ज्ञान प्रबोधिनीच्या शैक्षणिक साधन केंद्राने आनंदी शिक्षण प्रकल्पांतर्गत तयार केलेल्या चित्रफितींच्या मदतीने अवघड संकल्पना सोप्या करून सांगता आल्या आणि मुलांना अभ्यासाची गोडी लागली.

**२. आनंदशाळा :** ऊसतोड कामगारांच्या तांड्यांवरील मुलांना शिक्षणाची गोडी लावण्याच्या उद्देशाने सुरू झालेला हा प्रकल्प आज २० लमाण तांडे व एका मसणजोगी वस्तीमध्ये सुरू आहे. शिक्षणापासून वंचित असलेल्या समाजगटात त्यामुळे शिक्षणाचे वारे वाहायला लागले. मुले आनंदशाळेत येती, टिकती आणि रमती झाली. 'गोरमाटी' बोलीभाषा असणाऱ्या या मुलांना मराठी शिकणे हे एखादी नवीन भाषा शिकण्याइतकेच कठीण जाते, याचे भान ठेवून आनंदशाळेच्या अभ्यासक्रमाचे नियोजन केले. शिकवणारे सर्व ताई-दादा त्याच समाजातून असल्यामुळे संकल्पना समजावून सांगण्यासाठी किंवा संवाद साधण्यासाठी सहजच बोलीभाषेचा वापर केला जातो. आनंदी शिक्षण प्रकल्पातील चित्रफितींचा वापर या प्रकल्पातही केला जातो. त्यामुळे मुलांमध्ये लक्षणीय प्रगती दिसून येत आहे.

३. **छात्र प्रबोधन दिवाळी अंक विक्री :** या वर्षी केंद्रातर्फे छात्र प्रबोधन मासिकाच्या दिवाळी अंकाच्या विक्रीसाठी अभियान करण्याचे ठरले. त्या निमित्ताने जिल्ह्यातील २० हून अधिक शाळांमध्ये भेटी देण्यात आल्या आणि सुमारे ४५० अंकांची नोंदणी झाली. दिवाळीपूर्वी सर्व ठिकाणी अंक पोहोचवण्यात आले. जास्त नोंदणी झालेल्या चार शाळांमध्ये नंतर वाचक मेळावे घेण्यात आले. या पार्श्वभूमीवर दि. २७ फेब्रु. २४ रोजी छात्र प्रबोधनच्या मदतीने केंद्रावर कुमार साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले होते. या संमेलनात हराळी विद्यालयातील आणि आजूबाजूच्या शाळांमधील एकूण २५० विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

### ❖ स्त्री-शक्ती प्रबोधन ❖

या कार्यदिशेच्या अंतर्गत किशोरी विकास आणि जास्वंद कौशल्य प्रशिक्षण वर्ग हे दोन्ही प्रकल्प किशोरी आणि युवतींसाठी चालू आहेत. किशोरी विकास प्रकल्पात क्रीडा महोत्सव, किशोरी मेळावे आणि केंद्र भेटी असे वर्षभरात काही विशेष उपक्रम झाले. युवतींसाठीच्या जास्वंद कौशल्य विकसन वर्गामध्ये या वर्षी शिवण विषयातील प्रगत वर्ग पूर्ण होऊन त्यातील काही युवती स्वयंरोजगाराकडे वळल्या.

या वर्षात नव्याने ० ते ६ वयोगटातील मुलांच्या मातांसाठीच्या हिरकणी प्रकल्पाची भर पडली. हिप्परगा, हराळी आणि करवंजी अशा तीन गावांतील साधारण ४५ महिलांच्या पर्यंत या उपक्रमाच्या द्वारे पोहोचू शकलो. हराळी केंद्रावरील जबाबदार महिला सदस्यांचा बचत गट सुरू झाला, आनंदशाळा आणि विकासिका प्रकल्पातील महिला सदस्यांच्या नियमित द्वैमासिक बैठकी घेण्यात आल्या. याशिवाय काही प्रासंगिक उपक्रमही वर्षभरात घेण्यात आले.

### ❖ युवक विभाग ❖

या वर्षी हराळी केंद्र आणि करवंजी गाव येथील नियमित दलांच्या जोडीने सय्यद हिप्परगा येथे विस्तार दल सुरू झाले. गणेशोत्सवात युवक विभागाने परिसरातील नऊ गावांमध्ये शिस्तबद्ध मिरवणुकीचे प्रात्यक्षिक केले. दिवाळीच्या निमित्ताने युवक दलातील आठ युवकांनी उद्योजकता प्रशिक्षणाचा भाग म्हणून लोहारा शहरात आकाशकंदील विक्रीतून ६३ हजारांची उलाढाल केली. दि. ९ ते ११ जून २३ दरम्यान माजी विद्यार्थी गटाचा मेळावा झाला. यावेळी प्रतिज्ञाग्रहण कार्यक्रमात १० युवकांनी प्रथम तर एकाने द्वितीय प्रतिज्ञा घेतली. दि. ९ ते १५ फेब्रु. २४ दरम्यान भारत महाविद्यालय, माकणी येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर केंद्रावर झाले.

### ❖ युवती विभाग ❖

या वर्षी हराळी आणि करवंजी गावांमध्ये साप्ताहिक दल सुरू होते. नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने तोरंबा, माकणी, हराळी, लोहारा, सुपगाव या गावांमध्ये बर्ची प्रात्यक्षिके, देवीस्तोत्र व नृत्य सादरीकरण करण्यात आले. ज्यात ५० युवती सहभागी होत्या.

डिसेंबर महिन्यात तुळपुळे ट्रस्टच्या माध्यमातून पाटील तांडा आणि अंबरनगर तांडा या दोन तांड्यांवर प्रत्येकी २५ मुलींना शाळेत जाण्यासाठी सायकली देण्यात आल्या. त्यामुळे त्यांची रोजची सुमारे १० किमीची पायपीट वाचली.

### प्रतिसादासाठी जाहीर आवाहन

२०२५-२६ हे हराळी केंद्राचे त्रिदशकपूर्तीचे वर्ष असेल. गेल्या ३० वर्षांत हराळी केंद्राची वाटचाल भूकंपग्रस्तांच्या पुनर्वसनापासून ते ग्रामीण भागातील शैक्षणिक प्रयोग, ग्राम विकसनातील नवनवीन आयाम, कौशल्य विकसन आणि उद्योजकता प्रशिक्षण याकडे सुरू आहे. यामध्ये अनेक सुहृदांकडून आणि संस्थांच्या माध्यमातून अर्थसाहाय्य आणि अन्य मदत लाभलेली आहे. त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करतानाच, येत्या काळातील विविध उपक्रमांसाठी लागणाऱ्या मदतीसाठी सर्व स्नेहीजनांना काही आवाहन करत आहोत.

१. **वेळ देणे :** इथल्या विविध शैक्षणिक उपक्रमांत साधनव्यक्तींची सतत गरज भासत असते. अभ्यासक्रमाला पूरक साहित्य तयार करणे आणि मुलांना वेगवेगळी कौशल्ये शिकवणे यासाठी जर आपण प्रत्यक्ष अथवा दूरस्थ पद्धतीने वेळ देऊ शकत असाल तर त्याचा आम्हाला निश्चित उपयोग होईल. युवतींना रोजगारक्षम बनवण्यासाठी वेगवेगळी कौशल्ये शिकवण्यातही आपण मदत करू शकता.

२. **शालेय शिष्यवृत्ती योजना :** आपल्या हराळी येथील शाळेत सुमारे २५० विद्यार्थी निःशुल्क शिक्षण घेत असतात. त्यावर प्रति विद्यार्थी सुमारे रु. २०,०००/- इतका खर्च होतो. आपण एक किंवा अधिक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व घेऊ शकता. तसेच उपेक्षित समाजगटांतील सुमारे ६० विद्यार्थ्यांच्या निवास-भोजनाची व्यवस्थाही आपण निःशुल्क करत असतो. त्याचा खर्च प्रत्येकी रु. २५,०००/- इतका येत असतो. त्यासाठीही आपण मदत करू शकता.

३. **पूरक शिक्षण उपक्रम :** सध्या २५ ठिकाणी सुरू असलेला आनंदशाळा-विकासिका हा वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम पुढील काही वर्षांत ५० गावे आणि तांड्यांवर २,००० विद्यार्थ्यांपर्यंत न्यायचा आहे. एका आनंदशाळेचा वार्षिक खर्च सुमारे रुपये १.७५ लक्ष इतका असतो. सीएसआर आणि देणग्या या माध्यमातून हा खर्च दरवर्षी उभा करण्यासाठी आपण मदत करू शकता.

(संपर्क क्र. : ८८८८०२६३८, ८८८८०२६४४)



## २४. ज्ञान प्रबोधिनी, साळुंब्रे उपकेंद्र

### ❖ डेरवण अभ्यासदौरा ❖

दि. ८ ते १० जून २३ दरम्यान पाच शिक्षकांचा अभ्यासदौरा डेरवण येथे झाला. श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटेबल ट्रस्ट डेरवण, ता. चिपळूण. जि. रत्नागिरी ही सामाजिक संस्था यावेळी पाहिली. या संस्थेतील विद्यालय, विद्यार्थ्यांच्या कौशल्यातून विविध उत्पादने तयार करणे, विद्यार्थी गुणवत्ता, शिस्त, आत्मीयता, स्वच्छता, वास्तूची विशिष्ट रचना, रुग्णालय, सामाजिक संपर्क व गरिबांविषयी आस्था, स्त्रियांसाठी विविध आरोग्य विषयक योजना, शिबिरे, सर्व सुविधांनी युक्त क्रीडांगण, स्टेडियम, नर्सिंग कॉलेज, सुसज्ज ग्रंथालय, शिवसृष्टी इ. द्वारे पूर्ण भारतभर व परदेशी केले जाणारे काम अनुभवता आले.

### ❖ ग्राम प्रबोधिनी विद्यालय ❖

१. **गणेशोत्सव :** दि. १९ ते २८ सप्टें. २३ दरम्यान विद्यालयात श्रीगणेशाची आरती करण्यासाठी आठ पालक व दोन शासकीय अधिकारी आले होते. पाककला, चित्रकला, गणेशमूर्ती तयार करणे, रांगोळी, मेंदी काढणे, बुद्धिबळ, कविता तयार करणे, निबंध, मॉडेल्स तयार करणे, गणिती कोडी, अथर्वशीर्ष पठण, पाढे पाठांतर अशा स्पर्धा घेतल्या. श्री समर्थ गणेश मंडळ, गहुंजे आणि शिवशक्ती मित्र मंडळ, निगडी येथे विद्यार्थ्यांनी बर्चीनृत्य सादर केले.

२. **हिवाळी शिबिर :** दि. १४ ते १६ डिसें. २३ दरम्यान कुसगाव (पवन मावळ) या ठिकाणी निवासी शिबिर झाले. यामध्ये ११८ मुले व १०१ मुली असे २१९ विद्यार्थी सहभागी झाले. ग्राम स्वच्छता, भजन, छंदवर्ग, धरण पाहणे, वाघजाई मंदिर पायी प्रवास व इतिहास समजून घेणे, वनस्पती निरीक्षण, पर्यावरणाची माहिती व अभ्यास, मत्स्यपालन अभ्यासणे, गावाचा नकाशा तयार करणे, व्यायाम, आरोग्य शिबिर, कार्यक्रमांचे सूत्रसंचालन, सर्वेक्षण, सहनिवास, सहभोजन, स्वयंपाक तयार करणे, पत्रलेखन असे अनुभव विद्यार्थ्यांनी घेतले. संचालक वाच. गिरीशराव बापट यांची मुलाखत विद्यार्थ्यांनी घेतली. कुसगावचे सरपंच, उपसरपंच, दारुंब्रे केंद्रप्रमुख श्री. कारंडे यांनी शिबिरात भेट दिली.

### ❖ प्रदेश विकसन ❖

१. **पवनामाई उत्सव :** दि. २०, २१ डिसें. २३ रोजी पाणी या विषयावर प्रतिसाद व पुढाकार घेणाऱ्या गावांमध्ये पाण्याविषयी जनजागृती करणे या उद्देशाने हा उत्सव झाला. पवनानगर, शिवली, अरढव, थुगाव, शिवणे, बेबड ओहळ, साळुंब्रे अशा ठिकाणी कार्यक्रम होऊन मोरया गोसावी घाट, चिंचवड येथे समाप्ती झाली. उत्सवातील कार्यक्रमाचे स्वरूप पुढीलप्रमाणे होते – पथनाट्य, नदीची पूजा व ओटी भरणे, दिवे सोडणे, आरती, प्रतिज्ञा, संकल्प, पुरस्कार, बक्षीस वाटप. पवना नदी प्रदूषण मुक्त करण्यासाठी पुढील वर्षभर पर्यायी व्यवस्था करणे, सतत

**ग्राम प्रबोधिनीतील विद्यार्थ्यांचे २३-२४च्या शालान्त परीक्षेतील यश**

१. उत्तीर्ण विद्यार्थी : १००%
२. विशेष प्राविण्य : ३३ विद्यार्थी, प्रथम श्रेणी : २९ विद्यार्थी, द्वितीय श्रेणी : ५ विद्यार्थी
३. कु. हर्षदा तुषार देशपांडे ही विद्यार्थिनी ९३.८०% गुण मिळवून प्रथम

**इ. १२वी विद्यालयाचा निर्णय**

१. कु. सानिका सुनील राक्षे ७४.८३ % गुण मिळवून प्रथम

वर्षभर स्वच्छतेचे काम चालू ठेवणे, असे संकल्प उपस्थितांनी केले. डॉ. संजय लकडे व डॉ. संदीप माळी यांना या वेळी 'पर्यावरण मित्र' पुरस्कार देण्यात आला. पिंपरी-चिंचवड सायन्स पार्कचे प्रमुख श्री. प्रवीण दुबे यांना 'जलमित्र पुरस्कार' देण्यात आला. ग्राम प्रबोधिनी, ज्ञान प्रबोधिनी निगडी केंद्र, मॉडर्न स्कूल, जे.एस्.पी.एम्., डी.वाय.पाटील, एस्.एम.बी.पी., पी.सी.सी. अभियांत्रिकी महाविद्यालय, यांचे विद्यार्थी व प्राध्यापक तसेच इतर पर्यावरण प्रेमी संस्था यासाठी एकत्र आल्या.

## ❖ स्त्री-शक्ती प्रबोधन ❖

१. **माहेरवाशीण मेळावा :** दि. २२ ऑगस्ट २३ रोजी स्त्री-शक्ती संघटन, आरोग्य, सन्मान व नेतृत्व हे उद्देश डोळ्यासमोर ठेवून मेळावा घेण्यात आला. यावेळी २२१ महिला व विद्यालयातील इ. ५वी ते १२वीच्या विद्यार्थिनी उपस्थित होत्या. माहेरवाशिणींची ओटी भरून त्यांचा सन्मान करणे व महिलांची आरोग्य तपासणी असे मेळाव्याचे स्वरूप होते. साळुंब्रे, गोडुंब्रे, नेरे, शिंदे वस्ती, कासारसाई, दारूंब्रे, साखर कारखाना, कुसगाव, किवळे, विकास नगर, निगडी येथून महिला सहभागी झाल्या होत्या. स्त्री-आरोग्य तपासणीसाठी पवना हॉस्पिटलचे पाच डॉक्टर्स व नर्स उपस्थित होते. हिनाताई मुलानी (अध्यक्ष, नेचर अँड सिग्नेचर युनिव्हर्सल ट्रस्ट) या प्रमुख पाहुण्या होत्या. वरील सर्व गावातील सरपंच, सदस्य, पोलीस पाटील या वेळी उपस्थित होते.

२. **हिरकणी प्रकल्प :** दि. १० ऑगस्ट २३ रोजी या प्रकल्पाची सुरुवात साळुंब्रे, गोडुंब्रे, सांगवडे या गावांत झाली. या दिवशी तृप्तीताई कुलकर्णी (स्त्री-शक्ती प्रबोधन, ग्रामीण) व त्यांच्या सहकाऱ्यांनी हे पहिले शिबिर घेतले व मार्गदर्शन करून प्रकल्पाची आवश्यकता सांगितली. हिरकणी प्रकल्पाचे पुढचे सत्र दि. १६ ऑक्टोबर रोजी स्पर्शज्ञान, स्नायूंचा विकास या विषयावर झाले. यामध्ये ३५ महिला उपस्थित होत्या. दि. ४ मार्च रोजी केंद्रावर हिरकणी माता प्रशिक्षण झाले. त्यामध्ये मुलांच्या सूक्ष्म स्नायूंचा विकास, निरीक्षण, व्यवहार ज्ञान, सुदृढ व हुशार बालक यासाठी मार्गदर्शन व कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी ३२ माता पालक उपस्थित होत्या. यावेळी महिलांचे विविध खेळही घेण्यात आले.

३. **फॅशन डिझायनिंग वर्ग :** गावातील व्यक्तींना स्वतःच्या पायावर उभे करणे, स्वावलंबी बनविणे यादृष्टीने दि. ३ ऑक्टो. २३ रोजी या वर्गाचे उद्घाटन झाले. प्रमुख पाहुण्या म्हणून सौ. अलकाताई करकरे (देणगीदार व एन्प्रो कंपनीच्या संस्थापिका) उपस्थित होत्या. डॉ. सौ. रंजनाताई कदम (अध्यक्ष, इनरव्हील क्लब निगडी), ॲड. प्रतिभाताई दलाल (ज्ञान प्रबोधिनी, निगडी माजी विद्यार्थिनी) व सर्व केंद्रातील सदस्यही यावेळी उपस्थित होते. गणेशदादा भताने यांच्या प्रयत्नांतून हा कक्ष उभा राहिला. दि. २८ नोव्हें. २३ रोजी रोटरी क्लब ऑफ आकुर्डी यांच्यातर्फे तीन इलेक्ट्रिक शिलाईची यंत्रे वस्तूरूप देणगी स्वरूपात मिळाली. पंचक्रोशीतील किशोरवयीन मुली, युवती व महिला यांना व्यावसायिक प्रशिक्षण व कौशल्य प्राप्त व्हावे, महिला संघटन व्हावे, या उद्देशाने शिरगाव येथे फॅशन डिझायनिंग अंतर्गत शिवणकाम वर्ग सुरू झाला. सुरुवातीला चार महिलांसहित हा वर्ग दि. १ फेब्रु. रोजी सुरू झाला. या दिवशी आरोग्य शिबिर ठेवण्यात आले. त्यात ५७ महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

## ❖ पूरक शिक्षण ❖

१. **विविध शाळांना मदत :** ग्राम प्रबोधिनीच्या प्रयत्नातून आणि इनरव्हील क्लब ऑफ निगडीतर्फे वारू कोथुरणे शाळेला पाण्याच्या दोन टाक्या, सबमर्सिबल पंप, केबल, पाईप, कपाटे, टेबल व क्रीडासाहित्य देणगी स्वरूपात दिले. बा. न. राजहंस विद्यालयाला प्रयोग साहित्य, फिल्टर, पाण्याची टाकी, पाईप फिटींग, कपाटे, वर्गासाठी फळे असे तीन लक्ष रुपयांचे साहित्य मिळवून दिले. इंडियन मेडिकल असोसिएशनतर्फे ग्राम प्रबोधिनीच्या माध्यमातून गोडुंब्रे जि.प. शाळेतील मुलींसाठी पाच लक्ष रुपयांचे स्वच्छतागृह बांधले. याआधी गावासाठी ग्रंथालय व पुस्तके अशी मदत करण्यात आली होती.

२. **छोटे सायंटिस्ट अंतर्गत समस्या निराकरण स्पर्धा :** छोटे वैज्ञानिक तयार करणे या उद्देशाने केपीआयटी, ज्ञान प्रबोधिनी पुणे व ग्राम प्रबोधिनी यांच्या संयुक्त प्रयत्नांतून हा उपक्रम झाला. परिसरातील १५ शाळांतील इ. ८वी, ९वी मधील प्रत्येक वर्गाचे व प्रत्येक शाळेचे दोन-दोन विद्यार्थी स्पर्धेत सहभागी झाले. वजन काटा न वापरता दिलेल्या साहित्याचा वापर करून वजन मोजणे असे काम सर्वांना दिले होते. ग्राम प्रबोधिनी विद्यालयास १५ शाळांमध्ये द्वितीय क्रमांक मिळाला.



# २५. अंबाजोगाई विस्तार केंद्र

दरवर्षीप्रमाणे वर्षारंभ, भजन संध्या, अभिव्यक्ती, छात्र प्रबोधन दिवाळी अंक नोंदणी, नवरात्र महोत्सव, सामूहिक दिवाळी, स्वामी विवेकानंद जयंती उत्सव, वर्षान्त उपासना हे कार्यक्रम घेण्यात आले.

### ❖ विशेष उपक्रम ❖

शिकलकरी वस्ती, फकीर वस्ती येथील काम स्थिर झाले आहे. तेथील मुलांना चित्र, साहित्य देऊन त्यांना अभ्यासाकडे वळवण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले गेले. धनगर वस्तीवरील २४ मुले, फकीर वस्तीवरील २८ मुले, तर शिकलकरी वस्तीवरील ३० मुले यांच्यासोबत काम चालू होते. चित्र रंगवणे, पद्य, गोष्टी, खेळ, मुळाक्षरांचा अभ्यास असे उपक्रमांचे स्वरूप होते. वडार वस्तीवरील चार मुले दररोज शिक्षणाचा आनंद घेत आहेत.

वस्तीवरील लोकांच्या शिधापत्रिका काढून घेण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. आर्थिक दृष्टिकोनातून या वस्तीवरील लोकांना गरजेच्या वस्तूंचे वाटप समाजातील दानशूर व्यक्तींच्या वाढदिवसाच्या निमित्ताने करण्यात आले. नागरी वस्तीवरील लोकांकरिता मदत करणाऱ्या प्रबोधक परिवारांची संख्या सुमारे ७१ एवढी झाली आहे.

### ❖ युवती विभाग ❖

गटामध्ये सुमारे ५० ते ५५ मुली नियमितपणे विविध उपक्रमांमध्ये सहभागी झाल्या. गणेशोत्सव, अभिव्यक्ती, साप्ताहिक बैठक, शिबिरे, नवरात्र महोत्सव, आधुनिक नवरात्र, छात्र प्रबोधन नोंदणी, विवेकानंद जयंती उत्सव, मातृभूमिपूजन या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

आधुनिक नवरात्र साजरे करत असताना भगिनी निवेदिता, राजमाता जिजाबाई, सावित्रीबाई फुले, झाशीची राणी लक्ष्मीबाई या थोर महिलांविषयी अभ्यास युवतींनी केला. यासाठी समाजातील विविध स्तरातील मान्यवरांची व्याख्याने दूरस्थ व प्रत्यक्ष पद्धतीने आयोजित करण्यात आली.

मुलांसाठी सुट्ट्यांमध्ये शिबिरांचे आयोजन करण्यात आले. यात नाटक, हस्तकौशल्ये, कृतीसत्रे, गाणी, गप्पा, गोष्टी, उपासना यांचे आयोजन करून, शिबिराच्या शेवटी अभिव्यक्तीचा छोटासा स्वतंत्र कार्यक्रम घेण्यात आला.

शिवजयंतीच्या निमित्ताने भित्तिपत्रक स्पर्धा घेण्यात आली. २६ भित्तिपत्रके लावण्यात आली. मराठी दिनाचे औचित्य साधून विविध काव्य प्रकारांचे सादरीकरण करण्यात आले. यात नाट्यसंगीत, भारूड, अभंग, विडंबन काव्य, गवळण ओवी, पोवाडा, बालकविता, हास्य कविता इ. मराठी काव्य प्रकारांचे सादरीकरण झाले. या कार्यक्रमाला ४६ प्रबोधकांची उपस्थिती होती.

युवती गटातील चार मुलींची डिसेंबर महिन्यात ज्ञान प्रबोधिनी पुणे येथे केंद्र भेट झाली. त्यासोबतच प्रबोधिनीचे वेल्हे तालुक्यातील

काम पाहणे आणि राजगड किल्ला पाहणे हे देखील झाले.

महिला दिनाच्या निमित्ताने विविध व्याख्यानांचे आयोजन केले गेले. व्याख्यानांचे विषय अंधश्रद्धा व महिला, जाणून घेऊया महिलाविषयक कायदे, महिलांचे आरोग्य, योगासने व व्यायाम, प्रबोधिनी समजून घेऊया, मोबाईल पासून दूर राहूया असे होते.

यानिमित्ताने रक्तदान शिबिराचेही आयोजन केले होते. महिलांचे रक्तदानाचे प्रमाण कमी असल्याने हा उपक्रम घेण्याचे ठरले. नियोजन करताना असे लक्षात आले की, महिलांमध्ये याबाबत जागृती नाही व बरेच गैरसमज आहेत. त्यामुळे रक्तदान शिबिर व त्याचबरोबर स्वामी रामानंद तीर्थ मेडिकल कॉलेज मधील विश्रांतीताई देशमुख यांचे 'महिलांनी रक्तदान करावे का?' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

तसेच माँ शारदा गटातील स्वप्नाताई देशपांडे या २०१७ पासून नियमित रक्तदान करतात त्यांचे ही अनुभव व मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले. उपस्थित संख्या २८ होती. एकूण ११ महिलांनी रक्तदान केले.

## ❖ स्त्री-शक्ती प्रबोधन ❖

दि. ११ जाने. २४ रोजी आधुनिक नवरात्राच्या निमित्ताने गोविंद केंद्रावर मातृभूमिपूजन घेण्यात आले. याला ५२ सदस्य उपस्थित होते. पूजनाची भूमिका माँ शारदा गटाच्या सौ. अष्टपुत्रे ताईंनी मांडली. याच दिवशी अभिव्यक्ती २०२३ निमित्त महिलांच्या खेळाच्या स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये वेगवेगळे गट करून एक एक मिनिटाचे खेळ घेण्यात आले. त्यातून तीन स्पर्धक निवडण्यात आले. त्यांना अभिव्यक्ती कार्यक्रमांमध्ये बक्षीस देण्यात आले. खूप उत्साहाने व आनंदाने पालक ताई याच्यामध्ये सहभागी झाल्या.

**भगिनी निवेदिता गट :** प्लास्टिक रिसायकलिंग गटाकडून जवळपास ७८० किलो प्लास्टिक जमा करून ते रिसायकलिंगसाठी पाठवण्यात आले. यात योगेश्वरी प्राथमिक शाळा, योगेश्वरी नूतन विद्यालय, योगेश्वरी नूतन विद्यालय मेडिकल परिसर, सांडेश्वर विद्यालय, माध्यमिक चनई, सृजन विद्यालय, सीबी स्कूल, खोलेश्वर माध्यमिक विद्यालय, खोलेश्वर प्राथमिक विद्यालय, इरा पब्लिक स्कूल, मुकुंदराज विद्यालय, पोद्दार शाळा, योगेश्वरी शाळा मंदिर विभाग, स्वामी विवेकानंद बाल विद्यामंदिर, एमआयटी गुरुवार पेठ, एमआयटी प्रमोद महाजन स्कूल, न्यू व्हिजन पब्लिक स्कूल या शाळांमार्फत व काही कुटुंबांमार्फत प्लास्टिक जमा करण्याचे काम चालू आहे.

## ❖ प्रदेश विकसन ❖

१. केज, बीड व धारूर मधील १८ सदस्य पाण्याची गोष्ट २०२३च्या कार्यक्रमासाठी ठाण्याला गेले होते. दि. ८ जाने. २३ रोजी दिवसभर पाण्याची गोष्ट हा कार्यक्रम झाला.
२. कळम तालुक्यातील वाढवडा गावातील माध्यमिक शाळेत आपले सुंदर घर अंगण व परिसर ही स्पर्धा घेण्यात आली. या तीन दिवसांच्या स्वच्छता मोहिमेमध्ये ५७ विद्यार्थी / विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.
३. मृद्‌गंध साहित्य संमेलनात 'पाणीदार गाव' हा विषय प्रसाददादा चिक्षे यांनी मांडला.
४. वेल्हे गावातील बचत गटाच्या महिलांनी विवेकवाडीला भेट दिली व पाणलोट आणि पर्यावरणाचे काम समजून घेतले.

## ❖ शिशु विहार ❖

शिशु विहारमध्ये या वर्षी एकूण ७७ संख्या होती. चिमणी गट ५२ तर मयूर गट २५, त्यांच्यासोबत एकूण सहा ताई व एक मदतनीस ताई असे शिशुविहारचे स्वरूप होते. दरवर्षीच्या उपक्रमांसोबत विशेष गोष्टी म्हणजे या वर्षीपासून विद्यार्थ्यांना लेखन कार्य सुरू केले. अक्षरांची ओळख, ठसे काम व कोलाज काम याची आखणी केली.

सामूहिक दिवाळीत पालकताईंनी उत्साहाने सहभाग घेतला. अभिव्यक्तीनिमित्त संवादाची विशेष स्पर्धा घेण्यात आली. या वर्षीची सहल ही विशेष आकर्षणाची होती. बैलगाडी, घोड्याची रपेट, रामायणामधील गोष्टी असे वेगवेगळे अनुभव या सहलीत विद्यार्थ्यांना देता आले.

## ❖ छात्र प्रबोधन नोंदणी व मेळावे ❖

दि. १४ डिसें. २३ रोजी बालनिकेतन शाळेमध्ये छात्र प्रबोधनचा वाचक मेळावा घेण्यात आला. यात प्रश्नोत्तरे व विद्यार्थ्यांशी गप्पा झाल्या. आवडलेली कथा, कविता, लेख याविषयी चर्चा झाली. दिवाळी अंकातील विशेष भेट 'पेन स्टँड' मुलांनी बनवले. या उपक्रमाचे शाळेच्या मुख्याध्यापिका लोहिया मॅडम व रेश्मा नखाते मॅडम यांनी छान नियोजन केले व विद्यार्थ्यांचा प्रतिसाद छान होता.

दि. २० डिसें. रोजी विवेकानंद बाल विद्यामंदिर शाळेत छात्र प्रबोधन दिवाळी अंक वाचक मेळावा घेण्यात आला. सुरुवातीला रंगोत्सव या उपक्रमातील वेधक व आकर्षक स्पर्धांमधील विजेत्यांचे बक्षीस वितरण व नंतर मेळावा झाला. केंद्रातर्फे एकूण दिवाळी अंक नोंदणी मराठी अंक ३३१, इंग्रजी २८, ग्रामीण ६७ व दिनदर्शिका ७५ इतकी झाली.

## ❖ अन्य महत्त्वाचे ❖

ज्ञान प्रबोधिनी सोलापूर न्यासांतर्गत अंबाजोगाई केंद्राचे खाते काढण्याचे व ऑनलाइन बँकिंगचे काम पूर्ण झाले. पुढील आर्थिक वर्षात बँकेतून नियमित व्यवहार करणे सुरू करता येईल.



# २६. डोंबिवली विस्तार केंद्र

### ❖ विशेष महत्त्वाचे ❖

ज्ञान प्रबोधिनीच्या निगडी क्रीडाकुलाच्या रौप्य महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून डोंबिवली केंद्राच्या वतीने क्रीडाकुलच्या विद्यार्थ्यांचे भव्य क्रीडा प्रात्यक्षिक आयोजित केले होते. खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी सुमारे ५०० प्रेक्षक उपस्थित होते. क्रीडाकुलच्या इ. ५वी ते माजी विद्यार्थी अशा ५० खेळाडूंनी सादरीकरण केले. भव्य असे सादरीकरण पाहताना उपस्थितांचा श्वास रोखला गेला, तर दुसरीकडे कौतुकाने अंगावर रोमांच उभे राहिले. कार्यक्रमाचे प्रमुख म्हणून निगडी केंद्राचे प्रमुख वाच. मनोज देवळेकर उपस्थित होते. समारोपाच्या मार्गदर्शनात त्यांनी म्हटले, ''व्यक्तिविकसन म्हणजे आपल्याकडील विविध गुण एवढे मिळवायचे की लोकांना वाटण्यासारखे आपल्याकडे खूप काही असले पाहिजे. त्यासाठी स्वप्ने पाहता आली पाहिजेत. पालकांनी पाल्यांचा आत्मविश्वास वाढण्यासाठी मोकळीक दिली पाहिजे, त्याचबरोबर 'तुझ्या पाठीशी आम्ही आहोत', हा विश्वासही दिला पाहिजे.'' हे मार्गदर्शन विद्यार्थी, पालक व कार्यकर्ते यांसाठी अमूल्य होते. डोंबिवलीत क्रीडा प्रात्यक्षिकांचा असा सोहळा प्रथमच झाला.

### ❖ शालेय गट ❖

१. **टिळक नगर प्रबोधक मंडळ :** विद्याव्रत वर्गातील विद्यार्थ्यांना गणेशोत्सवानिमित्ताने निर्माल्यासाठी कागदी पिशव्या करायला शिकवल्या आणि प्रत्येकाने किमान पाच अनोळखी घरी पिशव्या द्यायच्या असे सांगितले होते. पिशव्या देताना वर्गाविषयीची माहिती देणे, असे कामही होते. यात अनोळखी लोकांशी बोलणं, त्यांना पर्यावरणाचे महत्त्व पटवून देणं, नकार पचवणं, असे अनुभव मुलांना मिळणे हा उद्देश होता.

दि. २५ फेब्रु. २४ रोजी 'साधना आधार वृद्ध सेवा केंद्रा'च्या भेटीस विद्याव्रताच्या विद्यार्थ्यांना नेले होते. एक पालक पण आले होते. मुलांनी प्रबोधन गीते सादर केली, तिथल्या आजी-आजोबांसोबत गप्पा मारल्या, कोडी घातली, कविता वाचून दाखवल्या. कथ्थक नृत्य, बासरी वादन केले. ओरिगामी पक्षी शिकवले.

बदलापूर येथील 'सत्कर्म बालकाश्रमा'स प्रबोधक मंडळाचे विद्यार्थी आणि पालकांनी भेट दिली. आश्रमात गेल्यावर तिथल्या मुलांशी गप्पा झाल्या. एकत्र खेळ खेळले. त्यांची दिनचर्या समजून घेतली. तसेच पणतीविक्री उपक्रमातून मिळालेल्या रकमेमध्ये काही रक्कम भर घालून आश्रमात देण्यात आली.

२. **शिवाई शाळा :** या निमशहरी शाळेत विद्यार्थ्यांना वैज्ञानिक खेळणी करायला शिकवणे असे उद्दिष्ट ठरवले होते, म्हणून विद्याव्रताच्या विद्यार्थ्यांना कॅलिडोस्कोप करायला शिकवला. अनेकांना कॅलिडोस्कोप माहिती नव्हता, पण त्यांनी छान तयार केला. प्रबोधक मंडळाच्या मुलांना 'टॅनग्राम' शिकवला. एका चौकोनात वेगवेगळ्या आकारात सात तुकडे केले जातात

आणि त्या आकारांचे जवळपास २०० आकार होऊ शकतात. मुलांनी टॅनग्राम तयार करून त्याचे प्राणी, पक्षी तयार केले.

३. **कलचाचणी :** डोंबिवलीमध्ये पहिल्यांदाच इ. ७वी व ८वीच्या विद्यार्थ्यांसाठी iTap चाचणीचे आयोजन झाले. दि. १० डिसें. रोजी १५ विद्यार्थ्यांची चाचणी व दि. ७ जाने. २४ रोजी समुपदेशन झाले. यासाठी प्रज्ञा मानस संशोधिकेतून सदस्य आले होते.

४. **रात्रशिबिर :** दि. १६ डिसे. २३ रोजी इ. ८वी ते १०वी आणि दि. २३ डिसे. २३ रोजी इ. ५वी ते ७वीच्या विद्यार्थ्यांचे रात्रशिबिर झाले. शिबिरात सहभाग घेतलेल्या १८१ मुलांनी शिबिराचा आनंद घेतला. अनोळखी व्यक्तीशी जुळवून घेणे, स्मरणशक्ती, निरीक्षण, कल्पकता, चपळता, दम-श्वास, एकाग्रता, सामान्य व्यवहारबाबत जागरूकता, समस्यापरिहार, नेम धरणे, अचूकता, अंदाज बांधणे, शारीरिक श्रम, हावभाव करून शब्द सांगणे व ओळखणे इ. विविध पैलूंना चालना देणाऱ्या खेळांची रचना केली होती. शिबिरात आदित्यदादा शिंदे (व्यवस्थापक, निगडी केंद्र) उपस्थित होते. त्यांनी ताई-दादांशी विविध विषयांवर संवाद साधला. पुण्याहून युवक कार्यकर्ते सुमेधदादा फाटक आणि आशुतोषदादा बारमुख हे देखील उपस्थित होते. १० युवती, १२ युवक व तीन प्रौढ कार्यकर्त्यांचा शिबिराच्या आयोजनात प्रत्यक्ष सहभाग होता.

### ❖ पौरोहित्य विभाग ❖

विस्ताराच्या दृष्टीने या वर्षी डोंबिवलीच्या बाहेर पौरोहित्य प्रशिक्षण कार्यशाळा घ्यायचे ठरवले होते. त्याप्रमाणे मुलुंडला गणेश प्रतिष्ठापना व लक्ष्मीपूजन अशा दोन कार्यशाळा, दादरला गणेश प्रतिष्ठापना व कल्याणला लक्ष्मीपूजन कार्यशाळा झाली. सर्व ठिकाणी चांगला प्रतिसाद मिळाला. संस्कारांच्या बाबतीत वेगळेपण म्हणजे परदेशातील मुलामुलींचे विवाह, मारवाडी गायक व दक्षिण आफ्रिकेतील ख्रिश्चन मुलगी यांचे लग्न व अमेरिकेत वाढलेल्या मुलीची भारतात मुंज केली. तर मीरा रोड येथील स्टुडिओत चित्रपटाच्या मुहूर्ताचे गणेशपूजन केले. वर्षभरात विवाह, उपनयन, सत्यनारायण पूजा, गणेशपूजन, वेदपूजन असे १८ संस्कार हिंदीतून आणि १४ संस्कार इंग्रजी मधून केले. तसेच महिला पुरोहितांनी गुजराथ व राजस्थानमध्ये हिंदी भाषेतून विवाह संस्कार केला. गोव्यात दोन विवाह व एक एकोद्दिष्ट श्राद्ध व वेदपूजन असे संस्कार केले.

### ❖ संवादिनी ❖

दि. १० मार्च २४ रोजी महिला दिनानिमित्त संवादिनी सदस्यांचे एकत्रिकरण व नवीन सदस्यांचा सहभाग, या उद्देशाने एकत्रित मेळावा झाला. एकूण उपस्थिती ३० होती. सुरुवातीला प्रबोधन गीतानंतर तीन गटात खेळ घेण्यात आले. प्रस्तावनेत संवादिनीच्या उद्दिष्टांबद्दल सांगून चार नाटुकल्या सादर करण्यात आल्या. त्या अनुषंगाने घेतलेल्या चर्चेला छान प्रतिसाद मिळाला. स्त्री-पुरुष संपूरकतेवर चर्चेला टोक आणत, सदस्यांना विचार करण्यास प्रवृत्त केले. आधुनिक नवरात्रोत्सवाच्या अंतर्गत महिला नगरसेवकांच्या घेतलेल्या मुलाखतींवर अनुभवकथन करण्यात आले. महिला आरक्षण व राजकारणात महिलांचा एकंदरीत सहभाग या विषयावर अभ्यास करणारी आपली विद्याव्रती कार्तिकी अरकल हिला बोलावले होते. विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनातील कामकाज अनुभवण्याची, चर्चासत्रांमध्ये सहभागी होण्याची, तसेच आमदारांशी संवाद साधण्याची संधी तिला मिळाली. तिच्या अनुभवकथनाने आपल्या महिला आरक्षण अभ्यासास दुजोरा देणारी माहितीही मिळाली. समारोप व प्रार्थनेने सांगता झाली.

### ❖ अन्य महत्त्वाचे ❖

१. मा. महेंद्रभाई सेठिया (विभागप्रमुख, छात्र प्रबोधन व नेतृत्व संवर्धन केंद्र) यांच्या केंद्रात झालेल्या अनौपचारिक भेटीत त्यांनी शालेय गटातील कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

२. 'दीनदयाळ नवरचना प्रतिष्ठान, सोनदरा गुरूकुल'ची माहिती डोंबिवलीकरांना मिळावी, तसेच मूळचे डोंबिवलीकर असलेले श्री. महेश खरे व सौ. पूनम खरे हे उभयता पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून सोनदरा येथे जाणार या निमित्ताने, डोंबिवली केंद्र, ब्राह्मण सभा व संवेदना फौंडेशन यांच्या सहयोगाने एक बैठक आयोजित केली होती. सोनदरा गुरुकुलचे सचिव श्री. अश्विन भोंडवे व कार्यकर्ते धनंजय आगलावे या बैठकीत उपस्थित होते. बैठकीला शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांना निमंत्रित केले होते. एकूण ६० उपस्थिती होती.

### प्रतिसादासाठी जाहीर आवाहन

१. शहरात मोठ्या प्रमाणावर बांधकामे होत आहेत. त्यासाठी वृक्षतोड होते आहे. या प्रश्नावर काही तरी ठोस काम करण्यासाठी केंद्राच्या माध्यमातून संवादिनी गटाच्या पुढाकारातून वृक्ष लागवड-संवर्धन भिशी योजना सुरू करायची आहे. कार्यकर्ते, पालक, विद्यार्थी, हितचिंतक, परिचित यांनी या योजनेत सहभागी व्हावे.

२. शिक्षकांसाठी प्रशिक्षण वर्ग / कार्यशाळा सुरू होण्याच्या दृष्टीने डोंबिवलीतील शिक्षण संस्थांचे सहकार्य मिळावे.

३. इ. ७वी-८वीच्या विद्यार्थ्यांनी विद्याव्रत उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे यासाठी पालकांनी, शाळांनी सहकार्य करावे. (संपर्क क्र. ९१६७७५०६१९)

# २७. ठाणे स्थायी संपर्क केंद्र

प्रबोधक मंडळ, विकासिका, संवादिनी, प्रासंगिक गट हे गट ठाणे केंद्रात नियमित सुरू आहेत. या वर्षी ओळख स्पर्शाची, विज्ञान दल, वंचित गटासाठी काम हे नवीन उपक्रम सुरू केले.

१. **प्रबोधक मंडळ :** इ. ७वीच्या विद्यार्थ्यांसाठी रविवारी पाक्षिक स्वरूपात 'मुलांचे वाचन कौशल्य वाढवणे, मुलांना स्वावलंबनाच्या सवयी लावणे, पंचकोशावर आधारित उपक्रम घेणे' ही उद्दिष्टे ठरवून, त्यांवर आधारित निरनिराळे उपक्रम घेतले गेले. प्रत्येक तासिकेची सुरुवात ॐ कार, पद्ये, मनाचे श्लोक यांनी झाली. छात्र प्रबोधन अंकातील कथावाचन, त्यातील आशयावर गप्पा झाल्या. लघुचित्रफितींवर चर्चा, हस्तकौशल्य, एकाग्रता वाढवणारे खेळ, निरीक्षण कौशल्य, वैज्ञानिक प्रयोग इत्यादी घेतले.

ठाण्यातील जुन्या वास्तूंचे दर्शन व्हावे म्हणून वारसास्थळांना सहल आयोजित केली होती. यामध्ये मुलांबरोबर पालकही सहभागी झाले होते. ठाण्यातील १७ ठिकाणे इतिहासकार मकरंद जोशी यांनी माहिती सांगत दाखवली. तसेच पर्यावरणाचे संवर्धन व्हावे, यासाठी मुलांकडून शिबिरामध्ये बीजगोळे (सीडबॉल) करून घेऊन, ते रानात, जंगलात टाकायला सांगितले गेले. एकूण १५ मुले नियमित तर २५ मुले शिबिरात उपस्थित होती.

२. **विकासिका :** मुलांमधे वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवणे, गटात काम करणे, कृतज्ञता निर्माण करणे, ही उद्दिष्टे ठरवून आनंदविश्व गुरुकुल शाळेत इ. ८वीच्या मुलांसाठी पाक्षिक स्वरूपात विकासिका घेतली गेली. वाढ आणि विकास यातील फरक स्पष्ट करून आपण कशावर लक्ष दिले पाहिजे ते सांगितले गेले. कोडी, जोडीकार्य, गटचर्चा, यक्षप्रश्न, बौद्धिक खेळ घेतले गेले. अन्न साखळीचे महत्त्व सांगून सगळे सजीव एकमेकांवर कसे अवलंबून आहेत त्यावर चर्चा झाली. छात्र प्रबोधन अंकातील 'वीर व्हा' हा लेख वाचून आपण कोणते वीर होऊ शकतो त्यावर संवाद साधला गेला. एकूण २२ मुले उपस्थित होती.

३. **संवादिनी :** शहरी महिलांसाठी संवादिनी गटाची मासिक बैठक स्त्री-शक्ती प्रबोधन कार्यदिशेअंतर्गत घेतली गेली. संवादिनीची सदस्य संख्या वाढवण्याचा प्रयत्न करणे, निरोगी जीवनशैली अंगीकारण्यासाठी प्रोत्साहित करणे, संवादिनींच्या अभिव्यक्तीसाठी प्रयत्न करणे, ही उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून उपक्रम घेतले. गप्पाकट्टाही सुरू केला गेला. यात निखळ हास्याचे फायदे शास्त्रीय दृष्टिकोनातून सांगितले गेले.

महिला आरक्षणाअंतर्गत, आरक्षण मिळाल्यामुळे निवडून आलेल्या आजी-माजी नगरसेविकांची मुलाखत घेऊन आधुनिक नवरात्र साजरे केले गेले. कचऱ्याची विल्हेवाट लावणाऱ्या महिलांबरोबर महिला दिन साजरा केला. स्नेहमेळावा आयोजित करून खेळ घेतले. नियमित संवादिनी संख्या १७ होती. तर प्रासंगिक स्वरूपात ५० होती.

ब्राह्मण शिक्षण मंडळाच्या चार शाळांमध्ये इ. १ली ते ४थीच्या ५०० मुलांसाठी ओळख स्पर्शाची हा उपक्रम संवादिनींनी घेतला.

४. **प्रासंगिक गट :** कार्यकर्त्यांच्या विचारांना चालना मिळावी, प्रबोधिनीच्या साहित्याचे वाचन व्हावे यासाठी गटामध्ये वाचन, वर्षारंभ, वर्षांत, सार्थभजन, सार्थ उपासना घेतली गेली. कार्यकर्त्यांसाठी प्रशिक्षणे/कार्यशाळा योजल्या होत्या. तसेच प्रबोधिनीच्या प्रकाशित होणाऱ्या पुस्तकांची विक्री केली गेली.

या वर्षी छात्र प्रबोधनच्या ३५१ दिवाळी अंकांची नोंदणी केली गेली. मान्यवरांच्या भेटी, मातृभूमिपूजन या उपक्रमांतून अंदाजे ७०० लोकांपर्यंत प्रबोधिनीचे कार्य पोहोचवले गेले. महाराष्ट्र विद्यालयातील इ. ५वीच्या ४५ विद्यार्थ्यांसाठी विज्ञान दल सुरू केले गेले. या वर्षी गणेश प्रतिष्ठापना कार्यशाळाही घेतली गेली.

५. **वंचित गट :** राष्ट्रीय एकात्मता कार्यदिशेअंतर्गत वंचित गटासाठी काम केले. शारदा अभ्यासिकेतील इ. ५वी ते १०वीच्या ५० मुलांसाठी साप्ताहिक तासिका दर मंगळवारी दुपारी घेतली गेली. सुरुवातीला मुलांना प्रबोधिनीची गोडी लागावी आणि सत्र घ्यायला येत असलेल्या मावशीची सवय व्हावी, असे ठरवून उपक्रम घेतले गेले. मुलांनीही स्वतःची ओळख करून दिली. हस्तकौशल्य, छात्र प्रबोधन अंकातील कथांचे वाचन, खेळ, लघुचित्रफितींवर आधारित चर्चा इत्यादी घेतले गेले.

**प्रतिसादासाठी जाहीर आवाहन**

ठाणे केंद्रात सुरू असलेल्या कामात आपण प्रत्यक्ष सहभागी होऊ शकलात, तर उपक्रम अधिक चांगल्या प्रकारे होण्यास मदत होईल. (संपर्क क्र. : ९८६९६८४७११)

# २८. चिपळूण स्थायी संपर्क केंद्र

## ❖ पूरक शिक्षण ❖

या वर्षी चिपळूण तालुक्यातील पाच शाळांमध्ये अग्रणी-प्राग्रणी शपथग्रहण समारंभ आणि शाळेतील शिक्षकांसोबत त्यासंदर्भातील बैठक झाली. या उपक्रमातील २०० अग्रणी-प्राग्रणी मुलांनी वर्षभरात शाळेत विविध उपक्रमांत व उपक्रमांच्या नियोजनात सहभाग घेतला आणि काही क्षेत्रभेटी व उद्योगांना भेटी दिल्या.

विद्यार्थ्यांमध्ये प्रभावीपणे अभ्यास करण्याचे तंत्र चांगल्या प्रकारे विकसित व्हावे, यासाठी तीन शाळांमधून इ. ९वी मधून १०वीमध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांची 'स्वयंअध्ययन शिबिरे' घेण्यात आली. त्यात माध्यमिक गटाचे एकूण २४५ विद्यार्थी सहभागी झाले.

तीन शाळा व एका महाविद्यालयात 'वाचक मेळावे' घेण्यात आले. ज्यामध्ये काय वाचावे?, कसे वाचावे? इ. बद्दल मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमात माध्यमिक गटाचे एकूण १७० विद्यार्थी व महाविद्यालयातील १२ युवती व तीन युवक सहभागी झाले.

'छोटे सायंटिस्ट' अंतर्गत चिपळूण व गुहागर तालुक्यातील विज्ञान शिक्षकांचे शिक्षक प्रशिक्षण घेण्यात आले. या प्रशिक्षणात विद्यार्थ्यांना प्रयोगांद्वारे विज्ञानाच्या संकल्पना कशा स्पष्ट कराव्यात?, इ. बद्दल सत्रे झाली. प्रशिक्षणात चिपळूणमधील ३८ माध्यमिक, गुहागर तालुक्यातील २५ माध्यमिक व ३६ प्राथमिक शिक्षक सहभागी झाले.

या विज्ञान शिक्षकांमार्फत केलेल्या कामामुळे चिपळूण मधील १,५२० माध्यमिक विद्यार्थी, तसेच गुहागर मधील ७५० माध्यमिक व १,०८० प्राथमिक विद्यार्थी 'छोटे सायंटिस्ट' उपक्रमात सहभागी झाले.

या वर्षी प्रथमच 'एक्सेल इंडस्ट्री' या कंपनी सोबत 'विज्ञान प्रकल्प कार्यशाळा' पाच शाळांमध्ये घेण्यात आल्या. या कार्यशाळांमध्ये विज्ञान प्रकल्प कसे तयार करावेत?, याबद्दलचे मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये २२५ माध्यमिक विद्यार्थी सहभागी झाले.

## ❖ हिरकणी ❖

मागील वर्षी नव्याने सुरू झालेल्या 'हिरकणी' उपक्रमाची तीन सत्रे पोफळी या ग्रामीण भागातील मातांसाठी झाली. या सर्व सत्रांना आठ हिरकणी माता धरून एकूण २२ महिला उपस्थित होत्या. या सत्रांबरोबर आरोग्यविषयक व्याख्यान झाले व या उपक्रमावर आधारित चित्रफीत स्पर्धा घेण्यात आली.

## ❖ महाविद्यालयीन गट ❖

दि. ५ ते ७ जानेवारी २४ या कालावधीत चिपळूण मधील दातार-बेहेरे-जोशी महाविद्यालयात विज्ञान प्रदर्शन व विज्ञान शिबिर घेण्यात आले. विज्ञान प्रदर्शनातून विद्यार्थ्यांनी प्रयोगांद्वारे वैज्ञानिक संकल्पना समजून घेतल्या.

विज्ञान शिबिरात 'Creative Problem Solving' हे सत्र झाले व सहभागी विद्यार्थ्यांनी 'Practical Research and Analysis' चे प्रयोग प्रत्यक्ष केले. हे तीनही दिवस मिळून एकूण १५० युवक-युवती या उपक्रमात सहभागी झाले होते.

## ❖ अन्य महत्त्वाचे ❖

१. केंद्राची वर्षारंभ उपासना दि. २ जुलै रोजी झाली. यानिमित्त आदित्यदादा शिंदेंचे 'काश्मिर अभ्यासदौरा' अनुभवकथन झाले.

२. दि. २२ जानेवारी रोजी प्रभू श्रीरामांच्या प्राणप्रतिष्ठा महोत्सवाच्या निमित्ताने केंद्राने 'सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत अखंड रामरक्षा पठण यज्ञ' केला. शालेय विद्यार्थ्यांपासून, युवक-युवती, प्रौढ सदस्यांपर्यंत एकूण ९८ जणांनी १०९१ पेक्षा अधिक वेळा रामरक्षा पठण केले. विशेष बाब म्हणजे ४० अग्रणी-प्रग्रणी विद्यार्थ्यांनी प्रत्येकी पाच वेळा रामरक्षा म्हटली.

३. या वर्षी ज्ञान प्रबोधिनी क्रीडाकुल, निगडी केंद्र आणि टाटा ट्रस्ट आयोजित 'ग्रामीण खेळाडू विकसन प्रकल्प' या अंतर्गत चिपळूण केंद्र हे मुख्य केंद्र करण्यात आले. ८ ते १४ या वयोगटातील मुलामुलींची खेळाची आवड जोपासणे, खेळांमध्ये सहभाग वाढवणे व निरोगी जीवनशैलीच्या सवयींसह जीवन कौशल्ये याबद्दल आवड निर्माण करणे, असे या प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे.

   चिपळूण केंद्रात माखजन, आंबडस, भोम आणि आकले या चार ठिकाणी उपकेंद्रे सुरू करण्यात आली. प्रकल्पाचा पहिला टप्पा म्हणून आंबडस हे उपकेंद्र मार्च महिन्यात पूर्ण क्षमतेने सुरू करण्यात आले. याचबरोबर या चारही उपकेंद्रांवर मिळून एकूण २०० मुला-मुलींचे 'उन्हाळी क्रीडा शिबिर' घेण्यात आले.

४. वरील सर्व उपक्रमांसोबत केंद्रावर नियमित साप्ताहिक उपासना, प्रबोधिनी वाङ्मयाचे एकत्रित वाचन होते.

# २१. बदलापूर अस्थायी संपर्क केंद्र

**❖ प्रासंगिक उपक्रम ❖**

१. दि. २९ जून २३ रोजी आषाढी एकादशी निमित्त बदलापूर-अंबरनाथ दरम्यान असलेल्या विठ्ठल मंदिरापर्यंत, प्रबोधिनी कार्यकर्त्यांनी बदलापुरातील नागरिक व दासबोध अभ्यास मंडळातील सदस्यांसह दिंडी काढली. जय जय रामकृष्ण हरीच्या गजरात दिंडी देवळात पोहोचली. त्यावेळी उपस्थित असलेले अनेक नागरिकही उत्स्फूर्तपणे यात सामील झाले. साधारणत: ४० लोकांनी या उपक्रमाचा आनंद घेतला. यालाच पूरक म्हणून दि. ४ जुलै २३ रोजी, बदलापूरमधील श्रीराम मारुती मंदिरात, सार्थ अभंग आणि निरूपण असाही उपक्रम झाला. यावेळी मंदिरात सुमारे ३५ लोक उपस्थित होते.

२. ऑगस्ट महिन्यात स्वातंत्र्यदिनानिमित्त दोन वेळा मातृभूमिपूजन झाले. वंदनाताई मुळे यांच्याकडे उपस्थिती १२ होती. तर शैलजाताई पांडे यांच्याकडे १० जणांच्या उपस्थितीत हे पूजन झाले.

३. वेगवेगळ्या शाळांमधून एकूण छात्र प्रबोधनच्या ३९८ दिवाळी अंकांची नोंदणी व वितरण केले.

४. नोव्हेंबर महिन्यात ज्ञान प्रबोधिनी आणि संपूर्ण सेवा फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने देवदेवतांच्या व इतर जुन्या भग्न प्रतिमा, मूर्ती यांचे संकलन झाले.

५. श्री. विलास वखारे सरांच्या मार्गदर्शनाखाली इ. ७वीच्या ५३ विद्यार्थ्यांसाठी 'पायाभूत इलेक्ट्रॉनिक्स' या विषयाची विज्ञान कार्यशाळा आयोजित केली होती.

**❖ नियमित उपक्रम ❖**

१. कार्यकर्त्यांसाठी वर्षारंभ उपासनेने वर्षाची सुरुवात झाली. शिशुविहार विद्या मंदिर, बदलापूर गाव या शाळेतील विकासिका, विद्याव्रत या गटातील मुलांसाठी व नगर परिषद शाळा क्र. १ मधील विज्ञानदल गटातील मुलांसाठी विद्यारंभ संस्काराने वर्षाची सुरुवात केली.

२. विद्याव्रतींसाठी एक शिबिर दि. ३० नोव्हें. ते २ डिसें. दरम्यान झाले. तर दि. १३ व १४ मार्च दरम्यान विद्याव्रत उजळणी शिबिर होऊन, प्रत्यक्ष विद्याव्रत संस्कार सोहळा दि. १५ मार्च रोजी झाला. यामध्ये समुपदेशक कु. तन्वी म्हात्रे, क्रीडा भारतीच्या सौ. गणपुले, सर्पमित्र श्री. बागडे, कीर्तनकार व डॉक्टर सौ. गौरी कुलकर्णी, डॉक्टर भामरे यांचा सहभाग होता.

३. शून्य ते सहा या वयोगटातील मुलांच्या माता पालकांसाठी हिरकणी उपक्रम लवकरच केंद्रात सुरू करण्यात येणार आहे.

तनूमनात एक ध्यान प्रिय महान हिंदुस्थान
हिंदुस्थान हिंदुस्थान हिंदुस्थान हिंदुस्थान ॥ ध्रु. ॥
ऋषी मुनी तपोनिधी कितीक येथ जाहले
दिव्यदृष्टि-चिंतकांनी विश्वगूढ भेदिले
गुरुपदीच शोभतो प्रिय महान हिंदुस्थान ॥ १ ॥
जाहली प्रसन्न येथ जान्हवी भगीरथा
सिद्ध सूर्य कोंडण्यास ब्रह्मपुत्र सर्वथा
यत्न हाच मंत्र देइ प्रिय महान हिंदुस्थान ॥ २ ॥
सरेल दैन्य येथले सुबुद्ध कष्ट सिंचता
बहरतील वैभवे ध्यासबीज पेरता
शतयुगे अदीन हा प्रिय महान हिंदुस्थान ॥ ३ ॥
असंख्य ज्योति चेतवून एक आरती तुझी
असंख्य सूर मेळवून एक अर्चना तुझी
हृदयपुष्प वाहिले पदी तुझ्याच हे महान ॥ ४ ॥

# ३०. ज्ञान प्रबोधिनी आयुर्विज्ञान न्यास संचालित कमला मेहता नेत्र रूग्णालय, शिरवळ

ग्रामीण भागात नेत्रसेवा करण्याच्या उद्देशाने या रुग्णालयाची स्थापना १९९७ मध्ये सातारा जिल्ह्यात शिरवळ येथे झाली. आजतागायत दोन लाखांहून अधिक रुग्णांना नेत्रसेवा पुरवण्यात आली आहे. पहिल्यापासून ग्रामीण शालेय विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी, औद्योगिक संस्थांच्या कामगारांची नेत्र तपासणी, आठवड्यातून दोन वेळा नेत्रशिबिर, रुग्णांची विनामूल्य ने-आण व शस्त्रक्रिया इ. उपक्रम आग्रहपूर्वक केले जातात.

### ❖ रूग्णालयाची वैशिष्ट्ये ❖

१. बाह्य रुग्ण विभागात द्विपदवीधर स्थायिक नेत्रविशारद उपलब्ध
२. दरमहा आठ शल्यविशारदांची भेट व शस्त्रक्रिया
३. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाचे विविध sub speciality नेत्रतज्ज्ञ आठवड्यातून एकदा बाह्य रुग्ण विभागामध्ये उपलब्ध
४. पूर्ण वेळ वैद्यकीय अधिकारी उपलब्ध
५. आठवड्यातून दोन वेळा मोतीबिंदू फेको शस्त्रक्रिया
६. शिकाऊ नेत्रविशारदांसाठी योग्य मार्गदर्शन व अनुभवांची व्यवस्था
७. महिन्यातून दोनदा काचबिंदू शस्त्रक्रिया
८. दिव्यांग व्यक्तींसाठी शिबिरे
९. नवीन अत्याधुनिक शस्त्रक्रियेसाठी Zeiss microscope, तसेच नवीन slit lamp आणि OT table
१०. अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज रुग्णालय, सर्वोत्तम दर्जाची नेत्रचिकित्सा व चष्म्याचे दुकान

### ❖ चालू वर्षातील रूग्णसंख्या (२०२३ -२०२४) ❖

१. बाह्यरुग्ण विभाग : एकूण १६२६०
२. शस्त्रक्रिया - मोतीबिंदू व अन्य : एकूण ९८७
३. मोफत नेत्रतपासणी शिबिरे : ६६
४. शाळेतल्या विद्यार्थ्यांची शाळेत जाऊन तपासणी : ४५६४ विद्यार्थी

ജ്ജ

संघर्ष करू, सहकार्य करू, नवजीवनमार्गी ध्यास धरू
या गावपांढरीच्या उद्धारा गगनधरित्री एक करू ।।ध्रु.।।

आयुष्य असे फरफटणारे, मंजूर नसे येथून पुढे
भवितव्य उजळ होणार कधी, हा प्रश्न मनाला सतत पडे
कोणी न दुजे वाटते खडे, आम्हास रडे अमुचेच नडे
मग अस्मानी आव्हान बडे, हे हसतमुखाने पार करू
या गावपांढरीच्या उद्धारा गगनधरित्री एक करू ।।१।।

आम्हास अम्ही लेखता कमी, अडवील कसे दुनियेस कुणी
चालते जयांची मनमानी, त्या पुरुषांना मानले कुणी
दुनियेत बरोबर नरनारी, येथेच अशी का शिरजोरी
आम्हीच शिकू, स्पर्धेत टिकू, मिळवून मान मग घरदारी
जर अम्हाबरोबर मैतरणी, अडचणी खरोखर दूर करू
या गावपांढरीच्या उद्धारा गगनधरित्री एक करू ।।२।।

कर्जात बुडाला शेतकरी, पोरांस नोकरी ना दुसरी
बेबनाव गावागावात, एकीचे नाव न कोण करी
हे पुरे अशिक्षित गावकरी वळणात जुन्या, संपले तरी
मग राजकारणी बहकावी, गावास लुटाया ढोंग करी
हे असे खुंटता गाव, चला गं प्रपंच गावाचाहि करू
या गावपांढरीच्या उद्धारा गगनधरित्री एक करू ।।३।।

# ३१. ज्ञान प्रबोधिनी फौंडेशन (JPF)

२०२३ मध्ये ज्ञान प्रबोधिनी फौंडेशनने पाचव्या वर्षात यशस्वी पदार्पण केले. आत्तापर्यंत ज्ञान प्रबोधिनी फौंडेशनचे संघटन, निधिसंकलन आणि उपक्रमनियोजन असे तीन विभाग होते. महाराष्ट्रातील उपक्रम आणि ज्ञान प्रबोधिनी फौंडेशन यामधील दुवा म्हणून या वर्षी एक समन्वय समिती (फिल्ड कोऑर्डिनेशन टीम) कामाला जोडण्यात आली.

### ❖ संघटन समिती ❖

विद्यार्थी, हितचिंतक, स्वयंसेवक अशा सर्वांना एकत्र आणणे, हा फौंडेशनचा गाभा आहे. या वर्षी चार खंडात आणि बारा देशांत मिळून सुमारे १२८६ सदस्य होते. यंदा १०४ पैकी १०१ अनौपचारिक मेळावे प्रत्यक्ष भेटून झाले. यातून सुमारे ६५० सदस्य जोडले गेले. कधी मुक्त संवाद, कधी मनसोक्त भ्रमण यातून ही जोडणी बळकट होण्यास मदत झाली.

२०२३ मध्ये 'ज्ञान प्रबोधिनी ग्लोबल नेटवर्क' (JPGN) च्या वतीने अमेरिकेत एक मध्यवर्ती समिती स्थापन झाली. या समितीत विद्यार्थी आधारगट आणि अमेरिकेतल्या विविध भागांतील व्हॉट्सॲप गट यांचे आठ प्रतिनिधी आहेत. आधारगटाच्या तीन मार्गदर्शन सत्रांतून सुमारे ७५ विद्यार्थ्यांना मदत झाली. तर सुमारे ३० जणांनी अमेरिकेत मातृभूमिपूजन केले.

२०२३ मध्ये फौंडेशनच्या सहविचार समितीचे दोन दिवसांचे एक शिबिर झाले. समितीचे सर्व सदस्य प्रथमच एकमेकांना भेटले आणि त्यांनी आत्तापर्यंतच्या कामाचा सर्वसमावेशक आढावा घेतला. तसेच पुढील कामाची दिशा काय असावी, याचा विचार केला. त्याही पुढे जाऊन, संस्थेच्या स्वरूपाबद्दल विचार केला गेला. त्यामुळे संस्थेला दीर्घकाळ स्थिरता येण्याच्या दृष्टीने हे वर्ष महत्त्वाचे ठरले. संस्थेची मूलभूत मूल्ये आणि कामाचे स्वरूप यांना अधिक स्पष्टता येण्यासाठी विशेष प्रयत्न होण्याच्या दृष्टीने या सहविचार समितीच्या शिबिरात सहा चर्चासत्रे झाली. ती पुढील कामासाठी दिशादर्शक होतील. त्यातून पुढील पाच वर्षांसाठी नेमकी कोणती उद्दिष्टे असावीत आणि प्राधान्य कशाला द्यावे, याचे निर्णय घेता आले.

### ❖ निधिसंकलन समिती ❖

निधिसंकलन मोहिमेने यंदा सुमारे ३.३३ लाख डॉलर्स (२.७ कोटी) चा निधी जमवून एक नवीन उच्चांक गाठला. त्यातून भारतात चालू असलेल्या १५ प्रकल्पांना मदत झाली आणि तीन नवे प्रकल्प सुरू झाले.

निधिसंकलन समितीने जुलै ते सप्टेंबर २३ या काळात 'लर्न इंडिया' ही मोहीम केली. त्यातून ७५,००० डॉलर्स उभे केले आणि ३५५ मुलांना शैक्षणिक मदत मिळाली.

अमेरिकेत नोव्हेंबरमध्ये 'गिव्हिंग वीक' म्हणजे दानाचा आठवडा असतो. त्या काळात VMWARE या कंपनीतर्फे ६३,००० डॉलर्स (५० लक्ष) आणि 'गूगल गिव्हिंग' मोहिमेतून १८,००० डॉलर्स (१४ लक्ष) उभे राहिले.

### ❖ उपक्रम नियोजन समिती ❖

उपक्रमनियोजन समिती एकूण सहा उपक्रम राबवते. त्यासाठी सहा उपक्रम समित्या आहेत. त्यांचे संक्षिप्त तपशील पुढीलप्रमाणे –

१. 'बियाँड लँग्वेज बॅरिअर्स' या समितीद्वारे ज्ञान प्रबोधिनी निगडी येथील ७० विद्यार्थ्यांसाठी दूरस्थ पद्धतीने इंग्रजी संभाषण सत्रे झाली.
२. 'प्रेरणा सेतू'द्वारे भारतातील १२ शाळांतून २०० विद्यार्थ्यांसाठी विविध विषयांवर दूरस्थ पद्धतीने ३० मार्गदर्शन सत्रे घेण्यात आली.
३. मराठी वारसा मिळालेल्या अमेरिकेतील मुलांसाठी 'बाल-प्रबोधिनी' या सांस्कृतिक आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठीच्या उपक्रमाद्वारे सुमारे ४० मुलांसाठी विविध विषयांची ५६ सत्रे घेतली. उत्सव आणि सण, ऐतिहासिक आदर्श व्यक्तींची माहिती आणि भारतीय संगीत असे सर्व प्रकार त्यात होते. उन्हाळी शिबिरात माहिती आणि विश्लेषणात्मक विचार पद्धती (Analytical thinking), वारली चित्रकला असे कार्यक्रम होते.
४. फौंडेशनच्या Analytics समितीने यूट्यूबद्वारे ११ कार्यक्रम आणि सुमारे १५ शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी एक परिसंवाद केला. कोविडसंबंधी संशोधनाचा उपक्रम पुढे चालू ठेवला.
५. फौंडेशनची 'IBRETA' समिती आरोग्यसेवा आणि अनुषंगिक शास्त्रात काम करते. या समितीद्वारे यकृत आरोग्य, मासिक पाळीविषयक आरोग्य आणि आहार या विषयांवर सत्रे घेण्यात आली.
६. अनुवाद समितीतर्फे तीन मराठी पुस्तकांचा इंग्रजीत अनुवाद करण्याचे काम सध्या चालू आहे.



# ३२. ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ॲल्युमनाय फौंडेशन (JPPAF)

या वर्षी फौंडेशनने औपचारिक स्थापनेपासून चार वर्षे पूर्ण केली. नियमित व विशेष उद्दिष्ट गटांचे उपक्रम आणि वैविध्यपूर्ण व आनंददायक अशा वार्षिक माजी विद्यार्थी संमेलनाच्या माध्यमातून माजी विद्यार्थ्यांमधील संवाद अधिक वाढला. वर्ष अखेर फौंडेशनचे ४४० औपचारिक सदस्य आहेत व औपचारिक व्यवस्थापनासाठी कार्यकारी समिती आणि मार्गदर्शक मंडळ कार्यरत आहे.

### ❖ नियमित उपक्रम ❖

१. **वृत्तपत्र :** 'JPPAF वार्ता' हे फौंडेशनचे त्रैमासिक वृत्तपत्र आहे. यामध्ये फौंडेशनचे व विशेष उद्दिष्ट गटांचे उपक्रम आणि माजी विद्यार्थी-विद्यार्थिनींचे उल्लेखनीय यश यांचे वृत्तांकन असते. हे वृत्तपत्र नियमित व्हावे आणि त्याचा दर्जा सुधारावा यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

२. **ऐस-पैस गप्पा :** हा कार्यक्रम प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शनिवारी खुल्या आणि अनौपचारिक गप्पांमधून प्रशालेच्या माजी विद्यार्थी-विद्यार्थिनींची विशेष कामगिरी समजून घेण्यासाठी आयोजित केला गेला. या वर्षीचे वक्ते वैज्ञानिक, वैद्यकीय, उद्योजक, नौदल अशा विविध क्षेत्रांतील होते. त्यांनी वैज्ञानिक संशोधन, आंतरराष्ट्रीय क्रीडा कार्यक्रमांचे व्यवस्थापन, नर्मदा परिक्रमा आणि आण्विक पाणबुडी अशा वैविध्यपूर्ण विषयांबद्दलचे अनुभव सांगितले.

### ❖ विशेष उद्दिष्ट गट व व्यावसायिक गट ❖

१. **राष्ट्रीय एकात्मता आणि राष्ट्रीय सुरक्षा :** जातीव्यवस्था, आंतरजाल सुरक्षा, परराष्ट्र धोरण, गाथा आणि इस्लाम यासंबंधीचा अभ्यास करणे, असा गटाचा उद्देश आहे. 'भारतीय नौदल' (कमांडर कुतुहल लिमये), '३७० कलम रद्द झाल्यानंतर जम्मू-काश्मीर मधील बदल' (आयएएस अधिकारी श्री. पांडुरंग पोळे) अशी व्याख्याने आणि मुस्लिम समाज समजून घेण्याच्या उद्देशाने श्रीमती हीना कौसर यांची मुलाखत या वर्षी आयोजित केली होती. अरुणाचल प्रदेशला पाच वेळा भेट देऊन राज्य सरकारच्या 'व्हायब्रंट व्हिलेज प्रोग्रॅम' आणि 'माऊंटन सायकल मॅरॅथॉन' मध्ये सहभाग, तीन स्वयंसेवकांचा ग्रंथालय चळवळ, शैक्षणिक उपक्रम, व्यसनमुक्ती आणि संपर्कवृद्धीसाठी अरुणाचलला प्रवास, ग्लोबंट कंपनी आणि भारतीय सेनादलाच्या मदतीने विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक अभिवृत्ती चाचणी (CoApt Test) आणि करिअर मार्गदर्शन, मणिपूरमधील निर्वासितांच्या शिबिरांमध्ये राहणाऱ्यांसाठी दिवाळी फराळ पाठवण्यासाठी मणिपूरच्या AMAND संस्थेबरोबर समन्वय, प्रा. प्रशांत दिवेकर यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय एकात्मतेवर 'मार्गदर्शक प्रशिक्षण शिबिर' असेही उपक्रम झाले.

२. **कला आणि संस्कृती :** हा गट कलेच्या अभिव्यक्ती आणि रसग्रहणातून आनंद अनुभवण्याची दृष्टी समाजात रुजवण्यासाठी

कार्यरत आहे. या गटाने पुढील कार्यक्रम आयोजित केले – 'प्रिय भाई एक कविता हवी आहे' (कविता सादरीकरण), आषाढीनिमित्त 'आख्यान तुकोबाराय' हे कार्यक्रम, कलेतून व्याधिमुक्ती (डॉ. शीतल हरपळे), छायाचित्रण – कला आणि व्यवसाय (श्री. सतीश पाकणीकर) ही व्याख्याने व प्रतिमा उत्कट चित्रप्रदर्शन (१४० चित्रे व प्रात्यक्षिके)

३. **पर्यावरण :** विवेकानंद केंद्रासह NARDEP येथे गटाने शाश्वत विकासाविषयी जागरूकता आणि शिक्षण यावर कायमस्वरूपी प्रदर्शन तयार करण्यात सहभाग घेतला. श्री. सुनील दाढे (उप–नियंत्रक आणि महालेखापरीक्षक, निवृत्त) यांचे नैसर्गिक संसाधन लेखा (Natural Resource Accounting) यावर सत्र आयोजित केले. शाश्वत विकासावर एक अभ्यासक्रम तयार केला.

४. **उदयोन्मुख तंत्रज्ञान :** या गटाने हरित ऊर्जा शेती, सोयाबीन उगवण चाचणी आणि हरित ऊर्जेचे ब्लॉकचेन आधारित व्यवस्थापन या विषयांवर प्रकल्प हाती घेतले.

५. **आरोग्य आणि स्वास्थ्य :** लसीकरण आणि एकात्मिक औषधांवर चर्चासत्रांचे आयोजन आणि आरोग्य शिक्षण, जागरूकता आणि तपासणीसाठी सत्रे गटाने आयोजित केली.

६. **उच्च शिक्षण आणि मानव संसाधन :** या गटाने भारतीय ज्ञान प्रणाली, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि त्यामध्ये मनुष्यघडणीच्या शिक्षणाचा अंतर्भाव करण्यासाठी सत्रांचे आयोजन केले.

७. **उद्योजक गट :** सर्व वर्गांतील उद्योजकांमधील परस्परसंवाद सुलभ करणे तसेच त्यांच्या व्यवसायांना प्रोत्साहन देणे आणि वाढवणे हे गटाचे उद्दिष्ट आहे. गटाने श्री. राजेंद्र वैद्य यांची नव–उद्योजकांसाठी कार्यशाळा आयोजित केली. व्यवसायाच्या ठिकाणचे अनुभव समजून घेणे, परिचय करून घेणे आणि व्यावसायिक गरजा मांडणे यासाठी तीन मासिक भेटी झाल्या.

८. **कृती गट :** स्वयंसेवकांचा हा गट संकेतस्थळ व्यवस्थापन, आंतरवासिता प्रकल्प सूची, प्रबोधिनीच्या नवीन वास्तू इ. प्रकल्पांसाठी प्रबोधिनीच्या विविध विभागांना मदत करत आहे.

९. मकरंदगडची सहल JPP Trekkers Group गटाने योजली.

१०. पेडल मंडळ या सायकलिंग प्रेमींच्या गटाने ऑगस्ट २३ मध्ये लडाखमध्ये आणि कोकणात सायकल सहल आयोजित केली.

### ❖ वार्षिक माजी विद्यार्थी मेळावा ❖

या वर्षीच्या मेळाव्यात सकाळी उपासनेनंतर युवकांसाठी बेसबॉल आणि युवती गटासाठी झुंबा, थ्रोबॉल या खेळांचे आयोजन करण्यात आले. नंतर महिला उद्योजिकांचा प्रवास समजून घेताना या सत्रात ज्ञानदा देशपांडे (प्रशाला १९८७) यांनी मृणाल जोशी (प्रशाला १९८२, Nichrome India Ltd.च्या CEO आणि उपाध्यक्षा) आणि अपूर्वा कुलकर्णी (प्रशाला १९९३, VK ग्रुपच्या संचालिका आणि संचालन प्रमुख) यांची मुलाखत घेतली. यानंतर विशेष उद्दिष्ट गटांचा वार्षिक आढावा घेण्यात आला. मेळाव्याचा मुख्य कार्यक्रम म्हणजे वाच. रामभाऊ डिंबळे यांचे भाषण! त्यांच्या खास विनोदी आणि भावनिकतेच्या शैलीत त्यांनी प्रबोधिनीच्या मनुष्यघडण आणि राष्ट्रसेवेच्या प्रवासातील प्रसंगांची आठवण करून दिली. सर्व श्रोत्यांना प्रबोधिनीच्या राष्ट्रउभारणीच्या कार्यात आयुष्याच्या सर्व वयोगटांत सहभागी होण्यासाठी प्रेरित केले. संचालक वाच. गिरीशराव बापट यांनी आपले विचार मांडून सत्राची सांगता केली. दिवसाचा शेवट कला गटाच्या भक्तिसंगीत सादरीकरणाने झाला.

### ❖ गुरूपौर्णिमा ❖

फौंडेशन, युवक विभाग आणि युवती विभाग यांनी संयुक्तपणे दि. २ जुलै रोजी गुरुपौर्णिमा कार्यक्रमाचे आयोजन केले होते. अनेक वर्गातील माजी विद्यार्थ्यांनी सराव करून आवडत्या पद्यांचे सादरीकरण केले. श्री. सचिन गाडगीळ यांनी मेळाव्यामागील पार्श्वभूमी स्पष्ट केली. श्री. अभिजित कापरे आणि सौ. सुवर्णाताई गोखले यांनी उपस्थितांना संबोधित केले. काही माजी विद्यार्थ्यांनी प्रशालेच्या खगोलशास्त्र विशेष अभिरूची गटाला एक दुर्बिण आणि पुस्तके देणगी दिली. संचालक वाच. गिरीशराव बापट यांनी राष्ट्रीयदृष्ट्या महत्त्वाच्या विषयांवर कामाची गरज आणि ती कामे प्रबोधिनीचे कार्य म्हणून करणे, वैयक्तिक आणि सामूहिक उत्तम कामगिरी, प्रबोधिनीच्या प्रार्थनेचा अर्थ आणि त्यातील गुण, परंपरांचा आदर करणे आणि स्वतःमध्ये गुरू शोधणे याविषयी उपस्थितांना संबोधित केले.

**प्रतिसादासाठी आवाहन**

१. ज्ञान प्रबाधिनी फौंडेशनबरोबर संपर्क साधण्यासाठी तपशील आणि सामाजिक माध्यमांचे दुवे : Alumni Support Centre: +९१-९५७९९००१२९; ईमेल : support@jppaf.in; संकेतस्थळ : https://www. jppalumni.org/; YouTube : Kala SPG JPPAF, Jnana Prabodhini Prashala, JPP Alumni Foundation; Instagram : @jppafofficial, @kalaspg.jppaf, @ jnanaprabodhiniprashala, @jnana_prabodhini; LinkedIn group: JPPAF - Official Group of JPP Alumnigroups

२. ज्ञान प्रबोधिनीच्या सर्व सदस्यांनी, प्रशालेचे माजी विद्यार्थी–विद्यार्थिनी आणि इतर सर्वांनीही नियमित कार्यक्रमांमध्ये आणि विशेष उद्दिष्ट गटांच्या उपक्रमांमध्ये सहभागी व्हावे आणि वर उल्लेख केलेल्या समाज माध्यमांना follow/subscribe करावे ही नम्र विनंती.

# ३३. एसीआयसी ज्ञान प्रबोधिनी इनोव्हेशन फौंडेशन

नीती आयोगाच्या अटल इनोव्हेशन मिशनच्या मार्गदर्शनाने ज्ञान प्रबोधिनी निगडी येथे अटल सामाजिक नवोन्मेष केंद्र (ACIC) स्थापन करण्यात येत आहे. या कामासाठी एसीआयसी ज्ञान प्रबोधिनी इनोव्हेशन फौंडेशन ही सेक्शन ८ कंपनी स्थापन करण्यात आली. ग्रामीण भागातील स्थानिक प्रश्नांवर नवोन्मेशाचा वापर करून उत्तरे शोधण्यासाठी, त्यांच्या कृतीशील अंमलबजावणीसाठी आणि सामाजिक उद्योजकता विकासासाठी हे केंद्र प्रयत्नशील असेल. या केंद्राच्या पूर्वतयारीच्या कामांना गेल्या वर्षभरात गती मिळाली.

१. **सुकाणू समिती :** नियोजन व प्रशिक्षण साहित्य निर्मितीसाठी ही समिती स्थापन करण्यात आली. मनुष्यबळ व्यवस्थापन, विपणन व उत्पादन, अक्षय ऊर्जा, प्रक्रिया विकास, इ. विषयातील तज्ज्ञांनी प्रकल्प व्यवस्थापन आणि उद्योजकता विकास कार्यक्रमाच्या नियोजनात पुढाकार घेतला असून, आर्थिक व साहित्य निर्मितीसाठी मार्गदर्शनही नऊ तज्ज्ञांद्वारे सुरू आहे.

२. **प्रशासन समिती :** सुकाणू समितीतील सहा तज्ज्ञांची प्रशासन समिती तयार करण्यात आली.

३. **विषय तज्ज्ञ समिती :** या प्रकल्पांतर्गत वनस्पती उतीसंवर्धन, सूक्ष्म जीवशास्त्र आणि वनौषधी प्रक्रिया प्रयोगशाळा (फायटोकेमिस्ट्री) या तीन प्रयोगशाळा निर्माण होणार आहेत. यासाठी विषयतज्ज्ञ समिती तयार झाली आहे. या समितीने या प्रयोगशाळांचे व्हीजन अँड मिशन स्टेटमेंट त्याचबरोबर आराखडेही तयार केले आहेत.

४. **निधी संकलन :** देसाई ब्रदर्स लि. यांनी प्रकल्पासाठी निधी भागीदार म्हणून साहाय्य करण्याचे मान्य केले. त्याचबरोबर ज्ञान प्रबोधिनी फौंडेशननेही केंद्राच्या ग्रामीण भागातील उपक्रमांसाठी अर्थसाहाय्य देऊ केले.

५. **मनुष्यबळ विकास :** प्रशासन समितीने चार मुलाखत सत्रांमधून तीन मॅनेजर व तीन यंग प्रोफेशनर्स यांची निवड केलेली आहे.

६. **सहभागी सामाजिक संस्थांबरोबर प्रत्यक्ष काम :** ज्ञान प्रबोधिनी हराळी केंद्र आणि दिशा, तळेगाव या सहभागी सामाजिक संस्थांबरोबर (कम्युनिटी पार्टनर) प्रत्यक्ष कामास सुरुवात केली आहे. ज्ञान प्रबोधिनी हराळी केंद्र येथे तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाने बांधावरील प्रयोगशाळेच्या कामास सुरुवात झाली आहे. याअंतर्गत, शेतात उपयोगी पडणाऱ्या ट्रायकोडर्मा बुरशी संवर्धन करण्याचे प्रशिक्षण हराळी केंद्रामधील दोन व निगडी केंद्रातील दोन कार्यकर्त्यांना देण्यात आले.

दिशा, तळेगाव या संस्थेबरोबर विघटनशील सॅनिटरी नॅपकिनस् बनवण्यासाठीचे युनिट तयार करण्यात आले आहे. तंत्रज्ञान व निर्मितीसाठी यंत्र देणे आणि त्याचे प्रशिक्षणही वात्सल्य फौंडेशनच्या तज्ज्ञांकडून देण्यात आले आहे. तसेच अन्य तज्ज्ञांकडून दिशा संस्थेमधील महिलांना सॅनिटरी नॅपकिनस् बनवण्याचं दोन दिवसीय प्रशिक्षण दिले असून प्रायोगिक स्तरावर निर्मिती सुरू केली आहे.

७. **महत्त्वाची भेट :** 'अॅन ऑटोनॉमस इन्स्टीट्यूट ऑफ मिनिस्ट्री ऑफ न्यू अँड रिन्युएबल एनर्जी'च्या संशोधक आणि नॅशनल इन्स्टीट्यूट ऑफ सोलार एनर्जीच्या डायरेक्टर जनरल डॉ. संगीता कस्तुरे यांनी निगडी येथील कामास भेट दिली. या भेटीत त्यांनी या केंद्राद्वारे ग्रामीण भागांमध्ये अपारंपरिक ऊर्जेच्या संबंधी नवीन काय करता येईल, याविषयी मार्गदर्शन केले.

**प्रतिसादासाठी आवाहन**

ग्रामीण भागात नवोन्मेषी पर्यावरणपूरक उत्पादने तयार करणे, नवोन्मेषी कल्पनांवर रोजगाराच्या तसेच उद्योगाच्या संधी निर्माण करणे, यासाठी प्रशिक्षण कार्यक्रमांसाठी मार्गदर्शक, संयोजक, अर्थसाहाय्यक म्हणून सहभागी होण्यासाठी हार्दिक निमंत्रण!

(संपर्क क्र. : ९८९०५१७७३५)

मातृभूमि हे दैवत येथे स्थापियले-पूजिले
त्याग, पराक्रम, सेवा यांचे त्रिदल पदी वाहिले ।
कर्मसुमातुन ज्ञान-भक्तिचे परिमळ दरवळले
चहू दिशांनी आज विकसती या कमलाची दले ।।

# सन्माननीय देणगीदार

ज्ञान प्रबोधिनीच्या अनेक हितचिंतकांनी सन २३-२४ मध्ये देणग्या दिल्या आहेत. ज्ञान प्रबोधिनी, पुणे न्यासाला ज्यांनी देणगी दिली आहे, अशा देणगीदारांपैकी रु. १०,००० वरील दात्यांचीच नावे यात जागेअभावी दिली आहेत. तथापि सर्वांविषयी मनःपूर्वक कृतज्ञता आहे. (यामध्ये निगडी केंद्राचा देखील समावेश आहे.) अनवधानाने एखादे नाव राहिले असल्यास त्याबद्दल क्षमाप्रार्थी आहोत. ज्या व्यक्तींनी दि. १ एप्रिल २३ ते ३१ मार्च २४ या कालावधीत एकापेक्षा अधिक वेळा देणग्या दिल्या आहेत, त्यांची रक्कम शक्यतो एकत्रित दर्शविली आहे. यासंबंधी आपल्या काही शंका अथवा सूचना असल्यास आपण ज्ञान प्रबोधिनीच्या मध्यवर्ती लेखा कार्यालयात ०२०-२४२०७२२९ या क्रमांकावर संपर्क साधावा. ज्ञान प्रबोधिनीच्या संलग्न न्यासांना दिलेल्या देणग्यांचा उल्लेख त्या-त्या न्यासाच्या वृत्तात स्वतंत्रपणे केला जाईल.

१०,०००/- पर्यंतच्या देणग्यांची एकूण वार्षिक रक्कम रु. २१,४६,०९१.४९ इतकी असून ८८७ दात्यांनी ही रक्कम दिलेली आहे. गेल्या आर्थिक वर्षातील सर्व देणग्यांची एकूण वार्षिक रक्कम रु. १०,८४,२१,५९३.६० इतकी आहे.

### रु. १०,००० प्रत्येकी

१. आपटे जयश्री
२. कडलस्कर सुहास
३. करंदीकर आदित्य
४. कानिटकर ज्योती
५. खरे स्मिता
६. खरे शिरीशा
७. खाडे सतीश
८. गजेंद्रगडकर संध्या
९. गांधी समीर
१०. गाडगीळ दत्तात्रेय
११. गाडगीळ नंदिता
१२. गुजर उर्मिला
१३. गोखले वैजयंती
१४. गोरे विद्या
१५. चाटेकर नागेश
१६. चुटके विनय
१७. जोशी अनंत
१८. जोशी चिन्मय
१९. जोशी प्रसाद
२०. जोशी मंदार
२१. जोशी रोहिणी
२२. टिकेकर स्वाती
२३. टोके मंगेश मुकुंद
२४. डॉ. कर्णे स्वप्नील
२५. डॉ. गायकवाड शीतल
२६. डॉ. गोडबोले श्रीरंग
२७. डॉ. गोडबोले सुनील
२८. डॉ. पाटील वैशाली
२९. डॉ. भिडे अनिल
३०. तुळापूरकर सुनिती
३१. दाते प्राजक्ता
३२. दाते निरामय
३३. दाते शेखर
३४. दामले कपिल
३५. दिघे सचिन
३६. दिघोलकर शीतल
३७. देशपांडे अभिजित
३८. देशपांडे संध्या
३९. धारवाडकर मिलिंद
४०. नरोटे प्रज्ञा
४१. नाडकर्णी वर्षा
४२. नातू वर्षा
४३. निकम भरत
४४. पटवर्धन अलका
४५. पटवर्धन सुरेश
४६. पसायदान एंटरप्रायझेस
४७. पाटील सौरभ
४८. पोंक्षे माधवी
४९. प्रधान संजय
५०. बारमुख आशुतोष
५१. बोरोले अमोल
५२. रायकर सुधीर
५३. राव शुभांगी
५४. लिमये नेहा
५५. लिमये राहुल
५६. वाघमारे आरती
५७. शहापूरकर अनिरुद्ध
५८. समुद्र शशिकांत
५९. साटम संतोष
६०. सादुल प्रमोद
६१. हर्डीकर श्रावण
६२. हळबे विनायक
६३. हिंगणेकर मंदार
६४. श्री. प्रदीप
६५. श्रीम. श्रुती

### रु. १०,००१ ते २०,०००/-

१. अभ्यंकर निरूपमा
२. आगटे शिवप्रसाद
३. आहेर वैशाली
४. इंदापूरकर स्वप्नील
५. एदलाबादकर अतुल
६. करमरकर नीलिमा
७. कसबेकर अखिलेश
८. कानिटकर चिन्मय
९. कापशीकर विवेकानंद
१०. कुमार परिसर
११. कुर्लेकर संविद
१२. कुलकर्णी नरेंद्र
१३. कुलकर्णी सुनीता
१४. कोरेगावकर नितीन
१५. कोल्ले ऋतुजा
१६. खांदवे विनायक
१७. गाढवे दिलीप
१८. गायकवाड शुभम
१९. गारुळे सागर
२०. गुप्ता श्वेता
२१. गोखले योगेश्वर
२२. गोखले रश्मी
२३. गोखले सुजाता
२४. गोडबोले अमित
२५. गोडसे दीपाली
२६. घुले पांडुरंग
२७. चौधरी शिरीष
२८. जोशी मकरंद
२९. जोशी माधव
३०. टिळक श्रिया
३१. टोळ अभया
३२. डांगी गणेश
३३. डुंबरे शैलेश
३४. डॉ. देसुरकर विनायक
३५. डोंगरे यशोधन
३६. थिटे ऋता
३७. दातार रमेश
३८. दाते संयोगिता
३९. दीक्षित मीना
४०. देवगावकर जयंत
४१. देवगावकर सुनीता
४२. देवचके विराज
४३. देवधर विद्यानंद
४४. देवळेकर मनोज

४५. देशपांडे अनघा
४६. देशपांडे धनश्री
४७. देशपांडे शमांगी
४८. देसाई श्रीधर
४९. धेंडे विनित
५०. नलगे भूषण
५१. नालकुर अदिती
५२. पटवर्धन युतिका
५३. पळसकर गिरीश
५४. पाटणकर शिवानी
५५. पाटील संतोष
५६. पारखी आनंद
५७. पारेख पौर्णिमा
५८. पालकर अनिल
५९. पावणसकर सुश्रुत
६०. पाळे प्रणय
६१. पेंढारकर सुहास
६२. पेठकर मनाली
६३. पेठकर संकेत
६४. प्रधान निनाद
६५. फडके आसावरी
६६. बर्वे प्रसाद
६७. बागडे अनंत
६८. बागले लखन
६९. बागाईतकर अमित
७०. बिलुरकर वरूण
७१. बिवलकर सुहासिनी
७२. बोरूडे ज्ञानदेव
७३. बोल्ली अभिषेक
७४. महाजन जयंत
७५. माईणकर सुचेता
७६. मुळे जयंत
७७. राणे चारुदत्त
७८. लिमये अभय
७९. वनपाळ निखिल
८०. विश्वनाथन उमा
८१. वैद्य प्रथमेश
८२. व्यास प्रशांत
८३. शाह जान्हवी
८४. सांभारे कौस्तुभ
८५. साने सतीश
८६. सामक अमृत
८७. सिंगवी उत्तमचंद
८८. सुराणा सागर
८९. सेठिया महेंद्र
९०. सोहोनी रजनी
९१. हर्षे अस्मिता
९२. हुबळीकर प्रदीप
९३. श्रीम. स्वप्ना

## रु. २०,००१ ते ३०,०००/-

१. अदवंत प्राजक्ता
२. आखरे दत्तात्रेय
३. आवटे रवी
४. इंद्राक्षे संगीता
५. ओझर्डे राजश्री
६. कदम ऋत्वी
७. कर्वे नितीन
८. कांबळे परशुराम
९. कानडे तुषार
१०. कानडे सागर
११. कुलकर्णी कविता
१२. कुलकर्णी पराग
१३. कुलकर्णी यशश्री
१४. कुलकर्णी श्रीपाद
१५. कुलकर्णी सौरभ
१६. क्षीरसागर सचिन
१७. खळदकर प्रतिभा
१८. गडीकर विनय
१९. गरदाडे तात्यासाहेब
२०. गांधी जितमन्यु
२१. गाडगीळ अमित
२२. गोखले संजीव
२३. ग्रीनलँड काउंटी सोसायटी
२४. चव्हाण आरती
२५. चावरे संजय
२६. चावरे स्मिता
२७. चिपळूणकर शर्मिष्ठा
२८. जोशी ऋजुता
२९. जोशी पद्मजा
३०. जोशी सुहास
३१. डॉ. कुर्लेकर उत्क्रांत
३२. डॉ. गांधी सचिन
३३. डॉ. गोडबोले गिरीश
३४. डॉ. गोरे सतीशचंद्र
३५. डॉ. जोशी अश्विनी
३६. डॉ. पेंडसे सायली
३७. डॉ. मोघे मृणालिनी
३८. डॉ. रामनवमीवाले मीरा
३९. दांडेकर दिलीप
४०. देशमुख हृषिकेश
४१. धर्माधिकारी राहुल
४२. नवरे अमेय
४३. पटवर्धन वनिता
४४. पालकर विमल
४५. पै नीरज
४६. पोटे पद्मजा
४७. प्रबोधिनी स्केटिंग अकादमी
४८. प्रबोधिनी स्केटिंग क्लब
४९. फडके लता
५०. फाटक अजय
५१. बर्वे संजय
५२. बागुल अनघा
५३. बाठे मनीषा
५४. बिडवाई जयंत
५५. बोकील चैतन्य
५६. बोधनी धनश्री
५७. बोरकर गोपीचंद
५८. भालेराव सुधीर
५९. माने प्रशांत
६०. मिरजकर विभाकर
६१. मोकाशी मनोज
६२. मोडक गौरव
६३. यादव राकेश
६४. रहाळकर स्नेहलता
६५. राजहंस नितीन
६६. राव लक्ष्मीदेवी
६७. राव सुरेश
६८. लिमये मंजुषा
६९. लेले संहिता
७०. वाडेकर अर्चना
७१. वार्डा स्वाती
७२. विभूते रवी
७३. वैद्य प्रद्युम्न
७४. व्यास प्रणोती
७५. शिंदे आशिष
७६. शिंदे गोपाळ
७७. शेटे अजित
७८. संकपाळ सुजाता
७९. सफई वर्षा
८०. सहस्रबुद्धे विद्याधर
८१. सोनी सुचेता
८२. हांडे संगीता

## रु. ३०,००१ ते ५०,०००/-

१. आपटे रवींद्र
२. आवटे किरण
३. उदास विद्या
४. कचरे शामराव
५. कदम हृषिकेश
६. कलशेट्टी विजया
७. काकडे विनायक
८. कामठे विक्रम
९. काळे हेमलता
१०. कुलकर्णी अमर
११. कुलकर्णी अमित
१२. कुलकर्णी रंजना
१३. कुलकर्णी हृषीकेश
१४. कोपरकर माणिक
१५. खांडेकर विलास
१६. गद्रे अमित
१७. गपचूप हिमांशू
१८. जयस्वाल सोनाली
१९. जोशी ओंकार
२०. ठाकूरदेसाई सुरेंद्र
२१. डॉ. केळकर धनंजय
२२. डॉ. गुजराथी अदिती
२३. डॉ. गुप्ता रसिका
२४. डॉ. मोडक मिलिंद
२५. डॉ. रहाळकर जयेश
२६. देवचके कीर्तिकुमार
२७. देशमुख किशोर
२८. नातू जयश्री
२९. पत्की प्रतिक
३०. परांजपे सीमा
३१. पाध्ये कांचन
३२. पिसाळ कोमल
३३. पेठे निनाद
३४. बादरायणी आरती
३५. बारपांडे हृषीकेश
३६. भट सरिता
३७. मांडके सारिका
३८. मोडक आदित्य
३९. राजपूत अनिल
४०. रामटेके उमेश
४१. राव आनंद
४२. लवळेकर अनघा
४३. वाजे विनया
४४. वाटवे प्रकाश

| | | | |
|---|---|---|---|
| ४५. वानखेडे आर्या | ४७. वैद्य सेठिया प्रयाग | ४९. शाह सन्मीत | ५१. सुसर समाधान |
| ४६. वाळुंजकर मयूर | ४८. शहा सुकेत | ५०. सावगावे धनश्री | |

## रु. ५०,००१ ते ९९,९९९/-

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. पटवर्धन आरती | ५०,००१.०० | ९. दगडे किरण | ६०,०००.०० | १७. पटवर्धन संपदा | ७५,०००.०० |
| २. वैद्य प्रिती | ५१,०००.०० | १०. अदवंत बिपीन | ६०,०६०.०० | १८. पारखी वामन | ७५,०००.०० |
| ३. इनामदार अपूर्वा | ५१,००१.०० | ११. बडे शालिनी | ६१,०००.०० | १९. पायगुडे प्रविण | ७५,२००.०० |
| ४. कुलकर्णी विश्वनाथ | ५३,०००.०० | १२. दर्प मिलिंद | ६६,०००.०० | २०. वाव्हळ संदीप | ७६,९६०.०० |
| ५. अहिरे मुकेश | ५५,०००.०० | १३. किर्वे हर्ष | ६७,९२०.०० | २१. गोडबोले प्रज्ञा | ९२,०००.०० |
| ६. माने प्रवीण स्मिता | ५५,०००.०० | १४. येळवंडे संतोष | ७०,०००.०० | २२. कानडे नंदकुमार | ८५,००२.०० |
| ७. फाळके अमोल | ५६,९५०.०० | १५. केळकर आदित्य | ७०,०००.०० | २३. देशपांडे पल्लवी | ८८,१११.०० |
| ८. कुलकर्णी जगजीत | ५७,०००.०० | १६. गायकी दीप्ती | ७५,०००.०० | २४. देशमुख अनिता व नरेंद्र | ९१,०००.०० |

## प्रत्येकी रु. १,००,०००/-

| | | | |
|---|---|---|---|
| १. अत्रे विजयकुमार | ४. डॉ. दांडेकर भूषण | ७. थत्ते निनाद | १०. ब्रिगेडियर पळशीकर रवींद्र |
| २. कोद्रे अंजली | ५. डॉ. मांडके कल्याणी | ८. थत्ते सुहासिनी | ११. ले. कर्नल अभ्यंकर एस एम |
| ३. जोशी वर्षा | ६. डॉ. मेहेंदळे संजय | ९. फाटक माधव | १२. वष्ट वरूण |

## रु. १,००,००१ व पेक्षा अधिक/-

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. धर्माधिकारी गायत्री | १,०५,४५४.०० | १३. कलाटे रोशनी | २,००,०००.०० | २४. थत्ते ललिता | ५,००,०००.०० |
| २. पिंपुडे शिवराज | १,१०,०००.०० | १४. कारिया नितीन | २,००,०००.०० | २५. गुजराथी मोहन | ५,००,०००.०० |
| ३. जोशी सौमित्र | १,१०,०००.०० | १५. पाटील सुरेंद्र | २,००,०००.०० | २६. लिमये शीला | ५,००,०००.०० |
| ४. सेवक गायत्री | १,२०,०००.०० | १६. फाटक अविनाश | २,००,०००.०० | २७. घुगे जगदीश | ५,७८,३३५.०० |
| ५. ओगले मेघना | १,५०,०००.०० | १७. पटवर्धन मिलिंद | २,०५,००२.०० | २८. संत मिलिंद | ६,०१,०००.०० |
| ६. घैसास अमित | १,५०,०००.०० | १८. गोडबोले मंदार | २,०७,०००.०० | २९. गुजराथी नलिनी | ७,०८,०००.०० |
| ७. डॉ. नाईक मधुकर | १,५०,०००.०० | १९. कुलकर्णी विजय | २,०७,०००.०० | ३०. फाटक कल्पना | १०,००,०००.०० |
| ८. लिमये अर्णव | १,५२,५००.०० | २०. मोघे शंतनू | ३,००,०००.०० | ३१. देसाई शालिनी | १०,००,०००.०० |
| ९. चांदोरकर शशांक | १,५७,०००.०० | २१. जोशी अमरेंद्र | ३,५०,०००.०० | ३२. कानिटकर अजित | ११,०१,७५३.०० |
| १०. शिंदे विमल | १,६०,०००.०० | २२. फाटक मृणालिनी | ४,००,०००.०० | ३३. गोगटे आशा | १५,००,०००.०० |
| ११. गाडगीळ सचिन | १,६६,३०४.०० | २३. देसाई वृंदा | ५,००,०००.०० | ३४. देसाई चंद्रशेखर | २२,५०,०००.०० |
| १२. पांगारे चंद्रकांत | १,८०,२०३.०० | | | | |

## न्यास, कंपन्या, फौंडेशन, इ.

| | | | |
|---|---|---|---|
| १. विशाल इंजिनियर्स प्रा. लि. | २६३.०० | १३. चिन्मय मिशन | ५,०००.०० |
| २. श्री मल्टीस्टिक्स अँड लेबल्स प्रा. लि. | १,०००.०० | १४. भारत विकास परिषद पिंपरी चिंचवड | ५,०००.०० |
| ३. इनरव्हील क्लब | १,५००.०० | १५. इनरव्हील क्लब ऑफ मंचर | ५,१००.०० |
| ४. रामकृष्ण विवेकानंद सेवा संस्था | २,०००.०० | १६. मनशक्ती आरोग्य नवीन मार्ग | ५,५००.०० |
| ५. प्रेरणा फाउंडेशन | २,०००.०० | १७. गेटझनर इंडिया प्रा. लि. | ७,०००.०० |
| ६. प्लास्टोटेक इंजिनिअर्स प्रा. लि. | २,०००.०० | १८. बडवे इंजिनियर्स प्रा. लि. | ७,०००.०० |
| ७. स्व-रूपवर्धिनी | ३,०००.०० | १९. कुंदन कार्स प्रा. लि. | ७,५००.०० |
| ८. अमेय फ्लुइड कंट्रोल सिस्टम्स प्रा. लि. | ३,५००.०० | २०. रोटरी प्रगती ट्रस्ट | ८,०००.०० |
| ९. जैन सोशल ग्रुप डायमंड | ४,०००.०० | २१. महाराष्ट्र एक्झिक्युटर ट्रस्टी कंपनी प्रा. लि. | १०,०००.०० |
| १०. ओकरिज इंटरनॅशनल स्कूल | ४,३५०.०० | २२. चिंचवड मल्याळी समाजम् | १०,०००.०० |
| ११. विद्योदय मुक्तांगण परिवार | ५,०००.०० | २३. विजयमाला विद्या मंदिर | १०,०००.०० |
| १२. नातू पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट | ५,०००.०० | २४. अशोक विद्यालय आणि महाविद्यालय | १०,०००.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| २५. पी. एन. गाडगीळ | ११,०००.०० | ४९. श्री समर्थ सेवा मंडळ | ५१,०००.०० |
| २६. नाट्यसंस्कार कला अकादमी | ११,०००.०० | ५०. प्रदीप भारत फाउंडेशन | ७४,०००.०० |
| २७. नृत्य कला मंदिर | १२,०००.०० | ५१. उमदा समाज विकास प्रतिष्ठान | १,००,०००.०० |
| २८. इनरव्हील क्लब ऑफ पुणे | १२,०००.०० | ५२. हरताळकर हॉस्पिटल | १,००,०००.०० |
| २९. केंब्रिज माध्यमिक विद्यालय | १२,१५०.०० | ५३. दाबके ट्रस्ट | १,००,०००.०० |
| ३०. डॉ. श्रीमती अंबुताई नागेशराव मारुळकर ट्रस्ट | १२,५००.०० | ५४. खुशबू चॅरिटेबल ट्रस्ट | १,०५,८००.०० |
| ३१. ज्येष्ठ नागरिक महासंघ | १३,०००.०० | ५५. पर्सिस्टंट फाउंडेशन | १,२८,७६०.०० |
| ३२. श्री श्री ज्ञान विकास केंद्र | १५,०००.०० | ५६. कम्युनिटीज ऑफ लर्निंगसाठी फाउंडेशन | १,४०,०००.०० |
| ३३. ज्ञान प्रबोधिनी सेवक सहकारी पतसंस्था | १५,०००.०० | ५७. जनता ग्राहक मध्यवर्ती सह.संघ मर्या. | १,४०,०००.०० |
| ३४. ऋतुपर्ण नारायण नाईक एच्यूएफ् | १७,०००.०० | ५८. रोटरी क्लब ऑफ पुणे शनिवारवाडा | १,५०,०००.०० |
| ३५. ऑनलाइन गिव्हिंग फाउंडेशन | १९,१४२.०० | ५९. ज्ञान प्रबोधिनी आयुर्विज्ञान न्यास | १,८०,०००.०० |
| ३६. शिवाई बालक मंदिर ट्रस्ट | २०,०००.०० | ६०. मिस इंडिया प्रा. लि. | २,००,०००.०० |
| ३७. शार्प अभियांत्रिकी | २०,०००.०० | ६१. तामिळनाडू आर्य समाज शैक्षणिक संस्था | ३,००,०००.०० |
| ३८. पिंपरी चिंचवड जिल्हा जिम्नॅस्टिक असो. | २०,०००.०० | ६२. फ्रेम्स प्रोसेस अँड एनर्जी सिस्टिम्स् इं.प्रा.लि. | ३,२०,०००.०० |
| ३९. रा. स्व. सं. भारत माता शाखा | २२,५००.०० | ६३. रोटरी क्लब ऑफ पुणे गांधी भवन | ३,६९,६५९.०० |
| ४०. श्री भगीरथ तापडिया ट्रस्ट | २५,०००.०० | ६४. श्री विवेकानंद संशोधन प्रशिक्षण संस्था | ३,७५,०००.०० |
| ४१. जिव्हाळा फाउंडेशन | २५,०००.०० | ६५. अक्षय फौंडेशन | ५,००,०००.०० |
| ४२. जनता सहकारी बँक लि. | २५,०००.०० | ६६. एन. जी. परांजपे प्रतिष्ठान | ६,८०,०००.०० |
| ४३. डी. व्ही. ब्रह्मे सन्स प्रा. लि. | २५,०००.०० | ६७. सायबेज आशा ट्रस्ट | ९,००,७२०.०० |
| ४४. प्राधिकरण ज्येष्ठ नागरिक संघ | २७,०००.०० | ६८. सर दोराबाजी टाटा ट्रस्ट | १०,००,०००.०० |
| ४५. तरुण विकास मंडळ | ४०,०००.०० | ६९. रतीलाल भगवानदास कन्स्ट्रक्शन कं. | २०,००,०००.०० |
| ४६. दसॉल्ट सिस्टिम्स् फाउंडेशन | ४३,०००.०० | ७०. प्रबोध अर्थ संचय प्रा. लि. | २६,००,०००.०० |
| ४७. व्हील्स ग्लोबल फाउंडेशन | ५०,०००.०० | ७१. मातृमंदिर विश्वस्त संस्था | ४५,९५,०००.०० |
| ४८. कॉटमॅक इलेक्ट्रॉनिक्स प्रायव्हेट लिमिटेड | ५०,०००.०० | | |

## सीएस्आर देणगी

| | | | |
|---|---|---|---|
| १. हेल्थएज टेक्नॉलॉजीज इंडिया प्रा. लि. | ४,१२,५००.०० | १०. मर्क्स् ग्लोबल सर्व्हिसेस सेंटर्स (इ.) प्रा. लि. | १८,००,०००.०० |
| २. ॲफकॉन इन्फ्रास्ट्रक्चर लि. | ५,६०,०००.०० | ११. सीगेट टेक्नॉलॉजी एचडीडी प्रा. लि. | १९,३०,०००.०० |
| ३. अग्रेको एनर्जी रेंटल इंडिया प्रा. लि. | ६,८६,१५८.०० | १२. साई सर्व्हिस प्रा. लि. | २१,१५,७२०.०० |
| ४. पर्सिस्टंट फाउंडेशन | ७,५०,०००.०० | १३. कोफोर्ज बिझनेस प्रोसेस सोल्युशन्स प्रा. लि. | ४७,००,०००.०० |
| ५. बोस्टन वैज्ञानिक टेक्नॉलॉजी अँड इंजिनिअरिंग सर्व्हिसेस प्रा. लि. | ८,८५,०००.०० | १४. देसाई ब्रदर्स लिमिटेड | ५०,००,०००.०० |
| ६. इनटॉक्स प्रा. लि | ११,००,०००.०० | १५. एक्झॉटिक फ्रुट्स प्रा. लि | ५०,००,०००.०० |
| ७. व्हीआरव्ही एशिया पॅसिफिक प्रा. लि | १२,५८,९७०.०० | १६. ग्लोबंट इंडिया प्रा. लि | ५२,७१,७३७.०० |
| ८. पॉलिवन पॉलिमर्स इंडिया प्रा. लि | १२,७१,५००.०० | १७. केपीआयटी टेक्नॉलॉजीज लि. | ५५,००,०००.०० |
| ९. प्रिशंट टेक्नॉलॉजीज प्रा. लि | १५,३०,०००.०० | | |

**सीएस्आर इन्व्हॉईस**

| | |
|---|---|
| १. भारत फोर्ज लि. | ३२,७९,५७४.०० |

## परदेशी योगदान

| | | | |
|---|---|---|---|
| १. इंगळे शोभा | १०,०००.०० | ६. यूके ऑनलाइन गिव्हिंग फौंडेशन मॅनेजमेंट | ३,९३,८१६.११ |
| २. भागवत सविता पांडुरंग | १,२८,००१.०० | ७. ग्रेटर पॅसिफिक कॅपिटल मॅनेजमेंट | ८,१५,८७३.०० |
| ३. साठे प्रभाकर | १,३०,०००.०० | ८. ब्लूम कम्बशन इं. प्रा. लि. (सीएस्आर) | २२,१९,३३०.०० |
| ४. डॉ. गोखले-गोडबोले आभा | १,५५,०९९.०० | ९. कृष्णमूर्ती मीरा | ५०,००,०००.०० |
| ५. चॅरिटीज एड फाऊंडेशन ऑफ अमेरिका | १,७१,०११.०० | १०. ज्ञान प्रबोधिनी फौंडेशन | १,५५,३७,२२७.०० |

ग्राम प्रबोधिनी विद्यालयाचे विद्यार्थी
आ. संचालकांची मुलाखत घेताना




ज्ञान प्रबोधिनी फौंडेशन सहविचार समितीची शिवापूर केंद्राला भेट




हराळी मधील पूरक शिक्षण उपक्रम





निगडी केंद्रातील वार्षिक स्नेहसंमेलन



बदलापूर येथील उपक्रमांची क्षणचित्रे



सोलापूर मधील विविध उपक्रमांची क्षणचित्रे



दिल्ली येथील प्रदर्शनात प्रशालेच्या एलिफायर प्रकल्पाच्या स्टॉलला मा.पंतप्रधानांची भेट



मुंबई येथील स्नेहमेळाव्यात मा. राज्यपाल रमेशजी बैस व चंद्रकांतदादा पाटील यांची भेट



अरुणाचल प्रदेश – केंद्रीय लोकसेवा आयोग प्रशिक्षण वर्ग २०२३–२४ समारोप प्रसंगी उपस्थित मान्यवर व विद्यार्थी



धाराशिव जिल्हा अभ्यास सहलीदरम्यान जिल्हाधिकारी मा.सचिन ओंबासे यांची भेट घेताना नेतृत्व संवर्धन केंद्रातील विद्यार्थी



स्त्री शक्ती प्रबोधन अभ्यास दौऱ्यात वर्धा येथे पवनार आश्रमात मा.गौतमजी बजाज यांची भेट

# ज्ञान प्रबोधिनी

५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.
दूरभाष क्र. : (०२०) २४२०७०००/००१
www.jnanaprabodhini.org contact@jnanaprabodhini.org